# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग-२ : राज्यशास्त्र

# सामाजिक सलोखा आणि शांतता

## (Social Harmony and Peace)

सत्र ३ : पेपर E-30

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२२

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ : सामाजिक सलोखा आणि शांतता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89345-01-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
  राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण–इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज–४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक E-30 सत्र ३ साठी 'सामाजिक सलोखा आणि शांतता' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सामाजिक सलोखा आणि शांतता यामध्ये भारतीय परंपरेतील सांप्रदायिक सद्भाव, आधुनिक भारतातील धार्मिक सलोखा, संमिश्र राष्ट्रवाद व जातीय सलोखा, बहुजन राष्ट्रवाद आणि जातीय सलोखा या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. भारती पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. रविंद्र भणगे, जेष्ठ अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, प्राचार्य डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी, विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) अशोक चौसाळकर,**
४१६ आर. के. नगर हौसिंग सोसायटी नं. ६,
पाचगाव, कोल्हापूर.

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सामाजिक सलोखा आणि सलोखा**
**एम. ए. भाग-२ : राज्यशास्त्र ऐच्छिक पेपर** E-30

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
| --- | --- |
| **डॉ. किशोर खिल्लारे**<br>सेंटर फॉर स्टडी ऑफ सोशल एक्सक्लुजन ॲण्ड एन्क्युझिव्ह पॉलिसी,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. मल्लिकार्जुन बंदरे**<br>राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज सदरबाजार, कोल्हापूर | २ |
| **डॉ. अजितानंद जाधव**<br>४८, समर्थनगर, दहिवडा, ता. माण, जि. सातारा | ३ |
| **डॉ. सुर्यकांत गायकवाड**<br>सातारा विभागीय समन्वयक, दूरशिक्षण केंद्र,<br>‘कर्मवीर छाया’ बॅरिस्टर पी. जी. पाटील बंगला,<br>५२९ अ पारसनीस कॉलनी, पवई नाका सातारा | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) अशोक चौसाळकर,**
४१६ आर. के. नगर हौसिंग सोसायटी नं. ६,
पाचगाव, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतीय परंपरेतील सांप्रदायिक सद्‌भाव | १ |
| २. | आधुनिक भारतातील धार्मिक सलोखा | ५२ |
| ३. | संमिश्र राष्ट्रवाद व जातीय सलोखा | ७३ |
| ४. | बहुजन राष्ट्रवाद आणि जातीय सलोखा | ९६ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# भारतीय परंपरेतील सांप्रदायिक सद्भाव

१.१. प्रस्तावना

१.२. उद्दिष्ट्ये

१.३. विषय विवेचन

- १.३.१ सांप्रदायिक सद्भाव
- १.३.२ सांप्रदायिक सद्भाव व असहिष्णूता
- १.३.३ धार्मिक सहिष्णूतेचा आधार
- १.३.४ भारतातील सांप्रदायिक सद्भाव

१.४. भारतातील धर्म आणि संस्कृती

१.५. शांततेचे तत्त्वज्ञान

- अ) उपनिषद
- ब) बौध्द
- क) जैन

१.६. भक्ती चळवळ

- अ) मुस्लिम सुफी संत परंपरा
- ब) वारकरी संप्रदाय

१.७. सारांश

१.८. अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना

वर्तमान जगातील अनेक देशामध्ये वाढत असलेली सांप्रदायिकता व तिचे परिणाम लक्षात घेता 'सांप्रदायिक सद्‌भावाची आवश्यता आधोरेखित होत आहे. 'सांप्रदायिक सद्‌भाव' हा इंग्रजी शब्द Communal Harmony चा मराठी अनुवाद आहे. याचे 'जातीय सलोखा' किंवा 'धार्मिक ऐक्य' असेसुध्दा भाषांतर केले जाते. 'सांप्रदायिक सद्‌भाव' हा भारतीय समाजाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ठ्य आहे. भारत हा असा सामाजिक देश आहे की ज्या देशामध्ये गत हजारो व वर्षांपासून अनेक जाती, धर्म आणि वंशाचे लोक एकत्रितरित्या राहात आले आहेत. या लोकांच्या धार्मिक प्रथा, परंपरा, आचार-विचार, संस्कृतीसुध्दा विभिन्न आहेत. परंतु; या विभन्नतेमध्ये असणारी एकता हा भारतीय समाजाचा वास आहे व त्यामुळेच भारतातील सांप्रदायिक सद्‌भाव हा जागतिक लोक समुदायापुढील आदर्श आहे.

भारताबरोबरच जगातील वेगवेगळां देशांमध्ये धर्म प्रवर्तनाबरोबरच विविध धर्म आणि संस्कृती यांच्यामध्ये आदान-प्रदानसुध्दा झाल्याचे दिसून येते. भारतामध्येसुध्दा अशा प्रकारची प्रक्रिया प्राचीन काळापासून झाली आहे. हिंदू, जैन, बौध्द, ीख इत्यादी धर्मांची निर्मिती तर याच देशामध्ये झालेली आहे, त्यामुळे या देशाचे स्वरूप बहुधर्मिय होणे ही अपरिहार्यता होती. या धर्मांबरोबरच मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, यहुदी इत्यादी धर्मांचे लोकसुध्दा या देशामध्ये आले व त्यांनी येथील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीच्या आधारे आपापल्या धर्मविचार व तत्त्वांचा या देशामध्ये प्रचार व प्रसार केला. त्यामुळे या देशाचे स्वरूप बहुधर्मिय असणे अपरिहार्य आहे. त्यामुळेच स्वतंत्र भारतातील आजच्या भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप धर्मनिरपेक्ष बनले आहे. भारतीय संविधानाच्या भाग ३ मधील कलम १५ नुसार राज्य कोणत्याही नागरिकाच्या विरूध्द केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करणार नाही असे स्पष्टरित्या नोंदविण्यात आले आहे.

भारतीय समाजामध्ये प्राचीन काळापासून आज पर्यंत विविध धर्म, विचार श्रध्दा, परंपरा, आचार-विचारांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत यास प्रमुख कारण म्हणजे येथे अस्तित्वात असलेला सांप्रदायिक सद्भाव होय. भारत देशामध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौध्द, पारशी, जैन इत्यादी अनेक धर्म अस्तित्वात आहे. या सर्व धर्मांच्या अनुयांयाच्या श्रध्दा, परंपरा, आचार-विचारांमध्ये कमालीचे वैधर्म्य असले तरी त्यांच्यामध्ये अन्य धर्मियांच्याप्रती आदर व सन्मान दिसून येतो. हिंदूच्या सण व उत्सवामध्ये मुस्लिम धर्मियांच्याबरोबरच अन्य धर्मातील लोकसुध्दा सहभागी होतात. तसेच मुस्लिमांच्या सणांमध्ये हिंदूबरोबरच अन्य धर्मातील लोक सहभागी होऊन तो साजरा

करतात. ख्रिश्चनांचा नाताळ सण भारतातील अन्य धर्मियांच्याकडून मोठाा उत्साहात साजरा केला जातो. तथागत गौतम बुध्द आणि वर्धमान महावीर यांच्याप्रति ज्ञानी महापुरूष म्हणून प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये आदर व सन्मान आहे. भारतातील सांप्रदायिक सद्भाव टिकून राहण्यामध्ये या देशातील धर्म व संस्कृती या घटकांचे महवाचे योगदान आहे.

## १.२ उद्दिष्ट्ये

१. सांप्रदायिक सद्भाव ही संकल्पना व विचार समजून घेणे.

२. भारतातील सांप्रदायिक सद्भाव व परंपरा समजून घेणे.

३. सांप्रदायिक सद्भावामध्ये धर्म आणि संस्कृतीचे योगदान समजून घेणे.

४. सांप्रदायिक सद्भाव निर्मितीच्या आवश्यकतेसाठी मांडण्यात आलेले शांततेचे तवज्ञान व विचार समजून घेणे.

## १.३ विषय विवेचन

### १.३.१ सांप्रदायिक सद्भाव

सांप्रदायिक सद्भाव म्हणजे जातीय अथवा धार्मिक एकोपा किंवा ऐक्य होय. सांप्रदायिक या शब्दांचा सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे अर्थ स्पष्ट होतो. 'सांप्रदायिक' म्हणजे 'विशेष धार्मिक मत' होय. बृहत हिंदी कोशामध्ये संप्रदाय या शब्दाचे 'गुरू परंपरेनुसार प्राप्त मंत्र', 'सिध्दांत इत्यादी किंवा परंपरागत विश्वास व प्रथा' असे अर्थ दिसून येतात. 'सद्भाव' या शब्दास 'चांगुलपणा', 'सज्जनता', 'दयाळूपणा' इत्यादी अर्थाने परिभाषित केले जाते. म्हणजेच दुसऱ्यांच्याप्रती चांगली भावना बाळगणे. 'मर्यादित संदर्भात या ठिकाणी संप्रदाय म्हणजे एखादा विचार, सिध्दांत, अथवा परंपरागत श्रध्दा होय आणि 'सद्भाव' या शब्दामध्ये विभिन्न संप्रदायांमध्ये आपापसात सुसंवाद असणे अपेक्षित आहे.' मर्यादित अर्थाने आपण 'संप्रदाय' शब्दास विशिष्ठ विचार, सिध्दांत, परंपरागत विश्वास अथवा प्रथा यावर आधारीत 'विशेष धार्मिक मत' असे परिभाषित करू शकतो तर 'सद्भाव' या संज्ञेमध्ये वेगवेगळा संप्रदायांचा आपापसातील संपर्क अपेक्षित आहे. सांप्रदायिक सद्भावामध्ये संस्कृतीचीसुध्दा एक महत्त्वपूर्ण भूमिका असते त्याकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही. म्हणजेच सांप्रदायिक सद्भावामध्ये धर्मा-धर्माध्ये एकत्मता, सलोखा अथवा सुसंवाद असावा

लागतो. समाजातील कोणतीही व्यक्ती असहिष्णूता व हिंसाचारी वातावरणामध्ये जीवन जगू शकत नाही. आज कोणत्याही देशाची एकात्मतेची वीण कायम ठेवण्यासाठी सांप्रदायिक सद्भाव ही मूलभूत गरज बनली आहे. सांप्रदायिक सद्भावाचा शब्दश: अर्थ पाहता असे दिसून येते की, भिन्न धर्म, संप्रदाय, जात, लिंग, वंश आणि पार्श्वभूमी असलेले लोकांनी एकमेकांशी प्रेमाने, विश्वास व शांततापूर्णरीत्या सहवास करणे होय.

सांप्रदायिक सद्भावाचे स्वरूप समाजातील लोकांच्या चांगुलपणा, नैतिकता, सदाचार आणि सद्भाव इत्यादीं नैतिक गोष्टींवर आधारलेले आहे व सांप्रदायिक सद्भावाच्या निर्मितीमध्ये या गोष्टींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जर लोक अविवेकी, दुराचारी व संकुचित मनाचे असतील तर सांप्रदायिक सद्भाव निर्माण होऊच शकत नाही. सांप्रदायिक सद्भावामध्ये धार्मिक अथवा जातीय कट्टरतावाद, हिंसाचार, अन्य धर्म, पंथीयांच्या परंपरा व श्रध्दा आणि संस्कृतीच्या प्रती अनादर अथवा हीनत्वाच्या भावनेला थारा नसतो कारण या गोष्टींच्यामुळे सांप्रदायिक सद्भाव निर्मितीमध्ये अडथळे निर्माण होतात. सांप्रदायिक सद्भावाच्या अभावापोटी समाजामध्ये अराजकता, अंदाधुदी, हिंसाचार, दु:ख, दैन्य इत्यादी गोष्टींची निर्मिती होते व अशा अराजक स्थितीमध्ये लोकांना जीवन जगणे असह बनते, या अराजक स्थितीस 'सांप्रदायिकता अथवा धार्मिक असहिष्णूता' असे म्हणतात. सर्वधर्म समभाव ही भावना सांप्रदायिक सहिष्णूतेचेच एक रूप आहे. सर्व धर्मांच्या प्रति समान भाव असणे म्हणजे 'सर्वधर्म समभाव' होय. विश्वातील सर्व धर्म व धर्मग्रंथ आणि संस्कृतीमध्ये नैतिक मूल्यांचे प्रतिपादन करण्यात आले आहे. मानवी मूल्यांची प्रस्थापना करणे हाच सर्व धर्मांचा मुख्य उद्देश आहे. हिंदू धर्म ग्रंथांमध्ये मांडण्यात आलेली ''हे विश्वचि माझे घर'' अथवा ''सर्वेत्र सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया:'' ही भावना म्हणजे सांप्रदायिक सद्भाव होय.

समाजामध्ये शांततामय सौहार्दपूर्ण वातारणाच्या निर्मितीसाठी जनमाणसांमध्ये सहिष्णूतेची भावना प्रतिष्ठित करणे आवश्यक असते. सांप्रदायिक सहिष्णूतेची आवश्यकता समाजातील वर्ग संघर्श संपविण्यासाठी नव्हे तर समाजाचे मानसिक संतुलन आणि सौहार्दपूर्ण वातावरण बनविण्यासाठी महत्त्वाची आहे. सहिष्णूतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एखाद्या देशास आपल्या विकास व प्रगतीसाठी ज्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय शांततेची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे अंतर्गत शाांततासुध्दा महत्त्वपूर्ण असते व ही अंतर्गत शांतता पारस्पारिक सौहार्दपूर्ण वातावरणाद्वारे निर्माण होणाऱ्या सहिष्णतेमधूनच शक्य आहे. मानवतावाद व उदारमतवादासाठीची धार्मिक सहिष्णूता ही पूर्वपिठीका आहे. धार्मिक सहिष्णूतेशिवाय मानवता व उदारमतवाद अशक्य आहे. सहिष्णूतेचा शब्दश: अर्थ समाजातील लोकांचा समुदाय, दुसऱ्या समुदायातील मूल्य, विचार, प्रथा, परंपरा, नैतिकता, मानदंड,

आस्था, विश्वास इत्यादी भिन्न असूनसुध्दा दोन्ही समुदाय एक-दुसऱ्यांचा स्वीकार करतात. जेव्हा समाजातील एका समुदायाकडून दुसऱ्या समुदायांचे विचार, विश्वास, व्यवहार, परंपरा, प्रथा इत्यादींना स्वतंत्र मान्यता मिळत नाही तेव्हा असहिष्णूता निर्माण होते. सहिष्णूता आणि असहिष्णूता या दोन्ही एक दुसऱ्यांच्या विरोधात आहेत. भारतामध्ये कधी-कधी ''धर्मनिरपेक्षता या शब्दाचा वापर ''सर्वधर्म समभाव'' या अर्थामध्येसुध्दा केला जातो. ''सर्वधर्म समभाव'' याचा अर्थ आहे सर्व धर्मांचा बरोबरनी सम्मान करणे. गांधीनीसुध्दा सर्वधर्म समभावाचे समर्थन केले आहे: ''माझा स्वत:चा असा विचार आहे की सर्व महान धर्म मूलत: समान आहेत. आपण दुसऱ्या धर्माचा अशा प्रकारे आदर केला पाहिजे जसा आपण स्वत:च्या धर्माचा सम्मान करतो.''(रमेन्द्र, २००६, १९३)

## १.३.२ सांप्रदायिक सद्भाव व असहिष्णूता

सांप्रदायिक सद्भाव ही संकल्पना समजून घेण्यासाठी सर्वप्रथम सांप्रदायिकता अथवा जमातवाद म्हणजे काय? हे समजून घेणे आवश्यक आहे. सांप्रदायिक सद्भाव व सांप्रदायिकता किंवा जमातवाद या दोन्ही संकल्पना परस्पर विरूध्द आहे. सांप्रदायिकता म्हणजे एका धार्मिक समुदायाचा दुसऱ्या धार्मिक समुदायाच्या आणि राष्ट्राच्या विरूध्द उपयोग करणे म्हणजे सांप्रदायिकता होय. एखाद्या धर्मातील नैतिक मूल्ये, प्रथा, परंपरा अथवा श्रध्दा आणि विश्वास या नैतिक गोष्टींचा सांप्रदायिकतावादामध्ये मोडतोड करून विकृतपणे वापर केला जातो. जमातवादाच्या मूळाशी अतेरिकी मूलत्त्ववाद असतो. याउलट, सांप्रदायिक सद्भाव ही विचारसरणी अथवा संकल्पना आहे. समाजातील सर्व धर्म, वंश, जात समुहातील लोक आणि त्यांच्या श्रध्दा व उपासना, प्रथा व परंपरा, आचार व विचार इत्यादींविषयी आदर व सन्मान राखला जाणे हे सांप्रदायिक सद्भावाचे मूलभूत वैशिष्ठ्ये आहे त्यामुळेच भारतीय समाजामध्ये प्राचीन काळापासून अनेक धर्म, जात व वंश संप्रदायाचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत.

जेव्हा सहिष्णूता आणि असहिष्णूतेचा वापर राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक रूपांमध्ये केला जातो तेव्हा असे दिसून येते की तो समाज सामाजिक एकात्मतेच्या अनुशंगाने सहिष्णूता व असहिष्णूतेच्या प्रति किती सहनशील व असहनशील आहे. समाजामध्ये असहिष्णूतेच्या विचारांमध्ये वाढ होते तेव्हा समाजातील एकात्मतेच्या स्वरूपावर आघात होतो. तर सहिष्णूतेच्या विचारांमध्ये वृध्दि होते तेव्हा विविधतेतील एकत्मतेची भावना वाढीस लागते. सांस्कृतिक आणि धार्मिक असहिष्णूता व्यक्तिगत नागरिकांचे अधिकार आणि स्वातंत्र्यास बाधा पोहचविणारी असते. समाजामध्ये असहिष्णू व्यक्तिंच्या संख्येमध्ये वाढ झाली तर नागरिकांची प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य धोक्यात येते. जेव्हा नागरिकांचे हित, प्रतिठा, आणि स्वातंत्र्य धोक्यात येते तेव्हा

राष्ट्रहितासमुध्दा धोका निर्माण होतो. मुलांना त्यांच्या बालपणापासून आपल्या जात अथवा धर्माचे शिक्षण दिले जाते. त्याला असे सांगितले जाते की, आपलाच धर्म अथवा जात श्रेष्ठ आहे व इतर धर्म निकृष्ट आहेत. तेव्हापासूनच त्याच्या मनामध्ये धार्मिक असहिष्णुतेची भावना वाढीस लागते व ही भावना समाजामध्ये मोठा प्रमाणात घृणा, अपराध आणि भेदाभेद निर्माण होण्यास तसेच इतर लोकांचे सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी प्रकारचे अधिकार नाकारण्यास कारणीभूत ठरते. असहिष्णूतेची भावना इतर धर्मिय लोकांच्या प्रथा-परंपरा, श्रध्दा, विश्वास, विचार इत्यादींचा सन्मान, प्रशंसा, आदर इत्यादींचा स्वीकार करण्यास नकार देते. तर याच्या उलट दुसरी बाजू म्हणजे सहिष्णूता आहे. सहिष्णूततेची भावना विविधता असली तरी विविधतेतसुध्दा एकता प्रस्थापित करण्यासाठी प्रेरणादायक ठरते. सांप्रदायिक सद्भावामध्ये 'जगा आणि जगू द्या' या सिध्दांताचा पुरस्कार केला जातो. विलियम यूरी यांच्या मते, सहिष्णूता केवळ एक-दुसऱ्यांच्या बरोबर राहण्याची परवानगी देत नाही किंवा अन्यायकारक स्थितीत उदासिन रहात नाही तर प्रत्येक व्यक्तीचा सन्मान आणि आवश्यक माणुसकी दाखविते. जेव्हा प्रत्येक आत्मसाक्षातकारासाठी प्रत्येक पर पदार्थाच्या प्रति ममत्व आणि आसक्तिचा त्याग करतो तेव्हा तो राग-द्वेषापासून मुक्त होतो, तो आत्मचेतनेशी जोडला जातो, शेवटी त्याच्या मनामध्ये कोणाच्याही प्रति राग किंवा द्वेषाची भावना शिल्लक राहत नाही. अशा प्रकारे प्रत्येक साधक सृष्टीतील प्रत्येक प्राण्यास आत्मतुल्य समजतो तेव्हा सुध्दा त्याचा कोणाशी राग अथवा द्वेष शिल्लक राहात नाही. समस्त प्राण्यांच्या प्रति मैत्रीभाव, प्रेमभाव तथा समभाव असणे म्हणजेच धर्म होय आणि यादृष्टीतून 'सर्वधर्मसमभावातून' जर विशेषणास काढून टाकले तर शिल्लक राहतो तो म्हणजे 'धर्मभाव'. असहिष्णूतेमध्ये भेद दृष्टी असते तर धर्मामध्ये 'अभेद'. विश्वामध्ये याच 'अभेद' दृष्टिचा विकास होणे आवश्यक आहे. विश्वातील प्रत्येक धर्मामध्ये नैतिक मूल्यांचे प्रतिपादन करण्यात आले आहे, मानवी मूल्यांचा समावेश करण्यात आला आहे, मनुष्य जातीमध्ये सदाचरणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या नैतिक मूल्यांना, सद्गुणांना आणि सदाचारास व्यक्त करण्याचे शब्द वेगवेगळे असल्यामुळे बाह्यदृष्ट्या आपणांस प्रत्येक धर्माच्या साधनेमध्ये भिन्नता दिसून येते. तात्विकदृष्ट्या पाहिले असता सर्वच धर्म मनुष्याच्या चांगुलपणाचे सुदर्शन घडवितात, तसेच सामाजिक जीवनामध्ये शांतता, बंधुभाव, प्रेम, अहिंसा आणि समताधिष्ठित विकासाचा आग्रह धरतात. सर्वधर्म-समभाव या उदात्त चेतनेचा विकास शक्य आहे. मतभिन्नता हे आमच्या ज्ञान आणि त्याच्या प्रस्तुतिकरण शक्तीच्या अपूर्णतेचे कारण आहे. प्रत्येक तत्त्व विचारावर अनेक दृष्टिकोनातून विचार संभव आहे. एकांगी प्रतिपादनामुळे ते तत्त्व विचार परस्पर विरोधी प्रतीत होतात. या परस्पर विरोधांचे समन्वयाद्वारे शमन करणे शक्य आहे. धार्मिक सहिष्णूता निर्माण करण्याचे विविध मार्ग विद्वान लोकांनी सांगितलेले आहेत. विद्वानांच्या

मते, जगातील सर्व धर्मग्रंथांचा सार एकच आहे. गीता, बायबल, गुरूग्रंथसाहेब या सर्व धर्मग्रंथांमध्ये एकाच परमपिता अशा ईश्वराचचा शोध घेतला जातो. जगातील श्रेष्ठ आणि तथाकथित निकृष्ठ समजले जाणारे दोन्ही प्रकारचे धर्म एकाच पातळीवर उभे आहेत. सर्व धर्मांमध्ये एक गोष्ट समान आहे ती म्हणजे सार्वजनिक गुन्हेगारी. अध्यात्मिक प्रवचन ऐकणे चांगले वाटते परंतु; रोजच्या जीवनामध्ये आपला ज्या धर्माशी संबंध येतो, तो प्रचंड आक्रमक, खतरनाक, क्रुर आणि अश्लील असतो जो उन्मादियांना काहीही करण्याची परवानगी देतो आणि त्यामुळे नागरिकांच्या शांततापूर्णरित्या जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे हनन होते.

धार्मिक दंगे हे असभ्यतेचे परमोच्च टोक म्हणावे लागेल. या धार्मिक दंग्यांमध्ये दंगेखोर लोक इतर धर्म समुदायातील लोकांच्या जीवास, मालमोस किंवा प्रतिष्ठेस फक्त ती व्यक्ती आपल्या धर्मातील नाही या कारणास्तव हानी पोहचवितात. कोणत्याही सभ्य समाजामध्ये खास करून अशा धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही राज्यव्यवस्था असलेल्या समाजात ज्यामध्ये विभिन्न धर्माला मानणारे आणि कोणत्याही धर्माला न मानणारे मानवतावादी लोक राहतात, त्या समाजातील नागरिकांच्या शातंतामय सहअस्तित्वासाठी धार्मिक सहिष्णूता एक आवश्यक अनिवार्य गोष्ट आहे. धार्मिक सहिष्णूतेची आवश्यकता आणि महत्त्व यामधून समजून येते. कोणत्याही धर्माच्या धर्मग्रंथांतील श्रध्दा आणि मूलभूत विश्वासांचे जेव्हा रूढी-परंपरांमध्ये रूपांतर होते, तेव्हा या रूढी व परंपरा धार्मिक सहिष्णूता प्रस्थापनेच्या मार्गातील अडथळा ठरतात.

कोणत्याही एका धर्मास मानणारी व्यक्ती जेव्हा आपल्या स्वधर्मातील श्रध्दा, विचार, परंपरा आणि मान्यता यांचे पालन करून जीवन जगत असते व ती व्यक्ति त्याचवेळेस दुसऱ्या धर्मास मानणाऱ्या लोकांच्या प्रति द्वेष अथवा असहनशीलता बाळगत नाही, उलट त्यांच्या जीवन, स्वातंत्र्य आणि संपत्तीच्या अधिकारांचा सम्मान करते तेव्हा हा धार्मिक सहिष्णूतेचा आदर्श ठरतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, एखाद्याच्या धार्मिक श्रध्दा आपल्यापेक्षा भिन्न आहेत या कारणास्तव कोणत्याही व्यक्तीने आपल्या धार्मिक विचारांना जबरदस्तीने दुसऱ्यांवर लादण्याचा प्रयत्न करू नये, किंवा यासाठी इतर कोणाच्या जीवाचा वैरी बनू नये. व्यापकदृष्ट्या धार्मिक लोकांच्याकडून मानवतावादी लोकांच्याप्रति सहनशीलता आणि मानवतावादी लोकांच्याकडून धार्मिक लोकांच्याप्रति सहनशीलतेची भावना असणे हे धार्मिक सहिष्णूतेमध्ये समाविष्ठ आहे.(रमेन्द्र, २००६, १६४) धार्मिक सहिष्णूतेमध्ये धार्मिक कट्टरतावादाचा अभाव असतो. धार्मिक कट्टरता धार्मिक असहिष्णूतेचा मूलस्त्रोत आहे आणि धार्मिक कट्टरतेवर सरळ हल्ला केल्याशिवाय धार्मिक सहिष्णूतेच्या विचारांस चालना मिळू शकत नाही. ईश्वरवादी धर्मांमध्ये जैन आणि बौध्द यासारख्या निरश्वरवादी धर्मांच्या तुलनेमध्ये कट्टरता

अधिक असते. वेगवेगळा धार्मिक संप्रदायांमध्ये धर्माच्या नांवावर घडून येणारा संघर्ष धार्मिक सहिष्णूतेचे आधारेचे रोखणे शक्य आहे. व्यक्तिहिताबरोबरच राष्ट्रहिताची जोपासना करण्यासाठी सांप्रदायिक सद्‌भावना निर्माण होणे आवश्यक आहे.

मात्र अलीकडील काळामध्ये या सांप्रदायिक सद्‌भावनेला समाजातील काही मूलतत्त्ववादी घटकांकडून धोका निर्माण होताना दिसून येत आहे. अन्यधर्मियांच्या प्रथा, परंपरा, श्रध्दा यांचा द्वेष करणे आणि स्वधर्मच श्रेष्ठ समजणे ही अतेरिकी भावना याच्या मुळाशी असल्याचे दिसून येते. या भावनेतून सामाजिक सौहार्द बिघडून सांप्रदायिक असहिष्णूता निर्माण होते आणि सांप्रदायिक असहिष्णूतेतून देशामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक असंतोष निर्माण होतो व या असंतोषाचे रूपांतर धार्मिक व सांस्कृतिक दहशतवादामध्ये होते. अर्थातच जेव्हा समाजामध्ये सामाजिक तणाव अथवा असंतोष निर्माण होतो तेव्हा तो देश प्रगती करू शकत नाही, देशातील नागरिकांचे व्यक्तिगत अधिकार आणि स्वातंत्र्य अबाधित राहू शकत नाहीत. त्यामुळे सांप्रदायिक सौहार्द अथवा सद्‌भाव टिकून राहणे हे भारतासारख्या बहुधर्मिय, बहुभाषिक, जातीय समाजामध्ये सांप्रदायिक सद्‌भाव टिकून राहणे व त्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकांने प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

### १.३.३ धार्मिक सहिष्णूतेचा आधार

धार्मिक सहिष्णूतेचा सर्वात मोठा आधार लोकशाही दृष्टीकोण आहे. लोकशाहीमध्ये वेगवेगळ्या राजकीय विचारधारेस मानणारे लोक आपापल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करीत असतात आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये वैचारिक संघर्षसुध्दा घडून येत असतो. अर्थातच हा संघर्ष शांततामय असला पाहिजे. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येकास आपले विचार अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असते, परंतु कोणासही आपल्या विचारांना बळजबरीने इतर दुसऱ्यांवर लादण्याचा अधिकार नसतो. अशा प्रकारे लोकशाही व्यवस्थतील राजकीय संघर्ष सामान्यत: शांततामयरित्याच असतो. अशाचप्रकारे धार्मिक कट्टरता आणि मूलत्त्ववादाचा त्याग करून, जर लोकशाहीवादी दृष्टिकोणाचा स्वीकार केला तर तो धार्मिक सहिष्णूतेचा एक प्रबळ आधार होऊ शकतो.

हे खरे आहे की लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय संघर्षसुध्दा कधी कधी हिंसक होतात. विशेषत: ज्यांचा लोकशाही व्यवस्थेवर विश्वास नाही अशा आतंकतावादी विचारांच्या समुहाकडून अशी हिंसा घडून येते. अशाच प्रकारे धार्मिक कट्टरतावाद्यांची स्थितीसुध्दा राजकीय आतंकवाद्यांसारखीच असते. दोघेही आपल्या विचारांना अलोकशाही मार्गाने समाजावर लादू इच्छितात. अशा प्रकारे

धार्मिक कट्टरता धार्मिक सहिष्णूतेचा दुश्मन आहे. धार्मिक कट्टरतेच्या विरोधात लढा दिल्याशिवाय धार्मिक सहिष्णूतेस चालना दिली जाऊ शकत नाही.(रमेन्द्र, २००६, ११६५) प्राचीन कालखंडापासून भारतीय समाजामध्ये लोकशाही तत्त्वांची रूजवात झालेली आहे. तथागत गौतम बुध्दांचा धम्मसंघ लोकशाही तत्त्वांवर आधारलेला होता व ही लोकशाही तत्त्वे त्यांनी त्याकाळात प्रचलित असलेल्या लोकशाहीवर आधारीत गणसंघाच्या राजकीय प्रारूपावरून स्वीकारलेली होती. आधुनिक कालखंडामध्ये ज्यावेळी भारत देश ब्रिटीशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला त्यावेळी अर्थातच आपण लोकशाही व्यवस्थेचे प्रारूप स्वीकारले. लोकशाही तत्त्वांवर आधारीत राज्यघटनेचा स्वीकार केला. भारतीय राज्यघटनेमध्ये नागरिकांना देण्यात आलेल्या मुलभूत अधिकारांमुळे देशात धार्मिक सहिष्णूता निर्माण होण्यास मदत झाली आहे. प्रतिगामी व मूलत्त्ववादी विचारधारांच्या प्रचार आणि प्रसारामुळे लोकशाही व्यवस्था तिचे आधारस्तंभ खिळखिळीत होण्याचा धोका असतो व अर्थातच त्यामुळे धार्मिक सहिष्णूतेससुध्दा तडे जातात.

### १.३.४. भारतातील सांप्रदायिक सद्भाव

भारत हा जगातील एकमेव असा देश असेल की, ज्या देशामध्ये विविधतेचे अनेक पैलू दिसून येतील. या देशामध्ये भाषा, प्रांत, भौगोलिक परस्थिती, जातीचे स्वरूप, राहणीमानाच्या पध्दती, सण-उत्सव आणि रीती-रिवाज इत्यादींप्रमाणेच येथील हवामानसुध्दा भिन्न स्वरूपाचे आहे. या देशात एकूण १६५२ बोलीभाषा व २५ भाषालिपी आढळून येतात. सन २००२ च्या ॲन्थ्रोपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या सर्व्हेनुसार आपल्या देशामध्ये ४६३५ इतक्या विभिन्न समुदायाचे लोक राहात आहेत. या भिन्न धर्मिय लोकांच्या श्रध्दा, परंपरा, आचरणाच्या पध्दती या विभिन्न असल्यामुळे काही धर्म संप्रदायांमध्ये तणाव निर्माण अपरिहार्य आहे व असे कित्येक प्रसंग भारताच्या इतिहासामध्ये घडून आले आहेत. असे असले तरी प्राचीन काळापासून आजपर्यंत ही सांप्रदायिक सद्भावाची परंपरा टिकून आहे. भारतीय इतिहासाचा मागोवा घेतला असता प्राचीन कालखंडापासून ते आजपर्यंत अनेक राज्यकर्ते, साधू-संत, समाजसुधारक इत्यांदींनी भारतामध्ये सामाजिक सलोखा निर्माण होण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य आणि प्रयत्न केलेले दिसून येतात. भारतामध्ये सांप्रदायिक सद्भाव निर्माण करण्यासाठी येथील धर्म संप्रदायांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. प्राचीन काळापासून आजमितीपर्यंत भारतामध्ये सांप्रदायिक सद्भाव टिकविण्यासाठी विशेष प्रयत्न झाल्याचे आपणास दिसून येते. 'कोणत्याही समाजात सामाजिक सौहार्द जपण्याची आणि वाढविण्याची पहिली आणि महत्त्वची जबाबदारी राज्यकर्त्यावर असते. राज्यकर्ता प्रशासनामार्फत ही जबाबदारी पार पाडत

असतो. त्यासाठी प्रसंगी कायद्याचाही वापर केला जातो. मात्र, यासाठी राज्यकर्ता सच्चा असला पाहिजे आणि प्रशासन कर्तव्यनिष्ठ असले पाहिजे, या प्राथमिक अटी आहेत. त्या पूर्ण झाल्या पाहिजेत. तरच समाजात वास्तव सौहार्द नांदू शकते.' (रणसुभे, २०१९, १६६) प्राचीन कालखंडापासून ते आजपर्यंत भारतात सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी राज्यकर्त्यांकडून विशेष प्रयत्न व कार्य झालेले दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने सम्राट अशोक, सम्राट हर्षवर्धन, शेहनशाह अकबर, छत्रपती शिवाजी महाराज आणि आधुनिक कालखंडामध्ये महात्मा गांधी व भारतीय राज्यघटना व तिच्या माध्यमातून पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी केलेल्या कार्याची व प्रयत्नांची विशेषत्वाने नोंद घ्यावी लागते.

**सम्राट अशोकांचे सांप्रदायिक सहिष्णूतेचे कार्य**

चक्रवर्ती सम्राट अशोकाचा सांप्रदायिक सहिष्णूतेच्या संदर्भात गिरनार येथील सम्राट अशोकाचे लेख अत्यंत महत्त्वाचे आहेत. या लेखांमध्ये सम्राट अशोक म्हणतात, ''देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा नाना प्रकारची दोने व पूजा यांनी सर्व संप्रदायांतील गृहस्थ व संन्यासी यांचा आदरसत्कार करीत असतो, पण सर्व संप्रदायाच्या तत्त्वांची वृध्दी व्हावी या गोटींच त्याला जितकी किंमत वाटते, तितकी दान किंवा पूजा यांची वाटत नाही. संप्रदायांच्या तत्त्वांची वृध्दी अनेक प्रकाराने होते, पण तिच्या मूळाशी वाक्संयम हा आहे. अर्थात माणसाने केवळ स्वत:च्याच संप्रदायाचा आदर व दुसऱ्याच्या संप्रदायाची निष्कारण निंदा करू नये. केवळ विषेश कारणासाठीच निंदा केली पाहिजे. कारण सर्व संप्रदायांचा आदर करणे माणसांचे कर्तव्य आहे. असे केल्याने स्वत:च्या संप्रदायाची उन्नती व दुसऱ्या संप्रदायाचे हित होते. याच्या उलट जो वागतो तो स्वत:च्या संप्रदायाचीही हानी करतो आणि दुसऱ्याच्या संप्रदायालाही अपकार करतो. कारण की आपल्या संप्रदायाची प्रतिष्ठा वाढावी अशा विचाराने स्वत:च्या संप्रदायाविषयीच्या प्रेमाच्या भरात येऊन आपल्या संप्रदायाची प्रशंसा व इतर संप्रदायांची निंदा करतो तो वस्तुत: स्वत:च्याच संप्रदायाची पूर्ण हानी करतो.

(दुसऱ्याशी) मिलाफाने राहणे ही फार चांगली गोष्ट आहे. अर्थात माणसांनी दुसऱ्याच्या धर्माची माहिती लक्ष देऊन ऐकावी. कारण देवांचा प्रिय राजा याची अशी इच्छा आहे की सगळ्या संप्रदायातल्या लोकांनी विद्वान आणि कल्याणाची कार्ये करणारे व्हावे. यासाठी जेथे जेथे जे जे म्हणून संप्रदाय असतील त्यांना सांगितले पाहिज की संप्रदायाच्या तत्त्वांची वृध्दी व्हावी ही गोष्ट जितकी महत्त्वाची समजली जाते, तितकी देवांना दान व पूजा अर्पण करणे ही गोष्ट महत्त्वाची समजली जात नाही. या कामासाठी धर्ममहामात्र, स्त्रीधर्ममहामात्र, वज्रभूमिका व आणखी काही अधिकारी नेमण्यात आले आहेत. याचा परिणाम हा झाला आहे की आपला संप्रदाय वाढत आहे व धर्माचा विकास होतो आहे.''

अशोकाच्या या गिरीलेखाप्रमाणे माणसे वर्तन ठेवतील तर जगातील पुष्कळ तंटे-बखेडे आणि मानसिक अत्याचार आपोआप नाहीसे होतील. खरे म्हणजे तंट-बखेडे व अत्याचार खऱ्या धर्मतवाच्या पायी निर्माण झाले नसून त्यांच्या मूळाशी स्वार्थबुद्धी असते असेच बहुदा आढळून येते. (कोंडविलकर, २००५, ६४) सर्व धर्ममतांविषयी आदरबुद्धी, सहिष्णूता, सर्व धर्मियांविषयी प्रेम व समान भाव हे गुण सम्राट अशोकाच्या ठायी किती उत्कटत्वाने वास करीत होते, हे त्याच्या गिरनारच्या लेखावरून दिसून येते. तीच वृत्ती आपल्या प्रजेमध्ये असावी, या सद्हेतुने त्याने हा गिरीलेख कोरला असावा, यात शंका नाही. (कोंडविलकर, २००५, ६५) अशोकाने गिरनारच्या आणखी एका लेखात म्हटले आहे की,''धर्मदानासारखे दुसरे दान नाही. धर्मदान म्हणजे सेवक व दास यांच्याशी योग्य व वर्तन ठेवणे, माता-पित्याची सेवा करणे, मित्र, परिचित व आप्त, श्रमण (साधू) व ब्राह्मण यांना दान देणे, प्राण्यांची हिंसा न करणे, सत्य बोलणे आणि हा उपदेश सर्व लोकांना सर्व काळी करणे याचेच नाव धर्मज्ञान होय. या धर्मज्ञानामुळे विजयप्राप्ती आणि परलोकी अमृवाचा लाभ होतो.(कोंडविलकर, २००५, ६५)

गिरनारच्या लेखाबरोबरच सम्राट अशोकांचा शहाबाजगढीचा लेख हा निरनिराळ्या धर्मांच्या व संप्रदायांच्या लोकांमध्ये ऐक्य व बंधुभाव स्थापन करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. तब्बल दोन हजार दोनशे वर्षापूर्वीच्या या लेखातील विचार आणि इसवी सनाच्या तेराव्या शतकापासून निर्माण झालेल्या मराठी संतकवींच्या अभंगातील विचार सारखे आहेत. धर्मातील मुख्य व आवश्यक भाग धर्मतव (विचार) की धर्मविधी या प्रश्नाचे उार अशोकाने या लेखात दिले आहे आणि ते असे की धर्मविधींपेक्षा धर्मत्त्व-विचारच फार महत्त्वाचे आहेत. निरनिराळ्या धर्मांच्या तत्त्वांचे म्हणजे विचारांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यांच्यामध्ये विरोध क्वचितच आढळतो. तेव्हा ज्या मुद्यांच्या बाबतीत एकमत आहे, त्यांच्याकडे लोकांनी लक्ष द्यावे आणि बाकीच्या क्षुद्र गोष्टींकडे दुर्लक्ष करावे म्हणजे सगळ्या संप्रदायाविषयी माणसाच्या मनात ममत्वाची भावना उत्पन्न होईल आणि मग सहकार्याचा मार्ग सुगम होईल आणि सगळे धर्मसाधक या मार्गाने जाऊ लागले की लोककल्याण आपोआप होईल, असे अशोकाने अत्यंत कळकळीच्या शब्दांनी त्या लेखात सांगितले आहे. (कोंडविलकर, २००५, ६५-६६) सम्राट अशोकाने कलिंग युध्दानंतर बौध्द धर्माचा स्वीकार केला आणि त्याने मोठ्या प्रमाणात या धर्माचा प्रसार आणि प्रचार केला परंत; इतर लोकांनी हा धर्म स्वीकारलाच पाहिजे असा त्याने आग्रह अथवा बळजबरी केली नाही. आपल्या राज्यात त्याने अहिंसा तत्त्वाचा मोठ्या प्रमाणात पुरस्कार केला, लोकांना अहिंसेचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांने स्वत: टप्याटप्याने आपल्या मुदकपाक खान्यातील मांसाहारी पदार्थसुध्दा बंद करून टाकले. 'अशोकाने शिकार करणे बंद केले व त्याऐवजी त्यांने धर्मयात्रेस जाण्याचा प्रघात सुरू केला. अशा धर्मयात्रेच्या प्रसंगी तो

ब्राह्मणधर्मी, बौध्द धर्मी व जैनधर्मी साधुसंतांचे दर्शन घेई, विद्वानांशी चर्चा करी आणि गावोगावच्या दीन, दरिद्री, पंगू व अनाथ लोकांना धर्मोपदेश करी.'(कोंडविलकर, २००५, ६८) सम्राट अशोकाचे आपल्या प्रजेच्याप्रतिसुध्दा समानतेचे धोरण होते. त्याच्या राज्यामध्ये विभिन्न विचारसरणी, श्रध्दा आणि धर्माचरण करणारे लोक होते व यासर्वांच्याप्रती त्याच्या मनामध्ये पितृत्त्वाची भावना होती. राजा आणि प्रजा यांच्यातील नातेसंबंध हा पितापुत्रासारखा असावा याविषयी तो सतत आग्रह धरतो. सम्राट अशोक या अनुषंगाने आपल्या एका आज्ञालेखात म्हणतो, ''सर्व माणसे माझी मुले आहेत, आणि ज्याप्रमाणे माझ्या मुलांनी इहलोकी आणि परलोकी कल्याण व सौख्य साधावे आसे मी इच्छितो त्याप्रमाणे सर्व माणसांच्या बाबतीतही (माझी इच्छा) आहे.'' (थापर, २००७, २०५)

धर्मयात्रेप्रसंगाने सम्राट अशोकाची धर्मकल्पना संकुचित न राहता ती विस्तृत व उदार बनली. 'तो ब्राह्मण, श्रमण म्हणजे संन्याशी, आजीवक म्हणजे बौद्ध भिक्षू इत्यादी भिन्न भिन्न धर्मसंप्रदायी लोकांचा सारखा, समान आदर करून त्यांना समान दृष्टीने पाहू लागला. त्यानं स्वत: बौद्ध धर्म स्वीकारला होता, तरी तो सर्व धर्मपंथांच्या मंदिरांचा व साधु संतांचा परामर्श म्हणजे विचारपूस करी, समाचार घेई. धर्माच्या संबंधाने मनाचा संकूचितपणा किंवा दुरभिमान त्याच्या ठायी काडीमात्र नव्हता. आपल्या प्रजेत कोणत्या का होईना, पण धर्माचा प्रसार अवश्य व्हायला पाहिजे, म्हणून त्यान सर्व धर्मांना पटणारी अशी सामान्य तवे अर्थात नीतीपर आचरणाचे नियम आणि नीतिविरूद्ध गोष्टींचा निषेध यांचाच उपदेश आपल्या शिला, गिरी व स्तंभ लेखांतून केला.(कोंडविलकर, २००५,६९)

धार्मिक सहिष्णूतेच्या दृष्टिने सम्राट अशोकाचे सातवे शिलासन अत्यंत महत्त्वाचे आहे. याअनुषंगाने सम्राट अशोकाच धार्मिक सहिष्णूतेच्या धोरणाचे महत्त्व प्रतिपादीत करताना रोमिला थापर म्हणतात, ''सातवे शिलासन अत्यंत लहान असून सर्व पंथांमध्ये सहिष्णूता असावी असे त्याच पुरस्कारले आहे. विविध धार्मिक पंथ आपापसातील मतभेद सरळ सरळ व परस्परांना विरोध करून व्यक्त करीत असत असे दिसते. प्रत्येक पंथ संयम आणि मानसिक पावित्र्य यांची इच्छा करतो. असे समान तत्त्व काढणाऱ्या माणसाचे अधिक व्यापक तत्त्वासाठी हे आवाहन आहे. पंथोपंथातील संघर्षातून कोणता धोका निर्माण होईल याविषयी अशोकाला जाणीव झालेली असली पाहिजे. अशा संघर्षामुळे धम्माचा प्रभाव नाहीसा होण्याचीही शक्यता होती कारण त्याचा धम्म म्हणजे आणखी एका धर्मपंथाची केवळ तत्त्वे असे लोकांना वाटण्याचा धोका होता व तसे त्यांना वाटले असते तर धम्माचे भवितव्यच नष्ट झाले असते. विविध समुह आणि धर्मपंथ यांनी आपापल्या जागी एकमेकात मिसळावे असेही सांगितलेले आहे. यामुळे धार्मिक सहिष्णूतेला मदत व

राजकीय-सामाजिक सांप्रदायिकतेला प्रतिबंध असा दुहेरी हेतू साध्य झाला असता. सहिष्णूतेचे आवाहन करण्यामागे अशोकाचा केवळ राजकीय हेतूच होता असे येथे सुचवायचे नाही. इतर परिस्थितीमध्येही त्याची इच्छा अशीच राहिली असती यात शंका नाही. परंतु सहिष्णुतेचा हा आग्रह धम्मामुळे अधिक निकडीचा ठरला.''(थापर, २००७, २२२)

बाराव्या शिलालेखाच्या आरंभी सम्राट अशोकाने स्वत:ची भूमिका स्पष्ट केली आहे. मी सर्व पंथांचा आदर करतो, इतकेच नव्हे तर सर्व पंथातील संन्यासी आणि सामान्य उपासक यांचाही आदर करतो, असे स्पष्ट म्हटले आहे. तसेच या सर्वांना भेटवस्तू देऊन आणि विविध स्वरूपात मान्यता देऊन त्यांचा गौरव करीत असतो, असेही स्पष्ट केले आहे. सम्राट अशोकाच्या लेखी आदर आणि सत्कारात पंथभेद नसल्याचे यातून स्पष्ट दिसून येते. शिलालेखात सर्व पंथांच्या मूळ तवांची प्रगती म्हणजे नेमके काय हे स्पष्ट केले आहे. तो म्हणतो, 'मूळ तत्त्वांची प्रगती अनेक स्वरूपात असू शकते. पण, याचा पाया हा स्ववाणी नियमन आहे. जेणे करून स्वपंथाचे अवास्तव कौतुक आणि परपंथास कमी लेखू नये, अनुचितप्रसंगी परपंथावर टीका करू नये, काही उचित प्रसंगी आणि सौम्य शब्दांत टीका करावी. प्रत्येकप्रसंगी प्रत्येकाने दुसऱ्या माणसाच्या पंथाचा आदर केला पाहिजे, असे केल्याने स्वपंथाचाच प्रभाव वाढीस लागतो आणि इतर माणसांना तो लाभकारक ठरतो.'

प्रजेत एकमेकांच्या पंथांचा आदर गरजेचा असल्याचे सांगताना त्याचे माध्यमही अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे. अर्थात वाणी. स्वपंथाचे अवास्तव कौतुक आणि परपंथावर अनाठायी टीका योग्य नसल्याचे सांगितले आहे. मात्र, तरीही रास्त टीका करण्यासाठी मुभा दिली आहे. मतांची चिकत्साच होणार नाही, अशी प्रतिगामी व्यवस्था सम्राट अशोकाने केली नाही. अर्थात अशा टीकेने औचित्यभंग होणार नाही, याची काळजी घेण्याचा आदेश सम्राट अशोकान दिला आहे. यात मतांच्या देवाणघेवाणीमध्ये एक प्रकारचा खुलेपणाही ठेवला आहे. तसेच एकमेकांच्या पंथाचा आदर केल्यास स्वत:च्याच पंथाला मोठेपणा लाभणार असल्याचेही नमुद केले असून त्याचा इतरांनाही फायदा होतो, असेही स्पष्ट केले आहे. सम्राट अशोकाने अतिशय मौलिक संदेश यात दिला आहे. हे सांगत असताना उलट आचरण ठेवल्यास काय होईल, याविषयीही शिलालेचखात सावध करयात आले आहे. तो म्हणतो,

'याउलट केल्यास स्वपंथाचा प्रभाव कमी होतो आणि इतर माणसांसाठी ते घातक ठरते. पुन्हा सांगतो, जो कोणी केवळ भक्तीपोटी आणि सोयीच्या दृष्टीने स्वपंथाचा गौरव करतो किंवा इतरांच्या पंथाला कमी लेखतो, तो प्रत्यक्षात स्वपंथाची खूप मोठी हानी करत असतो. त्यामुळे

सौहार्द जपण्याचा आदेश दिला जात आहे, त्यायोगे एकमेकांचे आचार-विचार ऐकले आणि पाळले जातील.' दुसऱ्यांच्या पंथाचा अनादर केल्यास स्वत:च्या पंथाचा लौकिक खालावतो आणि इतरांसाठी ती बाब हानिकारक ठरते. ही भूमिका एकदाच सांगून सम्राट अशोक थांबत नाही, तर तो पुन्हा एकदा अधोरेखित करतो. अगदी बजावून सांगतो की, निव्वळ भक्तीपोटी आणि स्वत:च्या सोयीच्या दृष्टीने जरी परपंथाची निंदा केली तरी ती घातकच ठरणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सौहार्द जपण्याचा थेट आदेश दिला आहे. दुसऱ्यांचा विचार ऐकण्याची सहिष्णूता आणि स्वत:चा विचार सांगण्याची मोकळीक कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी गरजेची असते. झार्बिंद विचारांनी कुठल्याही समाजाचे भले होत नाही. सुमारे सव्वादोन हजार वर्षापूर्वी मांडलेला हा विचार आजही आणि आगामी सर्व काळात लागू होण्यासारखा चिरंजीवी आहे. त्याचा काळरूप मरण नाही. या शिलालेखात सम्राट अशोक इथेच थांबत नाही, तो आणखी पुढे जातो. तो सांगतो,

'देवानमपियची इच्छा आहे, की, सर्व पंथाकडे स्वत:चे पूर्ण ज्ञान असले पाहिजे, जे उाम आहे तेच शिकवले पाहिजे. सर्व पंथांना त्यांच्या सर्व अनुयायांना हे सांगितले पाहिजे, की देवानमपिय, इतर कोणत्याही गौरवापेक्षा सर्व पंथांच्या मूळ तत्त्वांची प्रगती हाच श्रेष्ठ गौरव समजतो. याच्याशी संबंधित असलेले धम्म अधिकारी, या अधिकाऱ्यांच्या सहचारिणी, शेती खात्याचे व्यवस्थापक आणि अन्य खात्यांतील अधिकारी असे अनेजिण यावर कार्यरत आहेत. त्याची फलश्रूती म्हणून लोकांच्या स्वपंथाच्या प्रभावात वाढ व धम्माला वैभव प्राप्त झाले आहे.'

सम्राट अशोकाची इच्छा खासच म्हटली पाहिजे. सर्व पंथांकडे त्यांचे स्वत:चे ज्ञान पूर्ण पाहिजे, अशी अट घातलेली आहे. अर्धवट ज्ञान असलेल्यांकडून समाजहित साधण्यापेक्षा केवळ समाजाला रसातळाला नेण्याची क्षमता असते. हा तसा आपला सार्वत्रिक अनुभव आहेच. पंथाकडे परिपूर्ण ज्ञान असले पाहिजे. इतकेच नव्हे तर लोकांना शिकवताना उाम तेच शिकवले पाहिजे. अर्थात निरर्थक आणि तोट्याचे शिकवता कामा नये, असेही स्पष्ट केले आहे. तसेच सर्व पंथांच्या मूळ तत्त्वांची प्रगती यातच मोठा गौरव असल्याचे तो समाजत अल्याचे अधोरेखित केले आहे. यात केवळ बौध्द धर्म तवाचीच प्रगती अपेक्षित नाही, हेही अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. शिलालेखाच्या शेवटी सौहार्द आणि नीतित्त्वे यांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी झटत असून त्यामुळे लोकांच्या स्वपंथाच्या लौकिकात वाढ झाल्याचे आणि धम्माला वैभव प्राप्त झाल्याचे समाधान व्यक्त केले आहे. (रणसुभे, २०१९, १६८-१६९)

## अकबर बादशहाचे सांप्रदायिक सहिष्णूतेचे कार्य

सम्राट अशोकानंतर मध्ययुगीन (राजवट इ.स. १५५६ ते १६०५) कालखंडामध्ये भारतामध्ये सांप्रदायिक सहिष्णूता निर्माण व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले ते म्हणजे सम्राट बादशहा अकबर यांनी. अकबर बादशहाच्या राजकीय कारकिर्दीस सुरूवात झाली तेव्हा भारतामध्ये मुसलमान राजवट स्थिरस्थावर झाली होती. मुघल साम्राज्याचा संस्थापक बाबर यांनी कोणत्याही प्रकारच्या योजनाबध्द व व्यवस्थित स्वरूपातील धार्मिक नीति तयार केलेली नव्हती. असे असले तरी खाजगी आयुष्यात तो एक धार्मिक व्यक्ति होता आणि त्याची अल्लाहावर नितांत श्रध्दा होती. परंतु; एक राज्यकर्ता म्हणून धर्माच्या बाबतील त्याचे काय धोरण होते याची स्पष्टता होत नाही. हूमांयू बादशहा याच्या ठिकाणीसुध्दा काही विशेष अशी धार्मिक कट्टरता दिसून येत नाही किंवा तो काही धार्मिक असहिष्णू नव्हता. सम्राट बादशहा अकबर यांची मात्र धर्माविषयी स्वत:ची धार्मिक मते, श्रध्दा आणि त्यानुसार त्याचे केलेले कार्य याची माहिती स्पष्टपणे अधोरेखित होताना दिसून येते. अकबर जन्माने जरी मुसलमान असला तरी त्याच्या मनामध्ये इतर धर्मियांविायी आकस किंवा द्वेषाची भावना असल्याचे दिसून येत नाही. हिंदूबरोबरच सर्व धर्मियांबरोबर त्याची नाते स्नेहाचे व आदराचे होते. अकबराने हिंदूंची मने आपल्या गोड भाषणाने आणि नि:पक्षपाती वर्तनाने वश करून घेतली होती. अशोकाप्रमाणे अकबराचे मन उदार होते. त्याच्या ठायी धर्मजिज्ञासाही प्रबळ होती.

धार्मिक उन्मादापासून बचाव, धार्मिक सहिष्णूता तसेच विभिन्न धर्म संप्रदायांना मानणाऱ्यांमध्ये शांततामय सहअस्तिवास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने व त्यांच्यामध्ये समन्वय प्रस्थापित करण्याच्यादृष्टीने मध्ययुगीन भारतामध्ये अकबर बादशाहाने केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. सम्राट अशोकाप्रमाणेच शेहनशहा अकबर बादशाहानेही 'सर्वांसाठी शांतता' या तत्त्वाच्या आधारे आपल्या राज्यामध्ये सौहार्द निर्माण करण्याचा प्रयत्न केला. 'सर्वांसाठी शांतता या शब्दाचे फारसी भाषांतर सुलह ए कुल' असे आहे व या 'सुलह ए कुल' च्या नीतीवर शहेनशहा अकबरचे संपूर्ण धार्मिक धोरण आधारलेले होते. अकबराच्या या धार्मिक धोरणाचा मुख्य उद्देश - सार्वभौमिक सहिष्णूता होती. सुलह-इ-कुल ची नीति म्हणजे सर्वांच्याबरोबर शांततापूर्ण व्यवहार होय. शहेनशहा अकबर बादशहाने आपल्या राज्यातील सर्व धर्म व पंथांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्याचे मोठे कार्य केले. शेहनशहा सम्राट अकबर परम धार्मिक प्रवृत्तीचा होतो, सुरूवातीपासूनच त्याच्या अंत:करणाचा ओढा धर्मातील गूढ आणि उदार तत्त्वांकडे झुकलेला होता. धार्मिकदृष्ट्या तो आलमगिरप्रमाणेच कमी नव्हता परंतु, सुन्नी कट्टरतेचा त्याच्यामध्ये अभाव होता. तो सर्वांच्याप्रती समानतेच्यादृष्टीने पाहत असे. 'काफिर' त्याच्यादृष्टीने कोणी नव्हतेच. वेगवेगळ्या धर्मातील तवांना तुलनात्मकदृष्ट्या समजून घेण्याचा तो

प्रयत्न करीत असे. स्वभावत: अकबरचा ओढाज सुफी धर्म तवांकडे होता. आपल्या इतर सुफी मित्रांप्रमाणेच दिव्यत्व प्राप्तीचा अनुभव मिळावा यासाठी तो प्रयत्न करीत असे.

सम्राट अकबराच्या मनावर विविध धर्मसंप्रदाय व त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला होता. ''अहिंसा परमो धर्म:'' या सिध्दांचा त्यांने जैन धर्मातून स्वीकार केला होता. पारसी धर्माचा प्रभाव त्याच्या शांततापूर्ण आचार व व्यवहारामधून प्रत्यक्षपणे दिसून येतो. तो सूर्य आणि अग्निदेवतेची उपासना करीत असे. हिंदू रीतीरिवाजांचेही तो अनुसरन करीत असे. त्याचबरोबर ख्रिश्चन धर्मातील काही चिन्हांचाही वापर करीत होता. अकबराच्या धार्मिक विचारांवर जैन, पारसी, हिंदू, आणि ख्रिश्चन धर्मांचा विशेष प्रभाव पडला आहे. असे असले तरी त्यांने कोणत्याच एका धर्माचा स्वीकार केला नाही. अकबरास ज्या धर्मात जे चांगले वाटले त्याचा त्यांनी स्वीकार केला व ज्या गोष्टी अनुपयुक्त होत्या त्यांचा त्याग केला. अकबर धर्म तत्त्वांवर आधारीत शास्त्रार्थाचे नियमितपणे आयोजन करीत असे. यामध्ये सूफी विद्वान, व्याख्याते, न्यायाधीश, सुनी-शिया, ब्राह्मण, नास्तिक, जैन, चार्वाक, ईसाइ, यहूदी, सैबियन, पारसी आणि बौद्ध इत्यादी प्रत्येक धर्माचे विद्वान या शास्त्रार्थामध्ये सहभागी होत असत. या शास्त्रार्थामध्ये तो दोन्ही पक्षांच्या बाजू ऐकून योग्य तो निवाडा करीत असे. हा निवाडा निपक्षपातीपणे असे. यामध्ये तो स्वधर्माचाही मुलाहिजा राखीत नसे. सम्राट बादशहा अकबराचा अनेक धर्मातील विद्वान आणि प्रतिभासंपन्न लोकांशी संपर्क आल्यामुळे त्यांची विज्ञान, प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास, धर्म आणि संप्रदाय इत्यादी विषयांवरील त्यांचे आकलन वाढले होते, त्यांची स्वत:ची मते निर्माण झाली होती.

सम्राट अकबर एका विशाल साम्राज्याचा बादशहा असला तरी त्यांची धर्मविषयक बाबीतील रूची प्रचंड होती. सर्व धर्मातील चांगल्या गोष्टींची त्यांना विशेष जाण होती. धर्म पंडीतांबरोबर झालेल्या चर्चेतून एका विशिष्ट धर्म तत्त्वाजवळ ते येवून ते थांबले आणि त्यांनी धार्मिक सहिष्णूतेवर आधारित 'दीन-ए-इलाही' या स्वतंत्र धर्मसंप्रदायाची स्थापना केली. अकबराने या धर्मसंप्रदायाचे स्वतंत्र अशा प्रकारचे सिध्दांत निर्माण केले आणि त्याच्या प्रचार प्रसाराचे कार्य स्वत:पासून सुरू केले. 'दीन-ए-इलाही' या धर्माचा सम्राट अकबर हाच प्रमुख होता. यातील काही तत्त्वे महमंदाच्या कुराणामधून, काही तत्त्वे ब्राह्मणांच्या शास्त्रातून तर काही तत्त्वे ख्रिश्चनांच्या वचनातून घेण्यात आली. सम्राटने सर्व धर्मातील चांगल्या गोष्टींचा यामध्ये समावेश केला. सम्राट अकबराने स्वत: स्थापन केलेल्या या धर्मसंप्रदायाचा सर्वांनी स्वीकार करावा असे आवाहन केले आणि त्याचा सगळीकडे प्रसार व प्रचार करण्यासाठी शेख मुबारक यांना पाठविले परंतु; त्यांना फारसे यश मिळाले नाही. असे असले तरी लोकांनी आपल्या धर्मसंप्रदायाचाच स्वीकार करावा यासाठी अकबराने

भीती किंवा जबरदस्तीचा वापर केला नाही. दीन इलाहीच्या प्रमुख धर्मअनुयायांनमध्ये हिंदू बीरबलाचा उल्लेख आढळून येतो. दीन इलाही या नव्या धर्मसंप्रदायाची प्रेरणा अकबरास अल्लाउद्दीन खिलजी यांच्यापासून मिळाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण अल्लाउद्दीन खिलजीचा इतिहास पाहिला असता त्यांनेसुध्दा नवीन धर्मसंप्रदाय सुरू करण्याचा मानस व्यक्त केल्याचे दिसून येते. जेंव्हा जेंव्हा दीन इलाही धर्मअनुयायी भेटत असत तेव्हा पहिला ''अल्लाहु अकबर' तर दुसरा ''जल्ला जलालूह' म्हणून प्रतिउार देत असे. दीन इलाहीला मानणाऱ्यांना आपली संपत्ती, जीव, सम्मान आणि धर्म या चारींचा सम्राटाच्या गरजेनुसार त्याग करण्याची शपथ घ्यावी लागत असे.

सम्राट अकबराने दीन इलाहीची निर्मिती केली तरी धर्म आणि सत्ता याचा त्यांनी गैरवापर केला नाही. धर्माच्या आधारे कोणताही भेदाभेद केला नाही. 'धर्माचा अर्थ लावण्यात संकुचितवाद्यांचा वरचष्मा असलेल्या स्थितीत उदार निर्णय घेण्यात आडकाठी आणली जाते. ही स्थिती संपवण्यासाठी धाडसी पण विवेकी कृती आवश्यक ठरते. तेच शेहनशहा अकबराने केले. शहेनशहा जे सांगेल तोच अंतिम निवाडा असा सर्वाधिकार स्वत:कडे घेत एकाधिकारशाहीची स्थिती 'महेजरनाम्या'तून निर्माण केली नाही. तिथे विरोधी सुरालाही स्थान दिले आहे. धर्मशास्त्राच्या अर्थावर जिथे एकमत होत नाही, तिथे शहेनशहा स्वत:चा अधिकार वापरायचा आणि अशा असहमजीच्या मुद्यावर अंतिम निर्णय द्यायचा असा मर्यादित अधिकार अकबराने स्वत:कडे घेतला. इथेही संवादाला पुरेशी जागा ठेवली. एखादे मत ग्राह्य धरताना ते केवळ आवडले, किंवा स्वत:ला अनुकूल, सोयीचे आहे म्हणून शेहनशहाने घेऊ नये, असे अप्रत्यक्ष बंधन दोन निकषांतून घातलेले आहे. अर्थात लोककल्याणासाठी आणि इहप्रशासकीय सुलभतेसाठी. 'महेजरनाम्या'त शहेनशहाला स्वत:हून एखादा निर्णय देण्याचा अधिकार आहे. मात्र, त्यालाही व्यापक मानवी हित, तसेच कुरआन आणि हदीसच्या शिकवणूकीचा मर्यादा घातलेली आहे.

शेहनशहा अकबराने दिन ए इलाही (ईश्वरी धर्म) नावाने धर्म किंवा पंथ स्थापल्याचे सांगितले जाते. मात्र, नव्या संशोधनानुसार त्याने तसा कोणताही धर्म स्थापलेला नाही. काही आचारसूत्रे सामाईक करण्याचा प्रयत्न अकबराने केला. त्याचे नाव दिन ए इलाही नसून तौहिद ए इलाही (एकेश्वरवाद) असे आढळते. या प्रयत्नास प्रतिसाद मिळाला नाही. तसेच अकबराने इस्लामचा त्याग केल्याचे जाहीर केले नाही. इंग्रज इतिहासकारांच्या चुकीच्या भाषांतरामुळे आणि समजुतीमुळे अकबराच्या इस्लामत्यागाचा घोटाळा झाल्याचे नवसंशोधनातून पुढे आले आहे. १७४ असे असले तरी धार्मिकदृष्ट्या अकबर परधर्माविषयी तो मोठा सहिष्णू होता. बहुसंख्य जनता हिंदू असलेल्या देशावर आपण राज्य करीत आहोत तेव्हा जनतेलासुध्दा राजाविषयी आत्मियता निर्माण

झाली पाहिजे यासाठी जन्माने मुस्लिम असणाऱ्या अकबराने आपल्या वागण्यात मोठा बदल केला होता दृश्य स्वरूपामध्ये मुसलमानाची खूण असलेली दाढी काढून टाकणे, राजपूत पध्दतीची पगडी वापरणे, कपाळाला तिलक लावणे इत्यादी गोष्टी करण्यास सुरूवात केली होती. प्रसिध्द गायक तानसेन, कवी फैजी, संगीतंज्ञ बाजबहादूर शहा, बिरबल यांना राजाश्रय दिला. हिंदूना नोकऱ्या दिल्या, महत्त्वाच्या पदावर नमले, मथुरा या तीर्थक्षेत्राचा यात्राकर हटवला, हिंदूविरोधी असलेला जिझिया कर रद्द केला. जो कर ज्यू आणि ख्रिश्चनांकडून वसूल केला जात नसे. जकात म्हणजे आयातकर सर्व व्यापाऱ्यांवर होता. पण मुसलमानांवर २.५ टक्के, ज्यू-ख्रिश्चनांवर ३.५ व हिंदूवर पाच टक्के. बहुतेक सर्व वस्तू जकातमुक्त करून अकबराने हा प्रश्न सोडवला. अकबराने धर्म सुधारणेवरसुध्दा भर दिला. हिंदू धर्मातील अनिष्ठ चालीरीती विरूध्दसुध्द भूमिका घेतली. त्यांनी सतीची चाल, बालविवाह, गाय-बैल, म्हशी, घोडे इत्यादी प्राण्यांची होणारी हत्या थांबविली. सरकारी तिजोरीतून मक्का व मदिनेस पाठविली जाणारी आर्थिक मदत बंद केली होती.

सलीम जहांगीर साठी अकबराने लिहून ठेवलेला अखेरचा उपदेश धार्मिक सहिष्णूतेस चालना देणारा आहे. तो आपल्या उपदेशात म्हणतो, ''आपल्या राजकीय धोरणाच्या आड धर्माचा विचार येऊ देऊ नकोस. कुणालाही शिक्षा देताना सूडबुद्धीने हिंसक बनू नकोस. आपल्याला गोपनीय सल्ला देणाऱ्या विश्वासू जाणकारांचा योग्य आदर कर. कुणी मनापासून दिलगीरी व्यक्त केली तर त्यांना मोठ्या मनाने माफ कर.'

अशा प्रकारे मध्ययुगीन कालखंडामध्ये सम्राट अकबर बादशहा यांने केलेले कार्य आणि त्यांने देशाचा प्रमुख या नात्याने घेतलेले निर्णय भारतीय समाजातील धार्मिक सहिष्णूता प्रवर्धित करण्यासाठी उपयुक्त ठरलेली आहे व ते आजही भारतीय समाजाला दिशादर्शक ठरणारे आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे सांप्रदायिक सहिष्णूतेचे कार्य

धार्मिक सहिष्णूता जपणारा मध्ययुगीन राजा म्हणजे राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राबरोबरच उत्तर भारतामध्येसुध्दा आपले हिंदवी स्वराज्य प्रस्थापित केले. लोककल्याण आणि न्यायाची प्रस्थापना हे त्यांच्या हिंदवी स्वराज्याचे मुख्य ध्येय होते. शिवाजी महाराज जन्माने जरी हिंदू असले तरी सर्व धर्म आणि जातीतील लोकांच्याविषयी त्यांच्या मनामध्ये आपुलकी, स्नेह आणि ममत्त्व होते. त्यामुळेच त्यांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना आपल्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यामध्ये सामील करून घेतले. अर्थातच महाराजांनी हाती घेतलेले

हे कार्य सर्वसमान्य लोकांनासुध्दा आपलस वाटत होते. त्यामुळेच ते लोकसुध्दा शिवाजी महाराजांच्या आदेशानुसार स्वराज्यासाठी जीव मुठीत घेऊन लढत होते. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले हे स्वराज्य केवळ हिंदू धर्मियांचे नव्हते तर यामध्ये मुस्लिम धर्मिय लोकसुध्दा सहभागी झालेले होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये अनेक मुस्लिम सरदार, वतनदार व मावळे म्हणून सहभागी झाले होते. दर्यासारंग दौलतखान हा स्वराज्याच्या आरमार विभागाचा प्रमुख होता. महाराजांच्या खास अंगरक्षकात व खाजगी नोकरात अत्यंत विश्वासू म्हणून मदारी म्हेतर यांचा समावेश होता. काझी हैदर हे महाराजांचे वकील होते. ''सिद्दी हिलाल हा असाच एक मुसलमान सरदार शिवाजीच्या पदरी होता. १६६० मध्ये रूस्तमजमा व फाजलखान यांचा शिवाजीने रायबागेजवळ पराभव केला. त्यावेळी सिद्दी हिलाल शिवाजीच्या बाजूने लढला. त्याचप्रमाणे १६६० मध्ये सिद्दी जोहरने पन्हाळगडास वेढा दिला होता आणि नेताजी पालकर यांने त्याच्या सैन्यावर छापा घालून वेढा उठविण्याचा प्रयत्न केला, त्यावेळीसुध्दा हिलाल व त्याचे पूत्र हे नेताजीबरोबर होते. या चकमकीत सिद्दी हिलालचा पूत्र वाहवाह जखमी व कैदी झाला होता.'' ''शिवाजीच्या अशाच एका मुसलमान शिलेदाराचा उल्लेख आहे. त्याचे नावा शामाखान. राजवाडांच्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाच्या खंड १७ मध्ये नूरखान बेग याचा 'शिवाजीचा सरनोबत' म्हणून उल्लेख आहे. (पानसरे, २८)

रियासतकार सरदेसाई यांच्या 'शककर्ता शिवाजी' या पुस्तकातील पुढील उताऱ्यावरून मुस्लिम धर्मिय शिपायांबद्दलचे शिवाजी महाराजांचे धोरणच स्पष्ट होते.''सन १६४८ च्या सुमारास विजापूरच्या लष्करातले पाचसातशे पठाण शिवाजीकडे नोकरीस आले. तेव्हा गोमाजी नाईक पानसंबळ त्याला सल्ल दिला, तो फार चांगला म्हणून शिवाजीने मान्य केला व पुढे तेच धोरण ठेवले. नाईक म्हणला, 'तुमचा लौकिक ऐकून हे लोक आले आहेत त्यांस विन्मुख जाऊ देणे योग्य नाही. हिंदूंचाच संग्रह करू, इतरांची दरकार ठेवणार नाही अशी कल्पना धरिली तर राज्य प्राप्त होणार नाही. ज्यास राज्य करणे त्याने आठरा जाती, चारी वर्ण यांस आपापले धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावे.''(पानसरे, २८) शिवकालीन भारतात शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याबरोबरच अस्तित्त्वात असलेल्या आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही इत्यादी मुस्लिम धर्मिय राजकर्त्यांच्या पदरीसुध्दा अनेक हिंदू सरदार व सैन्य होते.

छत्रपती शिवाजी महाराज जन्माने हिंदू असले तरी त्यांनी राज्यकारभारामध्ये धर्म कधीच येवू दिला नाही. आज शिवाजी महाराजांची मुस्लिम विरोधक आणि हिंदू धर्म रक्षक अशी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे परंतु; इतिहासामध्ये अशी उदाहरणे आढळून येत नाहीत. सभासदांच्या बखरीतील पुढील उतारा यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. ''मुलखात देव-देवस्थाने

जागोजागी होती. त्यास दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेकस्थान पाहून यथायोग्य चालविले. मुसलमानांचे पीर, मशिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य स्थान पाहून चालविले.'' जी गोष्ट मशिदींची तीच गोष्ट मुस्लीम साधुसंतांची. शिवाजी महाराज आणि त्या काळातील इतरही मराठे-हिंदू दर्ग्यांना भजत व देणग्या देत. मुस्लीम साधू, पीर, फकीर यांना मान देत. शिवाजी महाराज अनेकांना गुरू मानत त्यात 'याकुतबाबा' या एका संताचाही समावेश आहे. मुस्लीम धर्माबद्दल शिवाजी महाराजांची सहिष्णूता अनेक रीतीने इतिहासात नमूद आहे. खाफीखान या मुस्लीम इतिहासकाराने नोंदवून ठेवलेला खालील उतारा खूप बोलका आहे. ''शिवाजीने सैनिकांकरिता असा सक्त नियम केला होता की, सैनिक ज्या ज्या ठिकाणी लूट करण्यास जातील; तेथे तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस तोषीस अगर त्रास देता कामा नये. जर एखादा कुराणाचा ग्रथ हाती आला तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपल्या मुसलमान नोकरांच्या स्वाधीन करीत असे. केव्हाही हिंदू किंवा मुसलमान स्त्रिया हाती सपडल्यास व त्यांचे रक्षण करण्यास कोणी जवळ नसल्यास त्यांचे नातलग त्यांची सुटका करण्यास येईपर्यंत शिवाजी स्वत: त्यांची काळजी घेत असे.'' ०२ नोव्हेंबर, १६६९ च्या एका पत्रात रघुनाथ पंडीतरावांनी राजांची आज्ञा उल्लेखलेली आहे ती तर त्याहूनह स्पष्ट आहे.- ''श्रीमंत महाराज राजे यांनी ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनी करावा, यात कोणी बखेडा करू नये असे फर्मावले आहे.'' (पानसरे, ३७-३८)

छत्रपती शिवाजी महाराज जन्माने जरी हिंदू असले तरी त्यांनी आपल्या राज्यकारभारामध्ये धर्म किंवा जात या घटकांना महत्त्व न देता तटस्थरित्या राज्यकारभार केला. त्यांनी आपल्या राज्यात हिंदू तसेच मुस्लिमांनासुध्दा समानतेचे वागणूक दिली. शिवाय हिंदू धर्मातील मराठेत्तर जातीनांसुध्दा स्वराज्याच्या बांधणीमध्ये सामील करून घेतले. महाराजांच्या स्वराज्यामध्ये सर्व जाती-धर्मातील लोक 'मावळा' या एकाच ओळखीच्या आधारे एकत्रित आले होते व ते स्वराज्यासाठी प्राणपणाने लढत होते. अर्थातच यापाठीमागे त्यांची स्वराज्यनिष्ठा असली तरी छत्रपती शिवाजी महाराजांचा नि:पक्षपातीपणाचे आणि सामाजिक सलोख्याचे धोरण कारणीभूत होते.

शिवाजी महाराजांनी औरंगजेबास फारसी भाषेत एक पत्र लिहिले होते. त्या पत्रात ते असे म्हणतात की, ''कुराण धर्म ग्रंथ ही प्रत्यक्ष ईश्वराची वाणी आहे, ते अस्मानी किताब आहे. त्यात ईश्वरास जगाचा ईश्वर म्हटले आहे. मुसलमानांचा ईश्वर असे म्हटलेले नाही. कारण हिंदू व मुसलमान या जाती ईश्वरापाशी एकरंग आहेत. मुसलमान लोक मशिदीत बांगदेतात, ती भगवंताची स्तुतीच होय आणि हिंदू लोकही देवळात घंटा वाजवून ईश्वराची स्तुतीच करतात म्हणून जाती धर्मावर जुलूम करणे भगवंताशी वैरत्व करणे होय. कारण शास्त्र व न्याय या दोन्हीही दृष्टीने विचार

केला तरी जिझिया पट्टी ही गैर आहे. अकबर बादशहा यांनी ५२ वर्षे राज्य केले. त्या काळात सर्वांना न्यायाने वागविले. त्यामुळे त्यांना जनतेने जगद्‌गुरू अशी पदवी दिली. यावरून शिवाजी महाराजांचे स्वधर्म व परधर्माबद्दलची भावना स्पष्ट होते. अकबर व इतर बादशहा हे धर्माच्या कारणामुळे लोकांना छळले नाही. औरंगजेब मात्र या गोष्टी करतो, त्यामुळे त्याच्या राज्यात बरकत नाही म्हणून ते करू नये. अशी प्रतिक्रिया या पत्रामध्ये शिवाजी महाराजांनी लिहिली आहे.

आधुनिक कालखंडात महात्मा जोतीराव फुले यांनी सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी आपल्या लिखाणातून जातीय सलोखा निर्माण करण्यासंदर्भात मांडणी केली. महात्मा फुले यांनी समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना नष्ट करणे, स्त्री-पुरुष भेदाभेद संपुष्टात आणणे, स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांची जोपासना करणे इत्यादी प्रमुख उद्देश समोर ठेवून 'सत्यशोधक समाज' स्थापन केला होता. समता प्रधान समाज हा सत्यशोधक समाज निर्मितीचा मध्यवर्ती गाभा होता. याच दरम्यान भारतामध्ये ब्रिटीशांची परकीय सत्ता प्रस्थापित झालेली होती. परंतु; काही ठिकाणी संस्थानिकांचे अधिकार काही प्रमाणात अबाधित होते. या संस्थानिकांमध्ये राजा राजर्षी शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानांमध्ये धर्म व जातीभेद मिटवून सामाजिक सलोखा निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, पंडीत जवाहरलाल नेहरू यांनीसुद्धा सामजिक सलोखा निर्मितीसाठी मौलाचे योगदान दिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार ई. व्ही. रामसामी नायकर यांनी देशामध्ये सुरु केलेली दलित उद्धाराची चळवळ या देशामध्ये सामाजिक सलोखा निर्मितीसाठी आजही दिशादर्शक ठरणारी आहे. याबाबतची मांडणी पुढील प्रकरणात सविस्तरपणे करण्यात आलेली आहे.

## १.४. भारतातील धर्म आणि संस्कृती

धर्म आणि संस्कृती यांचा भारतीय समाज जीवनामध्ये अत्यंत जवळचा संबंध असल्याचे दिसून येते. प्राचीन भारतीय समाजजीवनामध्ये 'धर्म' या संकल्पनेचा व त्यावर आधारीत धर्मसंस्थेचा मोठ्या प्रमाणात विचार झाला आहे. ऋग्वेदामध्ये धर्म या शब्दाची व्याख्या 'धृ म्हणजे धारण करणे, आधार देणे किंवा पोषण करणे होय.' अशा प्रकारे करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर धर्म या शब्दाचा प्रयोग धार्मिक कृत्ये या अर्थानेसुध्दा ऋग्वेदात केलेला दिसतो. ब्राह्मण ग्रंथात 'धर्मासंबंधी कर्तव्यांचा संपूर्ण समुच्चय' या अर्थाने किंवा चोदनालक्षणार्थो धर्मः' 'आज्ञा-स्वरूपाच्या वेदवचनावरून ज्यांचा बोध होतो तो धर्म' असे म्हटलेले आहे. वैशेषिकांनी यतोभ्युदयनिःश्रेयससिध्दिः

स धर्मः! म्हणजे ज्याच्यापासून ऐहिक आणि पारलौकिक सुखाची प्राप्ती होते, तो धर्म असे म्हटलेले आहे. 'प्राचीन धर्मग्रंथ ब्राह्मण व वैदिक संहितांमध्ये ऋत या नैसर्गिक नियमाच्या सर्वसाधरण संकल्पनेचा उल्लेख वारंवार आला आहे. विश्वाचा शाश्वत वा सामान्य नियम किंवा चांगली व्यवस्था म्हणजे ऋत होय. या सुव्यवस्थेलाच नतंर धर्म म्हणण्यात येऊ लागले. म्हणून धर्म म्हणजे सर्व गोष्टांची उचित अशी नियमित स्वरूपाची रचना होय. (https://vishwakosh.marathi.gov.in/32876/) मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती किंवा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय. संस्कृती आणि संस्कार हे दोनही शब्द सम् अधिक कृ या एकाच धातूपासून बनलेले आहेत. त्यांचा वाच्यार्थ व्याकरण दृष्टया एकच आहे पण संस्कार हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिला. धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती ही संज्ञा वापरली जाते. तिची व्याप्ती व अर्थ व्यापक असून संस्कृतीची अनेकता, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागते. (https://vishwakosh.marathi.gov.in/33786) प्राचीनता, निरंतरता, धर्म प्रधानता, ग्रहणशीलता, सहिष्णूता, सर्वसमावेशकता, कर्मवाद, शांतता व अहिंसेचा पुरस्कार, वैश्विक बंधुभावाचा विकास, विविधतेतील एकता ही भारतीय संस्कृतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

भारत हा एक बहुधर्मिय, बहुआयामी असा 'मिश्र संस्कृतीवर' आधारलेला देश आहे. येथे हिंदू, जैन, बौद्ध, शीख, इस्लाम, पारशी, ज्यू इत्यादी धर्माचे लोक कित्येक वर्षांपासून गुण्यागोविंदाने नांदत आहेत. त्याचबरोबर स्वतःस अदिवासी समजणारा एक मोठा गट या देशामध्ये असून त्यांची स्वतःची अशी एक संस्कृती आहे. जीवनशैली म्हणजे संस्कृती. एकादा व्यक्ती किंवा समुदायाची आचार, विचार आणि विहाराची पद्धती याचा संस्कृतीशी जवळचा संबंध असतो. व्यक्ती आणि समाज ज्या पद्धतीने विचार करतो आणि आपले व्यवहार पार पाडतो याचा संस्कृतीशी जवळचा संबंध असतो. सामाजिकरणाच्या माध्यमातून संकृतीचे घटक एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. कला, संगीत, साहित्य, वास्तुकला, मूर्तीकला, तत्त्वज्ञान, धर्म आणि विज्ञान हे संस्कृतीचेच घटक आहेत. आपले विचार आणि जीवनपद्धती याची अभिव्यक्ती म्हणजे संस्कृती. भारतीय लोकांच्या विचारसरणीनुसार, धार्मिक सहिष्णुता हा त्यांच्या राष्ट्राच्या अस्तित्त्वाचा मध्यवर्ती गाभा आहे. सर्वच प्रमुख धार्मिक गटांमध्ये, बहुतेक लोक असे म्हणतात की ''खरेखुरे भारतीय'' असण्यासाठी सर्व धर्मांचा आदर करणे अतिशय महत्त्वाचे आहे. तसेच सहिष्णुता हे एक धार्मिक तसेच नागरी मूल्य आहे अशी बहुतांश भारतीय लोकांची धारणा आहे. धार्मिक सहिष्णुता आणि समानता याविषयी आपले मत व्यक्त करताना महात्मा गांधी म्हणतात, ''जगातील सर्व महान धर्म मुलतः समान आहेत. आपण स्वधर्माविषयी जशी आदरभावना बाळगतो, तसाच इतरांच्या

धर्माविषयी आदरभाव ठेवावा. लक्षात ठेवा, फक्त परस्पर सहिष्णुता नव्हे, तर सर्व धर्माविषयी समान आदर बाळगावा, सर्व धर्म समभाव ठेवावा.'' (गांधी, १९९५, ८७) भारतीय संस्कृतीविषयी साने गुरुजी म्हणतात, ''भारतीय संस्कृती म्हणजे सहानुभूती, भारतीय संस्कृती म्हणजे विशालता, भारतीय संस्कृती म्हणजे सत्याचे प्रयोग. भारतीय संस्कृती म्हणजे सारखे ज्ञानाचा मागोवा घेत पुढे जाणे. भारतीय धर्म आणि संस्कृतीमध्ये समन्वय, परस्पर विश्वासाची भावना आणि परधर्म सहिष्णुता इत्यादी मानवी मूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अद्वैत हा भारतीय धर्म आणि संस्कृतीचे मुलभूत तत्त्व आहे. अद्वैत म्हणजे आपल्यासारखेच इतरेजन आहेत ही संकल्पना. याच भावनेतून आज भारतामध्ये हजारो वर्षांपासून अनेक धर्म संप्रदाय व पंथ निर्माण झालेले आहेत. तसेच याठिकाणी परदेशातून आलेल्या धर्म संप्रदायही रुजले आहेत. भारतामध्ये प्राचीन काळापासून वैदिक आणि अवैदिक परंपरा या दोन धर्म व तत्त्वज्ञानाच्या परंपरा आहेत. या दोन्ही धर्म परंपरांमध्ये टोकाचे मतभेद असले तरी सामाजिक सलोखा राखण्यासाठी या दोन्ही परंपरा प्रयत्नशील राहिल्या आहेत. भारत देशामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या सर्वच धर्म व पंथांचे 'मानवता' हेच मुलभूत तत्त्व राहिले आहे. त्याचबरोबर या मातीमध्ये परकीय आक्रमकांनी आणि व्यापाऱ्यांनी आपल्याबरोबर आणलेले मुस्लिम, ख्रिश्चन, यहुदी, पारशी इत्यादी धर्मसुद्धा याच मानवी मुल्यांची जोपासना करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या सर्व धर्म व पंथांच्या एकमेकांना साद प्रतिसाद देण्याच्या प्रक्रियेतून आज एक वैशिष्ठयपूर्ण अशी संपूर्ण मानवजातील मार्गदर्शक अशी संस्कृती निर्माण झालेली आहे व जागतिक स्तरावर ती 'भारतीय संस्कृती' म्हणून ओळखली जात आहे. धर्म आणि संस्कृती यांचा भारतीय समाजजीवनामध्ये अत्यंत घनिष्ठ संबंध आहे.

## १.५ शांततेचे तत्त्वज्ञान

वैश्विक शांततेचा पुरस्कर्ता म्हणून भारतास जागतिक स्तरावर अग्रक्रमाने ओळखले जाते. भारतीय तत्त्वज्ञानाने जगाला दिलेले शांततेचे तत्त्वविचार आजही अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. शांतता ही सामजिक सौहार्दाची पूर्व अट आहे असे म्हणावे लागेल कारण सामाजिक सौहार्दय शांततापूर्ण वातावरणातच निर्माण होऊ शकते. सामाजिक अर्थाने, शांतता म्हणजे सामान्यतः संघर्षाचा अभाव (जसे की युद्ध) आणि व्यक्ती किंवा गटांमधील हिंसाचाराच्या भीतीपासून मुक्तता. भारताच्या सामाजिक आणि धार्मिक तत्त्वज्ञानामध्ये 'शांतता' विचार अग्रभागी राहिला आहे. शिवाय आजही भारतीय समाजाची सामजिक तसेच राजकीय वाटचाल याच विचारांच्या आधारे सुरु आहे. तसेच आंतरराष्ट्रीय

पातळीवरील पेचप्रसंग सोडविण्याच्या बाबतीतही भारताने शांतता मार्गाचा कायम आग्रह धरलेला आहे. शांततेच्या वातावरणातच माणसांचे परस्परांशी तसेच कुटुंबाशी, समाजाशी असलेले नाते संबंध आणि व्यवहार वृद्धिंगत होण्यास मदत होते. याचाच अर्थ सामाजिक सौहार्द निर्माण होण्यासाठी शांतात आवश्यक असते. शांततेच्या वातावरणात मनुष्य आपली सर्वांगीण प्रगती साध्या करू शकतो. शांततेच्या वातावरणात माणसांच्या सर्व प्रकारच्या नैसर्गिक आणि मानवी अधिकारांची जोपासना होऊ शकते. शांतता तत्त्वांचा विचार प्राचीन कालखंडापासून आजमितीपर्यंत भारतीय तत्त्वज्ञानाचा मुलभूत गाभा राहिलेला आहे. प्राचीन धर्म तत्त्वज्ञानानमध्येसुद्धा हा विषय अग्रभागी आहे. यामध्ये वैदिक धर्मग्रंथ, बौद्ध व जैन धर्म तत्त्वज्ञानाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. प्राचीन भारतातील उपनिषदे ग्रंथ, बौद्ध व जैनांचे धर्म साहित्य इत्यादींमध्ये शांतता विषयक विचार आढळून येतात.

**अ) उपनिषदे**

उपनिषदे वेदांच्या शेवटी, म्हणजे अन्त्यभागी येतात म्हणून ती वेदांत होत. गुरूगृही राहिलेला विद्यार्थी आपले बाकीचे सगळे अध्ययन पूर्ण केल्यावर, म्हणजे अगदी शेवटी, उपनिषदे शिकत असे. त्याच्या वेद-शिक्षणाचा तो अन्त्य भाग असल्यानेही वेदान्त हे नाव सार्थ होते. उपनिषदांना वेदान्त म्हणण्यात आणखीही औचित्य आहे. वेदांनी ज्याचा अन्त पहिला आहे अथावा अंतिम ठाव घेतला आहे असे ज्ञान, म्हणजे वेदांचे सारभूत ज्ञान उपनिषदांत संगृहीत आहे. म्हणून ती वेदान्त होत. उपनिषद या शब्दाची फोड उप-नि-सद् अशी करता येते. त्यातील 'सद्' म्हणजे बसणे. त्याच्या पाठीमागे 'उप' आणि 'नि' हे उपसर्ग लाविल्याने 'गुरूंच्या फार जवळ (उप) आणि निष्ठापूर्वक (नि) बसणे', 'एकांतात बसणे' असा अर्थ होतो. उपनिषदातील ज्ञान गूढ असल्याने ते चारचौघात सांगावयाचे नाही, त्याची जाहीर चर्चा करावयाची नाही, तर सर्व प्रकारे योग्य असलेल्या जिज्ञासू शिष्याला अगदी खासगी रीतीने गुरूने द्यावयाचे ज्ञान असे त्याचे स्वरूप आहे. याच अभिप्रायाने उपनिषदांना 'रहस्य' असे खुद्द उपनिषदांतच म्हटलेले आहे.

उपनिषदामध्ये शांतताविषयक महत्त्वाचे विचार सामावलेले आहे. या शांतताविषयक विचारांचा या विचारांचा भर प्रामुख्याने वैयक्तिक मनाची शांतता त्याचबरोबर सामाजिक शांतता व सोहार्द्यावर दिसून येतो. ॐ या शब्दास उपनिषदामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ॐ या शब्दामध्येच शांतता अंतर्भूत आहे. ॐ या शब्दाचे तीन वेळा योग्य प्रकारे केलेले उच्चारण शांतता, स्थिरता आणि समाधान प्राप्त करण्यासाठी पुरेसे आहे. 'ॐ वाङ्? मे मनसि प्रतिष्ठिता ! मनो मे वाचि प्रतिष्ठितम। आविरावीर म एधि । वेदस्य म आणी स्थः । श्रुतं मे मा प्रहासी: ।अनेनाधीतेन

अहोरात्रन संदधामि । ऋतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । सत्यं वादिष्यामि। तन्मामवतु । तद्? वक्तारमवतु । अवतु वक्तारम्? ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।' (ॐ माझी वाणी मनामध्ये प्रतिष्ठित झाली आहे. माझे मन वाणीमध्ये प्रतिष्ठित झाले आहे. हे प्रकाशरूप आत्मन! माझ्यासाठी प्रकट हो! (हे मन आणि वाणी!) माझ्यासाठी वेद आणायला समर्थ व्हा. मी ऐकलेले (ज्ञान) माझा त्याग न करो. या अध्ययनाने मी दिवस आणि रात्र जोडीन. मी ऋत बोलेन. मी सत्य बोलेन. ते माझे ररक्षण करोत. ते बोलणारांचे रक्षण करोत. ते बोलणारांचे रक्षण करोत. ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।) हा ऐतरेय-कौषीतकि उपनिषदाचा शांति मंत्र आहे. त्याचबरोबर ॐ पूर्णमदः पूर्णमिदम्? पूर्णात्? पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।। (ॐ ते पूर्ण आहे, हे पूर्ण आहे. पूर्णापासून पूर्ण निष्पण होते. पूर्णातून पूर्ण काढून घेतले तरी पूर्णच शेष राहते. ॐ शांति: शांति: शांति:!) हा ईश-बृहदारण्यक-श्र्वेताश्वर उपनिषदांचा शांतिमंत्र आहे. तर ॐ सह नाववतु। सह नौ भुनक्तु। सह वीर्यं करवावहै। तेजस्वि नावधीतमस्तु। मा विद्विषावहै।। ॐ शान्ति: शान्ति: शान्ति:।। (ॐ (परमात्मा) आमचा (गुरु-शिष्यांचा) एकत्र विकास करो. आमचे एकत्र रक्षण करो. आम्ही एकत्र पराक्रम करू या. आमचे अध्ययन तेजस्वी होवो. आम्ही परस्परांचा द्वोष न करावा.) हा कठ-तैतिरीय-नारायण-कैवल्य-ब्रह्मबिंदु उपनिषदांचा शांतिमंत्र आहे. ॐ आप्यायन्तु ममांगानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि। सर्वम् ब्रह्मौपनिषदम् माऽहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोदनिराकरणमस्त्वनिराकरणम्? मेऽस्तु। तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।। (माझी हस्त-पादादि अंगे, तसेच वाणी, प्राण, चक्षु, श्रोत्र, पृष्ट होवोत. सर्व इंद्रियांमध्ये बळ येवो. हा केन-छांदोग्य-मैत्रायणी उपनिषदांचा हा शांतिमंत्र आहे. प्रश्न-मुंडक-मांडूक्य-जाबाल-आरुणिक उपनिषदाचा 'ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः। स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः । स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः। स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः। स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः। स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।। (हे देवांनो, आम्हाला सदैव चांगले आणि शुभकर बोलच ऐकायला मिळोत. डोळ्यांना देखील चांगले तेच पाहावयास मिळो. आमच्या स्थिर झालेल्या अवयवांनी- मनापासून तुमची स्तुती करणारे व्हावे. आम्हाला दीर्घायुष्य लाभो. आमचे मन शुभ गोष्टींकडे आकर्षित केले जाईल अशी प्रेरणा द्या.) हा शांती मंत्र आहे. 'ॐ द्यौ: शान्तिरन्तरिक्षं शान्ति: पृथिवी शान्तिराप: शान्तिरोषधय: शान्ति:। वनस्पतय: शान्तिर्विश्वेदेवा: शान्तिर्ब्रह्म शान्ति: सर्वं शान्ति:, शान्तिरेव शान्ति: सा मा शान्तिरेधि ।। ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ।।' या यजुर्वेदातील या शांति मंत्रामध्ये देवास सभोवतालच्या वातावरणाबरोबरच समस्त पृथ्वी वनस्पती परब्रह्मसंपूर्ण ब्रम्हांड इतकच नव्हे तर वातावरणाच्या कणा कणात शांतता रहावी अशी प्रार्थना केलेली आहे. त्याचबरोबर

'तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्माऽमृतं गमय। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।' या याजुर्वेदातीलच शांतीमंत्रामध्ये हे ईश्वरा आम्हाला असत्याकडून सत्याकडे! अंधारातून प्रकाशाकडे! आणि मृत्युकडून अमृत्याकडे न्यावे! अशी विनंवणी केलेली आहे.

उपनिषदातील शांतता विचारामध्ये 'आत्मा' आणि 'ब्रह्म' या संकल्पनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. स्वत:मध्ये आत्मा आहे व तो ब्रह्म, परिपूर्ण आणि सर्वोच्च निर्माता, संरक्षक आणि विध्वंसक आहे म्हणून तो परमात्मा आहे. आत्म्यामध्ये भांडणे थांबतात, वादविवाद थांबतात, तत्त्वज्ञान शांत होते. तेव्हा मौनच शिल्लक राहते. ही शांतता म्हणजेच आत्मा आहे असे माण्डूक्य उपनिषदात सांगितले आहे. जेव्हा एक शिष्य आपल्या गुरूंना 'मला आत्म्याबद्दल सांगा' असे म्हणतो तेव्हा गुरु शांत बसतात. तो शिष्य पुन्हा आपल्या गुरूला विचारतो, तेव्हा पुन्हा गुरु शांत बसतात, शिष्य तिसऱ्यांदा विचारतो, त्यावेळीही गुरु शांत बसतात, शिष्य चौथ्या वेळेस पुन्हा 'मला आत्म्याबद्दल सांगा' असे विचारतो, तेव्हा मात्र गुरु उत्तर देताना सांगतात, 'मी तुला सांगतच आहे पण तू ऐकत नाहीस. कारण मौन हाच आत्मा आहे. त्या महान शांततेमध्ये विश्वातील सर्व गडबडी आणि क्षोभ शांत होत असतात. उपनिषदामध्ये 'आत्मा' आणि 'ब्रह्म' या दोन्ही गोष्टी एकच मानल्या आहेत. आत्मा हा सर्वव्यापी असतो; तो साऱ्या आनंदाचा आणि प्रेमस्वरुपाचा जिवंत झरा असतो असे उपनिषदात सांगितले आहे. इमर्सननें म्हटल्याप्रमाणे ''Every man is God playing the fool'' ही गोष्ट त्या औपनिषत्कालीन विचार करणाऱ्यांना दिसून आली व याप्रमाणे सकल सुखाचा शांतिनिधि प्रत्येकाच्या हृदयात वसला असताना स्वर्गसंसाराकडे व यज्ञयागांकडे धाव घेणाऱ्या त्या अज्ञानी कर्मठजीवांची त्यांना कीव आली, हसू आले, सात्विक संतापही आला व ''न वा अरे सर्वस्य कामाय सर्व प्रिय भवति। आत्मनस्तु कामाय सर्व प्रिय भवती।।'' (बृहदारण्य ।।४।५।।) म्हणजे सर्व सुखाचे स्थान 'अस्ति भाति प्रिय' असा आत्मा आहे. उपनिषदांमध्येसुद्धा सामाजिक सहिष्णुता आणि एकात्मतेचे विचार सामावलेले आहेत. उपनिषदांमध्ये वर्ण आणि जातींवर आधारित शारीरिक भेदाभेदाच्या पलीकडे जावून 'आत्मा' सर्वश्रेष्ठ मानला आहे. विश्वातील सर्व जीवांमध्ये ब्रह्माचा अंश सामावलेला असतो; त्यामुळे अर्थातच सर्व मनुष्यांमध्ये ब्रह्माचा अंश सामावलेला असतो. त्यामुळे जाती व धर्माच्या आधारे भेदाभेद होता कामा नये अशी भूमिका उपनिषदामध्ये दिसून येते. आत्मा हेच परमप्राप्तव्य आहे. याचा अर्थ 'स्वत:च्या एकटेपणात, केवल ज्ञातृस्वरूपात रमून जा' असा नव्हे. आत्मा प्राप्त करून घ्यावयाचा म्हणजे विश्वात्मैक्याचा अनुभव घ्यावयाचा. मीच सर्वत्र भरून राहिलो आहे, इदं सर्वं यद् अयम् आत्मा, असा साक्षात्कार करून घ्यावयाचा. या प्रयत्नात अहंकार गळून पडल्यामुळे जो व्यापकतेचा अनुभव येत जाईल तो अत्यंत आनंददायक आहे. यो वै भूमा तत्सुखम । अल्पत्वात, संकुचीत्पानात सुख नाही. जो भूमा आहे तो

अमृत आहे. जो अल्प आहे तो मर्त्य आहे असे छांदोग्य उपनिषदात म्हंटले आहे. 'कृतकृत्य' ही नैतिक संकल्पना उपनिषदात आली आहे. कृत्य म्हणजे जे करावयाचे आहे, जे करणीय आहे ते, म्हणजे कर्तव्य. कृतकृत्य म्हणजे ज्याने कर्तव्य केले आहे असा.आयुष्यात काही कर्तव्य असतात ती पार पाडली पाहिजेत. पण ही कर्तव्य कल्पना, 'आप्तव्य' कल्पनेला सोडून नाही. कृतकृत्य झालेला माणूस आप्तकाम होतो असेही म्हंटलेले आहे. तसेच आप्तकाम झाल्याने अमृत होतो असाही उद्गार ऐतरेय उपनिषदात आहे. आत्मलाभ झाल्याने जो आप्तकाम आहे, अशा व्यक्तीचे मानसशास्त्रीय वर्णन पुष्कळदा येते. तो ''मोहरहित, शोकरहित, अभय आणि शान्त असतो'' असा माणूस परमसाम्याला पोचतो. आनंददायक व शांत जीवन कसे जगावे याचा एक आदर्श उपनिषदांनी उभा केलेला आहे. अमृतत्व हे माणसाचे खरेखुरे श्रेय आहे. त्याच्याविषयी त्याच्याविषयी व्यक्तीची अंतर्यामी ओढ असते. पण पुष्कळदा बुद्धी मोहवश होते. बाह्य रुपामुळे आकर्षक भासणाऱ्या प्रेमालाच ती श्रेय समजते.अन्ततो गत्वा विवेकाच्या सहाय्याने जे काल्याणनिधान ठरेल ते श्रेय होय असा महत्त्वपूर्ण विचार उपनिषदात आढळतो. उपनिषदांमधील हे विचार मानवी मनाबरोबरच विश्वातील सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणाचे व शांतता निर्मितीच्या प्रक्रियेतील महत्त्वाचे विचार आहेत.

### ब) बौद्ध धर्म

जगामध्ये शांतता विषयक तत्त्वज्ञानामध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाचा अग्रक्रमाने उल्लेख केला जातो. तथागत गौत्तम बुद्ध हे या विचार व तत्त्वज्ञानाचे जनक म्हणून ओळखले जातात. तथागत गौत्तम बुद्धांच्या विचारस ''धम्म'' म्हणून ओळखले जाते. हा 'धम्म' विचार आखिल प्राणीमात्राच्या कल्याणाचा विचार आहे. प्रज्ञा, शील व करुणा या मानवी मुल्यांवर हे संपूर्ण 'धम्म' तत्त्वज्ञान आधारलेले आहे. 'धम्म' हा बौध्द तवज्ञानाचा मूलभूत पाया आहे. 'धम्म' या शब्दाचा पालि-मराठी शब्दकोशामध्ये धर्म, सिध्दांत, स्वभाव, सत्य, सदाचार असा अर्थ दिला आहे. धम्म या शब्दाचे न्याय, सदाचरण, लोकोार घटना, उदाा जीवन, मुक्ती वगैरे अनेक अर्थ संभवतात. परस्पर सापेक्षता आणि परस्परनिरपेक्षता यांच्यामध्ये उचित संतुलन ठेवून व्यक्ती, कुटूंब आणि समाज यांचे सर्वोाम कल्याण साधणारी आणि त्यांना निकोप आनंद देणारी जीवनशैली म्हणजे तथागतांचा धम्म असे स्थूलमानाने म्हणता येईल. 'धम्म' हा शब्द तिपिटकात एखादी गोष्ट, पदार्थ, वस्तू, गुणधर्म, वैशिष्ट इत्यादी अर्थाने वारंवार येतो. तथागत गौतम बुध्दांना प्राप्त झालेली सम्यक् संबोधी म्हणजे 'धम्म' होय. महादुक्ख क्खन्धामध्ये गौतम बुध्दांनी धम्माचा उेश व आधार स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, ''आपल्या धम्माचे पहिले अनुष्ठान मनुष्यप्राणी दुःखात, दैन्यात आणि दारिद्रयात राहत आहेत आणि जगातून दुःख नष्ट करणे हा एकच धम्माचा उेश आहे. दुःखाचे अस्तित्व मान्य

करणे आणि ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हाच धम्माचा मुळ पाया आहे. जो धर्म ह्याला मान्य करत नाही ते धर्मच नव्हेत.''

**सब्बपापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा।**

**सचिापरियोदपनं एतं बुध्दान सासनं।।**

(सर्व पापापासून विरक्त होणे, (सर्व) कुशलाचा (पुण्याचा) संचय करणे आणि स्वचिाचे संशोधन करणे हे बुध्दाचे अनुशासन होय.) धम्मपदातील या पाली गाथेमध्ये बुध्दांच्या 'धम्म' तत्त्वाचा सार सामावलेला आहे. प्रतीत्यसमुत्पाद सिध्दांत, आर्य अष्टांगिक मार्ग, पंचशील तत्त्वे, चार आर्यसत्ये, दसधम्मसंक्कध, दहापारमिता यामध्ये संपूर्ण धम्म विचार समावलेला आहे व हा दु:ख मुक्ती व मानवी मन आणि समाज व्यवस्थेमध्ये शांतता आणि सलोखा निर्माण करणारा विचार आहे.

**चार आर्य सत्ये**

बौध्द धम्मामध्ये चार आर्यसत्यांना महवाचे स्थान आहे. ही चार आर्य सत्ये प्रतीत्यसमुत्पाद सिध्दांतावर आधारलेली असून त्यांचा समावेश प्रतित्यसमुत्पादाच्या सिध्दांतामध्ये सांगितलेल्या बारा अंगापैकी अविद्या या अंगामध्ये समावेश होतो. आर्य म्हणजे 'ज्याचे सर्व अकुशल पापधर्म दूर झाले आहेत तो' अशी मज्झिमनिकायात व्याख्या करण्यात आली आहे, तर 'जो पापकर्मापासून अत्यंत दूर गेला आहे तो आर्य' असे अभिधर्मकोषभाष्यात म्हटले आहे.

**१) दु:ख**

जन्म दु:खकारक आहे. जरा दु:खकारक आहे. व्याधी दु:खकारक आहे. मरण दु:खकारक आहे. अप्रियांचा समागम आणि प्रियांचा वियोग दु:खकारक आहे. इच्छिलेली वस्तू मिळत नसली म्हणजे तेणेकरूनही दु:ख होते. संक्षेपाने पाच उपादानस्कन्ध दु:खकारक आहेत.(महासतिपट्ठानसु)

**२) दु:खसमुदय**

दु:ख समुदय म्हणजे दु:खाचे कारण. 'सम' हे पद 'सह' किंवा 'समवेत' वाचक आहे. 'उद्' उत्पन्न होणे किंवा उदित होण्याच्या अर्थाने आहे. तर 'अय' हे कारण किंवा हेतुवाचक आहे. म्हणून दु:खसमुदय म्हणजे ज्याच्यामुळे दु:ख उत्पन्न होते ते कारण किंवा हेतु. दीघनिकायातील महासतिपट्ठानसुत्तात बुध्द म्हणतात, भिक्खूंनो, दु:खसमुदायाच्या विषयी काय आर्यसत्य आहे. भिक्खूंनो, ही पुन:पुन्हा उत्पन्न होणारी लोभ आणि विकाराने युक्त असलेली अनेक विषयात रममाण होणारी तृष्णा, जिला कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभवतृष्णा असे म्हणतात, ती दु:खसमुदय नावाचे दुसरे आर्यसत्य आहे.

### ३) दु:खनिरोध

कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभवतृष्णा यांच्यापासून संपूर्ण वैराग्य, त्या तृष्णेचा निरोध, त्याग, परि त्याग, त्या तृष्णेपासून मुक्ती, अनासक्ती, हेच दु:खनिरोधाच्या विषयीचे आर्यसत्य आहे.

### ४) दु:खनिरोधगामिनी प्रतिपदा

दु:खनिरोधाकडे घेऊन जाणारा मार्ग म्हणजे दु:खनिरोधगामिनी प्रतिपदा होय. अभिधर्मकोषभाष्यात म्हटल्याप्रमाणे हा मार्ग सम्यक् रीतीने प्रतिपादन केला असल्यामुळे त्याला प्रतिपद असे म्हटले आहे. मार्गालाच निर्वाणाचे प्रतिपादन केल्यामुळे प्रतिपद असे म्हटले आहे. या मार्गानेच निर्वाणाकडे जाता येते. या मार्गाने गेल्यानेच दु:खनिरोधाचा लाभ होतो. हा एकच मार्ग असल्याने त्याला दु:खनिरोधगामिनी प्रतिपद असे म्हणतात. आर्य अष्टांगिक मार्ग हा दु:खनिरोधाचा मार्ग आहे.

### अष्टांगिक मार्ग

गौतम बुध्दांनी चार आर्यसत्यामध्ये दु:ख, दु:ख निर्मितीची कारणे, दु:ख समुच्चय आणि त्यापासून सुटका करून घेण्याचा मार्ग यांविषयी महत्त्वपूर्ण मांडणी केलेली आहे. या आर्यसत्यांमध्ये दु:खाचे निर्वाण करण्याचा जो मार्ग सांगितलेला आहे त्यास 'अष्टांगिक मार्ग' असे म्हणतात. अष्टांगिक मार्ग हा बौध्द धम्माचा गाभा आहे. तो पुढीलप्रमाणे -

### १) सम्यक् दृष्टी

पाली भाषेतील सम्मा किंवा संस्कृत भाषेतील सम्यक् म्हणजे योग्य, यथार्थ, बरोबर, अत्युत्तम किंवा निर्मल आणि दिट्ठि किंवा दृष्टी म्हणजे दृष्टिकोन किंवा तत्त्वज्ञान. जी वस्तू आहे त्यारूपात तिचे दर्शन होणे, ज्ञान होणे, तिचे यथार्थ रूप जाणणे म्हणजे सम्यक् दृष्टी.

### २) सम्यक् संकल्प

प्रत्येक माणसाला काही ध्येये, आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा असतात. अशी ध्येये, आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा ही उदात्त आणि प्रशंसनीय असावीत. ती क्षुद्र आणि अयोग्य नसावी. हा 'सम्यक् सकल्पा'चा आशय आहे. सम्यक् संकल्प म्हणजे यथार्थ संकल्प किंवा ठीक विचार. सम्यक् संकल्पात लोभ, द्वेष, मोह यांना स्थान नाही. त्यामुळे सुडाने, क्रोधाने किंवा लालसेने केलेला संकल्प हा सम्यक् संकल्प नसून मिथ्या संकल्प आहे. इतरांचे नुकसान करून आपली संपत्ती व सत्ता न वाढविणे, चैनविलास व इंद्रिय सुखात मग्न न होणे, इतरांवर पूर्णपणे प्रेम करणे व इतरांचे सुख वाढविणे म्हणजे सम्य्क संकल्प.

### ३) सम्यक् वाणी

माणसाने जे सत्य असेल तेच बोलावे, असत्य बोलू नये, दुसऱ्यांची निंदानालस्ती करण्यापासून परावृत्त व्हावे, आपल्या लोकांविषयी रागाची किंवा शिवीगाळीची भाषा वापरू नये, सर्वांशी आपुलकीने व सौजन्याने बोलावे, अर्थहीन मूर्खपणाची बडबड करू नये, बोलणे समंजसपणाचे व मुद्देसूद असावे. असत्य वचन, निंदानालस्ती, निर्भर्त्सना, निरूपयोगी बडबड आणि अशाच प्रकारच्या जिभेच्या दुरूपयोगामुळे समाजाची घडण दूषित होते, भांडणे उत्पन्न होतात व त्यातून दंगल व हत्या होण्याचा संभव असतो. म्हणूनच योग्य भाषण हे सत्य परस्पर स्नेहास पोषक प्रेमभाव निर्माण करणारे व मोजके असले पाहिजे. खोटे न बोलणे, चहाडी न करणे, कठोर शब्द न उच्चारणे, आणि वृथा भाषण न करणे यांना सम्यक् वाचा म्हणतात.

### ४) सम्यक कर्मांत

'सम्यक् कर्मान्त' हे योग्य वर्तनाची शिकवण देते. दुसऱ्यांच्या भावना आणि त्यांचे हक्क यांचा मान राखून प्रत्येक कृती करावी अशी याची शिकवण आहे. कोणत्याही जीवहिंसेपासून, चोरीपासून, कामोपभोगाच्या मिथ्याचारापासून दूर राहणे यालाच 'सम्यक् कर्मांत' असे म्हणतात. सम्यक् कर्मांत याचा अर्थ ठीक कर्म, योग्य कर्म, निर्मन कर्म हे मिथ्या कर्मान्ताच्या विरूध्द आहे.

### ५) सम्यक् आजीविका

'प्रत्येक व्यक्तीला आपला चरितार्थ चालवायचा असतो. परंतु चरितार्थाचे अनेक मार्ग आहेत. काही वाईट आहेत, काही चांगले आहेत. ज्यांच्यामुळे इतरांची हानी होते किंवा इतरांच्यावर अन्याय होतो ते वाईट मार्ग होत. दुसऱ्यांची हानी किंवा अन्याय न करता जगण्यापुरते मिळवण्याचे जे मार्ग चांगले होत. याला 'सम्यक् आजीविका' म्हणतात. (आंबेडकर, (२००८),९८) शस्त्रांचा व्यापार, प्राण्यांचा व्यापार, मद्याचा व्यापार आणि विषयाचा व्यापार हे पाच व्यापार सोडून दुसरा कोणताही उचित व्यापार-उद्योग चालविणे सम्यक् आजीविकेमध्ये अभिप्रेत आहे.(मोरे, (२००९), १२६१) तथागत बुध्दांनी भिक्खू, उपासक व राज्यकर्त्यांसाठी वेगवेगळा प्रकारची सम्यक् आजीविका सांगितली आहे.

राज्यकर्त्यांच्या सम्यक् आजीविकेविषयी दीघनिकाय आणि अंगुत्तरनिकायात भगवान बुध्दांनी केलेल्या उपदेशात असे म्हटले आहे की, राजाने राजधर्माप्रमाणे राज्य करावे. (कित्ता, १२१) बौध्द धम्मग्रंथामध्ये राज्यकर्त्यांचे दहा राजधर्म सांगितलेले आहेत. याची चर्चा पुढे करण्यात आली आहे.

### ६) सम्यक् व्यायाम

'सम्यक् व्यायाम' म्हणजे अविद्या नष्ट करण्याचा प्राथमिक प्रयत्न होय. अविद्या नष्ट करणे म्हणजे या दु:खदायक कारागृहातून बाहेर जाण्याच्या दारापर्यंत पोहचून पुढील मार्ग मोकळा करणे होय. सम्यक् व्यायामाचे पुढील चार हेतू असतात. १) अष्टांग मार्गाशी विरोधी अशा चित्तवृत्तीचा प्रतिरोध करणे, २) अशा प्रकारच्या ज्या चित्तवृत्ती अगोदर उत्पन्न झाल्या असतील तर त्या दाबून टाकणे, ३) अष्टांग मार्गाला आवश्यक अशा चित्तवृत्ती उत्पन्न करण्यास माणसाला साहाय्य करणे ४) अशा प्रकारच्या ज्या चित्तवृत्ती अगोदरच अस्तित्त्वात आल्या असतील तर त्यांची वाढ आणि विकास करणे.

### ७) सम्यक् स्मृती

सम्यक् स्मृतीला जागरूकपणा व विचारीपणा याची आवश्यकता असते. मनाची सतत जागृति हा त्याचा अर्थ होय. दुष्ट वासनांवर मनाचा सतत पहारा ठेवणे हे सम्यक् स्मृतीचे दुसरे नाव होय. शरीर अपवित्र पदार्थाचे बनले आहे हा विवके जागृत ठेवणे, शरीरातील सुखदु:खदि वेदनांचे वारंवार अवलोकन करणे, स्वचित्ताचे अवलोकन करणे, आणि कार्यकारणपरंपरा इत्यादि तात्त्विक गोष्टींचे चिंतन करणे या चार प्रकारांनी चित्ताला जागृत ठेवणे, याला सम्यक् स्मृति म्हणतात.

### ८) सम्यक् समाधी

सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मान्त, सम्यक् आजीविका, सम्यक् स्मृती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसाच्या मार्गावर लोभ, द्वेष, आळस व स्तुती, संशय आणि अनिश्चय हे पाच अडथळे होत. म्हणून हे अडथळे दूर करणे आवश्यक आहे. हे अडथळे म्हणजेच बंधने होत; आणि ते दूर करण्याचा मार्ग समाधी हा होय.

### पंचशील

त्रिशरणाच्या उच्चारानंतर उपासकाला पाच नियमांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घ्यावी लागते. या नियमांना सिक्खापद (शिक्षापद) असे म्हणतात. हे पाच नियम खुद्दकपाठात सरणायानंतर लगेच पुढे देण्यात आले आहेत.

१) **अहिंसा** – कोणत्याही प्राणीमात्राची हिंसा करू नये.

२) **सत्य** – असत्य संभाषण किंवा विचारांचा पूर्णपणे त्याग करावा.

३) **अस्तेय** – जे आपल्या मालकीचे नाही किंवा आपल्यास दिले नाही त्याची अभिलाषा धरू नये.

४) **ब्रह्मचर्य –** ब्रह्मचर्य तत्त्वाचे काटेकोरपणे पालन करावे.

५) **अपरिग्रह –** कोणत्याही मादक पदार्थाचे सेवन करू नये किंवा अनावश्यक बाबींचा संग्रह करू नये.

**दहा पारमिता**

दहा पारमिता म्हणजे माणसांनी साध्य करावयाचे दहा अंतिम नैतिक आदर्श होत. प्राचीन काळापासून आजपर्यंत झालेल्या नीतिशांस्त्रामध्ये या आदर्शांचे स्वयंपूर्णत्व केवळ भगवान बुध्दानेच सांगितले. बुध्द धर्मातील एका संप्रदायात परमेश्वर म्हणजे पारमिताच होय, असा विचार कालांतराने रूढ झाला. पारमिता म्हणजे मानवाचे नैतिक जीवनाचे अंतिम स्वरूप होय. बुध्द व तीर्थंकर यांनी उपदेशिलेल्या अहिंसा या परमधर्माचा विधायक स्वरूपातील निष्कर्ष म्हणजे पारमिता होत. विशेषत: मैत्री पारमितेला बुध्दांने स्वत:च्या उपदेशात केंद्रस्थानी ठेवले आहे. या मैत्री पारमितेचा म्हणजे विश्वव्यापी प्रेमतत्वाचा प्रभाव पडून बुध्दाच्या हयातीतच राजा अजातशतू, पसेनदिराजा, सिंह सेनापती, वैदिक ब्राह्मणांचे समुदाय, तपस्वी संप्रदाय बुध्दांकडे व बुध्दानुयायांकडे आकर्षिले गेले. बुध्दानंतर दोनशे वर्षाच्या कालावधीत भारतात मौर्य साम्राज्य स्थापित झाले आणि त्यातील श्रेष्ठ सम्राट अशोक हा बुध्द धर्माच्या आदेशाने भारावला गेला व त्यांने बुध्द धर्माच्या प्रसाराला वेग आणला व याचे कारण विश्वव्यापी मैत्रीचा संदेश होय.

बोधिसव बुध्दत्व प्राप्तीसाठी ज्या गुणाची पूर्णता प्राप्त करतो, तो गुण म्हणजे पारमिता होय. पाली भाषेत यास पारमी असे म्हणतात. या दहा पारमिता म्हणजे १) दान २) शील ३) नैष्कर्म्य ४) प्रज्ञा ५) वीर्य ६) क्षांती ७) सत्य ९) अधिष्ठान ९) मैत्री १०) उपेक्षा होय. मानवी स्वभावामध्ये निर्माण झालेल्या स्वार्थ, लोभ, मोह आणि मत्सर या प्रवृत्तीमुळे तो चौर्यप्रवृत्तीचा, हिंसक आणि सत्ताकांक्षी बनला आहे. जास्तीत जास्त सुख व स्वार्थ साध्य करण्यासाठी मनुष्य तृष्णेच्या अधीन बनला आहे. त्यामुळे तो हिंसात्मक कृत्य करतो. अर्थातच त्याच्या या हिंसात्मक कृत्यास हिंसाजन्य दण्ड हे उत्तर होऊ शकत नाही, अशी बुध्दांची धारणा होती. समाजामध्ये या ज्या प्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत, त्याचे मूळ बुध्दांना मानवी जीवनात अस्तित्त्वात असलेल्या दु:खामध्ये सापडले व दु:ख निर्मितीच्या मुळाशी तृष्णा असल्याचे दिसते. अभिधम्मात तृष्णेचे एकशे आठ प्रकार सांगितले आहेत. ही तृष्णा संपत्तीची, भोगाची तसचे प्रिय वस्तूपासून मिळणाऱ्या सुखाची असते व या तृष्णेच्या पूर्तीसाठी माणूस सदैव प्रयत्नशील असतो. परंतु, एका तृष्णापूर्तीतून दुसरीचा जन्म होतो, त्यामुळे मानवी जीवनातील तृष्णेची कधीच पूर्तता होत नाही व मानवी जीवन दु:खमय बनते. गौतम बुध्दांनी दु:ख निर्मितीच्या केलेल्या या विश्लेषणास 'चार अरियसत्ये' असे

म्हणतात. त्यांनी मानवी जीवनातील दु:ख निर्मितीची ही कारणमीमांसेबरोबरच त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही सांगितला. यास 'आर्यअष्टांगिक मार्ग' असे म्हणतात. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मांत, सम्यक् आजीविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती, सम्यक् स्मृती, सम्यक् समाधी या अष्टांगिक मार्गातील महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. गौतम बुध्दांचा हा आर्यअष्टांगिक मार्ग संपूर्णत: नैतिकता, सदाचार, प्रज्ञा, शील आणि करूणेच्या तत्त्वांवर आधारलेला आहे. पंचशीले, दसधम्मस्कंध, दहा पारमिता इत्यादींच्या आधारे हा आर्यअष्टांगिक मार्ग आणखी प्रबळ झाल्याचे दिसून येते. बौध्द धम्म तत्त्वज्ञानामध्ये मानवी जीवनातील संपूर्ण नैतिक शुध्दतेवर भर देण्यात आला आहे.

### क) जैन धर्म

जैन धर्म हा भारतातील एक प्रमुख आणि प्राचीन धर्म असून त्याची परंपरा आजतागायत भारताच्या विविध भागात अव्याहतपणे चालू आहे. जैन धर्मपरंपरेचे हे सातत्य अबाधितपणे आणि अविरतपणे शातकानुशतके चालू राहणास जैन धर्माने दिलेली शांततेचे व एकात्मतेची शिकवणूक मुख्यत: कारणीभूत आहे. जैन धर्म हा जरी अल्पसंख्यांकाचा धर्म असला तरी जैन धर्माच्या अनुयांयांनी सर्व प्राणीमात्रांशी भावनात्मक स्वरूपाचे आपलेपणाचे संबंध निग्रहपूर्वक प्रस्थापित करावेत, सर्व लोकांशी सामाजिक बाबतीत परस्परांना सहाय्यभूत होईल असे आपले दैनंदिन आचरण जाणीपूर्वक ठेवावे आणि भारताच्या राष्ट्रीय एकतेच्या भावनेची अनेक प्रकारे निष्ठापूर्वक जोपासना करावी, अशा तऱ्हेचे एकात्मतेचे दंडक जैन धर्माने अत्यंत आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहेत. धर्माच्या व तत्त्वज्ञानाच्या बाबतीत जैनांचे स्थान उच्च प्रतीचे आहे. जैन धर्म हा स्वतंत्र धर्म असून श्रमण संस्कृतीतील अध्वर्यू धर्म म्हणून तो ओळखला जातो. जैनांचे तत्त्वज्ञान, कर्मसिध्दांत, ईश्वरविषयक मान्यता आदी बाबी अगदी विशिष्ट स्वरूपाच्या आहेत. अनेकांतवाद ही भारताच्याच नव्हे तर जगाच्या तवज्ञानाला जैनांनी दिलेली अमोल देणगी आहे.

'जैनधर्म' हा शब्द 'जिन' व 'धर्म' या दोन शब्दांच्या मिलाफाने तयार झालेला आहे. ज्याप्रमाणे 'विष्णूला देव मानणारे वैष्णव' आणि 'शिवाला देव मानणारे शैव' म्हणविले जातात, आणि त्यांच्या धर्मास 'वैष्णवधर्म' किंवा 'शैवधर्म' म्हणतात त्याच प्रमाणे जिनाला दैव समजणाऱ्यांना 'जैन' म्हणतात व त्यांच्या धर्मास 'जैनधर्म' म्हणतात. साधारणपणे जैनधर्माचा हाच अर्थ समजला जातो. परंतु याचा यापेक्षाहि अत्यंत महत्त्वपूर्ण असा अर्थ आहे. 'जिनांनी सांगितलेला (उपदेशिलेला) धर्म' अर्थात जिनेंद्र भगवंतांनी जो धर्म सांगितला किंवा ज्याचा उपदेश केला तो धर्म 'जैनधर्म' होय. ज्याने आपल्या आत्मिक विकारांवर पूर्णपणें विजय प्राप्त केलेला आहे, त्यांनाच 'जिन'

म्हणतात. (शास्त्री, ६८) धर्म या दृष्टीने पाहता अहिंसा हा त्याचा प्राण आहे, तर तत्त्वज्ञान या दृष्टीने पाहता 'अनेकान्तवाद' हा त्याचा पाया आहे. खरे म्हटले तर अनेकान्तवाद हा एखादा वाद किंवा सिध्दांत नसून तो जगाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोण आहे. असेही म्हणता येईल की, अहिंसा या मूलभूत प्रेरणेतून अनेकान्तवादाचा जन्म होतो. अहिंसा म्हणजे हत्या न करणे एवढेच नव्हे, तर दुसऱ्या जीवांवर प्रेम करणे, मन उदार करण. तेव्हा बौद्धिक पातळीवरील अहिंसा किंवा भिन्नमतसहिष्णुता म्हणजेच अनेकान्तवाद. (दीक्षित, २०१७,१०९)

अनिश्वरवाद, वेद प्रामाण्यास विरोध, आत्मावाद, कर्मावर विश्वास, त्रिरत्न, तपस्येचे महत्त्व, पंच महाव्रत, निर्वाण मार्ग, वर्ण व्यवस्था संबंधी सिद्धांत, मूर्ति पूजन ही जैन धर्माची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. मानसिक, सामाजिक तसेच राजकीय शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने जैन धर्मात महत्त्वपूर्ण मांडणी झाल्याचे दिसून येत. जैन विचारांमध्ये याबाबत सांगितलेला 'चारित्र' हा भाग महत्त्वपूर्ण आहे. त्यास 'आचार धर्म' असे म्हणतात. सिद्धहस्त जैनाचार्य श्री. संमतभद्र स्वामींनी 'रत्नकरण्डश्रावकाचार' नामक प्राचीन जैन ग्रंथात कर्माचे वर्णन पुढील श्लोकाद्वारे केले आहे. ''देशयामि समीचीनं धर्मं कर्मनिबर्हणम् संसारदुःखतः सत्त्वान् यो धरत्युत्तमे सुखे।।'' या श्लोकात त्यांनी प्राणिमात्रांची संसारिक दुःखापासून सुटका करून उत्तम सुख देणाऱ्या व कर्मबंधनांचा नाश करणाऱ्या सत्य धर्माचे कथन केले आहे. या श्लोकावरून खालील निष्कर्ष निघतात. १. संसारात दुःख आहे. २. त्या दुःखाचे कारण प्राण्यांची आपआपली कर्मे आहेत. ३. धर्म हा प्राणिमात्रांची दुःखापासून सुटका करून नुसते सुखच नव्हे, तर उत्तम सुख प्राप्त करून देतो. (शास्त्री, १९४०, १६५) बौध्द धम्माप्रमाणेच जैन धर्मातही दुःख निर्मितीची कारणमीमांसा करण्यात आली आहे. संसारात दुःख आहे, ही गोष्ट कोणापासून लपलेली नाही आणि सर्व लोकांना सुखाची इच्छा असून त्यासाठी ते रात्रंदिवस प्रयत्न करतात; हिही गोष्ट कोणापासून लपलेली नाही. ज्यांच्याकडे अन्न, वस्त्र आणि निवारा नाही. त्यांची गोष्ट वेगळी परंतु; ज्यांच्याकडे ते मुबलक प्रमाणत आहे. तेसुद्धा दुःखी आहेत व या दुःखाचे कारण अनेक प्रकारची तृष्णा असल्याचे जैन विचारांमध्ये सांगितले आहे.

या तृष्णायुक्त दुःखापासून मुक्तीचा जो मार्ग जैन विचारांमध्ये सांगितला आहे. तो मार्ग मानवी जीवनामध्ये व पर्यायाने समाजामध्ये सुख व शांतता निर्माण करण्यास उपयुक्त ठरणारा मार्ग आहे. दुःखातून सुटून सुख प्राप्त करण्याचा उपाय काय आहे सांगताना आचार्य समंतभद्रस्वामी रत्नकरण्ड श्रावकाचार ग्रंथामध्ये लिहितात- ''सद्दृष्टीज्ञानवृत्तानि धर्मं धर्मेश्वराविदुः। यदीयप्रत्यनीकानी भवन्ति भवपद्धतः ।। अर्थातच धर्माचे प्रवर्तक, सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यग्चारित्र यांना धर्म

म्हणतात. (शास्त्री, १९४०, १७२) या तीन धर्मास रत्नत्रयी असे संबोधतात. जैन धर्म विचारांमध्ये या रत्नत्रयीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'आचार्य सूत्रकार उमास्वामींनी या रत्नत्रयीस मुक्तीचा मार्ग म्हंटले आहे. ती पुढीलप्रमाणे–

**१. सम्यग्–दर्शन :**

सम्यग्–ज्ञान व सम्यग्– चारित्र या दोहोंचा आधार म्हणजे सम्यग्–दर्शन किंवा सम्यग्–श्रद्धा होय. जैन तत्त्वज्ञानात जी तत्त्वे मुख्य मानली आहेत, त्यांवर अढळ विस्वास असणे ही सम्यक् श्रद्धा होय. तीर्थंकर हे खरे ईश्वर आहेत होत, जैन आगमग्रंथ हेच खरे आगमग्रंथ होत, जैनधर्मिय संत हेच खरे धर्मोपदेशक हत असे मानणे हे सम्यग–दर्शन अथवा सम्यक् श्रद्धा होय. अशा तऱ्हेच्या सम्यग् दर्शनाची आठ अंगे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे– १) नि:शंकित २) निष्कांक्षित, ३) निर्विचिकित्सित, ४) अमूढदृष्टी, ५) उपगूहन, ६) स्थितिकरण, ७) वात्सल्य, ८) प्रभावाना. (डांगे, २०१३, १९२) सम्यग् दर्शन तीर्थंकरांच्या तत्त्वज्ञानावर, उदा., जीवादी सहा द्रव्यांवर, श्रद्धा ठेवणे म्हणजे सम्यग्दर्शन होय. दोषरहित सम्यग्–दर्शन हे मोक्षरूपी वृक्षाचे बीज आहे. तीर्थंकरप्रणीत जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल या षड्द्रव्यांची त्याला माहिती पाहिजे.

**२. सम्यग्–ज्ञान :**

सम्यग्–दर्शनानंतर सम्यग्–ज्ञान प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. दिवा व त्याचा प्रकाश या दोहोत जो कारण आणि कार्य यांचा संबंध असतो तोच सम्यग्–दर्शन आणि सम्यग्–ज्ञान यांच्यामध्ये असतो. शंका, विक्रिया आणि संदिग्धता यांच्यापासून ज्ञान वेगळे असावयास हवे. तरच ते सम्यग–ज्ञान होऊ शकते, मिथ्या–ज्ञान दूर झाल्यावरच सम्यग–ज्ञान प्राप्त होऊ शकते, हे ज्ञान पाच प्रकारचे असते. ते पुढीलप्रमाणे– १) मति–ज्ञान, २) श्रुत–ज्ञान, ३) अवधि–ज्ञान, ४) मन:पर्याय ज्ञान, ५) केवल–ज्ञान. सम्यग्– दर्शनाप्रमाणे सम्यग्–ज्ञानाच्या संदर्भात १) ग्रन्थ, २) अर्थ, ३) उभय, ४) काल, ५) विनय, ६) सोपधान, ७) बहुमान, ८) अनिह्त्र या आठ गोष्टी आवश्यक म्हणून मानल्या आहेत. (डांगे, २०१३, १९४–९५)

याशिवाय साधकाला जगाच्या स्वरूपाचे व त्याबरोबरच्या आपल्या संबंधांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (१) देह, तारुण्य, ऐश्वर्य अनित्य आहेत. (२) मृत्यू अटळ आहे. (३) जीव संसारात सारखा भटकत असतो. (४) जीव एकटा जन्मतो, एकटा मरतो. (५) आपला आत्मा इतर पदार्थांहून व आपल्या देहाहूनही भिन्न आहे. (६) देह मलमूत्राचे आगर आहे. (७) मोहामुळे आपण कर्म ओढून घेत असतो. (८) व्रते पाळल्याने व कषाय जिंकल्याने 'संवर' होतो.

(९) तपाने कर्माची निर्जरा होते. (१०) अनंत आकाशामध्ये असलेले हे जग कोणी निर्माण केलेले नाही. (११) मनुष्यजन्म व बोधिप्राप्ती दुलर्भ आहेत. (१२) सर्वज्ञ देवाने सांगितलेला धर्मच खरा आहे. या बारा 'भावनांचे' किंवा 'अनुप्रेक्षांचे' त्याने चिंतन केले पाहिजे.

### ३. सम्यक्-चारित्र :

वाणी, शरीर, आणि मन यांच्या संदर्भातील सर्व निंद्य क्रियांचे नियमन करणारे जे विनयाचे (शिस्तीचे) नियम आहेत ते सर्व सम्यक्-चरित्रात अंतर्भूत होतात. अर्थातच सम्यक्-चारित्र हे सम्यग्-दर्शन व सम्यग्-ज्ञान यांचे अस्तित्त्व गृहीत धरते. म्हणूनच ज्यांनी सम्यक्-दर्शन व सम्यग्-ज्ञान प्राप्त केले आहे अशा व्यक्तींसाठी सम्यक्-चरित्राचे नियम सांगितले आहेत. कर्मद्रव्याचा नाश करण्यासाठी सम्यक्-चारित्र हे फार आवश्यक असते. सम्यक्-चारित्र हे दोन प्रकारचे असते. ते म्हणजे 'सकल' म्हणजे परमोच्च किंवा निर्विशेष प्रकारचे आणि 'विकल' म्हणजे अपूर्ण किंवा सविशेष असे. 'सकल' चारित्र श्रमणांनी अंगीकारावयाचे असते आणि 'विकल' अर्थातच उपसाकांकडून आचरिले जाते. परंतु ते 'विकल' चारित्र आचरले जात असतानाही, पुढे तो उपासक सकल चारित्र आचरण्यास पात्र ठरवा याची काळजी घेण्यात आलेली आहे. (डांगे, २०१३, १९५) सम्यग्-दर्शन व सम्यग्-ज्ञानानंतर त्याने सम्यक्-चारित्राचीही आराधना केली पाहिजे. चरित्रामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो : ५ महाव्रतेअहिंसा, सत्य, अचौर्य, अपरिग्रह व ब्रह्मचर्य. ५ समितीईर्या, भाषा, एषणा, आदाननिक्षेपण व उत्सर्ग (प्रतिष्ठापना). ५. इंद्रियजय-पाच इंद्रियांवर जय मिळविणे. ३. गुप्तीमनोगुप्ती, कायगुप्ती वचनगुप्ती. २२ परीषहजयक्षुधा, तृषा, शीत, उष्ण इ. २२ परीषहांवर (पीडादायक गोष्टींवर) विजय मिळविणे. १२ तपे अनशन वगैरे ६ बहिरंग व प्रायश्चित वगैरे ६ अंतरंग तपे. १२ अनुप्रेक्षा (भावना) अनित्य, अशरण, एकत्व इ. (वर दिलेल्या) अनुप्रेक्षा.

### श्रावकधर्म

शांतताविषयक विचारांमध्ये जैन धर्मात सांगितलेला 'श्रावकधर्मसुद्धा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अहिंसा, अमृषा, अस्तेय, अमैथुन आणि अपरिग्रह अशी पाच व्रते आहेत. हिंसा करू नये, खोटे बोलू नये, चोरी करू नये, व्यभिचार करू नये, आणि वस्तुसंचय करू नये. हे ते पाच श्रावक धर्म आहेत. जो गृहस्थधर्म पाळून सम्यग्दर्शन प्राप्त होण्यासाठी मुनिजनांकडून सदाचाराचा उपदेश श्रवण करतो तो श्रावक होय. श्रावकालाच उपासक हे नाव आहे. हा श्रावकधर्म अत्यंत नैतिक मानवी मुल्यांवर आधारलेला आहे शिवाय तो सर्व प्राणिमात्रांच्या नैसर्गिक अधिकारांची जपणूक करणारा आहे.

## १) अहिंसा :

अहिंसा हा तर जैनांचा मुलभूत सिद्धांत होय. अहिंसा तत्त्वास जैनाचाराचे प्राणभूत तत्त्व म्हणून ओलाखेले जाते. अहिसा हा परमधर्म आहे. हे परमब्रह्म आहे. अहिंसा ही सुख शांति देणारी अमृतवल्ली आहे व सर्व विश्वाचे रक्षण करणारा रक्षामणि आहे. अहिंसा मनुष्याचा खरा धर्म व त्याचें खरे कर्म अहिंसाच आहे. वीरांचाही हाच बाणा आहे व धैर्यवानांचें ते प्रबळ मानचिन्ह आहे. अहिंसेशिवाय मनुष्याच्या मानव्याला किंमत नाही व शानहि नाही. मानव आणि दानव यांच्यातील अंतर अहिंसा व हिंसाप्रवृति यावरच अवलंबून आहे. अहिंसा मानवी तर हिंसा दानवी आहे. ज्या क्षणापासून मनुष्य अहिंसेला विसरला तेव्हांपासून ती दानवरूप बनू लागला आहे आणि त्या दानवतेचा अभिशाप या जगाला भोगावा लागत आहे. असे असूनही हे सत्य मानवप्राणी अद्यापि लक्षात घेत नाही. परंतु आता ते सत्य समजण्यास मानव जातीस फारसा काळ लागणार नाही; कारण या सर्व आपत्तींवर अहिंसा हा एकाच अमोघ उपाय आहे, दुसरा नाही.

संसारांतील प्राणिमात्रांना शांतीची इच्छा आहे, याचा अर्थ असा की, प्रत्येक जीव सुख-शांतीचा इच्छुक असून मरण्याची कोणाला इच्छा नाही. अत्यंत दु:खी प्राणी सुद्धा जिवंत राहण्याची इच्छा करतो. सर्वांनाच आपलें जीवन केवळ प्रियच आहे असे नाही, तर तें अत्यंत प्रिय आहे. याप्रमाणे अशा प्रियतम वस्तूला जो नष्ट करतो, प्रसंगी आपल्या प्राणाचें बलिदान करूनहि दीनदु:खितांना वांचवितो, त्यांना जीवदान देतो तो अहिंसक आहे, तो खरा मानव आहे. या मानवतेचे मूल्य तोच योग्य प्रमाणात जोखू शकतो की, ज्याच्या प्राणांवर कधी काळी बेतलेले आहे. (शास्त्री, १९८४) जैन धर्मात संकल्पी, उद्योगी, आरंभी आणि विरोधी असे हिंसेचे चार प्रकार कल्पिलेले आहेत. संकल्पी हिंसा म्हणजे पशुनाचा कसायाकडून वाढ होणे. अशा प्रकारची हिंसा; उद्योगी हिंसा म्हणजे जीवननिर्वाहासाठी केल्या जाणाऱ्या शेती, व्यापार या उद्योगांच्या संदर्भात तसेच युद्धाच्या ठिकाणी केली जाणारी हिंसा; आरंभी हिंसा आणि विरोधी यामुळे स्वत:च्या किंवा दुसऱ्याच्या रक्षणासाठी केली जाणारी हिंसा होय. दुसऱ्याच्या दृष्टीने हिंसेचे द्रव्यहिंसा होय, तर एखाद्या जीवाचे वाईट करण्याची इच्छा मनात उत्पन्न होणे वत्यानुसार त्याला वात्काडन करणे ही भावाहिंसा होय. या दोहोंतील खरी हिंसा म्हणजे भावहिंसा होय कारण तिच्या संदर्भात कर्त्याच्या मनातला वाईट भाव स्पष्टपणे दिसतो.

## २) सत्य :

दररोजच्या बोलण्यातील स्वार्थासाठी अथवा इतर कारणासाठी केलेला खोटेपणा कमी व्हावा असा उद्देश सत्य या अनुव्रताचा होता. असत्य भाषणाने मनुष्याला लघुता प्राप्त होते, त्याचा

अपमान होतो आणि शेवटी तो अधोगतीला जातो. म्हणून असत्यभाषणाचा परित्याग करावा असे वाचन जैनधर्मामृतात येते. वाचन सत्य असले तरी जर ते दुसऱ्याच्या अंत:करणाला झोंबत असेल किंवा दु:ख देत असेल तर ती हिसा ठरेल व पर्यायाने ते असत्यभाषण ठरेल. तेव्हा असे वचनही टाळावे असा विचार येतो. अशा रीतीने सत्याची कल्पना अहिंसेच्या व्रताला जोडूनच येते हे येथे नमूद केले पाहिजे.

**३) अचौर्य अथवा अस्तेय किंवा अदत्तान :**

ठेव म्हणून ठेवलेले पडलेले व परक्याचे असलेले धन जो स्वत: ग्रहण करीत नाही आणि जो ते उचलून दुसऱ्यालाही देत नाही, तो स्थूल चौर्यापासून विरक्त झाला असे समजावे.

**४) ब्रह्मचर्य :**

जो पुरुष पापाच्या भीतीने परस्त्रीगमन करीत नाही आणि दुसऱ्या कोणाला त्यासाठी प्रवृत्त करीत नाही अशा परस्त्रीपासून निवृत्ती आणि स्वस्त्रीच्या ठिकाणी संतुष्टता या दोन्ही गोष्टी मिळून ब्रह्मचर्य हे अनुव्रत होते. जैन उपासकाने आदर्श वैवाहिक जीवन जगावे हा या अनुव्रताचा मागचा उद्देश आहे.

**५) परिग्रहपरिणाम व्रत (अपरिग्रह) :**

मुनी अथवा श्रमण यांच्यासाठी अपरीग्रहाचे महाव्रत सांगितले होते व त्यानुसार कोणत्याही प्रकारचा संग्रह मुनी अथवा श्रम बाळगू शकत नसे. परंतु जैन उपसकासाठी हे व्रत अनुस्वरुपात होते. या व्रतानुसार जड वस्तूंच्या साठ्यांबद्दल उपासकाने विशिष्ट तऱ्हेची मर्यादा आपणहून घालून घ्यावयाची असे सांगितलेले आहे. दागदागिने धनसंपत्ती, घरेदारे इत्यादी अथवा तदंगभूत वस्तूंवर मर्यादा घालून त्या मर्यादेबाहेर जाणाऱ्या संचयावर आपला हक्क अथवा लोभ ठेवावयाचा नाही. अशा तऱ्हेची अपेक्षा या व्रताच्या संदर्भात जैन उपासकाकडून केली जाई. अशा रीतीने धन-धान्यादि दशविध परिग्रहाचे परिमाण ठरवून त्या परिमाणातच त्यांचा संचय अकरणे व त्याहून अधिकाविषयी नि:स्पृहता ठेवणे हे इच्छापरिमाणनामक परीग्रहपरिमाणव्रत होय. अर्थातच वर सांगितल्याप्रमाणे हि व्रते उपासकाने अथवा श्रावाकाने अनुप्रमाणात पाळावयाची असतात. म्हणून या पाचास अनुव्रते असे म्हणतात. (डांगे, २०१३, १४९-५२) या पाच अनुव्रताशिवाय जैन धर्मामध्ये उपासकांसाठी सांगितलेले सदाचरणाचा ३५ नियम सांगितलेले आहेत. हे ३५ सदाचरणाचे नियम आणि उपरोक्त सांगितलेली रत्नत्रयी, श्रावकधर्म सिद्धांत आणि विचार समाजामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

## १.६ भक्ती चळवळ

भारतीय समाज जीवनामध्ये धर्माबरोबरच 'भक्ती' या संकल्पनेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'भक्ती' ही भावना भारतीय समाजास चेतना देणारी, त्याचबरोबर धर्मास मानवी मनामध्ये रुजविणारी आहे. 'भक्ती' शब्दाची उत्पत्ती 'भज् + क्तिन्' असे क्रियापद + प्रत्यय मिळून ते झालेले आहे. भज् धातूचा अर्थ सेवा व क्तिन् प्रत्ययाचा अर्थ प्रेम असा होतो. म्हणून भक्ती शब्दाचा अर्थ प्रेमपूर्वक सेवा (भगवंताची) असा होतो. असे भा. प. बहिरट आपल्या 'भक्तिसाधना' या ग्रंथात म्हणतात. तर डॉ. आ. ह. साळुंखे असे म्हणतात की, भक्ती हा शब्द 'भज्' (सेवा करणे) या संस्कृत धातूपासून बनला आहे व भक्त, भगवान, भागवत इ. शब्द त्याच धातूपासून बनलेले आहेत. ईश्वरासाठी निर्मळभाव, निर्हेतुक प्रेम, (सेवा) व श्रद्धा म्हणजे भक्ती असे म्हणता येईल. भक्ती ही कामनायुक्त असू शकत नाही. सर्व कामनांचा निरोध हे तिचे स्वरूप आहे. कामनांचा निरोध म्हणजे मनाचा निरोध किंवा चित्तवृत्तींचा निरोध होय. भक्तीचे स्वरूप सांगताना ज्ञानेश्वरांनी चार पुरुषार्थापेक्षा वेगळा असा व उच्च कोटीचा पाचवा पुरुषार्थ भक्तीला मानले आहे. 'भक्ती' हाच सर्व भक्ती पंथांचा व भक्ती चळवळीचा पाया आहे. भारतात भक्ती मार्गाची सुरुवात सुरुवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. भारतीय धर्म साहित्य व इतिहासामध्ये भक्तीचे अनेक प्रकार व मार्ग दिसून येतात व या धर्म साहित्याइतकाच 'भक्ती' संकल्पनेचा उदय ही प्राचीन आहे. कालानुरूप भक्ती संकल्पनेने भारतीय समाज जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. ऐतिहासिक दृष्टीकोनातून विचार करता पाणिनी यांच्या अष्टाध्यायी या व्याकरणपर ग्रंथात भक्तीचा उल्लेख सापडतो. त्यापूर्वी वैदिक व उपनिषद साहित्यात सर्वप्रथम परमेश्वर प्राप्ती भक्तिमार्गाचे उपाय सांगितलेले दिसतात. ते म्हणजे ज्ञानकांड व कर्मकांड. कालांतराने कर्मकांड व ज्ञानकांड हे ज्ञानयोग, कर्मयोग व राजयोग या योगशास्त्रीय परिभाषेत ते मांडले. ईश्वरप्राप्तीच्या पर्यायी मोक्षप्राप्तीच्या दृष्टीने सामान्यजनांना अत्यंत सुलभ मार्ग म्हणून भक्तीयोगाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. निष्काम कर्मयोगाच्या पालनामध्ये सुद्धा मी परमेश्वराचा दास आहे, हा भाव अंत:करणात असणे नितांत आवश्यक मानण्यात येत असल्याने परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी ज्या चित्तशुद्धीची आवश्यकता असते. ती चित्तशुद्धी करण्याचा सुलभ व श्रेष्ठ उपाय म्हणून भक्तीयोगावर विशेष भर देण्यात येऊ लागला. भागवत पुराण व वैष्णव ग्रंथांतही ज्ञानमार्गापेक्षा व अष्टांगमार्गापेक्षा भक्ती मार्गचे महत्त्व अधिक प्रतिपादित केले आहे. या पार्श्वभूमीवरच मध्ययुगीन महाराष्ट्रात वारकरी सांप्रदायाचा उदय झाला.

इसवी सनाच्या ६ ते ९ व्या दशकात दक्षिण भारतात भक्ती उपासना मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होती व याचे श्रेय घुमक्कडो साधूंना दिले जाते. अप्पार, संबंदर, सुन्दारार, मणिक्कवसागर

हे नयनार तर पेरियअलवार, पेरियअलवार यांची मुलगी अंडाल, नम्मालवार, तोंडरडिप्पोडी अलवार हे अलवार संत होते. या घुमक्कडी साधुतील जे शिवभक्त होते त्यांना नायनार तर जे विष्णूभक्त होते त्यांना अलवार म्हणून ओळखले जात असे. या दोन्ही पंथांमध्ये अनेक जातींचे लोक सहभागी झालेले होते. यातील कित्येक अस्पृश्य जातीतील होते परंतु; आपल्या विचार व आचारांमुळे त्यांना समाजामध्ये श्रेष्ठत्व प्राप्त झालेले होते. अकराव्या शतकात दक्षिण भारतामध्ये विशेषतः कर्नाटक राज्यात रामानुज यांनी विष्णू पूजेवर भर दिला. उत्तर भारतातील संत रामानंद यांनी उत्तर आणि दक्षिण भारतातील भक्ती आंदोलनात समन्वय निर्माण करण्याच्या कामी सेतूची भूमिका निभावली. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार करून रामाच्या भक्तीवर जोर दिला व जातीभेदास विरोध करून सामाजिक समानतेवर भर दिला. संत कबीर, गुरुनानक, रविदास इत्यादी उत्तर भारतातील प्रमुख भक्ती परंपरेतील प्रमुख संत होते. तर पूर्व भारतात चैतन्य महाप्रभू हे भक्ती परंपरेतील एक संत म्हणून ओळखले जातात. ते कृष्ण भक्त होते.

महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, जनाबाई, चोखामेळा, रामदास इत्यादी अनेक थोर संत होऊन गेले. त्यांनी विठ्ठलाची व रामाची भक्ती करीत समाजातील भेदाभेदावर टीका केली व सामाजिक समतेचा संदेश दिला. संत दादू दयाल आणि संत मीराबाई हे राजस्थान मधील भक्ती चळवळीतील प्रमुख संत होत. निर्गुण उपासनेचे समर्थक असलेले संत दादू बाहरी यांनी व्यक्तिगत साधनेवर भर दिला. त्यांनी ईश्वरी भक्तीस सामाजिक व मानवतावादी दृष्टीकोनातून जोडले. मीराबाईंनी आपले संपूर्ण आयुष्य कृष्ण भक्तीमध्ये समर्पित केले. त्यांच्या कवितांमध्ये प्रेमभाव ओतप्रेत भरलेला दिसतो. आपल्या कवनानांमधून त्यांनी स्त्रियांमधून जनजागृती करण्याचे कार्य केले. मध्ययुगीन भारतात इस्लाम अंतर्गत सूफी पंथीयांची एक प्रमुख भक्ती चळवळ निर्माण झाली. सुफी पंथ परंपरेची खाली सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे. सुफी व वारकरी संप्रदायांच्या मुळाशी 'भक्ती' हा महत्त्वाचा धागा आहे. तत्त्कालीन समाजात अस्तित्वात असलेला धर्म, वर्ण व जाती भेदाभेद, अस्पृश्यता, अनिष्ठ रूढी व परंपरा इत्यादी बाबींवर प्रश्न उपस्थित करण्याचे महत्त्वाचे कार्य या दोन्ही संप्रदायांनी केली. त्यांनी लोकांमध्ये मिसळून आपल्या अभंग, ओव्या, भारुडे, रूपके, रिवायती, कविता इत्यादीच्या माध्यमातून समाज जागृतीचे महत्त्वाचे कार्य केले.

### अ) मुस्लिम सुफी संतपरंपरा

सूफी शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधी विद्वानांमध्ये वेगवेगळी मते आहेत. पहिल्या मतानुसार 'सूफी' हा शब्द 'सफा' पासून बनलेला आहे. 'सफा'चा अर्थ आहे-पवित्रता. म्हणून जो कोणी मनवाचाकर्माने

पवित्र असेल त्याला सूफी म्हणावे. दुसऱ्या मतानुसार ह्रदयाच्या शुद्धतेस, मनाच्या पावित्र्यास 'सफा' म्हणतात. या धारणेनुसार जो कोणी परमेश्वर व इतर प्राण्यांविषयी शुद्ध, पवित्र भाव राखतो आणि परमेश्वर पण त्याच्याविषयी प्रेमभाव ठेवतो, अशास सूफी असे म्हणतात. तिसऱ्या मतानुसार 'सूफी' शब्दाचा उद्भव हा 'सोफिया' या शब्दापासून झालेला आहे. 'सोफिया' याचा अर्थ आहे ज्ञानी किंवा परमज्ञानी. चौथ्या मतानुसार 'सूफी' हा शब्द 'सफ' या शब्दापासून निघालेला आहे. याचा अर्थ आहे 'प्रथम श्रेणी' किंवा 'पहिली रांग' अर्थात अंतिम न्यायाच्या दिवशी (कयामत) जे ईश्वराचे प्रियपात्र ठरून सर्वात पुढे पहिल्या रांगेत उभे केले जातील असे जे लोक असतील ते सूफीच होत. पाचव्या मताप्रमाणे 'सूफी' हा शब्द 'सुफा' अर्थात चबुतरापासून बनलेला आहे. मदिना येथील प्रेषित महमंद यांच्या मशिदीतील प्रांगणात एक उंचवटयाची जागा होती. त्यावर महमंद प्रेषित यांचे काही सहचर (सहाबी) बसत असत. या उंचवटयावर बसून ते सर्व आपला वेळ ईश्वरचिंतनात व्यतीत करीत. त्यामुळे त्यांना सूफी हे नामाभिधान प्राप्त झाले. शेवटच्या सहाव्या मतानुसार 'सूफी' हा शब्द वास्तविक 'सूफ' (लोकर) या शब्दापासून बनलेला आहे. जे लोक आपल्या शरीरावर लोकरीचे प्रावरण घेत असत, अशा लोकांना 'सूफी' म्हणून संबोधित असत. हे लोक जाडेभरडे वस्त्र नेसून ऐश्वर्यआणि भोगविलासापासून दूर राहून-अलिप्त राहून अत्यंत साधे जीवन जगत राहून फक्त आध्यात्मिक साधनेमध्ये मग्न राहत असत. काहीजण पैगंबरांची गणना पहिले सुफी म्हणून करतात. त्यांना इस्लामी इतिहासात 'एहले सूफा' मानले जाते.

ऐतिहासिकदृष्ट्या कालखंडाच्या अनुषंगाने सूफी संप्रदायाचे चार टप्प्यामध्ये विभाजन केले जाते. पहिल्या कालखंडामध्ये सूफी संतांमध्ये अनासक्त (फकिरी) जीवन व्यतीत करण्याची प्रवृत्ती क्रियाशील होती. दुसऱ्या कालखंडामध्ये गुढवादी प्रवृत्तीचा उदय होऊन तिचा उत्तरोत्तर विकास होत गेला आणि सैद्धांतिक व तात्त्विक तत्वचिंतनाची प्रामुख्याने वाढ होत गेली. तिसऱ्या कालखंडामध्ये सूफी संप्रदाय संघटित होत गेला आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये त्याचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येऊ लागला, तर चौथा कालखंड हे ऱ्हासावस्थेचे द्योतक आहे. पहिला कालखंड इ. स. ६५० ते ८७० हा मानला जातो. इमाम जाफर, हसन बसरी, अवैस करनी, दाऊद ताई, शफिक बल्खी, इब्राहीम बिन अधम, राबिया अल अदविया, हबीब अजमी, अबू हनीफा नुमान, फुजैल अयाज, या सर्व प्रारंभिक गूढवादी सूफी संतांचा प्रथम कालखंडात समावेश होतो. द्वितीय कालखंड हा इ. स. ८७० ते १००० असा मानला जातो. या कालखंडात अब्बास घराण्याचा राजाश्रय सूफी पंथास मिळाला. अब्बास घराण्याचा राजाश्रय व मिळालेल्या शासकीय प्रोत्साहन यामुळे सुफीजणांचे युनानी, ग्रीक तत्त्वज्ञान, भारतीय बौद्ध आणि वेदांत तत्त्वज्ञान व इतर धर्मांतील प्रतिनिधींबरोबर आध्यात्मिक प्रश्नांवर विचारविनिमय व विचारमंथन सुरु झाले. इराणी संस्कृती, ख्रिस्ती धर्मीयांचा भावायोग

आणि नव प्लेटो मतवाद यांचा पण विशेष प्रभाव पडला. परिणामी इस्लाम धर्मात नितांत नवीन विचारस्त्रोतांचा या कालखंडात समावेश झाला. जुन्नून मिस्त्री, मारुफ कर्खी, अबू सुलेमान दारानी बायाजीद अल बिस्तामी, मन्सूर अल हल्लाज इत्यादी विचारवंत या कालखंडात होवून गेले.

इ. स. १००० ते १५०० हा तिसरा टप्पा म्हणून ओळखला जातो. या कालखंडात सुफीमध्ये साहस आणि स्वतंत्र सिद्धांत प्रमाणित करण्याची क्षमता निर्माण झाली. वास्तविक हे इस्लामी तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्त्व करणारे होते. ते एका परीने इस्लामचे सूक्ष्म परंतु गूढ तत्त्वज्ञानाचे ज्ञाते होते. या कालखंडात सुफीमत इस्लामचे एक अभिन्न अंग बनले. सुफीमताच्या विकासाच्या या तृतीय कालखंडास सामंजस्याचा कालखंड म्हणून ओळखले जाते. कारण काही समर्थ आणि मेधावी विद्वानांनी सुफीमताचे इस्लामशी सामंजस्य प्रस्थापित करण्यात पवित्र कुराणाचे भाष्य रूपकाच्या भाषेत केले आहे. इमाम गजाली यांनी इस्लामच्या सनातन पंथीयांशी सुफीमटाचा असलेला विरोध दूर करण्यात आणि दोघांमध्ये सामंजस्य प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. इब्न सीना आणि गजाली यांची विचारधारा सारखीच आहे. या कालखंडातील अबू बकर कलाबाजी, अबुलहसन आली अल हुज्वीरी इत्यादी प्रसिद्ध सुफी संत होते. या सर्वांनी इस्लाम आणि सुफी विचार यांच्यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. या काळात सूफी विचारावर श्रद्धा असणारे व त्याचा प्रसार आणि प्रचार करणारे एकूण १२ संप्रदाय अस्तित्त्वात होते. इ. स. १५०० ते १८०० हा सूफी संप्रदायाच्या विकासातील चौथा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात सूफी संप्रदायाचे संगठन करण्याची प्रवृत्ती विकसित झाली. या कालखंडात १. चिश्तिया संप्रदाय २. सुहरवर्दिया संप्रदाय ३. कादारीया संप्रदाय ४. नक्शबंदिया संप्रदाय असे प्रमुख चार संप्रदाय उदयास आले. इ. स. १२०० शतकाच्या शेवटच्या कालखंडात सूफी संप्रदायाचा भारतामध्ये प्रवेश झाला असे मानले जाते.

ईश्वरतत्त्व, सृष्टितत्त्व, मानवतत्त्व, सूफींचे आत्म्यासंबंधीचे सिद्धांत, वासना (नफ्स) विवेचन, मोक्ष हे सूफी तत्त्वज्ञानाचे मुलभूत घटक आहेत. अल्ला (परमेश्वर) सर्वत्र, सर्वव्यापी, सर्वस्पर्शी आहे. तो अखिल विश्वात सामावून राहिला आहे. विश्वातील सर्व वस्तुमात्रात तो आहे. सर्व दृश्य आणि अदृश्य वस्तुमात्र आणि जीवमात्र त्याच्यापासूनच निर्माण होतात. जिक्र (जप), नामस्मरण, एकांतातील चिंतन, वैराग्य या मार्गाने सत्याप्रत जाता येते. जिक्र करता करता सूफी अशा अवस्थेला पोहोचतो की, त्याला अल्लाशिवाय कशाचेही भान राहत नाही. कादरिया, चिश्तीया, सुव्हावर्दिया, नक्शबंदिया, सत्तारिया हे सूफीमधील प्रमुख पंथ आहेत. त्याशिवाय हबिबीया, जुनैदिया, सख्तिया, गाजरुनियां, फिरदोसिया, जैदिया, हुबेरिया असे अनेक पंथ निर्माण झाले आहेत. मलंग आणि मदारिया हे भटके असतात. मलंग आणि अवधूत यांच्यात साम्य दिसून येते. ते आपल्याच धुंदीत

मग्न असतात आणि पोथीनिष्ठ धर्माचरण करीत नाहीत. इसवी सन तेराव्या शतकात काही सूफी संत दक्षिण भारतात आले. सूफी संताचे औरंगाबाद गंगापूर पैठण दौलताबाद खुलताबाद ही मराठवाड्यातील प्रमुख केंद्रे होती. त्यांतले पैठण हे महत्त्वाचे प्रमुख केंद्र होते. मराठवाड्यात प्रथम मोईजुद्दीन व नंतर निजामुद्दीन यांनी सूफी संप्रदायाचा प्रसार केला. नाथ संप्रदायाने सूफी संप्रदायापासून प्रेरणा घेतली असे म्हटले जाते. दिल्लीत वास्तव्य असलेल्या निजामुद्दीन अवलियाच्या प्रेरणेने त्याचा शिष्य मुंतजबोद्दीन जर्जरी बक्ष याने आपल्या धर्मप्रचारकासह महाराष्ट्रात खुलताबादेस मुक्काम केला होता. सू पंथ हा गाढ भक्तीचा तसेच वैराग्य तपश्चर्या व मानवतावाद इत्यादींचा आदर्श मानणारा संप्रदाय होता. भारतात चिस्ती संप्रदाय मोठ्या प्रमाणात रुजला. भारतात या संप्रदायाच्या प्रचार व प्रसाराचे काम ख्वाजा मुईनद्दीन चिश्ती व त्याचे शिष्य शेख हमिउद्दिन नागोरी, शेख कुतुबुद्दीन, बख्तियार काकी, शेख सलीम चिस्ती, बुऱ्हाणूद्दीन, शेख अब्दुलहक, शेख मुहम्मद तुर्क, शेख फक्करुद्दिन मसुह, शेख शासुरुद्दिन मोहम्मद, हजरत गेसूदराज, हजरत अशरफ जहांगीर, शेख मन्ता, शेख वाहिद, शेख मसून, शेख अली, गैजेशकर, अमीर खुश्रो, उद्दीन झकारिया व त्यांच्या शिष्यांनी केले.

सूफी संप्रदायाचे सामाजामध्ये सामजिक सलोखा प्रस्थापित करण्याच्यादृष्टीने बहुमोल असे योगदान आहे. एकेश्वरवादवाद हा इस्लाम धर्माचे मुलभूत तत्त्वज्ञान आहे. सुफी पंथाचे एकेश्वरवादी तत्त्वज्ञान हे वाहदत-उल-वजूद च्या किंवा अस्तित्वाच्या ऐक्याच्या सिद्धांतावर आधारलेले होते. सर्व चराचर वस्तु एकाच मूल तत्त्वापासून निर्माण झाल्या आहेत. असे हा सिद्धांत सांगतो. निर्माता (हक) आणि निर्माता (खलक) यांच्यात एकरूपता असते. ईश्वराचे अस्तित्व हीच विविधतेमागील एकता आणि सर्व घटनाचक्रामागील वास्तव आहे. या सिद्धांताचे जनक शेख मुहिऊद्दीन इब्नुल अरबी हे पुढील शब्दात त्याचे वर्णन करतात. ''ईश्वराशिवाय येथे काहीच नाही, ईश्वराशिवाय दुसऱ्याचे कशाचेही अस्तित्व नाही. येथे सर्व वस्तुंचा गाभा एकच आहे.'' सुफिंच्या मतानुसार अदृश्य व सर्वोच्च वास्तव्य आणि चिरंतर सोंदर्य म्हणजे जमाल आहे. त्यांच्या मते हे विश्व केवळ माया नसून ईश्वराचे दृश्य व बाह्य अभिव्यक्त स्वरूप म्हणजे हुस्न किंवा प्रेम करण्याजोगे सौंदर्य आहे. सुफिंनी आग्रहाने असे मत मांडले आहे की, चिरंतन सौंदर्याचे सर्वात महत्त्वाचे लक्षण हे स्वरूपाची अभिव्यक्ती आणि कोणीतरी आपल्यावर प्रेम करावे ही भावना होय. म्हणूनच सुफी तत्त्वज्ञान हे प्रेम या तत्त्वज्ञानावर आधारलेले होते. ते सर्व धर्माचे सार आणि सर्व निर्मिती मागचे कारण आहे. सूफी अनुयायाला ईश्वराशी एकरूप होण्यापूर्वी समर्पणाच्या दहा पायऱ्या पार कराव्या लागतात. या दहा पायऱ्या अशा तौबा (पश्चाताप), वारा (मितभोग-संयमशील), सब्र (सहनशीलता), झुहद (धर्मनिष्ठा), फकर (गरिबी), रजा (इच्छा आशा), तवकुल्ल (समाधान), खौफ (भय), शुक्र (कृतज्ञता) आणि रीजा (ईश्वरी इच्छेपुढे समर्पण). सर्वजण एकाच ईश्वराचे भक्त आहेत त्यामुळे

एकमेकांबद्दल कसलेही पूर्वग्रह न बाळगता आपण वावरले पाहिजे असा महत्त्वाचा संदेश सूफीपंथीयांनी दिला. सूफी संप्रदायावर उदारमतवादी विचारधारेचा मोठा प्रभाव होता. धार्मिक सहिष्णुता आणि एकाता यावर त्यांचा मोठ्याप्रमाणात भर होता. सूफी संत दाराशिकोह यांनी फारसी भाषेत लिहिलेल्या आपल्या 'मज्म-उल-बहरैन' या पुस्तकामध्ये हिंदू आणि मुस्लिम यांच्या एकतेवर भर दिलेला दिसून येतो. इस्लाम आणि हिंदू हे दोन समुद्र आहेत आणि त्याचा संगम होऊ शकतो कारण या दोन्ही धर्मांमध्ये अनेक बाबतीत मुलभूत साम्य आहे असा आशय या पुस्तकामध्ये नोंदविण्यात आला आहे.

### ब) वारकरी संप्रदाय

भक्ती चळवळीतील एक महत्त्वाची परंपरा म्हणून वारकरी संप्रदायाचा उल्लेख केला जातो. 'वारकरी संप्रदाय' हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय असा भक्तिसंप्रदाय म्हणून ओळखला जातो. वारी करणारा ह्या अर्थाने वारकरी हा शब्द वापरण्यात आलेला आहे. आपल्या उपास्य देव-देवतेच्या यात्रेला जो नियमितपणे, एक व्रत म्हणून जातो, तो त्यास वारकरी असे म्हणतात. येरझारांमध्ये जी वारंवारता आहे, तीही येथे अभिप्रेत आहे. तथापि; वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूरच्या विठोबाशी संबंधित असलेला वारकरी संप्रदाय, असाच अर्थ घेतला जातो. ह्याचे मुख्य कारण म्हणजे विठोबा वा विठ्ठल वा पांडुरंग ह्या आपल्या उपास्य दैवताच्या वारीला ह्या संप्रदायाने जितके महत्त्व दिले आहे, तितके अन्य कोणत्याही पंथाने त्याच्या उपास्य दैवताच्या वारीला दिलेले नाही. वारकरी संप्रदायाच्या आचारधर्मानुसार संप्रदायाच्या अनुयायांनी प्रतिवर्षी दोन वेळा-म्हणजे आषाढ शुद्ध एकादशीस व कार्तिक शुद्ध एकादशीस-श्रीविठ्ठलाची वारी पंढरपूर क्षेत्री जाऊन केली पाहिजे. शुद्ध माघी एकादशी व शुद्ध चैत्री एकादशी ह्या दोन दिवशीही पंढरपूर येथे मोठ्या संख्येने वारकरी जमतात. तथापि आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ह्या दोन वाऱ्या प्रमुख मानल्या जातात. त्यांतही आषाढीला महत्त्व विशेष आहे. वर्षातून किमान एक तरी वारी करणे हे वारकरी संप्रदायाची साधना आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राजायातील कित्येक कुटुंबामध्ये विठ्ठलाची वारी करणे ही प्रथा कित्येक पिढ्यांनपिढ्या सुरु आहे व त्या कुटुंबासाठीती अभिमानाची व समाधानाची गोष्ट आहे. वारकरी संप्रदायाला माळकरी संप्रदाय असेही एक पर्यायी नाव आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. माळ घालणे, म्हणजे एक नवा आध्यात्मिक जन्म घेणे, असे मानले जाते. हा संप्रदाय भागवत धर्मातच अंतर्भूत होतो. किंबहुना त्यास भागवत धर्म असेही म्हटले जाते. भागवत धर्म हा प्रामुख्याने वैष्णव संप्रदाय म्हणूनच विख्यात असून त्यात विष्णु आणि विशेषतः त्याचा कृष्णावतार वासुदेव भगवान हाच

उपास्य आहे आणि वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत विठ्ठल, हे विष्णूचा अवतार मानल्या गेलेल्या श्रीकृष्णाचे रूप मानले गेले आहे. ह्याच कारणासाठी पंढरपुरास दक्षिण द्वारका असे संबोधण्यात येते.

**वारकरी संप्रदाय संज्ञेची शब्दसिद्धि आणि यथार्थत्व**

वारकरी संप्रदाय हे दोन शब्द वेगवेगळे आहेत. या दोन्ही शब्दांची शब्दसिद्धी पुढीलप्रमाणे दिसून येते. वारी ह्या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, किंवा येरझार करणे असा अभिप्रेत असतो. वारकरी या सामासिक शब्दांत वार+करी ही पदे असून त्यांपैकी 'वार' हे प्रातिपदिक व 'करी' हे धातुसाधित आहे. वारी करी तो वारकरी कृदन्त तत्पुरुष असा या शब्दाचा विग्रह सांगण्यात येतो. वारी हा शब्द ज्ञानेश्वरीत येरझारा किंवा यात्रा या अर्थाने वापरण्यात आला आहे. संस्कृत वार या शब्दाच्या अर्थामध्ये पाळी (Turn) असाहि एक अर्थ आहे. वार या शब्दावरून वार आणि वारी हे दोन्ही शब्द लिंगभेद आणि अर्थभेद होऊन मराठीत आले असावेत. उदाहरणार्थ, लाज या पुल्लिंगी शब्दावरून लाहो हा मराठी शब्द लिंगभेद होऊन इकारान्त बनतो. म्हणूनच वारी करतो या व्युत्पत्तीने वारकरी शब्द बनला, असे म्हणता येईल. या कृदन्त किंवा नामसाधित रूपांत स्वरव्यत्यास आणि स्वरालोप झालेले आढळतात.

आ > ए पहारेकरी, मारेकरी, वाटेकरी

आ > शाळकरी

ई > पाणकरी

वारकरी या शब्दाचा जुना प्रयोग 'वारैकरू' या रुपात कोकणाधिपति हंबीरराव यांच्या नागांव शिलालेखात आला आहे. अर्थातच वारी करणारा म्हणजे पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाच्या दर्शनास नियमितपणे जाणारा भक्त, असा वारकरी या शब्दाचा अर्थ होतो. संप्रदाय हा शब्द 'सम्+प्र' या दोन उपसार्गांसह 'दा' या धातूवरून तयार झाला असून, तो 'अ' हा प्रत्यय लागून सिद्ध होतो. पाणिनीय व्याकरणाप्रमाणे अ प्रत्ययापूर्वी आकारान्त धातूला युगागम होतो. (म्हणजे य येतो). ऐतरेय ब्राह्मणात संप्रायच्छत् असें धातुरूप आले असून, त्यांत 'सम्+प्र+दा' चा वापर 'देणे' या अर्थी करण्यात आला आहे. ही देण्याची प्रक्रिया सातत्याने चालू राहिली; आणि पूर्वसुरींकडून पुढील लोकांना सतत काही दिले गेले की, तेथे संप्रदाय या संज्ञेचा उपयोग करता येईल. संगीतरत्नाकरांत प्रस्तुत संज्ञेत अर्थव्याप्ती पुढीलप्रमाणे विशद केलेली आहे संप्रदाय अशा प्रकारे जाणवा- शास्त्रांत सांगितले नसतां, पण शास्त्रास संमत असलेल्या व शास्त्राशीं विसंवादी नसलेल्या विशिष्ट अर्थांचे, गुरुशिष्य-परंपरेने, उपदेशपूर्वक प्रदान करणे हे संप्रदायाचें लक्षण होय. वारकरी संप्रदाय ही बहुरूढ आणि सार्थ संज्ञा आहे, पण या संज्ञेस समानार्थक म्हणून म्हणून माळकरी पंथ, भागवत धर्म,

पंढरपूरचा संप्रदाय, भागवत संप्रदाय, वारकरी पंथ, भक्तिमार्ग इत्यादि पर्याय संज्ञा वापरल्या जातात. या संज्ञातील माळकरी, भागवत, पंढरपूरचा व भक्ति ही पदे वारकरी या पदार्थी आली असून, धर्म, पंथ व मार्ग ही पदे संप्रदायदर्शक आहेत. या सर्वच पर्याय-संज्ञा काही अंशी योग्य असल्या, तरी वारकरी संप्रदाय या संज्ञेतील यथार्थत्व त्यांतून पुरेसे व्यक्त होत नाही. वारकऱ्यास माळकरी असेही म्हणतात. वारकरी गळ्यांत तुळशीच्या मण्यांची माळ घालतो. विठ्ठल म्हणजेच श्रीविष्णू हे वारकऱ्यांचे दैवत आहे आणि विष्णूस तुळस अत्यंत प्रिय असल्याने वारकरी तुळशीची माळ वापरतो. पण ती वापरणे हा वारकऱ्यांच्या आचारधर्माचा केवळ एक भाग आहे, ते त्यांचे आचारसर्वस्व नव्हे. त्यामुळे माळकरी ही संज्ञा ऊनोक्तियुक्त आहे. (इनामदार,२५८-२६०)

**वारकरी संप्रदायाचा उदय व विकास**

वारकरी सांप्रदायाची स्थापना कोणी केली व कोणत्या साली केली हे निश्चित सांगता येत नाही. त्याचप्रमाणे या संप्रदायाच्या उदयाचा निश्चित कालखंड ठरविणेही अशक्य आहे. संत बहिणाबाई यांनी महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाचे अगर भागवत धर्माचे मंदिर कसे उभारले गेले याचे वर्णन आपल्या एका अभंगात केले आहे. त्या म्हणातात, संतकृपा झाली । इमारत फळा आली ।। ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।। नामा त्याचा किंकर। तेणे केला हा विस्तार ।। जनार्धन एकनाथ । खांब दिला भागवत।। तुका झालासे कळस। भजन करा सावकाश ।। या अभंगात 'ज्ञानदेवें रचिला पाया' बहिणाबाईंनी म्हंटले आहे. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला, याचा अर्थ त्यांनी या संप्रदायाला आरंभ केला नसून, त्यांच्या हातून त्या संप्रदायास स्थैर्य लाभले, असाच केला पाहिजे. ज्ञानेश्वरांनी 'मेळविली मांदी वैष्णवांची' असे तुकारामांनी म्हंटले आहे. ज्ञानेश्वरांच्या आधीहि वारकरी भक्त होते. या विखुरलेल्या वारकऱ्यांची ज्ञानेश्वरांनी आपल्या स्वयंसिद्ध सामर्थ्याने संघटना केली; आणि ज्ञानेश्वरी लिहून या साम्प्रदायास स्थैर्य प्राप्त करून दिले. 'पूर्वी अनंत भक्त झाले। पुढेही भविष्य बोलले ।।' असें नामदेवांनी म्हटले आहे. त्यावरून त्यांना या संप्रदायाची पुरातनताच अभिप्रेत होती, असे दिसते. वारकऱ्यांचे दैवत श्रीविठ्ठल आणि आद्य भक्त पुंडलिक या दोघांच्या कालनिर्णयांतून वारकरी संप्रदायाचा काळ ठरविणे शक्य आहे. (इनामदार,२६३)

**वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि वारसा :**

वारकरी संप्रदाय हा मूलत: भक्तिपंथ आहे. भक्तिरसात न्हालेल्या संतांचा अनुभव हेच या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे अंतिम प्रमाण आहे. देव हा भक्तांहून वेगळा असल्याशिवाय त्याची भक्ती करावयाची कशी ? कैवलाद्वैत वेदांताच्या म्हणण्याप्रमाणे ब्रह्मच केवळ सत्य असेल तर भक्ती

करावयाची कोणी आणि कोणाची? मात्र ही अडचण वारकरी संतांस वाटली नाही. त्यांना स्वसंवेद्य आत्मतत्वाचे अद्वैत मान्य होते. भक्ती हा केवळ या अद्वैताचा अनुभव घेण्याचा मार्ग होता असे नाही, तर त्या अनुभवाच्या मुक्कामाला पोहचल्यावर सुद्धा सुखाचा सोहळा त्यांना हवा होता. भक्ती हा पाचवा पुरुषार्थ आहे आणि तो परमपुरुषार्थ आहे. एकच डोंगर कोरून त्यातून देव, देऊळ व परिवार निर्माण करतात. त्याच रितीने एकाच आत्मतत्त्वाच्या विलासातून भक्तीचा व्यवहार होऊ शकतो. 'चिद्विलासवाद' म्हणजेच वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान होय. वारकरी संप्रदायाचा उगम पुंडलिक या महान भक्तापासून झाला. विठ्ठलाची भक्ती व उपासना तेथूनच सुरु झाली. पण या भक्तीस तात्त्विक जोड ज्ञानदेवापासून पुढील संतांनी दिली. त्यासाठी प्राकृत भाषेत ग्रंथ रचना केली. त्यामुळेच ज्ञानदेवाची 'ज्ञानेश्वरी', श्री. एकनाथांचे 'एकनाथी भागवत' व तुकारामांची 'गाथा' हे तीन ग्रंथ म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची प्रस्थानत्रयी होत.

सर्वत्र केवळ आत्मतत्त्वाचे म्हणजेच चैतन्याचे स्फुरण आहे. ते स्वसंवेद्य आहे, म्हणजे त्याच्या अस्तित्वाला कोणताही बाह्य पुरावा लागत नाही. त्यास 'असत' असे म्हणताच येणार नाही. कारण जो म्हणणारा तेच आत्मतत्त्व होय. त्याच्या अभावाचे भान होणार नाही; कारण भान (चित्त) हेच त्याचे स्वरूप होय. हे चैतन्य आनंदरूप आहे असा संतांचा अनुभव आहे. पण कापरामध्ये ज्याप्रमाणे शुभ्रता, सुगंध व मृदुता ही एकमेकांपासून विलग नसतात. त्याच रीतीने चैतन्य, असतेपणा व आनंद ही आत्मत्त्वात एकरूप असतात. हे आत्मतत्त्व एक असले तरी क्रीडेसाठी देव आणि देवी या स्वरुपात ते आविष्कृत होते. जगताची ही माता-पितरे आवडीमुळे एकमेकांत मिळत असतात. त्यांच्यापासून जगाची निर्मिती होते. जगत हे अज्ञानमूलक नसल्याने ते असत्य अथवा मिथ्या नाही. ते चैतन्याचा विलास आहे. स्वप्रित्यर्थ ते नित्यनव्या रूपाने प्रगट होते. पाणी स्वत:मध्ये कल्लोळ निर्माण करून खेळत असते. तो कल्लोळ मिथ्या नव्हे अथवा पाण्याहून अन्य नव्हे. पाणी पाण्यास पिऊ शकत नाही. चैतन्याच्या ठिकाणी असणाऱ्या सुखाचा अथवा प्रेमाचा आस्वाद घेण्यासाठी जीवरुपाने ते प्रकट होते.जीवाला अहंभाव टाकून तद्रूप झाल्याशिवाय ते प्रेमसुख मिळत नाही. भक्तीचा हा अनुभव म्हणजेच परमपुरुषार्थ होय. या भक्तीची गोडी एकांतात नसून संतांच्या संगतीत आहे. असे उत्कट भक्तीचे वर्णन ज्ञानेश्वरीत केले आहे.

हा संप्रदाय अद्वैत मत प्रतिपादन करूनही पुन्हा भक्तीचे तत्त्व प्रतिपादन करतो. म्हणजेच वारकरी संप्रदायाचा विशेष भर भक्तीवरच आहे. आपल्या अद्वैतपणात किंचितही बिघाड येऊ न देता भक्तीसुखाचा आनंद उपभोगता येतो. किंबहुना खरी भक्ती अद्वैतातच होते असे शिकविणारा हा संप्रदाय आहे. या संप्रदायातील कोणीही संन्यासवृत्तीचा उपदेश केला नाही व करत नाही. उलट स्वत: मुक्त बनून आपण ज्या मार्गाने मुक्त झालो, त्याचे जगास ज्ञान करून देतात. साध्य भक्तीस

साधनही भक्ती आहे. म्हणजेच हा संप्रदाय सागुनोपासक आहे. नीतीने वागून श्री. विठ्ठलाची भजनाद्वारे उपासना करणारा जो आहे, त्यासच अभ्यूदय व नि:श्रेयस ही दोन्ही प्राप्त होतात, असे संप्रदायाचे मत आहे. (कदम,२०१४, पृ.२७-२८) धर्माप्रमाणेच संप्रदायांचींहि तत्त्वज्ञान आणि आचार अशी दोन अंगे असतात. आचारावर मुख्यत: तत्त्वज्ञानाचाच प्रभाव पडतो. म्हणून वारकरी संप्रदायांतील संतांच्या काव्याचा अभ्यास करतांना त्यातील तात्विक बाजू पहिली पाहिजे. संत ज्ञानेश्वरांनी या संप्रदायास तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या प्रभावळीतील नामदेवादि संतांच्या काव्यात ज्ञानेश्वरांच्या विचारांचेच पडसाद उमटले आहेत. ज्ञानेश्वरांचे हे ऋण नामदेवांनी पुढील शब्दांत मान्य केले आहेत.

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली । जेणें निगमवल्ली प्रगट केली।।

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मानंदलहरी प्रगट केली।।

अध्यात्म-विद्येचें दाविलेंस रूप। चैतन्याचा दीप उजळविला ।।

वेद प्रामाण्य, भक्ति प्राधान्य, सगुणनिर्गुणवादाची निरर्थकता व्दैताव्दैतातील भूमिका हरिहरैक्य अशी वारकरी संप्रदायाच्या विचारप्रणालीची मुख्य अंगे आहेत. (इनामदार,२६५) मानवतावादी दृष्टीकोन, जातीवर आधारित भेदाभेद आणि अस्पृश्यतेला विरोध, कर्मकांडाला विरोध इत्यादी वारकरी संप्रदायाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. याबरोबरच या संप्रदायाने प्रवर्तित केलेली 'संत' ही संकल्पना हे सुद्धा वारकरी संप्रदायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये असल्याचे संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे नोंदवितात. त्यांच्या मते, ''जितके महत्त्व विठ्ठल देवतेला आहे तितकेच संतांनाही आहे. म्हणून तर अगोदर विठ्ठलाची वारी होती. तिला पुढे संतांच्या वारीचीही जोड मिळाली. देव. संत आणि जीव यांच्या मधील एका विवक्षित संबंधावर हा संप्रदाय आधारित असल्याचे दिसते.'' (https://sadanandmore.wordpress.com/1594-2/) वारकरी संप्रदायाचा आचारधर्म अत्यंत साधा, सोपा आहे. व्यक्तिजीवनाला समुदायिकता प्राप्त करून देणारा, तर व्यक्तिनिष्ठ जीवन सात्विक करणारा हा मार्ग आहे. वारकरी पंथात काया-वाचा-मनाने शुद्ध असला पाहिजे. कर्म आणि विचारला सात्विकता प्राप्त करून देऊन सामाजिक आदर्श निर्माण करणारा हा आचारधर्म आहे. या आचारधर्मात वारी, भजन, नामस्मरण, आणि कीर्तन या चार मुद्यांचा समावेश होतो. वारकऱ्यांचा प्रमुख आचारधर्म 'वारी' होय. वारकरी पंथातच 'वारी' हा स्वतंत्र धर्म आहे. तो यापूर्वी आणि समकालीन पंथात दिसून येत नाही. आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या पंढरपूरच्या वाऱ्या वारकऱ्यांकरिता महत्त्वाच्या मानल्या जातात. वारीस आठरापगड जातींतील भक्तांचा मेळा, गरीब, श्रीमंत, दलित, रंजल्या-गांजल्यांना सोबत घेऊन खेळीमेळीच्या, आनंदात पंढरपूरची वारी केली जाते. विठ्ठलाचे नामस्मरण

करत, संतांचे अभंग गात, ठरावीक प्रवासानंतर मुक्काम, मुक्कामी भजन-कीर्तन करून वारी केली जाते. (कुंभार, २०१७, ७४) भारतीय सामाजिक जीवनामध्ये सामजिक सलोखा व शांतता निर्माण करण्यासाठी वारकरी संप्रदायाने महत्त्वाची भूमिका बजावलेले आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी सांगितलेला सामाजिक समतेचा विचार सर्व प्रकारचे धार्मिक व जातीय भेदाभेद तसेच वर्ण श्रेष्ठत्व नाकारणारे होते. सर्व प्राणीमात्र हे एकाच विठ्ठलाची लेकरे आहेत हा वारकरी संप्रदायाचा प्रमुख विचार आहे. वारकरी संप्रदायाने अध्यात्माचा साधा सरळ विचार पटवून देऊन सामाजिक, धार्मिक जीवनात समतेची, नैतिकतेची शिकवण देत सर्वसामान्यांचे जीवन प्रतिष्ठित केले. तत्कालीन व्यवस्थेत हिंदू-धर्म-पोथीनिष्ठ विचारला प्रमाण मानत होता. धर्मग्रंथांची भाषा संस्कृत होती आणि ती भाषा ती भाषा जाणणारा वर्ग अत्यंत तोकडा होता. त्यामुळे खऱ्या धर्मविचारांपासून सर्वसामान्य वर्ग पारखा राहिला होता. केवळ कार्मठतेतून धर्माचे पालन होत होते. बहुजन-स्त्री-शुद्रातीशुद्रांना धर्म जाणून घेण्याचा अधिकार नाकारलेल्या काळात विद्वान धर्म पंडित मात्र अशा कर्मठप्रधान धर्माचे पालन करण्यात स्वत:ला धन्य समजत होते. तसेच समाजालाही तोच विचार मान्य करायला भाग पडत होते. धर्माची दहशत या काळात होती; पण ज्या विद्वानांना खरा धर्म काळाला होता, ते धर्माचे स्वरूप समाजाला समजावून सांगत नव्हते. म्हणून सर्वसामान्य माणसांची धार्मिक घुसमट होत होती. अशा परिस्थितीत वारकरी संप्रदायाने केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे होते.

## १.७ सारांश

मानवी जीवनामध्ये सामजिक सलोखा आणि शांतता या दोन्ही गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. या दोन्हींच्या आधारेच आजपर्यंत मानवी जीवन सुखकारक बनले आहे. ज्या ज्या वेळी या दोहोंना सामाज विरोधी घटकांकडून हानी पोहचविण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्या त्या वेळी समाजामध्ये अराजकता निर्माण झालेली आहे. सामाजिक सलोखा म्हणजे आपल्याला स्वत:चा धर्म, समाज आणि कुटुंब जेवढे प्रिय असते तेवढेच दुसऱ्याही व्यक्तीला त्याचा धर्म, समाज आणि कुटुंब याविषयी प्रेम भावना असू शकते हे मान्य करणे होय. भारताच्या सामाजिक आणि राजकीय जीवनामध्ये प्राचीन कालखंडापासून आजपावेतो ही भावना टिकून आहे. या देशामध्ये वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या धर्म विचारधारा असलेल्या वंशांच्या हातामध्ये राजकीय सत्तेचे हस्तांतर होत राहिले. तसेच अनेक परकीय सत्ताधीशांनीही आपले वर्चस्व प्रस्थापित करून आपली हुकुमत गाजविण्याचा प्रयत्न केला परंतु; या देशातील सामाजिक सलोखा आणि शांतता अपवादात्मकरीत्या टिकून आहे. यास कारण म्हणजे येथील धर्म व्यवस्थेने सांगितलेले तत्त्वज्ञान आणि न्यायी राज्यकर्त्यांनी राबविलेले सहिष्णूतेचे धोरण कारणीभूत ठरले आहे.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. बहिरट भा. पं. आणि भालेराव प. ज्ञा., (१९७२), ''वारकरी संप्रदाय उदय व विकास'', व्हीनस प्रकाशन, पुणे.

२. कुंभार नागोराव, (संपा.), ''विचारशलाका, संत साहित्यातील नैतिक संदेश विशेषांक'' जाने. ते सप्टें. २०१७' जोडअंक ११९,१२०,१२१ वा.

३. डांगे सिन्धु, (२०१३), ''जैन धर्म आणि तत्त्वज्ञान'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४. इनामदार हे. वि., (१९७०), ''संत नामदेव', केसरी प्रकाशन, पुणे.

५. कदम विकास, (२०१४), ''वारकरी संप्रदायाचा इतिहास आणि पंढरपुरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य'', अरुणा प्रकाशन, लातूर.

६. शास्त्री कैलाशचंद्रजी, (१९६४), ''जैन धर्म'', जीवराज जैन ग्रंथमाला, सोलापूर

७. भोमाज जिनेंद्रकुमार, (१९७१), ''भारतीय संस्कृतीला जैन धर्माची देणगी'', जीवराज जैन ग्रंथमाला, सोलापूर

८. दीक्षित श्रीनिवास, (२०१७), ''भारतीय तत्त्वज्ञान'', फडके प्रकाशन, कोल्हापूर

९. डांगे सिन्धु, (२०१६), ''बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१०. काकडे आसावरी, (२०१२), ''ईशावास्यम्? इदं सर्वम्... एक आकलन-प्रवास'', राजहंस प्रकाशन, पुणे.

११. विनोबा, (२०१६), ''अष्टादशी (सार्थ) ईशादि अठरा उपनिषदांचे सार'', परंधाम प्रकाशन, पंवनार (वर्धा)

१२. भगत सुर्यकांत, (२०११), ''सम्राट हर्षवर्धन'', सुधीर प्रकाशन, वर्धा.

१३. मोरे मा. शं., (२००४), ''बुद्धधम्माचे संदेशवाहक'', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.

१४. त्रिपाठी शेषमणी, (२००७), ''अकबर की राज्य-व्यवस्था'', हिन्दी-साहित्य संमेलन, प्रयाग.

१५. ढावरे ज्ञानेश्वर, (२००२), ''सम्राट अशोकाचा राजधर्म आणि आर्यांची मनुस्मृती'', सुगावा प्रकाशन, पुणे.

१६. परांजपे बिंदा, (२००५), ''अशोकाचे शिलालेख'', लोकवाङ्मय गृह, मुंबई.

१७. कोंडविलकर माधव, (२००५), ''देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा सम्राट अशोक'', सुगावा प्रकाशन, पुणे.

१८. विनोबा, (२०१९), ''उपनिषदांचा अभ्यास'', परंधाम प्रकाशन, पंवनार (वर्धा)

१९. रणसुभे सुर्यनारायण, (२०१९), ''सामाजिक समतेचा प्रवाह'', द युनिक अकॅडेमी, पुणे.

२०. पानसरे गोविंद, (२०१०), ''शिवाजी कोण होता?'', लोकवाङ्मय गृह, मुंबई.

२१. थापर रोमिला, (२००७), ''अशोक आणि मौर्यांचा ऱ्हास'', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

२२. रमेंद्र, (२००६), ''धर्म-दर्शन (सामान्य एवं तुलनात्मक'', मोतीलाल बनारसीदास, दिल्ली

**संकेतस्थळे**

१. https:mr.wikipedia.org

२. https://vishwakosh.marathi.gov.in

❋ ❋ ❋

# घटक २

# आधुनिक भारतातील धार्मिक सलोखा


२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ ब्रिटीश राजवट : धार्मिक सलोख्यापुढील आव्हाने

२.३.२ भारतीय राज्यघटना आणि अल्पसंख्यांकांचे अधिकार

२.३.३ बहुसंख्याकवादाच प्रश्न

२.४ स्वयं अध्ययन प्रश्न

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सारांश

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- ब्रिटीश राजवटीतील साम्राज्यवाद्याचे धोरण समजून घेता येईल.
- भारतातील जमातवादाचे राजकारण समजून घेता येईल.
- भारतीय राज्यघटनेतील अल्पसंख्याकांच्या अधिकाराविषयी चर्चा करता येईल.
- भारतीय समाजातील बहुसंख्याकवादाचे राजकारण स्पष्ट करता येईल.

## २.२ प्रास्ताविक

आधुनिक भारतातील धार्मिक सलोखा आणि भारतीय राष्ट्रवादाची जडणघडण समजून घेताना ब्रिटीश राजवटीतील साम्राज्यवाद्यांचे धोरण समजून घ्यावा लागेल. धर्मनिरपेक्ष भारतीय राष्ट्रवादाला जमातवादाचे रूप देण्यात ब्रिटीशांचे वसाहतवादी धोरणाने महत्त्वाची भूमिका बजावली. या धोरणास भारतातील धार्मिक जमातवादी नेतृत्त्व ही तितकाच कारणीभूत आहे. याचा परिणाम एकसंघ राष्ट्रनिर्मितीस व राष्ट्रीय चळवळी समोर नव-नवे आव्हान निर्माण झाले. स्वतंत्र भारताची राज्यघटना निर्माण करताना घटनाकारांनी भाषिक व धार्मिक अल्पसंख्याक गटाच्या अधिकाराचे संवर्धन केले आहे. भारतीय समाजात एकता व एकात्मता निर्माण करण्यात व बहुसंख्यांक समूहाच्या प्रभावापासून अल्पसंख्यांकाचे हितरक्षण करण्यात आली. परंतू १९८० नंतरच्या जात व धार्मिक मुद्याच्या आधारे बहुसंख्यकवादाचे राजकारण प्रसरण पावली. त्यामुळे भारतीय समाजासमोर नवे आव्हान उभी राहिल्याचे दिसून येते.

भारतामध्ये बहुसंस्कृतीक, बहुधार्मिक, बहुभाषिक लोक राहतात. अनेक वेळा धर्माधर्मामध्ये संघर्ष निर्माण होऊन अनेक दंगली निर्माण झाले आहेत. ब्रिटिश लोकांना भारतावर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर भारतातील धर्मिक लोकांमध्ये दुही निर्माण करण्याचे कार्य केले आहे. ब्रिटिशांनी अनेक वेळा मुस्लीम लीग, शीख यांना आरक्षण देऊन खुश करण्याचा ही प्रयत्न केला आहे. तसेच अल्पसंख्याक लोकांना भारतातील बहुसंख्याक हिंदू लोकांची भिती वाटत असल्यामुळे अल्पसंख्याकाच्या संरक्षणाची तरतूद भारतीय राज्यघटनेत केलेला दिसून येतो. तरीही आज बहुसंख्याकाचा प्रश्न हा गुंतागुंतीचा बनत चाललेला आहे. कारण अनेक राज्यामध्ये अल्पसंख्यांक समाजावर अन्याय होताना दिसतो. त्यामुळे बहुसंख्याकवाद हा एक भारतीय राजकारणात महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. एकूणच भारतीय राजकारणामध्ये जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी अनेक नेत्यांनी प्रयत्न केला आहे. महात्मा गांधी, पंडीत नेहरू, महर्षी शिंदे, महात्मा फुले, सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना आझाद इत्यादी विचारवंत, राजकीय नेते हे जातीय सलोख्याचा विचार मांडला आहे.

## २.३ विषय विवेचन

भारतामध्ये इंग्रज येण्यापूर्वीच हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध, शीख इत्यादी धर्माचे लोक राहत होते. ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी धार्मिक सलोखा नष्ट करण्याचा किंवा त्याला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. कारण त्यांनी फोडा आणि राज्य करा या तत्वाद्वारे भारतीय समाजामध्ये

जमातवादी संघर्षाची बीजे पेरली आणि हिंदू मुस्लीम संघर्ष निर्माण करून भारताची फाळणी करण्यात आली. नंतरच्या काळामध्ये भारतीय राज्यघटना तयार करताना भारतात राहिलेल्या मुस्लीम आणि इतर धर्माच्या अल्पसंख्याक लोकांना हिंदू बहुसंख्याकाची भिती वाटू लागली. त्यामुळे त्यांना राज्यघटनेत संरक्षणाच्या तरतूदी करून त्यांना अभय दिले आणि भारताने धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्विकारले आहे. परंतू १९८०-९० नंतरच्या काळात बहुसंख्याक समाजाने हिंदूत्वाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न होऊ लागला आहे. आज भारतीय राजकारणामध्ये हिंदू हे वर्चस्ववादी बनले असून मुस्लीम अल्पसंख्याकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### २.३.१ ब्रिटीश राजवट : धार्मिक सलोख्यापुढील आव्हाने

भारतावर इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांच्या अन्यायी, स्वार्थी व दडपशाही राजवटीने हिंदी जनतेची मोठ्या प्रमाणात धुळधाण उडाली. इंग्रजी राजवटीचे हिंदुस्थानावर अनेक परिणाम घडून आले ते पुढीलप्रमाणे -

**१) ब्रिटीशांचे साम्राज्यवादी धोरण :**

एतद्देशीय राज्यकर्त्यांची सत्ता नामशेष करून ब्रिटीशांनी भारतात एकछत्री अंमल निर्माण केला होता. साम्राज्य विस्तार आणि सार्वभौमत्त्व प्रस्थापित करणे हे त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे तत्व होते.रॉबर्ट क्लाईव्ह पासून ते लॉर्ड डलहौसी पर्यंतच्या गर्व्हनर जनरलसल्मी मुत्सद्देगिरीने भारताच्या कानाकोपऱ्यात इंग्रजी शासनाचा अंमल लागू केला होता. देशात राजकीय एकी प्रस्थापित करून प्रशासकीय ऐक्य प्रस्थापित झाले. राज्यकारभाराच्या सुव्यवस्थेसाठी त्यांनी अमूलाग्र बदल घडवून आणले. ज्याप्रमाणे नेपोलियन बोनापार्टने इटलीचे प्रशासकीय एकीकरण अप्रत्यक्ष घडवून आणण्यास मदत केली, त्याचप्रमाणे भारतातही एकीची भावना ब्रिटीशांच्या साम्राज्य विस्तारामुळे निर्माण झाली. राज्या-राज्यातील वेगवेगळेपणा नष्ट करून ब्रिटीशांच्या विरोधात असंतोष निर्माण झाला.

**२) ब्रिटीशांचे पक्षपाती धोरण :**

ब्रिटीशांनी भारतीयांना पक्षपातीपणे वागविले. विविध क्षेत्रात पक्षपाती धोरणाची नीती होती. भारतीयांना सतत अपमानास्पद वागणूक दिली जाई. चहाचे मळे ब्रिटीशांच्या मालकीचे असत. महत्त्वाच्या नोकऱ्या भारतीयांना पात्रता असूनही दिल्या जात नतस. इ.स. १८५७ नंतर भारतीयांना सुडबुद्धीने वागविले जाई. शासक आणि शासित यांत दुरावा निर्माण झाला. संवादाची भाषा संपुष्टात आली. ब्रिटीशांच्या पक्षपाती धोरणाने राष्ट्रीय आंदोलनासाठी अनुकूल भावना निर्माण झाली.

### ३) ब्रिटीशांच्या सुधारणा :

ब्रिटीश राजवटीमध्ये साम्राज्य विस्तार करीत असताना विविध सुधारणा घडवून आणल्या. विविध प्रकारचे कायदे करून लोकजीवन आधुनिक बनविण्यातही त्यांनी काही प्रमाणात पुढाकार घेतला. इ.स. १८५९ मधील 'सिव्हिल प्रोसीजर कोड'. इ.स. १८६१ 'इंडियन पिनल कोड', गुलामगिरी नष्ट करणारा कायदा इ.स. १८२८ चा सतीबंदीचा कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा, आदींमुळे भारतीय समाजातील कुप्रथा बंद झाल्या.

### ४) आधुनिक विचार आणि पाश्चात्य तत्वज्ञान :

पाश्चात्य संस्कृतीची आणि तत्वज्ञानाची भारतीयांना केवळ ओळखच पटली असे नव्हे तर, ते त्यांनी स्वीकारण्याचा व आचरणात आणण्याचा प्रयत्नही केला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या फ्रेंच राज्यक्रांतीतील उदात्त तत्वज्ञानाचा भारतीय जनमानसावर दूरगामी परिणाम भारतीय जनमानसावर दूरगामी परिणाम झाला. मानवी जनमानसावर दूरगामी परिणाम झाला. मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याने लोकांननिर्भय आणि निश्चिय बनविण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करण्यास मदत झाली. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीमधील उदारमतवादाने आशियातील लोक जागृतीला नवे वळण प्राप्त करून दिले. मानवतावादी, साम्यवादी आणि राष्ट्रवाजी विचारांची भारतीयांना जाणीव झाली. इंग्रजी भाषा आणि शिक्षणाने पाश्चात्य विचारवंताचे विचार आकलन करता आले. शेक्सपिअर, हॅर्बर्ट स्पेन्सर, एडमंड बर्क, मिल आदी लेखकांच्या धारदार विचारांनी भारतीय प्रभावित झाले.

### ५) इंग्रजी भाषेचा परिणाम :

अर्वाचीन भारताचे व नव्या समाजरचनेचे आद्य पुरस्कर्ते राजा राममोहन रॉय यांनीच प्रामुख्याने इंग्रजी भाषेचा आग्रह धरला. लॉर्ड मेकॉलेच्या सुधारणा आणि वुड्सच्या विवरण पत्रानंतर इंग्रजी भाषेला आणि शिक्षणाला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले होते. या भाषेतील समृद्ध विचार, प्रगल्भ ज्ञान भांडार भारतीयांनी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. जगातील सर्वश्रेष्ठ प्रागतिक तत्त्वज्ञानाची माहिती मिळविली. देशांतर्गत जनजागृतीला प्रारंभ झाला.

### ६) आर्थिक पिळवणूक :

ईस्ट इंडिया कंपनीचे धोरण आर्थिक शोषण करण्याचे होते. इ.स. १८५८ मध्ये कंपनीचे राज्य नष्ट झाले असले तरी ब्रिटीश सरकारने स्वार्थ साधण्यासाठी भारताची पद्धतशीर लुट करण्याचा प्रयत्न केला. भारताची आर्थिक पिळवणूक करून त्यांस कंगाल केले. विविध स्वरूपातून कर वसूल केले. ब्रिटीशांच्या औद्योगिक धोरणातून लघूउद्योग व कुटीरोद्योग नष्ट झाले. हजारो कारागीर बेकार

झाले. दुष्काळ, अवर्षण या नेसर्गिक आपत्तीनी भारतीय जनता त्रस्त झाली होती. भारताचे व भारतीयांचे दारिद्र्य वाढतच गेले व त्यातून भारतीयांत असंतोष निर्माण झाला.

**७) राजकीय परिवर्तन :**

इंग्रजांनी भारतात नव्या राजकीय संस्था स्थापन करून पाश्चिमात्य ज्ञानाचे धडे द्यायला सुरूवात केली. १८८२-८३ साली नगरपालिकेचा व स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा लॉर्ड रिपनयाने केला. १८८८ साली मुंबई महानगरपालिका कायदा झाला. १९०९, १९१९, १९३५ च्या कायद्याने भारतीयांना राजकीय अधिकार दिले. या परिवर्तनामुळे राजकीय अभिव्यक्तीची प्रेरणा भारतीय नेतृत्वाला मिळाली.

गेल्या दीडशे वर्षांच्या ब्रिटीश राजवटीच्या काळात भारताच्या जीवनात ज्या प्रकारचे प्रगतीमय स्थित्यंतर घडून आले, त्या प्रकारचे स्थित्यंतर हिंदी भारताच्या इतिहासात अनेक वर्षात घडले नाही. ब्रिटीशपूर्व भारतीय ऐतिहासिक परिणतीक्रम मंदावला होता. विकास व प्रगती यांना प्रसवणारी शक्ती सुप्त होती. इंग्रजांच्या राजवटीमुळे भारतात बदल झाले पण त्यामुळे भारतात बदल होतच नव्हते वा हे राज्य जर स्थापन झाले नसते तर बदल झाले नसते असे म्हणणे चुकीचे आहे. असे काही इतिहासकारांचे मत आहे.

एकंदरीत आशिया खंडाचाच इतिहास असा दिसतो की, त्यात युरोपाच्या ऐतिहासिक घटने प्रमाणे एकामागून एक प्रकट होणारे व्यवस्थित टप्पे सापडत नाहीत. ऐतिहासिक विकासक्रम ही कल्पना आशियाची व हिंदुस्थानच्या इतिहासशास्त्राशी जुळत नाही. म्हणून असे म्हणावे लागते की, ब्रिटीश राज्यात जे सर्वांगीण जीवन संक्रमण झाले, त्याचे असाधारण प्रेरणास्थान ब्रिटीश राज्याची भारतातील स्थापना होय. सामाजिक व वैयक्तिक भारतीय जीवनाच्या सर्व अंगावर या स्थित्यंतराचे परिणाम घडून आले.

**८) भारतातील प्रबोधनाच्या चळवळी :**

इंग्रजी राज्याने आधुनिक शिक्षण, भौतिक सुधारणा आणि सुधारलेली राज्यव्यवस्था यांची स्थापना करून काल्पनिक विश्वाला भूकंपाचा हादरा दिला. श्रुति, स्मृति, पुराणे यांचे स्थान इतिहास, भूगोल, गणित इ. आधुनिक विधांनी घेतले. त्यामुळे सकस नवविचारांचे आकंठ सेवन केलेली तरूण पिढी जन्माला आली. तिने देशी भाषांना नव्या इंग्रजी जद्याचा आकार आणण्यास सुरूवात केली. शब्दप्रामाण्य आणि रूढीप्रामाण्य झुगारून देणारा हा नवशिक्षितांचा वर्ग होता. त्यामुळे मध्ययुगीन अंधारात वाढलेल्या व टिकून राहिलेल्या जीर्ण, सनातन समाजव्यवस्थेचे कुरूप, ढिसूळ व हिणकस

अंतरंग झपाट्याने उघडकीस आले. पाश्चात्य विद्येने बुद्धिवाद, व्यक्ति स्वातंत्र्य आणि सर्व मानवांची राष्ट्रभेद निरपेक्ष व वंशभेदनिरपेक्ष नैसर्गिक समानता ही तीन मूल्ये देशात प्रथमत: आणली. या त्रिविध मूल्यामुळे ऐहिकता प्रधान विचारसरणी उत्पन्न झाली. त्यातूनच या देशात धर्म सुधारणेच्या नव्या चळवळी सुरू झाल्या.

१९ व्या शतकातील धर्मचिकित्सा व सामाजिक सुधारणा यामुळे भारताच्या राष्ट्रवादाला चौकट मिळाली. वृत्तपत्र, पाश्चात्य ज्ञान, सामाजिक जागृती या माध्यमाद्वारे राजकीय जागृती भारतीयांत होऊ लागली. या नवीन चळवळीमुळे या वेगवेगळ्या प्रांतातील राजकीय संस्थाचे एकसूत्रीकरण करणे, राजकीय दृष्ट्या जागृत असलेल्या विविध गटांना आणि व्यक्तिना एकत्र आणणे आणि राष्ट्रीय हितांच्या प्रश्नांकडे लोकांचे लक्ष वेधून राष्ट्राच्या आकांक्षा प्रकट करणे या उद्देशाने एका अखिल भारतीय स्वरूपाची राजकीय संघटना निर्माण करण्यासाठी अनुकूल भूमी तयार झाली. याची परिणती १८८५ मध्ये 'राष्ट्रसभे'च्या स्थापनेत झाली.

**भारतावरील इंग्रजी राज्य आणि सांप्रदायिक राजकारण :**

भारतामध्ये जमातवादी प्रश्न हिंदु-मुस्लिमा पुरताच मर्यादित नसून, हिंदू-ख्रिश्चन, हिंदू-शीख यांच्यामध्ये सुद्धा जमातवादी संघर्षाचा इतिहास आहे. त्याचप्रमाणे मुसलमानांमध्ये सुद्धा शिया-सुन्नी असे संघर्ष होत आहेत. परंतु भारताच्या संदर्भात हिंदू-मुस्लिम संबंध हा सर्वात जटील प्रश्न होता. भारतामध्ये हिंदू-मुस्लिम संघर्षाला प्रामुख्याने ब्रिटीश राजवटीत उग्र व विध्वसंक स्वरूप प्राप्त झाले. हा जमातवाद निर्माण होण्यासाठी हिंदू, मुस्लिम आणि ब्रिटीश हे तीन्ही घटक जबाबदार आहे. आणि जमातवाद निर्मितीमध्ये हिंदू-मुस्लिम व ब्रिटीशांनी त्यांच्या-त्यांच्या भूमिका कमी अधिक प्रमाणात बजावलेल्या आहेत.

इ.स. १८८५ साली राष्ट्रसभेची स्थापना ही प्रामुख्याने भारतातील सामाजिक व राजकीय आकांक्षाचा अविष्कार होता. भारताच्या राजकीय क्षेत्रातील भिष्माचार्य दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशाह मेहता, न्या. रानडे व अन्य उदारमतवादी विचारसरणी असलेले विचारवंत आणि अनेक उत्साही तरूण कार्यकर्ते यांनी काँग्रेसच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता. काँग्रेसचा जन्म ही भारताच्या राजकीय इतिहासातील अद्वितीय घटना होती. भारतीय जनतेला राजकीय हक्क मिळविण्याची जी आकांक्षा होती त्या आकांक्षाचे स्वरूप म्हणजे काँग्रेस या राष्ट्रीय व्यासपीठाची स्थापना होय.

राजकीयदृष्ट्या जागृत असलेले भारतातील सर्वनेते जात, भाषा, प्रांत आदी भेद बाजूस सारून काँग्रेसच्या व्यासपीठावर एकत्र येत होते. त्यांच्यामध्ये काँग्रेसच्या उद्दिष्टांविषयी आणि शांततेच्या व सनदशीर मार्गानेच राजकीय चळवळ पुढे नेण्याच्या विचाराविषयी सर्वसाधारण एकमत होते. हे खरे असले तरी काँग्रेसच्या कार्यपद्धतीबद्दल मात्र त्यांच्यामध्ये मतभेद होते. नेमस्त व जहाल राजकीय पुढाऱ्यांमधील मतभेद तात्विक होते आणि भारतीय राजकारणातील विचारमंथनातून ते निर्माण झाले होते.

भारतीय राष्ट्रवादाची कल्पना धर्म, जात, वंश या अनेक घटकांना एकत्रित आणून स्वराज्यासाठी ब्रिटीशांविरूद्ध लढा उभा करण्यासाठी राष्ट्रसभेच्या स्थापनेपासून मांडण्यात आली होती. सर्व धर्माचे लोक व वंशाचे लोक राष्ट्रवादाच्या जागृतीतून एकत्र आले होते. त्यांच्यात राजकीय जागृती वाढत होती. परंतु भारतीयांची वाढती जागृती पाहून ब्रिटीशांना अस्वस्थ वाटू लागले. ब्रिटीश साम्राज्यवाद्यांना भारतावरची मगरमिठी सोडायची नव्हती. जोपर्यंत भारताची संपत्ती धुवुन नेता येते, तोपर्यंत ब्रिटन हे सधन व संपन्न राष्ट्र राहू शकेल हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळे ब्रिटीशांच्या भारतावरील सार्वभौम सत्तेला कधी काळीदेखील धोकादायक ठरू शकेल अशी चळवळ सुरू होणे व वाढणे या गोष्टी त्यांना सहन होणे शक्य नव्हते. भारतावरील आपले साम्राज्य चालू राहावे यासाठी त्यांनी सर्व मार्गांचा अवलंब चालू ठेवला. ज्यामुळे लोकांच्या मनात दहशत निर्माण होईल असा जुलूम करणे ही त्यांची पद्धत होती. भारतातील लोकांमध्ये दुहीची बीजे पेरून वाढती राजकीय चळवळ नष्ट करण्याचा डाव ते खेळत होते. राजकीय चळवळ बाहेरून नष्ट करण्याची साधने जुलूम व दडपशाही ही होती. आणि भारतीय जनतेत अंतर्गत कलह व द्वेष निर्माण करणे हा राजकीय चळवळ आतून पोखरण्याचा मार्ग होता.

**'फोडा व राज्य करा'चे तत्त्व :**

१९ व्या शतकात भारतावर वसाहतवाद्यांनी आपले राज्य प्रस्थापित केले. तिसऱ्या जगातील सर्वच देश वसाहतवाद्यांच्या धोरणाला बळी पडले. इंग्रज भारतात आल्यानंतर भारतात त्यांनी 'फोडा आणि राज्य करा'चे तत्त्व स्वीकारले आणि हिंदू व मुस्लमान या दोन स्वतंत्र, वेगवेगळ्या इतिहास असलेल्या जमाती आहेत असे सांगावयास सुरूवात केली. इंग्रजांनी भारतात प्रातिनिधिक लोकशाहीची कल्पना मांडली. या व्यवस्थेत संस्थेला महत्त्व असते. आणि भारतामध्ये हिंदूची संख्या शे. ७१% असल्यामुळेच मुसलमानांना सतत त्यांच्याच वर्चस्वाखाली राहावे लागेल ही गोष्ट मुसलमान सरंजामदारांच्या मनात भरविण्यात आली. लोकशाहीत बहुमत हे राजकीय बहुमत असते, जमातीय बहुमत नसते ही गोष्ट मुद्दाम दडवण्यात आली. त्यामुळे सुरूवातीच्या काळात काँग्रेसने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पुरस्कार करूनही फुटीर प्रवृत्ती कायम राहिल्या.

वरील डावपेचामुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांचे राजकीय चळवळ वाढविण्याचे स्वप्न भग्न होईल अशी ब्रिटीशांची खात्री होती. म्हणून हिंदू व मुसलमानात दुही निर्माण करून त्यांना एकमेकांविरूद्ध झगडत ठेवण्याचा दुष्ट व कुटील निर्णय ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी घेतला. मुसलमान समाजाच्या काही नेत्यांची अशी खात्री पटवून द्यावयाची की, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या झेंड्याखाली वाढत जाणाऱ्या राजकीय चळवलीला विरोध करण्यानेच मुसलमान समाजाचे हित साधू शकेल, असा या कारस्थानातील पहिला डावपेच होता. हिंदुस्थानात धर्मा-धर्मामध्ये कलह निर्माण केल्यानेच ब्रिटीश साम्राज्यास बळकटी येऊ शकेल असा कयास बांधून 'फोडा आणि राज्य करा' या नीतीची कार्यवाही सरकारने सुरू केली.

**हिंदू-मुस्लिम दुहीच्या बीजाची पेरणी :**

हिंदू व मुसलमान यांची राजकीय पातळीवर एकजूट झाली तर ब्रिटीश साम्राज्य धोक्यात येईल याची ब्रिटीश राज्यकर्त्यांना जाणीव झाली. म्हणून त्यांनी दुहीचे बीज पेरण्यासाठी प्रथम मुस्लमानांवर मेहरनजर करण्याचे आणि त्यांना खास सवलती देण्याचे ठरविले. लॉर्ड नॉर्थब्रुकने अलिगडच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्यांसाठी दहा हजार रूपये दिले. तसेच १८८२ मध्ये नेमलेल्या शिक्षण आयोगाचे अध्यक्ष हंटर यांनी शिक्षणात मुस्लमानांचा खास सवलती मिळविण्याचा हक्क मान्य केला. भारताचे व्हाइसरॉय लॉर्ड लँन्सडाऊन यांनी इंग्लडच्या मंत्रीमंडळातील भारतीय मंत्र्याना पाठविलेल्या पत्रात लिहिले, ''मुस्लमानांना खासगी व सरकारी नोकऱ्यापासून दूर ठेवण्यात आल्यामुळे त्यांच्या मनात हिंदूबद्दल कटुतेची भावना निर्माण झाली आहे. भूतकाळात मुस्लमानांचे राज्य होते, ही जाणीव त्यांच्या मनात आल्यामुळे हिंदू बद्दलची कडवटपणाची भावना त्यांच्या मनात सतत जागती राहते.'' हिंदू व मुस्लमान लोकांमधील दुरावा वाढविण्याची धोरणे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी राबविली. १८८५ मध्ये त्यावेळचे भारतमंत्री रॅण्डोल्फ चर्चिल यांनी भारताला भेट दिली आणि ब्रिटीश सरकारच्या मुस्लिमधार्जिण्या धोरणास अधिक चालना दिली. ऑकलंड कोलव्हिनसारख्या साम्राज्यवाद्याने असे उद्गार काढले की, काँग्रेसचे राजकारण धोकादायक असून मुस्लमानांना या राजकारणापासून दूर ठेवण्यासाठी सर्वतऱ्हेने प्रयत्न केले पाहिजेत. साम्राज्यवाद्यांनी स्वत:चे हित साधण्यासाठी अशा कुटील नीतीचा वापर केला.

**अलीगड विद्यापीठ : मुस्लिम अभिजनांची चळवळ :**

सर सय्यद अहमद यांनी अलिगड विद्यापीठाच्या माध्यमातून मुस्लिम अभिजनांची चळवळ उभी केली. सर सय्यद महमद हे उदारमतवादी विचारसरणीचे होते. मुस्लिमांनी आधुनिक शिक्षण घेऊन हिंदूच्या बरोबरीने आपले स्थान निर्माण करावे असे विचार मांडले. १८५७ च्या बंडामध्ये मुस्लमानांनी शौर्य दाखविले होते. आणि मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला होता. बंडवालच्या पराभवानंतर ब्रिटीशांनी बंडाशी संबंधित लोकांना चिरडून टाकले. आणि या कारवाईत मुस्लमान समाजाचे प्रचंड नुकसान झाले. ब्रिटीशांनी केलेल्या दडपशाहीमुळे मुस्लमान समाजाचे धार्मिक नेते उलेमांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र व कडवट झाली आणि त्यांनी इंग्रजी शिक्षणापासून दूर राहण्याचा सल्ला मुस्लमानांना दिला. नेमकी या उलट भूमिका सर सय्यद अहमद यांनी घेतली. सर सय्यद अहमद यांच्या लक्षात आले की, आधुनिक ज्ञान आत्मसात करण्यातच मुस्लमान समाजाचे हित आहे. म्हणून इंग्रजी शिक्षणाचा प्रसार मुस्लमान समाजात करण्याची चळवळ सर सय्यद अहमद यांनी सुरू केली. त्यांच्या या सुधारणवादी वृत्तीमुळे मुल्ला-मौलवींचा त्यांच्यावर मोठा रोष झाला. परंतु मुस्लिम तरूणांनी आधुनिक पद्धतीनचे इंग्रजी शिक्षण घेऊन समाजात महत्त्वाचे स्थान मिळवावे हे त्यांना पटवून देण्यात सर सय्यद अहमद यशस्वी झाले. त्यांच्या प्रयत्नांमुळे १८७४ साली अलिगढमध्ये 'अंग्लो-ओरिएंटल' स्कूल सुरू करण्यात आली आणि त्याची वाढ होत १८८३ मध्ये अलिगढ कॉलेज स्थापन झाले.

सर सय्यद अहमद यांनी हिंदू-मुस्लमान ऐक्यासाठी कळकळीने आवाहन त्यांच्या अनेक भाषणाच्या माध्यमातून इ.स. १८८४ पर्यंत केले. परंतु इ.स. १८८७ मे त्यांनी पूर्वीची भूमिका सोडून विरूद्ध भूमिका घेतली. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस विरूद्ध जोराची प्रचार मोहिम सुरू केली. आणि ब्रिटीश सरकारला विरोधात करण्यात मुस्लिमांना धोका आहे असा इशारा मुस्लमान समाजाला दिला. अलिगडच्या कॉलेजचे प्राचार्य थिओडोर बेक यांचा सर सय्यद अहमद यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. बैक याने सर सय्यद यांच्या मनात आर्य समाजाबद्दल विष पेरले आणि काँग्रेस बद्दलही त्यांचे मन पुरे कलुषित केले. ब्रिटीशांची सहानुभूती व पाठिंबा यांच्या जोरावरच भारतातील मुस्लमानांची प्रगती होऊ शकेल असे सर सय्यद अहमद यांना वाटू लागले. म्हणून, ''काँग्रेस ही संकूचित दृष्टिकोन असलेली राजद्रोही संस्था असल्यामुळे मुस्लमानांनी काँग्रेसशी संबंध तोडावा.'' असे त्यांनी मुस्लमान समाजाला सांगितले.

सारांश रूपाने सर सय्यद अहमद यांची भूमिका अशी होती की, १८५७ च्या उठावाला जिहादचे स्वरूप आले, ते सर सय्यद अहमद यांना मान्य नव्हते. त्या काळात त्यांनी नव्या प्रचाराला

सुरूवात केली, मुसलमानांमध्येच मुसलमानांचे भविष्य आहे. उठावाला पाठिंबा न देता भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये मुसलमानांनी सामील होऊ नये. भारतात हिंदू-मुस्लिम या दोन जमाती आहेत. त्यांची संस्कृती, भाषा, राजकीय हितसंबंध वेगळे असून राष्ट्रीय सभा हा बहुसंख्याक हिंदूचा पक्ष आहे. भारतात हिंदू-मुस्लिमात हिंदूचे प्रमाण ७०% आहे तर मुस्लिमांचे स्थान २४% आहे. भारतावर आजपर्यंत मुस्लिमांचे राज्य होते. ते आमच्या पूर्वजांनी बाहुबलावर मिळविले. उद्याच्या लोकशाहीत बहुसंख्याक हिंदूचे राज्य येणे अपरिहार्य आहे. त्यामुळे ज्यावेळी भारतात लोकशाही स्थापन होईल त्यावेळी शेकडा ७०% हिंदूचे राज्य मुसलमानांवर स्थापन होईल. त्यामुळे हे राज्य स्थापन होण्यापेक्षा इंग्रजी राज्य चालू ठेवण्यातच आपले हित आहे. आपल्याला लोकशाही राजवट नको. कारण ती आपल्या हिताच्या विरूद्ध आहे. ज्या मुस्लमानांनी ८०० वर्षे या भारतावर राज्य केले, त्या देशांत त्यांना पुन्हा कधीही लोकशाही राजवटीत सत्तेवव येता येणार नाही. म्हणून सध्याची स्थिती कायम राहावी, ती राहिली नाही तरी मुस्लमानांनी नव्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आधुनिकतावाद स्वीकारावा अशी सर सय्यद अहमद यांची भूमिका होती.

अशा प्रकारे सर सय्यद अहमद यांच्या भूमिकेने भारतामध्ये जमातवादाचा प्रश्न सुरू झाला. राष्ट्रसभेसारख्या राजकीय संघटनेला सर सय्यद अहमद यांनी हिंदूची संघटना किंवा बहुसंख्याक जमातवादाचा शिक्का मारून आपली वेगळी चूल मांडण्याचा प्रयत्न केला. यातूनच मुस्लिम जमातवादाच्या चळवळी व त्यास ब्रिटीशांनी घातलेले खतपाणी यामुळे भारताच्या स्वातंत्र्य चळवलीवर जमातवादाचे सावट येऊ लागले. एकसंघ राष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेला एक विकृत रूप येवू लागले. धर्म व राष्ट्र या समीकरणाने भारताच्या मुळ धर्मनिरपेक्ष राष्ट्रावादाला खिंडार पडले. याच्यातून निर्माण झालेले अनेक प्रवाह हे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक शोकांतिक आहे.

भारतामध्ये जमातवादाविषयी अनेकवेळा चर्चा होत असते. त्यामध्ये मुस्लीम जमातवाद आणि हिंदू जमातवाद अशा दोन जमातवाद महत्वाच्या आहेत. विसाव्या शतकाच्या आरंभापासूनच धार्मिक आधारावर हिंदूच संघटन करण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. पण हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याच कधीच फारस जुळल नाही. त्यामुळे हिंदुत्ववादी विचार किंवा शक्ती तशा विस्कळीत राहिल्या. १९८० साली भाजपची स्थापना झाली परंतू त्याची सुरूवात खडतर ठरली. त्यामुळे पुढे भाजपने सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पाठपुरावा सुरू केला आणि हिंदूत्ववादी भूमिका घेतली. भारतीय समाजात हिंदू विरूद्ध बिगर हिंदू अशी थेट विभागणी करून हिंदूमध्ये आक्रमक आत्मसन्मान निर्माण करण्यावर भाजपच्या नव्या हिंदूत्वाचा भर होता. मुख्यत: मुसलमान व ख्रिश्चन समाजाच्या विरोधात हिंदूचे हितसंबंध मांडून दाखवण्याचा भाजपचा भर राहिला. तसेच हिंदू समुदायाच आपल्या राजकीय

पाठीराख्यामध्ये रूपांतर करण्यासाठी हिंदू विरूद्ध मुस्लिम असा प्रत्यक्ष संघर्ष उभा करण्याचा भाजपने प्रयत्न केला. रामजन्मभूमी आंदोलनाच्या काळापासून भाजपने हिंदू व्होट बँक निर्माण केली आणि हिंदूत्वाच्या जहाल आणि आक्रमक प्रचारामुळे पक्षाची लोकप्रियता वेगाने वाढून केंद्रीय राजकारणात भाजपाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आणि २०१४ मध्ये केंद्रांमध्ये व अनेक राज्यात सत्तेवर आले. हिंदूत्व या मुद्यावर त्यांनी २०१९ साली सुद्धा सत्तेवर आले. त्यामु भारतीय राजकारणात हिंदूत्वाच्या धर्मवादी राजकारणाचा भाजपला फायदा झाला. एकूणच मुस्लीम लीग व अलीगढ चळवळीच्या माध्यमातून मुस्लिम जमातवाद निर्माण झाले तर संघ आणि हिंदू सभा यांनी हिंदू जमातवाद निर्माण केला आहे. या जमातवादी राजकारणामुळे भारतीय राजकारणात धर्माधारित राजकारणाची सुरूवात होऊन आजच्या परिस्थितीत धर्मावरच सर्व निर्णय होतांना दिसतात. त्यामुळे भारतीय धर्म निरपेक्ष तत्त्वाला धोका निर्माण झाला असून अल्पसंख्याक व बहुसंख्याक वाद निर्माण झाला आहे आणि अल्पसंख्याक लोकांना बहुसंख्याकाची भिती वाटत आहे.

### २.३.२ भारतीय राज्यघटना आणि अल्पसंख्याकांचे अधिकार

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. विविधतेत एकता हे भारतीय राष्ट्रवादाचे वैशिष्ट्ये आहे कारण भारतामध्ये बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुसांस्कृतिक लोक राहतात. त्यामध्ये प्रामुख्याने ख्रिश्चन, हिंदू, इस्लाम, बौद्ध, शीख, ईसाई, पारशी, जैन इत्यादी धर्माचा समावेश होतो. त्यामध्ये हिंदू हा बहुसंख्याक धर्म आहे. या विविध धार्मिक लोकांनमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न भारतीय राज्यघटनाकारांनी केली. भारतीय राज्यघटनेनुसार दोन प्रकारचे अल्पसंख्याक आहेत. एक धार्मिक अल्पसंख्याक आणि दुसरे भाषिक अल्पसंख्याक आहेत. भारतामध्ये १७०० भाषा बोलल्या जातात. त्यामधील २२ भाषांना भारतीय राज्यघटनेने घटनात्मक दर्जा दिला आहे. तसेच भारतीय संविधानाने भारतातील सर्व धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना त्यांची स्वत:ची परंपरा व संस्कृती जपण्याची समान संधी देण्यात आली. त्याचबरोबर जात, धर्म व लिंगाच्या आधारे भेदभाव न करण्याची भूमिका घटनाकारांनी घेतली. धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक समूहांना बहुसंख्याक समूहापासून भिती वाटू नये आणि राज्यसंस्थेकडून अल्पसंख्याक समाजावर अन्याय होणार नाही याची काळजी घटनाकारांनी घेतली. भारतीय समाजामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी अल्पसंख्याकांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. भारत सरकारच्या नं. एफ-७-५/२००५ MC(P) आदेशान्वये मुस्लीम, ख्रिश्चन, शीक, बौद्ध आणि पारशी हे धर्म अल्पसंख्याक म्हणून घोषित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब

आंबेडकरानी राज्य आणि अल्पसंख्याक निवेदन भारतीय घटना समितीला सादर केले होते. त्यानुसार नंतर घटना समितीने अल्पसंख्याकाच्या संरक्षणासाठी काही घटनात्मक तरतूदी करण्यात आले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अल्पसंख्याकाच्या संरक्षणासाठी ज्या शिफारशी केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे.

घटनेमध्ये करण्यात आलेल्या तरतूदी.

**समानतेचा हक्क :**

**अनुच्छेद १४ :**

कायद्यापुढे समानता : राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

**अनुच्छेद १५ :**

धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई :

- ♦ राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणांवरून भेदभाव करणार नाही.
- ♦ केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक.
- ♦ दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यात प्रेवश, किंवा
- ♦ पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिताच खास नेमून दिलेल्या अशा विहिरी, तलाव, स्थानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर, याविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही.
- ♦ या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद १६ :**

राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणांवरून भेदभाव करणार नाही.

**धर्म स्वातंत्र्याचा हक्क :**

**अनुच्छेद २५ :**

सदसदविवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार,

- सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या व या भागातील अन्य तरतुदींच्या अधीनतेने, सदसदविवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत.
- या अनुच्छेदातील कोणत्याही बाबींमुळे.
- धर्माचरणाशी निगडीत असलेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धार्मिकेतर कार्याचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या.
- सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्था, हिंदूचे सर्व वर्ग व पोट-भेद यांना खुल्या करण्याबाबत तरतूद करणाऱ्या, कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही किंवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद २६ :**

धर्म विषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य : सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या अधीनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास.

- धार्मिक व धर्मादायी प्रयोजनांकरिता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालविण्याचा.
- धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा.
- जंगम व स्थावर मालमत्ता मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा, आणि
- कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

**अनुच्छेद २९ :**

अल्पसंख्याक वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण :

- भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी भाषा, लिपी वा सांस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल.
- राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**अनुच्छेद ३० :**

अल्पसंख्याक वर्गाचा शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क :

- धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.
- शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही.

**अनुच्छेद ४६ :**

अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन : राज्य, जनतेतील दुर्बल घटक, आणि विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वख करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करील.

अनुच्छेद २९ व अनुच्छेद ३० मधून निर्देशित होणारे अधिकार पुढीलप्रमाणे –

१. कोणत्याही नागरिक गटाला आपली भाषा, लिपी अथवा संस्कृती जतन करता येते.

२. राज्यातून अनुदानातून चाललेल्या शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, भाषा, वंश अशा कारणांवरून प्रवेश नाकारता येत नाही.

३. धर्म किंवा भाषा या निकषांनुसार अल्पसंख्याक समाजास शिक्षणसंस्था स्थापता येतात. त्यांचे प्रशासन करू शकतात.

४. क्रमांक ३ नुसार स्थापण्यात आलेल्या शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्यांकाची संस्था असल्याच्या कारणावरून सहाय्य करताना भेदभाव करता येत नाही.

'अल्पसंख्यांक' ही संकल्पना संविधानात स्पष्ट केलेली नसली तरी सर्वसाधारणपणे संबंधित राज्याच्या लोकसंख्येच्या निम्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या आणि स्वत:ची स्वतंत्र भाषा बोलत असलेल्या नागरिकगटाला अल्पसंख्याक मानता येते. अल्पसंख्यांकाच्या शिक्षण संस्थाचे प्रशासन पाहण्याचा अधिकार संबंधितास देण्यात आला आहे. असे असले तरी अशा संस्थाना अनुदानासाठीचे जे नियम असतात ते त्यांच्यावर बंधनकारक राहतात. तसेच अल्पसंख्याक नागरिकगटाची संस्था असल्याने त्यांना आपल्या धर्माच्या शिक्षणाची सक्ती विद्यार्थ्यांवर करता येत नाही. या अधिकारात आणखी एक महत्त्वाची तरतूद आहे की, अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थेकडील संपत्तीचे संपादन करतेवेळी त्याबाबतची कायद्याप्रमाणे ठरणारी रक्कम भरपाई म्हणून देण्याचे राज्यावर बंधनकारक केले आहे. इतर संस्थांच्या बाबत घटनात्मक पद्धतीने अशी सवलत दिलेली नाही.

अलिकडेच भारतीय संसदेने मुस्लीम समाजातील तीन तलाकमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला त्याच्या या पर्सनल लॉ मधील कायद्यात बदल करून स्त्रियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. समान नागरीकायदा किंवा काश्मिरमधील मुस्लीमावरील दहशतवादी हल्ले होत असताना मुस्लिमाना दहशतवादी ठरविले जाते या कारणावरून मुस्लीम अल्पसंख्याकामध्ये पुन्हा भितीचे वातावरण निर्माण झाला आहे.

### २.३.३ बहुसंख्यांकवादाचा प्रश्न

भारतातील विविध धर्माचे धर्मकारण आणि समाजजीवन यांच्या परस्पर संबंधातून साकारलेले राजकारण त्यामधून विकसीत झालेला बहुसंख्याकवाद, अल्पसंख्याकवाद आणि त्याचा समाजजीवनावर होत असलेला अनिष्ठ परिणाम याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. इ.स. २००४ मधील सार्वत्रिक निवडणूकीत भाजपाचा पराभव झाला हे जरी खरे असले तरी भाजपाने स्वत:च्या हितासाठी घडवलेली जनमताची भूमी स्थिरावली, समाजमान्य झाली. भारतीय समाजातील उच्च स्तरावर जीवन जगणारा वर्ग आणि उच्च मध्यमवर्ग हा अधिक धार्मिक जीवनपद्धतीकडे व कर्मकांडाकडे झुकला. भारतीय

सामाजिक जीवन क्षेत्र कोणत्या दृष्टिकोनानी साकारले आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. १९८५ नंतर देशात सावकाशपणे बहुसंख्याकवाद विकसित होत गेलेला आहे. हिंदू समाज बहुसंख्य असल्यामुळे इथल्या संस्कृतीवर चालीरीतीवर हिंदू छाप असणार आणि असायलाच हवी. असा आग्रह हिंदू जमातवादी संघटनाकडून धरला जातो. लोकशाही म्हणजे सर्वच निर्णय बहुसंख्येच्या इच्छेनुसार होणे एवढाच मर्यादित अर्थ मांडून, भारतात कोणत्याही बाबी हिंदू मतासारखा होत नाहीत. अशी तक्रार हिंदू जमातवाद्यांकडून केली जाते. सरकारकडून नेहमीच मुस्लिम अनुनय केला जातो. ही एक कायमची तक्रार हिंदू जमातवाद्यांकडून केली जाते. जमातवादाचा हिंसाचार हा जसा एक पैलू आहे तसाच बहुसंख्याकवादाची पेरणी करून सामाजिक विद्वेषाच्या विषाची जोपासना करणे हे दुसरे वैशिष्ट्य आहे. बहुसंख्याकवादाचा प्रश्न हा लोकशाही जीवन पद्धतीला मारक असून लोकशाही जीवनपद्धती व राजकीय पद्धती उध्वस्त करणारा आहे.

भारतीय समाजात आढळणारा बहुसंख्याकवाद सध्यातरी आक्रमक व परद्वेष करणारा नाही. बहुसंख्याकवाद हिंदू विरूद्ध अल्पसंख्या मुस्लिम असा वाद व विभागणी झाल्यामुळे वाद निर्माण होऊ लागले. शहाबानो प्रकरण, हज यात्रेसाठी दिले जाणारे आर्थिक साहाय्य इ. मुद्याबाबत केला जाणारा प्रचार हा बहुसंख्याकवादाचाच परिणाम आहे. वस्तुत: मुस्लिमबाबत स्विकारण्यात येत असलेली तथाकथित काँग्रेसचे धर्मनिरपेक्षतेचे धोरण हे मुस्मीमांच्या धार्मिक वृत्तीला पोषक ठरणारे आहे. शहाबानो प्रकरणी पंतप्रधान राजीव गांधीनी घेतलेली धोरणात्मक माघार मुस्लिम जमात व त्यांच्या जमातवादी राजकारणाला प्रेरक ठरली. बहुसंख्यकवादी दृष्टीकोनामुळे इतर समूहाविषयी उदासिनता व अज्ञान निर्माण होते. शहाबानो प्रकरमाबाबत हिंदूची प्रतिक्रिया गोध्रा हत्याकांडाबाबत मौन या सर्व बाबी बहुसंख्याकवादाशी संबंधीत आहेत. सर्व समाज घटकांचे जीवन व बंधुभावाचे परस्पर संबंध हे लोकशाहीचे पायाभूत अंग आहे. बहुसंख्याकवादामुळे इतर अल्पसंख्य समूहाचे अस्तित्व चालवून घेतले जाते. परंतु त्यांच्यात परस्पर संबंध प्रस्थापित होत नसतो. भारतातील परिस्थिती जवळपास अशीच आहे. हे खेदाने नमूद करावे लागेल. अल्पसंख्या विरूद्ध बहुसंख्य अशी बद्वेताची मांडणी करून बहुसंख्याकवादाची उभारणी १९८५ नंतर करण्यात हिंदुत्ववाद्यांना यश आलेले आहे. हिंदू बहुसंख्याकवादाचे वर्चस्व आज वाढल्याचे दिसते.

भारताच्या संदर्भात हिंदूत्ववादी राजकारणाचे वर्णन करताना बहुसंख्याकवाद ही संकल्पना अलीकडे बरेच लोक वापरू लागले आहेत. परंतू तिची पुरेशी संकल्पनात्मक मांडणी झालेली नाही. आतापर्यंत जमातवाद असा शब्दप्रयोग केला जात होता. त्याऐवजी समाजाच्या राजकीय व सांस्कृतिक अनुभवासाठी बहुसंख्याकवाद हा शब्दप्रयोग उपयोगी ठरू शकतो.

कर्तव्यसाधना या अंकाच्या २० नोव्हेंबर २०१९ रोजीच्या सदरात सुहास पळशीकर यांनी बहुसंख्याकवादासंबंधी एक लेख लिहिला आहे त्यामध्ये त्यांनी बहुसंख्याकवादाचे दोन प्रकार सांगतिले आहेत. ते खालीलप्रमाणे,

## १. बहुमताचा बहुसंख्याकवाद :

लोकशाही याचा अर्थ बहुमताशी जोडला जातो. परंतू निव्वळ बहुमत लोकशाहीचा एकमेव आधार किंवा अर्थ असू शकत नाही. परंतू बहुमताच्या जोरावर अनेक निर्णय घेताना अनेक उदाहरणे लोकशाही व्यवस्थामध्ये आढळतात. ५२ विरूद्ध ४८ अशासारख्या जेमतेम बहुमताने धोरणात्मक किंवा देशाच्या भवितव्याविषयीचे निर्णय घेतले गेल्याची उदाहरणे अनेक देशामध्ये घडलेली आढळतात. जेव्हा काढावरचे बहुमत असलेले पक्ष, सरकार किंवा कोणतेही समूह फक्त त्या बहुमताच्या आधारावर निर्णय प्रक्रिया लोकशाहीची असल्याचा दावा करतात आणि प्रतिपक्षाशी वाटाघाटी किंवा देवाणघेवाण करण्यास नकार देतात तेव्हा त्याला बहुसंख्याकावाद असे म्हटले जाते. लोकशाहीमध्ये अशा बहुसंख्याकवादाचा धोका असतोच असेही अनेकांना वाटत आले आहे.

## २. समूहनिष्ठ बहुसंख्याकवाद :

धार्मिक भाषिक वांशिक किंवा तत्सम इतर प्रकारची विविधता असलेल्या समाजामध्ये जो समूह संख्येने जास्त आहे त्याने आपल्या संख्येच्या बळावर राजकीय बहुमत मिळविण्याचा प्रयत्न करतो. हा बहुसंख्याकवाद केवळ राजकीय बहुमतपुरता मर्यादित राहत नाही. एखाद्या भौगोलिक प्रदेशात, देशात, राज्यात किंवा राज्यामधल्या एखाद्या भागात आपण बहुसंख्य आहोत आणि म्हणून त्याच्यावर आपले वर्चस्व असले पाहिजे अशी भावना बहुसंख्याकवादामध्ये निर्माण होते. दुसरी गोष्ट म्हणजे बहुसंख्याक आपल्या चालीरिती, आपली जीवनशैली वगेरे गोष्टीचा परिसरातल्या किंवा त्या प्रदेशातल्या इतरानी स्वीकार केला पाहिजे असा आग्रह बहुसंख्याक समूह धरतात. त्यामुळे त्याचे सांस्कृतिक वर्चस्व कायम राहील याचा प्रयत्न केला जातो. तिसरी गोष्ट म्हणजे समाजातील सार्वजनिक संख्या कायदेशीरदृष्टीने तटस्थ आणि समूहनिरपेक्ष असल्या तरी त्याचे प्रत्यक्ष वर्तन मात्र बहुसंख्याक समूहाची दृष्टी, विचार आणि मूल्य यांच्याकडे झुकलेले दिसून येतो. शेवटचे म्हणजे राजकीय बहुमत संख्येच्या जोरावर राजकीय सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला जातो.

अशा प्रकारे बहुसंख्याकवादाचे दोन प्रकार पडतात. त्याचबरोबर बहुसंख्याकवाद ही संकल्पना स्पष्ट केले असले तरी बहुसंख्याकवादामध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही कार्य करीत असताना बहुसंख्याक लोकांचा विचार केला जातो. त्यामुळे खालील प्रश्न निर्माण होतात.

१. एखाद्या प्रदेशात आम्ही बहुसंख्या आहोत म्हणून येथे राज्य करण्याचा आमचा अधिकार आहे अशी भावना बहुसंख्याक समाजामध्ये अथवा समूहामध्ये निर्माण होते. उदा. भारतामध्ये हिंदूना बहुसंख्या आहोत म्हणून सत्ता प्राप्त करता येते. तर महाराष्ट्रात मराठा, कर्नाटकात लिंगायत, आंध्रात रेड्डी इत्यादी जातीचे कायम वर्चस्व राहिले असून राज्य करण्याचा अधिकार आमचाच आहे अशी भावना निर्माण झाल्याचे दिसते.

२. देशात किंवा राज्यामध्ये बहुसंख्याक समाजामध्ये अशी भावना निर्माण होते की समाजातील जे निर्णय घेण्यात येईल ते सर्व निर्णय हे बहुसंख्याक असलेल्या समाजाच्या मताप्रमाणे होईल. त्याचे जे मत असेल ते इतरांनी ते स्वीकारावे अशी भूमिका मांडली जाते.

३. सार्वजनिक विधिनियम हे अधिकृतपणे बहुसंख्याक समाजाच्या मर्जीने आणि त्याच्या सांस्कृतिक दृष्टीच्या चौकटीत बसणारे असले पाहिजे असा आग्रह धरला जातो आणि अनेकवेळा त्या दिशेने वाटचाल सुरू होते. म्हणजेच संस्था अनौपचारिकपणे बहुसंख्याक समाजाच्या मर्जीने चालण्याऐवजी नियम कायदेकानून औपचारिक शासकीय चौकट या सर्व बाबी बहुसंख्याक समाजाच्या म्हणण्याप्रमाणे तयार कराव्यात म्हणून प्रयत्न केले जातात.

४. बहुसंख्याकवादाचा आविष्कार म्हणजे सार्वजनिक अस्मिता किंवा राष्ट्रीय ओळख हीच मुळी बहुसंख्याक समूहाच्या कल्पनेप्रमाणे रचली जाते म्हणजे जर एखाद्या देशामध्ये देशपातळीवर असा बहुसंख्याकवाद प्रचलित असेल तर त्या देशाच्या राष्ट्रवादाची बहुसंख्याकवादी पुर्नमांडणी होते. आणि बहुसंख्याक समाजानी सांगितलेला हाच राष्ट्रवादाचा नैसर्गिक आधार मानला जातो. त्याची प्रतिके त्याचे मानदंड हेच राष्ट्रवादाचे घटक बनतात उदा. हिंदूनी सांगितलेल्या राष्ट्रवाद हाच भारताचा राष्ट्रवाद होय अशी भूमिका मांडली जाते.

वरील सर्व कारणामुळे बहुसंख्य नसलेल्या समाजाचे काय करायचे हा प्रश्न निर्माण होतो कारण कोणत्याही प्रकारे इतराना अदृश्य करण्याची भूमिका बहुसंख्याकवादाची असते. त्यासाठी पहिला मार्ग म्हणजे ते इतरांचीहकालपट्टी करणे परंतू ते दरवेळी शक्य होत नाही. त्यामुळे दुसरा मार्ग म्हणजे इतरांना बहुसंख्याकासारखे बनण्यास प्रवृत्त करून त्याचे वेगळेपण कमी करणे किंवा नाहीसा करणे होय. जे जर शक्य झाले नाही तर त्यांना राष्ट्रदोही किंवा धोकादायक ठरवून त्याचे खच्चीकरण करणे त्यांना राजकीय व सामाजिकदृष्ट्या पराभूत करून सार्वजनिक व्यवहारामध्ये अस्तित्व कमी करणे इत्यादी प्रयत्न बहुसंख्याकवादी करतात. त्यामुळे बहुसंख्याकवाद हा लोकशाही समोरील एक मोठे आव्हान निर्माण केले आहे ते स्थानिक पातळीवरील जातीचे बहुसंख्याक, प्रादेशिक बहुसंख्याक व शपातळीवरील बहुसंख्याक इथपर्यंत वर्चस्व निर्माण करतात. त्यामुळे लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी

बहुतेकवेळा संविधान हे अशा बहुसंख्याकवादी राजकारण्याच्या विरोधात एक महत्त्वाची ताकद म्हणून काम करते परंतू बहुसंख्याकवादी राजकारण हे अनेकवेळी लोकशाही पुढील पेच निर्माण केला जातो. कारण सर्वांना समान अधिकार आणि सर्व समूहांचा सर्व सार्वजनिक क्षेत्रात सहभाग घेण्याचा समान हक्क ही लोकशाहीची वैशिष्ट्ये बहुसंख्याकवादाच्या वावटळीत टिकून राहत नाही ही शोकांतिका आहे. त्यामुळे बहुसंख्याकवादाचा प्रश्न महत्त्वाचा असून तो सोडविला पाहिजे तरीही अनेक प्रश्ं नर्माण होतात कारण लोकशाहीमध्ये बहुसंख्याक वाद पूर्णपणे टाळता येत नाही आणि दुसरीकडे बहुसंख्याकवादामुळे लोकशाहीच्या वाटचालीमध्ये आडकाठी आणल्याशिवाय राहत नाही.

## अल्पसंख्याकांचे कर्तव्ये

भारतातील अल्पसख्याक व बहुसख्याक लोकाना एकत्रितरित्या काही कर्तव्ये सांगितले आहेत. ती कर्तव्ये सर्वांनी पालन करावे अशी अपेक्षा आहे. कारण अल्पसंख्यांक लोकांना बहुसंख्यांक लोकांशी समांजस्यपणे राहावे लागते. जेणे करून समाजामध्ये ताणतणाव निर्माण होऊ नये हा महत्त्वाचा उद्देश आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ क मध्ये कर्तव्य दिले आहेत ते पालन करणे आवश्यक आहे.

१. राज्यघटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२. ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य ल यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्याचे अनुसरण करणे.

३. भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे.

४. देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

५. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलिकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

६. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशांचे मोल जाणून तो जतन करणे.

७. वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि प्राणिमात्रांबद्दल दया बुद्दी बाळगणे.

८. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०. राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक कार्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये उत्तमता संपादन करण्यासाठी झटणे.

११. जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या अपत्यास / पाल्यास, त्याच्या वयाच्या ६ वर्षापासून ते १४ वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

## २.६ सारांश

आधुनिक भारतामध्ये इंग्रजांनी सत्ता प्रश्थापित केल्यानंतर समाजामध्ये धार्मिक सलोखा निर्माण करण्याऐवजी धर्माधर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न इंग्रजी सत्तेने केले. त्याचबरोबर भारतातील लोकामध्ये संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतामध्ये अल्पसंख्याक समाजाला बहुसंख्य हिंदूची भिती वाटत होती. त्यासाठी अल्पसंख्याक समाजाला भारतीय राज्य घटनेमध्ये काही अधिकार दिले आहेत. त्यांना आपला धर्म प्रचार करण्याचा, प्रसार करण्याचा प्रयत्न चालू आहेत. तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अल्पसंख्याकांना संरक्षण देण्यात यावे असे नमूद केले आहेत. त्याचबरोबर समाजामध्ये जो समान बहुसंख्याक समाज आहे त्याच्या राजकारणामुळे अल्पसंख्याकावर अन्याय करण्याचा प्रयत्न होत असतो त्यामुळे बहुसंख्याक व अल्पसंख्याक हे एकमेकांपासून विभक्त झालेले आपल्याला दिसून येते. भारतीय राजकारणामध्ये बहुसंख्याक समाज हा सत्ता प्रस्थापित करण्यासाठी राजकीय पातळीवर त्यांना महत्त्वाची कार्य सांगितले पाहिजे. त्याच बरोबर आणि भारतीय राजकारण्यामध्ये बहुसंख्याक समाजाने अल्प संख्यांकांच्या अदिकारांची बूज राखून सामाजिक सद्भाव व जातीय सलोखा निर्माण केला पाहिजे व अल्पसंख्यांकांनी राष्ट्र निर्मितीच्या व समाज सुधारणेच्या कामात सर्वांना साथ दिली पाहिजे.

## २.७ स्वाध्यायासाठी प्रश्न

१. भारतातील ब्रिटिश काळामधील जातीय सलोख्यासमोर निर्माण झालेल्या आव्हानांची चर्चा करा.

२. भारतीय राज्यघटनेतील अल्पसंख्यांकाच्या अधिकाराविषयी सविस्तर चर्चा करा.

३. बहुसंख्याकवादाच्या प्रश्नाविषयी सविस्तर चर्चा करा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. जावडेकर श. द., 'आधुनिक भारत', सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १८९०.

२. बिपिनचंद्र व सहकारी, 'इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स', के. सागर प्रकाशन, पुणे, २००३.

३. चौसाळकर अशोक, आधुनिक राजकीय सिद्धांत, युनिक, पुणे, २०१८.

४. बाळ प्रकाश, किशोर बेडकिहाल (सं.) 'धर्म आणि राजकारण', अक्षय प्रकाशन, मुंबई, २००३.

५. राजेंद्र व्होरा आणि सुहास पळशीकर (सं), 'भारतीय लोकशाही सेझ प्रकाशन, नई दिल्ली, २०१०.

६. भालबा विभूते, 'भारताचे संविधान', मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९९९.

७. आंबेडकर बाबासाहेब यांचे निवडक लेख, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८.

८. पळशीकर सुहास, राजकारणाचा ताळेबंद, साधना प्रकाशन पुणे, २०१३.

९. पळशीकर सुहास, बहुसंख्याकवाद म्हणजे काय ?, कर्तव्य साधना, २० नोव्हेंबर, २०१९.

१०. चौसाळकर, अशोक. भारतीय राष्ट्रवाद.

११. सामाजिक अंतविरोध मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, २०१८.


❋❋❋

# घटक ३

# समिश्र राष्ट्रवाद व जातीय सलोखा


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ महात्मा गांधी

३.३.२ पंडीत नेहरू

३.३.३ मौलाना आझाद

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द व त्याचे अर्थ

३.६ स्वाध्यायासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.१ उद्दिष्टे

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला संमिश्र राष्ट्रवादाचा अभ्यास करायचा आहे. एकसंघ राष्ट्राअंतर्गत लोकशाहीतील स्वातंत्र्यवादी उदार विचारांनी संमिश्र सांस्कृतिक विचारांना अधिक खुलेपणा दिला. त्यामुळे एकसंघ राष्ट्राअंतर्गत असणारा एकात्म व एकजिनसी राष्ट्रवाद मागे पडून संमिश्र राष्ट्रवाद तयार झाला. जसा विविध धर्म व भाषामधून अभिव्यक्त होणारा राष्ट्रवाद हा बहुलवादी बनला. याचा अभ्यास या प्रकरणात करायचा आहे.

राष्ट्रवाद अभिव्यक्त करण्याचे मार्ग भिन्न असल्याने त्याता काही ताणतणाव कालौघात तयार होणे क्रमप्राप्त ठरते. सामान्यत: याला जातीय, धार्मिक अंतसंर्घष अथवा आंतरिक वाद म्हणता येईल. अनेक धर्म, जाती, भाषा यांच्या भिन्न अभिविवेषामुळे तयार होणारे जातीय तणाव ही नव्या राष्ट्रवादाशी संलग्न

समस्या आहे. ती दूर करण्यासाठी राष्ट्रवादाची लोकसत्ताक उपयोगिता लक्षात घेत या राष्ट्रवादातील अतिरेकी हिंसक भडकपणा कमी करताना जातीय सलोखा तयार करणेही महत्त्वाचे असते.

हा जातीय सलोखा निर्माण करण्याचे काम विसाव्या शतकामध्ये महात्मा गांधी, पंडीत नेहरू व मौलाना आझाद यांनी केल्याचे दिसते. या त्यांच्या जातीय सलोख्याच्या कार्याला व्यापक उदार राष्ट्रवादाची जोड देत समाजात सौहार्दाचे व समन्वयाचे वातावरण तयार करण्याचे काम या थोर समाजधुनिणांनी केले. त्या राष्ट्रपुरूषांच्या या कार्याची ओळख प्रस्तुत प्रकरणात करून घ्यायची आहे. यासाठी सुरूवातीला आपणास राष्ट्रवाद म्हणजे काय ? हे समजून घ्यावे लागेल. त्याचबरोबर संमिश्र राष्ट्रवाद आणि राष्ट्रवादाची विविध स्वरूपे तपासून पहावी लागतील. संमिश्र राष्ट्रवाद व जातीय सलोखा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने त्यासंदर्भात झालेल्या कामाचा आढावा या प्रकरमात महात्मा गांधी, पंडीत नेहरू व मौलाना आझाद यांच्या संदर्भात करून घ्यावा लागेल.

## ३.२ प्रास्ताविक

आधुनिक राजकीय सिद्धांतामध्ये राष्ट्रवादाचा अनेक अंगानी अभ्यास झालेला आहे. राष्ट्रवादामध्ये राष्ट्र ही मूळ संकल्पना असून त्या राष्ट्रामध्ये राहणाऱ्या लोकांना त्या राष्ट्राबद्दल वाटणारे प्रेम, आपुलकी व त्या राष्ट्रासाठी सर्वस्व देण्याची तयारी या मानसिक भावनेला राष्ट्रवाद असे म्हटले जाते. लोकांची ती एक समूह भावना असते व त्यात राष्ट्रकल्याणासाठी लढण्याची किंवा संघर्ष करण्याची एकसंघ मानसिकता असते. पूर्वीच्या राष्ट्रामध्ये ही भावना अधिक तीव्र, एकात्म व लष्करी सामर्थ्याला जवळची होती. या काळात जगात बहुतेक ठिकाणी राजेशाही अस्तित्वात असल्याने सैनिकी सामर्थ्याबरोबर तेंव्हा धर्म, वंश, प्रदेश यासारख्या संकुचित व्यवस्थांना राष्ट्रवादाच्या केंद्रस्थानी स्थान होते. समान, धर्म, समान वंश, समान भाषा, समान संस्कृती इतिहास आणि छोटी राष्ट्रे यामुळे प्राचीन राष्ट्रावाद हा अधिक एकात्म व मजबूत वाटत होता. या राष्ट्रावादावर त्या काळात राजाचा प्रभाव असल्याने देश, देव व धर्म यासाठी सर्वांनी आपल्या वैयक्तीक स्वार्थाचा त्याग करावा असा प्रचार त्याकाळात होत असे. जुन्या धर्मग्रंथातून व त्यावेळच्या राजकीय तत्वज्ञानातून हा प्राचीन राष्ट्रवाद त्या वेळच्या राष्ट्रांना बळकटी देत होता.

मात्र राजकीय इतिहासात राजेशाहीच्या अंताबरोबर राष्ट्रवादी संकल्पनाही अधिक विस्तृत लोकसत्ताक, बहुलवादी व संमिश्र बनत गेल्या. राजाच्या व झर्मसंकल्पनांच्या एकछत्री प्रभावातून राष्ट्रवाद हा लोकशाहीतील स्वातंत्र्यवादी मूल्यांमुळे अधिख बहुजनवादी बनू लागला. राष्ट्र संकल्पनेला राज्यसंकल्पना जोडल्या गेल्याने छोट्या राष्ट्रांचा भौगोलीक विस्तार वाढत गेला. लोकशाही उदारमतवादाने राष्ट्रवादाने आपली साचेबंद एकसंघता सैल करून त्याऐवजी राष्ट्राच्या विकासवादी अंगाने राष्ट्रावर प्रेम करणाऱ्या नागरिकांना महत्त्व देऊन व्यक्तिस्वातंत्र्य व राष्ट्रवादाची सांगड घातली. यालाच संमिश्र राष्ट्रवाद किंवा लोकशाही राष्ट्रवाद असे म्हणतात. ही एक नैसर्गिक मानवी भावना असते व तिची निर्मिती मानवी एकसंघ

समूहाकडून राष्ट्र या सर्वोच्च संघाकडे संक्रमित होत जाते. मुळात मानवी समूह हेच कोणत्या तरी एकसंघ समान कारणाशिवाय तयार होत नाही. या समूहांना स्वत:चा विकास करावयाचा असतो व त्यामध्ये संरक्षण आणि सुरक्षा हे घटक महत्त्वाचे असल्याने राष्ट्रवादाचा संबंध एका बाजुला राष्ट्राच्या अस्तित्ववादी विकासाशी जोडला जातो तर हे ध्येय पूर्ण करण्यासाठी संरक्षण, सैन्य व युध्दाशी निगडीत सामर्थ्याला राष्ट्रवादात प्राधान्य दिले जाते. जसजशा विकासाच्या संकल्पना बदलत गेल्या तसतशा राष्ट्रवादी संकल्पनाही कडव्या आक्रमक संरक्षणवादी विचाराकडून मूल्यप्रधान सहिष्णू व समूहाच्या बौद्धिक मानसिक व्यापक स्वरूपाशी जोडल्या जावू लागल्या.

## ३.४ विषय विवेचन

राष्ट्र राज्याची संकल्पना व राष्ट्राचा स्वयंनिर्णयाचा हक्क यांच्या विकासाबरोबरच राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा विकास झाला. आज एकविसाव्या शतकात राष्ट्रवाद ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाची राजकीय संकल्पना बनली आहे. पूर्वी ती राष्ट्रीय स्तरावर आणि राष्ट्रमर्यादेत काम करीत होती पण आता मात्र ती राष्ट्रीय सीमांच्या अंतामुळे आंतरराष्ट्रीय बनली आहे. लोकांना आपल्या राष्ट्राबद्दल अभिमान वाटणे स्वाभाविक असते. कारण ते त्या राजकीय व सामाजिक संस्कृतीचे भाग असतात. आपल्या राष्ट्रासाठी त्याग करण्याची भावना म्हणजे राष्ट्रवाद कारण या त्यागाचा राष्ट्रप्रेमाशी संबंध असतो. ॲक्टन यांच्या मते राष्ट्रवाद ही सत्ता नसलेल्या सत्तेची सर्वोच्च शक्तीशाली एकसंघ लोकभावना असते.

**राष्ट्राची व्याख्या :**

राष्ट्रवाद समजून घेण्यासाठी राष्ट्र शब्द समजून घ्यावा लागतो. बऱ्याच वेळा सामान्य मानवी व्यवहारात राज्य, राष्ट्र व देश हे शब्द एकमेकाला पर्यायी म्हणून वापले जातात पणराजशास्त्रामध्ये या तिनही संज्ञा एकमेकाला जवळच्या असल्या तरी त्यात सूक्ष्म व तांत्रीक भेद दिसतात. साधारणत: देशाची छोटी आवृत्ती म्हणून राज्य शब्द वापरला जातो व त्यासाठी अशा देशात व राज्यात लोकसंख्या, भूप्रदेश, शासन व सार्वभोमत्व असावे लागते. याउलट राष्ट्र ही कृत्रीम शासनाद्वारे तयार होणारी सर्वोच्च राजकीय संस्था नसून तिच्या मुळाशी लोकांची नैसर्गिक एकजिनसी राष्ट्रप्रेमाची सर्वोच्च भावना असते व त्याद्वारे ती राष्ट्राला अधिक बलवान व मजबूत बनवते.

राष्ट्र या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील नेटस (Natus) या शब्दापासून झाली. याचा अर्थ जन्म, जाती असा होतो. म्हणजेच राष्ट्र हे जातीकुळातील एकतेच्या एकसूत्री बंधनाने बांधलेले असते. हा एकात्म समाज एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करतो व त्याच्या निश्चित अशा वर्तनपद्धती असतात. यासंदर्भात प्रसिद्ध विचारवंत गार्नर असे म्हणतो की, ''राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक समानता असलेला असा सामाजिक समूह की जो आपल्या मानसिक व वैचारिक वर्तनाची व त्या अनुशंगीक सर्व कृतींची एकता जाणिवपूर्वक कायम ठेवतो.'' रॅम्से मूर या विचारवंतानेही राष्ट्राची व्याख्या साधारणत: याच प्रकारे केली आहे.

''ज्या लोकसमूहात विशेष आपुलकी, आस्था निर्माण झाल्यामुळे हे लोक आनंदाने राहातात व त्यांना एकमेकांपासून तोडल्यास नाराज होतात आणि त्याचवेळी हे लोक इतरांच्या गुलामगिरीत राहू इच्छित नाहीत. त्या एकसंघ व्यवस्थेला राष्ट्र म्हणतात.'' डॉ. ए. इ. झिरमन यांच्या मते, ''राष्ट्र हा अशा एकात्म लोकांचा समूह असतो की, जो घनिष्ट संबंधानी, अभिन्न वृत्तीने व आत्मप्रतिष्ठेने संघटीत बनलेला असतो. तसाच तो समान व निश्चित मातृभूमीने बांधलेला असून त्याची दृढ एकता ही समान भाषा, प्रदेश, अर्थसंबंधाच्या समान संस्कृतीवर उभी असते.

थोडक्यात राष्ट्रवाद ही मानसिक राजकीय भावना वांशिक ऐक्य, समान भाषा, परंपरा, भौगोलिक एकता, धार्मिक एकता, समान श्रद्धा, अस्मिता व समान हितसंबंध आणि समान राजकीय, सामाजिक विचार पद्धतीवर आधारीत असते. राजकीय इतिहासामध्ये वरील घटकांवव आधारीत राष्ट्रवाद तयार होत असला तरी कालपरत्वे व देशपरत्वे त्यामध्ये असणारे वेगळेपण आपल्याला लक्षात घ्यावे लागते. याला राष्ट्रवादाचे प्रकार म्हणता येतील. प्रा. स्नायडर यांच्या मते राष्ट्रवाद हा एकीकृत, विनाशकारी, आक्रमक व आधुनिक राष्ट्रवादाच्या आधारे अभ्यासला जातो. कोहोन या विचारवंताने मात्र पाश्चात्य राष्ट्रवाद व पाश्चात्येतर राष्ट्रवाद असे राष्ट्रवादाचे दोनच प्रकार केलेले आहेत. तर क्रिन्सी राईटच्या मते राष्ट्रवाद हा मध्ययुगीन राजेशाही प्रधान, क्रांतिकारी, उदारमतवादी व हुकूमशाही स्वरूपाचा असतो.

यातील उदारमतवादी राष्ट्रवादालाच लोकशाही किंवा संमिश्र राष्ट्रवाद असे नाव देता येईल. संमिश्र राष्ट्रवाद हा बहुलवादी असून एका मोठ्या राष्ट्राअंतर्गत असणाऱ्या काही राष्ट्रकांच्या आधारे तो मांडला जातो. वैचारिक व सांस्कृतिक स्वातंत्र्य हा त्याचा पाया असल्याने तो स्वयंनिर्णयाच्या जवळचा असला तरी विघटनवादी नसतो. मात्र क्वचित प्रसंगी हे राष्ट्रीय एकात्मतेचे भान नष्ट झाले तर मोठ्या संमिश्र राष्ट्रवादी देशात जातीय, प्रादेशिक, धार्मिक, भाषिक, वैचारिक व सांस्कृतिक ताणतणाव आणि यादवी तयार होते. त्यासाठी सलोखा व समन्वय तयार करणारे समाजधुनिण नेते तयार व्हावे लागतात. भारतामध्ये जातीय सलोख्याचे महत्त्वाचे काम ज्यांनी केले त्यामध्ये अनेक सुधारक नेते यांचे योगदान महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणात आपल्याला महात्मा गांधी, पंडीत नेहरू आणि मौलाना आझाद यांचे जातीय सलोखा या संदर्भातील व्यापक कार्य अभ्यासायचे आहे. या अगोदर आपण महात्मा गांधी, पंडीत नेहरू व मौलाना आझाद यांच्या राष्ट्रवादाची माहिती अभ्यासली आहे. साधारणत: महात्मा गांधींचा राष्ट्रवाद हा अधिक मानवतावादी तर पंडीत नेहरूंचा राष्ट्रवाद हा उदार भारतीय राष्ट्रवादाकडून आंतरराष्ट्रवादाकडे वैश्विक पद्धतीने वाढत जाताना दिसतो तर मौलाना आझाद यांचा राष्ट्रवाद संकुचित राष्ट्रवादाकडून पुढे अधिक लोकसत्ताक व सर्वसमावेशक होताना दिसतो. साधारणत: या तिन्ही समाजधुनिन नेत्यांच्या राष्ट्रवादाचा पाया व्यापक लोकशाही मूल्यांवर आधारीत असल्याने विविधता असणाऱ्या भारतात त्यांना राष्ट्रवाद तयार करताना जातीय सलोखा व संमिश्र राष्ट्रवाद जोपासता आला. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राष्ट्रवाद कधीही आक्रमक, धार्मिक, एकतर्फी झाल्याचे दिसत नाही. संमिश्र राष्ट्रवाद व जातीय सलोख्याच्या अनुशँगाने आपण आता महात्मा गांधी, पंडीत नेहरू व मौलाना आझाद यांच्या व्यापक समन्वयवादी जातीय सलोख्याच्या कार्याची ओळख करून घेऊ. जातीय सलोखा हा शब्द

राज्यशास्त्रात जातीपुरता मर्यादित नसून तो धार्मिक, वांशिक, भाषिक, प्रादेशिक अशा व्यापक सलोख्याच्या अंगाने रापरला जातो. हे लक्षात घोणे गरजेचे आहे.

ज्या कालखंडात भारतात हिंदू राष्ट्रवाद, मुस्लीम राष्ट्रवाद व इतर प्रादेशिक तथा संकुचित राष्ट्रवाद विशेषत: तरुणांना आकर्षित करीत होते. त्या कालखंडात म. गांधी, पं. नेहरू व मौलाना आझाद यांनी लोकसत्ताक, सर्वसमावेशक, उदारमतवादी राष्ट्रवाद मांडण्याचा प्रयत्न केला. म. गांधींनी राष्ट्रवादाला नैतिक अधिष्ठान दिले तर पंडित नेहरूंनी राष्ट्रवादाबरोबर आंतरराष्ट्रवादावर भर देताना विश्वक शांतता, सहकार्य, स्थैर्य विकास व विश्वबंधुत्वाला महत्त्व दिले. राष्ट्रवाद ही एक राजकीय शक्ती असून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकांना एकत्र आणण्यासाठी ती महत्त्वाची असते, असे मौलाना आझाद म्हणतात. त्यांनी आयुष्यभर हिंदू मुस्लीम ऐक्यावर भर दिला. लोकशाही, धर्मनिरपेक्षता व व्यापक उदारमतवादी राष्ट्रवादाचे ते पुरस्कर्ते होते. भारत-पाकिस्तान फाळणीला त्यांचा तीव्र विरोध होता. थोडक्यात मं. गांधी, पं. नेहरू व मौलाना आझाद यांनी धर्म जातींसारख्या मर्यादित आधारांना बाजूला करून, व्यापक राष्ट्रहिताचा उदात्त सकारात्मक विचार करून भारतीय राष्ट्रवादाला लोकसत्ताक, सहिष्णू व सर्वसमावेशक बनवण्याचा प्रयत्न केला. या सर्व व्यापक राष्ट्रवादाची आपणास माहिती होईल.

आतापर्यंत आपण भारतातील विविध प्रकारच्या राष्ट्रवादांची माहिती पाहिली. मध्य युरोपात तयार झालेला राष्ट्रवाद भारततही वापरला गेला. मूळात राष्ट्रवाद ही नैसर्गिक भावना असते. प्रत्येक देशात लोकांना त्यांच्या-त्यांच्या देशाबद्दल आदर प्रेम असतो. कारण ही देशभक्तीची भावना केवळ भौगोलिक स्वरूपाची नसते तर त्या भूमीत तेथील नागरिकांच्या वाडवडिलांचा इतिहास लपलेला असतो. त्या इतिहासाला हजारो वर्षांची गौरवशाली परंपरा असते. अशा इतिहासात त्या देशाची साचेबंद संस्कृती लपलेली असते व संस्कृती तयार करण्यात धर्म, जाती, सण समारंभ, उपासना, पौराणिक ऐतिहासिक प्रतिके, स्मृतीस्थळे श्रध्दा, अस्मिता, यांचा महत्त्वाचा वाटा असतो. त्यामुळे प्रत्येकाला आपल्या देशाचा अभिमान वाटतो. हे त्याचे नाते भावनिक व आंतरीक असते. त्या-त्या देशातील भाषा, साहित्य, कला, विज्ञान या साऱ्यांचा मानवी जीवनाच्या जडणघडणीत मोठा वाटा असतो. कुठे ना कुठे हे सारे समान ऋणानुबंध लोकांचे संघ घट्ट करण्यास कारणीभूत ठरतात. लोकांचे एकत्रीत संघ व संघटीत समाज ही त्या राष्ट्राची खरी ऊर्जा असते.

१९ व्या शतकात राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक राष्ट्रवादाची या देशात अधिक शिस्तबध्द सुरुवात झाली. भारतीय राष्ट्रवादाची बैठक पारंपरिक इतिहासात तयार झाली असली तरी तिला सूत्रबध्द करण्याचे काम लो. टिळकांनी केले. मात्र हा या काळातला एकमेव राष्ट्रवाद नव्हता. न्या. रानडे व दादाभाई नौरोजींमुळे आर्थिक राष्ट्रवाद मांडण्याचा प्रयत्न केला तर राष्ट्रीय काँग्रेसने राजकीय संघटन करून राजकीय राष्ट्रवाद पुढे नेण्याचा प्रयत्न केला. वरील सर्व राष्ट्रवाद भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत होते. मात्र विसाव्या शतकात हिंदू राष्ट्रवाद व मुस्लीम राष्ट्रवादाने अधिक आक्रमक, धार्मिक, संकुचित राष्ट्रवाद तयार केला. तरुणांना आकर्षित करणाऱ्या या राष्ट्रवादाने काही क्रांतिकारक तयार

केले. पण या भडक व हिंसक राष्ट्रवादाने भारतीय समाज दोन धर्मियात विभागला गेला. असा विभाजीत समाज स्वातंत्र्याला व विकासाला उपयोगाचा नसतो हे पहिल्यांदा म. गांधी, मौलाना आझाद व पं. नेहरूंच्या लक्षात आले व त्यांनी सर्वांना एकत्र बांधणारा, लोकसत्ताक, धर्मनिरपेक्ष, संयुक्त सहभागी व वैश्विक राष्ट्रवाद तयार करण्याचा प्रयत्न केला. हा राष्ट्रवाद आदर्शवादी, मानवतावादी, नैतिक होता. तसाच तो सर्व भारतीयांना एकत्र बांधणारा होता. या गांधीवादी राष्ट्रवादात हिंसा, आक्रमकता व कोणताही संकुचित विचार नव्हता तर तो सर्व भारतीयांना एकत्र बांधून रचनात्मक कार्यक्रमाबरोबर, भौतिक मानवी व वैचारिक विकासाला प्राधान्य देणारा होता. संपूर्ण जगाला राष्ट्र मानून सर्व मानवजातीचे कल्याण करण्याचा आंतरराष्ट्रवाद व विश्वबंधुत्वाचा मूलगामी विचार त्यामध्ये होता. म्हणूनच भारतीय राष्ट्रवाद सुरूवातीला स्वातंत्र्य व स्वराज्यासाठी तयार झाला. पुढे तो धर्मावर आधारीत बनून धर्मराष्ट्राच्या संकल्पना त्याने विकसीत केल्या पण त्याचवेळी म. गांधी, मौलाना आझाद व पं. नेहरू यांनी समन्वयाची भूमिका तयार करून राष्ट्रीय एकात्मतेतून भारतीय राष्ट्रवादाला व्यापक आशय व प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न केला. मध्य युरोपातील साचेबंद राष्ट्रवादापेक्षा भारतीय राष्ट्रवादाची विविध प्रारूपे होती. या सर्व राष्ट्रवादांनी आपापले राष्ट्रप्रेम भिन्न पध्दतीने व्यक्त केले तरी त्यांना स्वत:च्या मर्यादाही होत्या. या छोट्या संकुचित राष्ट्रवादाला व्यापक रूप देण्याचा प्रयत्न गांधीयुगात झाला. हा राष्ट्रवाद फारच आदर्शवादी असल्याने काही दिवस व उत्तर गांधीयुगात लोकशाही व सहभागी सयुक्त राष्ट्रवादाने लोकांना एकत्र बांधून स्थैर्य व विकासाचे कार्यक्रम दिले. सकारात्मक राजकारणाची व नैतिक मूल्यांची शिकवण दिली पण अलीकडच्या पंचवीस-तीस वर्षात हा सारा व्यापक राष्ट्रवादाचा प्रभाव पुन्हा कमी झाला व विघटनवादाला जोर आला. खलीस्तान, आझाद काश्मिर, यासारख्या मागण्यांमुळे राष्ट्रीयत्वापुढे काही प्रश्न तयार झाले. यात अस्थिर सरकारे व राजकीय पक्षांचे सत्तेसाठीचे धार्मिक, जातीय, प्रादेशिक राजकारणाचा आधार घेण्यास सुरूवात झाली. प्रादेशिक अस्मितेतून स्थानिक पक्ष, गट, सांप्रदायिक विचार गतिमान बनले व भारतीय राष्ट्रवाद पुन्हा संकुचित बनतो की काय, अशा शंका यायला लागल्या.

### २.२.३.१ महात्मा गांधींचे संमिश्र राष्ट्रवादाबाबतचे विचार

म. गांधींनी संपूर्ण आयुष्यभर भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी सत्य, अहिंसा, सत्याग्रह व नैतिक मार्गांचा वापर त्यांनी केला. त्यांचा स्वातंत्र्याचा व्यापक प्रयत्न हा राष्ट्रवादी, देशप्रेमाचा एक अविभाज्य भाग होता. त्यांची स्वातंत्र्य चळवळ ही साध्य साधनशुचिता, आत्मबळ या मूल्यांवर आधारीत होती त्यामुळे या चळवळीतील राष्ट्रवाद थोडासा दुर्लक्षिला गेला. भारतीय राजकारणाची सूत्रे १९२० मध्ये हातात आल्यानंतर म. गांधींनी सतत भारतीयांच्या संघटना व हिंदू मुस्लीम ऐक्याचे प्रयत्न केले. या संघटीत भारतीयांना त्यांनी सत्य, अहिंसा, सत्याग्रहाचे मार्ग सांगितले. रचनात्मक कार्यक्रम दिले व राष्ट्रीय काँग्रेसला खेड्यापाड्यापर्यंत, सामान्य लोकापर्यंत नेऊन स्वातंत्र्यासाठी प्रबोधन केले. हे सारे प्रयत्न राष्ट्रवादी स्वरूपाचे होते.

## १. म. गांधींचे राजकीय विचार व राष्ट्रवाद :

आधुनिक भारताची राजकीय बांधणी करताना म. गांधींनी कोणताही राजकीय सिध्दांत मांडला नाही. त्यांनी सत्याचे व राजकीय विचारांचे प्रयोग करून पाहिले. या राष्ट्रवादाबद्दल ते एके ठिकाणी म्हणतात, ''माझी देशभक्ती ही चिरंतन स्वातंत्र्याच्या व शांततेच्या माझ्या प्रवासातील एक टप्पा आहे. माझ्या मते, धर्माशिवाय राजकारण नाही कारण त्यामुळे आत्म्याचा नाश होतो. जे लोक धर्माचा राजकारणाशी संबंध नाही असे मानतात त्यांना धर्माचा अर्थच कळत नाही. राजकारणाचे आध्यात्मीकरण म्हणजे धर्म व अध्यात्मीकरण म्हणजे मानवी नैतिकता व आंतरीक शुध्दी होय.'' म. गांधींनी राष्ट्रवादातील विद्रोह, संताप, हिंसा, या प्रवृत्तींना बाजूला करून परस्पर सहयोग, समन्वय व कृतीशील संघटना यातून विकासाभिमुख मानवतावादी नैतिक पायावर उभा असणारा अस्सल राष्ट्रवाद तयार केला. राष्ट्रावर प्रेम म्हणजे त्या राष्ट्रातील सर्व लोकांवर प्रेम अशी राष्ट्रवादाची व्यवहार्य भूमिका त्यांनी मांडली. म्हणूनच त्यांचा स्वराज्याचा मार्गही विशुध्द व नैतिक होता. अर्थातच त्यांच्या राष्ट्रवादी प्रेरणा यासुध्दा आंतरीक, आध्यात्मिक, शुध्द तत्त्वांचा आविष्कार होता.

म. गांधी व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचारवंत होते, पण त्याचवेळी ते समूहवादी विचारवंतही होते. व्यक्तीतत्त्व व समाजतत्त्वात ते फरक करीत नाहीत. व्यक्तीत जशी नैसर्गिक हक्काची स्वत:साठीची भावना असते. तसेच व्यक्तीत नैसर्गिक समाजाप्रती कर्तव्याची एक भावना असते. या कर्तव्यभावनेत राष्ट्रप्रेमाचा समावेश होतो असे ते म्हणतात. म. गांधींच्या राजकीय विचाराचे व्यक्तीवादी व समूहवादी असे जसे दोन भाग आहेत. तसेच राष्ट्रवादी विचाराच्या संदर्भात एका बाजूला ते ब्रिटीश शासनाला विरोध करून स्वातंत्र्याची मागणी करतात तर दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्यानंतर स्वायत्त खेड्यांचा रामराज्य म्हणून पुरस्कार करताना 'राज्यच नको' अशी अराज्यवादी भूमिका मांडतात. मात्र अराज्यवाद व्यवहारात येण्यासाठी अद्याप लोकांची मानसिक तयारी नसल्याने ते लोकशाहीला पाठिंबा देतात. पाश्चात्य अराज्यवाद्यांप्रमाणे राज्य नष्ट करावे असे ते म्हणत नाहीत. याठिकाणी त्यांचा राष्ट्रवाद राष्ट्र या संभाव्य पाशवी, कठोर संस्थेऐवजी अधिक समाजशील बनतो. इंग्रजी जुलमी राजवटीला विरोध करताना ते दुसऱ्या बाजूला या राष्ट्रवादी जनआंदोलनाचा स्वायत्त खेडे, पंचायत राज्य, रचनात्मक कार्यक्रम व आदर्शवादी समाजरचनेसाठी वापर करतात.

## २. म. गांधींचे राष्ट्रवादी आणि आंतरराष्ट्रवादी विचार :

लो. टिळक, बॅ. सावरकर व बॅ. जीना ज्यापध्दतीने राष्ट्रवादी विचार मांडत होते. त्या अर्थाने महात्मा गांधी राष्ट्रवादी विचारवंत नव्हते. त्यांच्या विविध चळवळीत व विचारांमध्ये राष्ट्रवादी विचारांचे काही विस्कळीत भाग आपल्यास सापडतात. पण त्यातही तशी सूत्रबध्दता दिसत नाही. सत्याग्रह, सविनय कायदेभंग, बहिष्कार, स्वराज्य, उपोषणे, हिंदू मुस्लीम ऐक्य, काँग्रेसची अधिवेशन, अस्पृश्यता निवारण व छोडो भारतसारख्या लोकआंदोलनातून त्यांचा व्यापक, लोकसत्ताक राष्ट्रवाद आपल्याला अनुभवता येतो.

स्वराज्य स्वातंत्र्य व स्वदेशीच्या राष्ट्रीय आंदोलनात म. गांधी हे राष्ट्रवादी होते याची खात्री पटते. मात्र पाश्चात्य राष्ट्रवादाप्रमाणे प्रखर व आक्रमक राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. तसेच धार्मिक, प्रादेशिक व संकुचित अशा सर्व राष्ट्रवादांना त्यांचा विरोध होता. भारतीय लोकांनी राष्ट्रवादाच्या पलीके जाऊन आंतरराष्ट्रवादी बनावे, अशी त्यांची इच्छा होती. राष्ट्रवादी झाल्याशिवाय कोणत्याही जनसमुदायाला आंतरराष्ट्रवादी बनता येत नाही, याची त्यांना जाणीव होती. यासाठी सर्व जगातील लोक एकमताने संघटित झाले तरच आंतरराष्ट्रवादाची शक्यता आहे. याचाच अर्थ मूलत: गांधी.मानवतावादी असल्याने आंतरराष्ट्रवादी होते व आंतरराष्ट्रवाद शक्य होण्यासाठी ते संयमीत राष्ट्रवादी होते. सर्व मानवजातीवर प्रे व अन्यायाचा सविनय सत्याग्रही प्रतिकार यासाठी त्यांना राष्ट्रप्रेम महत्त्वाचे वाटत होते. राष्ट्रप्रेम तयार करण्यासाठी ते अस्पृश्यता निवारणाला महत्त्व देतात. स्पृश्य अस्पृश्य, हिंदू मुस्लीम यातील मतभेद व विषमता दूर झाली तरच संघटीत सहभागी संमिश्र राष्ट्रवाद तयार होईल असे म. गांधींना वाटत होते. लोकांना एकत्र बांधण्यास मूलौगामी शिक्षण, सूतकताई, पंचायत व्यवस्था, श्रमदान व विश्वस्तसारख्या समाजशील सहिष्णू संकल्पना महत्त्वाच्या आहेत असे त्यांचे मत होते.

म. गांधींचा ब्रिटिशांना विरोध नव्हता पण त्यांच्या साम्राज्यवादी भूमिकेला विरोध होता. या साम्राज्यवादाने या देशातील सभ्यता, संस्कृती व उत्तय मूल्यांची अतोनात हानी झाली असे ते म्हणतात. म्हणून या दडपशाहीविरुध्द लोकांना ते एकत्र बांधतात व त्यासाठी त्यांना राष्ट्रवादी प्रेरणा महत्त्वाच्या वाटतात. भारतात अनेक धर्मिय लोक राहतात म्हणून भारत हे मूळात राष्ट्रच नाही हा काहींचा युक्तीवाद त्यांना मान्य नव्हता. उलट परकीयांनासुध्दा आत्मसात करण्याची क्षमता फार प्राचीन काळापासून भारतीयांत असल्याने अनेक धर्मीय लोक येथे एकत्र आनंदाने राहतात असे म. गांधी म्हणतात. हा देश सर्व धर्मियांचा आहे असे म्हणताना त्यांनी हिंदू राष्ट्रवादाला म्हणजे हिंदूमहासभा व बॅ. सावरकरांना विरोध केला. भारतात राहण्याचा अधिकार केवळ हिंदूना नसून सर्व धर्मियांना आहे. असा व्यापक विचार गांधी मांडतात. स्वातंत्र्यानंतर भारतात कोणत्याही एका धर्माचे राज्य नसेल तर ते सर्वधर्मियांचे असेल असे ते म्हणतात. त्यांनी राजकारणात संप्रदाय, धर्म व जातीला खाजगी स्थान दिले. आदर्श लोकशाही राजकारणासाठी ते गुणवत्तेवर आधारीत लोकप्रतिनिधींना महत्त्व देतात. म. गांधी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादातून रामराज्याची स्थापना करू इच्छित होते.

म. गांधी हे हिंदू मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. यासाठी दोन्ही धर्मातील धर्मगुरूंच्या भ्रामक, सनातनी, अंधश्रध्दात्मक मार्गदर्शनापासून अनुयायांनी दूर राहावे, असे ते म्हणतात. अशा संकुचित खोट्या शिकवणुकीपासून दोन्ही समाज सावध राहिले तर भारतात खरा राष्ट्रवाद तयार होईल अशी त्यांना खात्री होती. यावेळी सर्व धर्मातील तत्त्वे समान असून सर्व धर्मांनी अहिंसा व प्रेमाला महत्त्व दिल्याचे ते सांगतात. समान ध्येयापर्यंत सर्वांनी जाण्यासाठी, सर्वांनी समान जन्म, समान, दु:ख, समान शिष्टाचार, समान सवयी, समान परवशता यांची जाणीव करून घ्यावी व त्या आधारावर राष्ट्रैक्याची उभारणी करावी. आपसातले मतभेद सामोपचाराने आपसात मिटावेत व कोणत्याही

परिस्थितीत त्यासाठी ब्रिटिशांचे सहकार्य घेऊ नये असे म. गांधी म्हणतात, कारण भारतीय ऐक्य व राष्ट्रवादात ब्रिटिश लोकच मुख्य अडथळा आहे असा चिंतनशील विचार ते मांडतात. हिंदू मुस्लीम ऐक्यात असणाऱ्या काही अडथळ्यांचा त्यांनी व्यावहारिक विचार केला होता. शिक्षण व पश्चिमी संस्कृतीमुळे हिंदू समाजाचे अधिक मानुषीकरण झाले, पण निरक्षरता, दारिद्र्य व धर्मांधता यामुळे मुस्लीम समाज फारसा पुढारला नाही असे ते म्हणतात. यासाठी हिंदू मुस्लीम नेत्यांनी पुढाकार घ्यावा असे ते सूचवतात. हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी म. गांधींनी अनेकवेळा उपोषणे केल्याचे सर्वश्रुत आहे. धार्मिक एकरूपता, समेट व सहअस्तित्वाच्या आधारावर त्यांनी भारतीय राष्ट्रवादाची बांधणी करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय राष्ट्रवादात प्रादेशिक घटकांचाही ते सखोल विचार करतात. भाषावार प्रांतरचनेमुळे भारतीय राष्ट्रवादात अडचणी येतील, असे त्यांना वाटत नाही. म. गांधींनी नेहमीच स्वायत्तता व फुटिरता यातील अंतर लक्षात घेतले. निरोगी स्वरूपाच्या प्रांतियतेबद्दल त्यांना कसलीच शंका वाटत नव्हती. मात्र ही प्रांतियता कधीही अलिप्ततावादी बनू नये असे ते म्हणतात. आपण सर्वजण एकाच देशाचे घटक आहोत. हे राष्ट्रीय भान ते प्रांतांना देतात. उपनद्यांमुळे जसा मुख्य नदीचा प्रवाह मोठा होतो तसे प्रांतांनी राष्ट्रीय प्रवाहाला अधिक शक्ती द्यावी, असे म. गांधी म्हणतात. असे न केल्यास भारत अनेक राष्ट्रात वाटला जाईल याचा इशारा ते संकुचित, धार्मिक राष्ट्रवाद्यांना देतात. म. गांधी हे भारतीय राष्ट्रवादाचे खंदे पुरस्कर्ते होते. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ अधिक प्रवाही करताना ती एकजिनसी करण्याचे काम त्यांनी केले. आपल्या राष्ट्राबद्दल प्रेम व निष्ठा बाळगताना इतर राष्ट्रांचा द्वेष न करता उत्तरोत्तर अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रवादी बना, असे मार्गदर्शन ते करतात.

### ३. महात्मा गांधींचे जातीय सलोख्याचे प्रयत्न :

महात्मा गांधींचे संपूर्ण जीवन हेच उदार राष्ट्रवाद व मानवतावादी राष्ट्रवादाने भारलेले होते. राष्ट्रप्रेम स्वदेशी, स्वातंत्र्य, सेवा व समग्र विकास तथा नैतिकता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा भाग होता. या वैशिष्ट्यांना बुद्धिप्रामाण्यता व उच्च मानसिक अध्यात्मवादाची सभ्य बैठक होती. म्हणूनच त्यांचा राष्ट्रवाद धर्म, जाती, भाषा व प्रदेशाच्या मर्यादित चौकटीमध्ये राष्ट्रप्रेम तयार करणारा नसून व्यापक स्वरूपात अखिल मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणारा होता. तो राष्ट्रांच्या सीमा ओलांडणारा असल्याने त्याला आंतरराष्ट्रीय राष्ट्रवादाचे मोठे भान होते.

महात्मा गांधींनी कधीच आक्रमक व संकुचित राष्ट्रवादाला मान्यता दिली नाही. त्यांची लोकशाही सहिष्णू विचारांवर श्रद्धा होती. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी आपला सकारात्मक विधायक राष्ट्रवाद वेळोवेळी स्पष्ट करताना ब्रिटिशांच्या लोकशाही गुणांचे ही कौतुक केले. ब्रिटिश सरकार साम्राज्यवादी असून ते भारतीय राष्ट्रवादी स्वातंत्र्यवर आघात करीत असले तरी ब्रिटिश लोक मात्र उदार व लोकसत्ताक असल्याचे ते म्हणत.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याला लोक लढ्याचे रूप देताना भारतीतल संमिश्र राष्ट्रवादाला एकत्र

बांधून जातीय सलोखा, सामंजस्य व परस्परातील प्रेम कायम टिकवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यासाठी त्यांना भिन्न धर्म, जाती, भाषा व प्रादेशिक राष्ट्रवादात समन्वय साधावा लागला. भारताचे स्वातंत्र्य हे कोणत्याही एका धर्माचे वा जातीचे नसून ते सर्व लोकांचे व सर्वांच्या कल्याणासाठी आहे. हे सूत्र त्यांनी आपल्या सत्यअहिंसेच्या सत्याग्रही लढ्यातून लोकांना पटवून दिले. राष्ट्रीय काँग्रेस ही सुद्धा सामान्य मानसांची काँग्रेस असून ती संसदीय लोकशाहीतून स्वतंत्र विकासशील भारत तयार करू शकते हे त्यांनी अनेक प्रसंगातून स्पष्ट केले. म्हणूनच त्यांच्या काळात विशेषत: १९३६ च्या फैजपूर काँग्रेस अधिवेशनानंतर काँग्रेसमध्ये सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी व खेड्यातील लोक आपल्या जातीपाती विसरून एकत्र आले. काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी शहरी उच्चभ्रू काँग्रेस खेड्यातील सामान्य लोकांचीही आहे हे दाखवताना जसे काँग्रेसला व्यापक रूप दिले तसे भारतीय राष्ट्रवादही अधिक खुला करून त्यातील जातीभेदांचे सर्वच अडथळे दूर केले. यामुळे १९४२ चे छोडो भारत आंदोलन हे संमिश्र राष्ट्रवादाचे संघटीत लोकसत्ताक आंदोलन बनले.

भारतात फार प्राचीन काळापासून विविध जातीधर्माचे लोक राहात असल्याने मुळात भारत हे राष्ट्रच नाही असे अनेकांचे मत महात्मा गांधींना मान्य नव्हते. भारतात ही विविधता असली तरी इथे सर्व लोक हजारो वर्षे आनंदाने एकत्र राहातात. एकमेकाला सहकार्य करतात व राष्ट्रीय मोठ्या संकटात एकत्र त्याविरोधात संघर्ष करतात. याचा अर्थ इथे मजबूत असा राष्ट्रवाद आहे.

किरकोळ धार्मिक, जातीय संगर्ष म्हणजे इथे राष्ट्रवादच नाही असे म्हणता येत नाही, असे त्यांचे मत होते. त्यांनी हिंदू राष्ट्रवाद या संकल्पनेला विरोध केला होता. उलट द्विराष्ट्रवादाला विरोध करून त्यांनी हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी व जातीय धार्मिक सलोख्यासाठी वेळोवेळी उपोषणे व सत्याग्रह केले. भारतीयांनी केवळ ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून स्वतंत्र होणे उपयोगाचे नसून जातीधर्माच्या व स्पृश्य अस्पृश्यतेच्या संकुचित कोषातून मुक्त होणेही गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. यासाठी त्यांनी हिंदू मुस्लीम ऐक्याबरोबर अस्पृश्यता निवारणासाठी मोठे काम केले. अस्पृश्यांना ते हरिजन म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराचे लोक असे म्हणत.

जातीय सलोखा प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी १९३२ मध्ये जातीय निवाडा विरोधात उपोषण केले. त्यातून डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात पुणे करार होऊन अस्पृश्य समाजात कायदेकौंसिलमध्ये जादा जागा मिळाल्या व त्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मागे पडली. भारतात होणाऱ्या हिंदू मुस्लीम संघर्षाच्या विरोधात त्यांनी एकवीस दिवसाचे उपोषण केले होते. त्यांचे हे जातीय व धार्मिक सलोख्याचे काम बघून महर्षी शिंदे त्यांना प्रेमाने 'ब्राम्हो' असे म्हणत. त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीत भगवतगीता, रामायण, महाभारत, बौद्ध साहित्य बायबल, जैन विचार या साऱ्यांचा प्रभाव होता. त्यातून ते धर्मनिरपेक्षता व जातनिरपेक्ष उदार मानवतावादाला महत्त्व देत होते.

महात्मा गांधींच्या जातीय सलोख्याच्या संदर्भातील एक महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांची ग्रामराज्याची म्हणजे विकेंद्रीत पंचायतराज्य व्यवस्थेची भूमिका. ग्रामीण भागात जातीय मतभेद असले तरी त्यात टोकाचे ताणतणाव नसतात असे त्यांचे मत होते. पंचायतराज्याच्या निमित्ताने खेड्यांकडे

राज्यकारभाराची तिथली स्थानिक सूत्रे दिली तर खेड्यांच्या विकासाबरोबर लोकांमध्ये प्रेमाची व सलोख्याची भावना तयार होईल असे त्यांना वाटत होते. संसदीय लोकशाहीवर त्यांचा विश्वास होता तरी त्यांनी या शासन प्रकारास अंतिम मानले नव्हते. महात्मा गांधींना शासनविरहीत राज्य संकल्पना म्हणजे अराज्यवाद मान्य होता. अशा अराज्यवादात ते स्वयंशासन करणाऱ्या जबाबदार आदर्श नागरिकांना व्यापक स्वातंत्र्य देण्याच्या बाजुचे होते. जातीय सलोखा व लोकालोकातील सामंजस्य, सहकार्य यातून अराज्यवादी समाजरचना तयार होईल असा त्यांना विश्वास वाटत होता. यासाठी ते पंचायत राज्य व्यवस्था, संसदीय लोकशाही शासन याकडे एक प्रशिक्षण संस्था तथा साधन म्हणून पहात होते. महात्मा गांधींनी जातीय सलोख्यातून लोकलढे उभारताना लोकांमध्ये उदार राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, नैतिकता, सेवा व विकासाचे विचार पेरले. महात्मा गांधींच्या नंतर हा उदार राष्ट्रवाद व एकसंघ समाजनिर्मितीचे काम त्यांच्या अनेक अनुयायांनी केले.

महात्मा गांधींच्या सर्वोदयी विचारातही राष्ट्रवाद व परस्पर विश्वास आणि सलोख्याचे मानवी सूत्र आहे. महात्मा गांधींच्या अगोदर संपूर्ण भारतीय समाजाने संघटन करण्याचे अनेक प्रयत्न झाले. यात हिंदू मुस्लीम ऐक्य, अल्पसंख्य धर्म व जातींना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे प्रयत्न झाले. विशेषत: अस्पृश्यता निवारण करून राष्ट्राला अधिक मजबूत करण्याचे प्रयत्न ब्रालो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांनी केले. या सामाजिक संघटना आणि समाजधुनिणांना ही विषमता दूर करून जातीय सलोखा तयार करण्यात काही प्रमाणात यशही आले. मात्र महात्मा गांधींनी सत्य अहिंसा व सत्याग्रहाच्या माध्यमातून सर्व भारतीयांचा जो व्यापक लोकलढा उभारला, तो एका बाजूला राष्ट्रवाद स्पष्ट करणारा होता तर त्याच्या मुळाशी जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मता होती. भारतीय स्वातंत्र्यासाठी राष्ट्रप्रेम जेवढे महत्त्वाचे होते तेवढेच लोकसंघटन महत्त्वाचे होते व यासाठी महात्मा गांधीजींचे नेतृत्व आणि त्यांनी वापरलेले नैतिक मार्ग महत्त्वाचे होते. भारतीय संमिश्र राष्ट्रवादाला एकसंघ बनवण्याचे काम महात्मा गांधींनी केले.

या त्यांच्या नैतिक प्रयोगाचा एक भाग म्हणजे सर्वोदय होय. महात्मा गांधींच्या अगोदर 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण' या आशयाची मांडणी पाश्चात्य देशात झाली. राष्ट्रीय प्रवाहात सर्वांचे कल्याण व्हावे व शेवटचा उपेक्षीत माणूसही सक्षम बनावा यासाठी महात्मा गांधींनी सर्वोदयाचा विचार मांडला. हा विचार एकाबाजुला कल्याणकारी होता तर दुसऱ्या बाजुला सर्वोदयात अराज्यवाद व्यापक व्यक्तिस्वातंत्र्य, रामराज्य व रचनात्मक कार्यक्रमांनी भारलेली पंचायत राज्य व्यवस्था होती. महात्मा गांधींनी मांडलेल्या सर्वोदयात विकासाबरोबर विश्वास हा मानवी मूल्याला महत्त्व होते. हा तसा अस्सल गांधीवादी समाजवादाचा प्रयोग होता. समाजवाद हा अर्थिक समतेबरोबर भारताच्या संदर्भात जातीय समता व सलोखा तयार करणारा आदर्शवादी विचार आहे हे महात्मा गांधींनी सर्वोदयातून दाखवून दिले. यासाठी कार्ल मार्क्सने ज्या भांडवलदार व उच्चभ्रू लोकांना समाजाचे शत्रू मानले होते. त्याच भांडवलदार व उच्चभ्रूंना महात्मा गांधींनी विश्वस्त मानले. त्या काळात प्रस्थापित जातीचे लोकच जमिनदार व भांडवलदार होते. याचा अर्थ उच्च जातींच्या हाती भारतीय अर्थव्यवस्था स्थिर होती तर मागास जातीजमाती या केवळ श्रमावर आपले जीवन दारिद्र्यात जगत होते. भारतीय भांडवलदार

म्हणजेच उच्चजाती व प्रस्थापित लोकांवर महात्मा गांधींनी विश्वास टाकून त्यांना आपला पैसा व जादा संपत्ती स्वातंत्र्य व गरीब लोकांच्या कल्याणासाठी वापरण्यास सांगितले. हा जातीय सलोख्याचा खूपच आगळा वेगळा प्रयोग होता. अर्थिक विषमता दूर झाली की जातीय सलोख्याचे व लोकसंघटनेचे मार्ग खुले होतात हे त्यांनी ओळखले असले तरी ही विषमता दूर करण्यास त्यांनी अध्यात्मवादी विश्वासाचा मार्ग वापरला म्हणून त्यांचा हा अर्थिक समतेचा प्रयोग पूर्णत: परस्पर सहकार्यावर जसा आधारीत होता तसाच तो दुसऱ्या बाजुला राष्ट्रप्रेम, गरीब लोकांसाठी प्रस्थापितांना त्याग करावयास लावणारा होता. यातून त्यांनी भांडवल व पैशाचे महत्त्व मान्य करताना श्रमाला म्हणजे सामान्य मानसालाही प्रतिष्ठा मिळवून दिली.

महात्मा गांधींच्या प्रत्येक राजकीय, सामाजिक चळवळीत राष्ट्रवाद तर होताच पण दुसऱ्या बाजुला त्यात व्यक्तीकेंद्री विकासाचा व्यक्तीवादी तरी संघटीत समूहवादी नैतिक विचारही होता. स्वायत्त खेडे, पंचायत व्यवस्था, ग्रामोद्योग शारिरीक श्रम, किमान गरजा, स्वदेशी शिक्षण, हिंदी राष्ट्रभाषा, द्विराष्ट्रवादाला विरोध, हिंदू मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, सत्याग्रह, अहिंसा आणि सविनय लोकक्रांतीच्या मुळाशी राष्ट्रप्रमे व जातीय सलोखा होता. महात्मा गांधींना राष्ट्राबरोबर सर्व समाजाचा समतोल विकास अभिप्रेत होता.

### २.२.३.२ पंडित नेहरूंचा संमिश्र राष्ट्रवाद

पं. नेहरू हे आधुनिक भारताचेच नव्हे तर व्यापक व सर्वसमावेशक राष्ट्रवादाचे शिल्पकार होते. युरोपातील उदारमतवादी, स्वातंत्र्यवादी, समाजवादी व लोकशाही वातावरणात त्यांची जडणघडण झाली. त्यांच्यावर म. गांधी व मोतीलाल नेहरूंचा मोठा प्रभाव होता. त्यांचे 'आनंद भवन' हे हिंदू-मुस्लिम व ब्रिटिश संस्कृतीचे केंद्र होते. विद्यार्थी दशेत १९०४ मध्ये रशिया-जपान युध्दात छोट्या जपानने रशियाचा पराभव केल्याने भारत ही बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याचा पराभव करू शकेल ही राष्ट्रवादी प्रखर भावना त्यांच्या मनात तयार झाली व जपानच्या संदर्भातील सर्व साहित्य त्यांनी वाचून काढले. यासंदर्भात ते म्हणतात, ''राष्ट्राभिमानाच्या विचारांनी माझे अंत:करण भरून आले. हिंदुस्थानसह आशिया खंडातील इतर गुलाम राष्ट्रे युरोपच्या दास्यश्रृंखलेतून कसे मुक्त होतील. या विचाराचे चक्र डोक्यात फिरू लागले. वीरोचीत कामे मी करीत आहे. हातात तलवार घेऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी मी लढत आहे, अशी स्वप्ने मला पडू लागली.'' पं. नेहरूंवर राष्ट्रवादाचे संस्कार तरुणवयातच झाले. पुढे १९०५ मध्ये इंग्लंडमध्ये शिकताना गॅरिबाल्डीच्या राष्ट्रवादाने ते भारावून गेले. १९१२ मध्ये भारतात आल्यानंतर पं. नेहरू, अॅनी बेझंट व लो. टिळक यांच्या राष्ट्रवादी होमरूल चळवळीने प्रभावीत झाले व काँग्रेस चळवळीत सामील झभाले. १९२७ मध्ये ब्रुसेल्स येथे भरलेल्या जित राष्ट्रांच्या परिषदेला पं. नेहरू उपस्थित राहिले. स्वातंत्र्याचे युध्द हे सर्वांनी मिळून साम्राज्यशाहीबरोबर खेळायचे असते. त्यासाठी एका बैठकीवर जमून विचार करणे महत्त्वाचे असते, याची जाणीव जित राष्ट्रांमध्ये झाल्याचे नेहरूंच्या लक्षात आले त्यामुळे पं. नेहरू

म्हणतात, ''माझी दृष्टी यामुळे फाकून राष्ट्रवाद हा अपुरा व संकुचित आहे हे मला वाटू लागले.'' पं. नेहरूंमध्ये राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवादाचे विचार होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने केवळ स्वातंत्र्यासाठी काम न करता समाजप्रबोधन व लोकसंघटन करावे असे त्यांना वाटू लागले. १९२९ च्या लाहोर काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले, ''सामाजिक परिवर्तने आंतरराष्ट्रीयत्व या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत व त्यासाठी राष्ट्रीय लढ्यात मजूरांना सामील करून घेतले पाहिजे. असे केले तर राष्ट्रवादी काँग्रेस लढ्याला बळकटी येईल.'' पं. नेहरूंच्या या भाषणात एका बाजूला राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद होता, पण त्याचबरोबर परिवर्तनासाठी समाजवादी विचारही डोकावत होता. कारण या काळात रशियन साम्यवादी क्रांतीने सर्व जगात श्रमिक मजूर शेतकऱ्यांच्या राष्ट्रवादाला महत्त्व आले होते. १९३० च्या काळात तुरुंगात असताना त्यांनी मार्क्स व लेनिनचे वाचन केले. भारतात ब्रिटिश लोक भांडवलदार व राज्यकर्ते असल्याने भारतीयांचे शोषण करतात हे त्यांच्या लक्षात आले यासाठी लोकसंघटन व क्रांतीचा विचार त्यांना अस्वस्थ करू लागला. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ग्रंथाच्या लेखनाच्यावेळी भारतीय विविधता, लोकांचे प्रश्न व त्यांचे राष्ट्रप्रेम त्यांनी जवळून पाहिले. ९४० मध्ये बॅ. जीनांनी द्विराष्ट्रवादाचा विचार मांडला अर्थातच पं. नेहरूंना तो मान्य नव्हता. १९४९ च्या 'चलेजाव' या राष्ट्रवादी चळवळीत त्यांनी पुढाकार घेतला. सुरुवातीपासून काँग्रेस व म. गांधी यांच्या सानिध्यात राहूनही पं. नेहरूंनी स्वत:चे वेगळेपण जपले. त्यांच्या एकंदर नेतृत्वात व विशेषत: परदेशविषयक धोरणात ते दिसते. या सर्व ठिकाणी भारताची प्रतिष्ठा व लोकशाही तथा राष्ट्रवाद जोपासण्याचे त्यांनी काम केले.

जनइच्छा हीच सार्वभौम, सर्वशक्तीमान अशी अधिसत्ता असते. ही जनइच्छा एकमेव व एकात्म असावी लागते. राष्ट्रवाद हा त्या राष्ट्राच्या जिवंतपणाचे लक्षण असते असे पं. नेहरू मानतात. ते म्हणतात, ''कोणतेही जिवंत राष्ट्र विजेत्या राज्यकर्त्याच्या सत्तेखाली शांतातपूर्वक राहू शकत नाही कारण अशी शांतता म्हणजे शरणागती आणि शरणागती म्हणजे राष्ट्राच्या मौलिक तत्त्वांचा मृत्यू होय.'' पं. नेहरूंच्या या विचारात ब्रिटिश राजवट व त्यांनी केलेल्या शोषणाबद्दलचा संताप होता तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय चैतन्य तेवत ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोकांच्या राष्ट्रवादाचे महत्त्व होते.

तरी या समकाळात मातृभूमीसाठी बलीदान करणाऱ्या थोर राष्ट्रभक्त व क्रांतिकारकांबद्दल पं. नेहरूंना अतीव आदर होता. पण अशा प्रयत्नातून स्वातंत्र्याचे ध्येय पूर्ण होणार नाही अशी त्यांना शंका होती. ब्रिटिश साम्राज्य खूपच सामर्थ्यशाली असल्याने वैयक्तिक राष्ट्रवादापेक्षा सामूहिक व संघटित राष्ट्रवाद त्यांना महत्त्वाचा वाटत होता. राष्ट्रवाद ही सुरूवातीला राष्ट्रीय प्रक्रिया वाटत असली तरी ती वैश्विक व संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी असते असे ते म्हणतात. भारतीय स्वातंत्र्य हे मानवी स्वातंत्र्याचेच अंग असल्याने भारतीय राष्ट्रवादालाही अखिल मानवजातीचे संदर्भ असल्याचे ते लक्षात आणून देतात. त्यांच्या मते, दारिद्र्य, शोषण, अन्याय हे केवळ भारताचे प्रश्न नसून जगाचेही तेच प्रश्न आहेत म्हणून भारतीय राष्ट्रवादाचा विकास करावा असे ते म्हणतात.

उदारमतवादी राष्ट्रवाद व वंशश्रेष्ठत्वाधिष्ठित आक्रमक राष्ट्रवाद यातून पंडित नेहरूंनी उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रवादाचा स्वीकार केला. भारतीय राष्ट्रवाद हे निखळ राष्ट्रप्रेम असून त्यात द्वेष, हिंसा वा वर्चस्ववाद नाही असे ते म्हणतात. या संदर्भात पं. नेहरू आपल्या आत्मचरित्रात असे लिहितात, ''राष्ट्रवाद ही वस्तुतः विरोधी भावना आहे. इतर राष्ट्रीय गटाविरुध्द व विशेषतः स्वराष्ट्रावर सत्ता गाजविणाऱ्या परकीय सरकारविरुध्द जी संतापाची व द्वेषाची भावना जागृत होते. तिच्या खतपाण्यावर राष्ट्रवाद पोसला जातो. १९२१ साली हिंदुस्थानात ब्रिटिशांच्याविरुध्द अशा प्रकारचा द्वेष नव्हता असे नाही. पण अशा परिस्थितीत वागणाऱ्या इतर देशांपेक्षा येथे तो अल्प प्रमाणात होता.'' याचे कारण सांगताना पं. नेहरू म्हणतात. म. गांधींच्या समन्वयवादी मवाळ विचारांमुळे या काळात ब्रिटिशांविरुध्द लोकांचा द्वेष सौम्य होता. ते पुढे म्हणतात की, पुढे जसे ब्रिटिशांनी शोषण वाढवले तसे राष्ट्रप्रेम वाढत गेले तरी या काळात भारतात जर्मनी, इटालीसारखा आक्रमक राष्ट्रवाद कधीच तयार झाला नाही. आधुनिक राष्ट्रात अस्तित्वाची जी नैसर्गिक भावना तयार होते त्याला पं. नेहरू राष्ट्रवाद म्हणतात. अशी भावना लोकांची सहज स्वाभाविक भावना असते. ती कधी नष्ट होत नाही. या भावनांना मोठ्या ऐतिहासिक परंपरा व स्वार्थत्यागाची तेजस्वी किनार असते. म्हणून राष्ट्रवादाला ती टिकावू लोकभावना म्हणतात.

राष्ट्रवाद ही केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित मानवी भावना नसून ती स्वातंत्र्यानंतरही प्रभावी ठरते, कारण राष्ट्रवादच केवळ रचनात्मक कार्यक्रम व विकास प्रक्रिया व्यवहारात आणू शकतो असे पं. नेहरू म्हणतात. राष्ट्रवाद ही केवळ भावनिक संकल्पना नाही असे ते म्हणतात. त्यांच्या मते, राष्ट्रवादाला बौध्दिक कर्तृत्वाचे संदर्भ असतात. कारण लोक आपल्या इतिहास परंपरा, भाषा, प्रदेश, साहित्य, कला, संस्कृती व गौरवशाली प्रतिकांकडे अंधश्रध्देने व केवळ भावनिकदृष्टीने पहात नाहीत तर लोक या साऱ्या व्यापक पराक्रमाकडे बुध्दिप्रामाण्यवादी नजरेने पहात असतात. इतिहास व उदात्त परंपरा, श्रध्दा व अस्मितांचा लोक सखोल अभ्यास करून मगच त्याचा स्वीकार करतात. म्हणून राष्ट्रवाद ही उथळ प्रक्रिया नसून ती विवेकी व बौध्दिक संकल्पना आहे, असे पं. नेहरू म्हणतात.

भारतीय इतिहासातील गौरवशाली, उदात्त व आदर्श तत्वांना ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक हीन ठरवण्याचा प्रयत्न केला. किंबहुना या देशाचा खरा राष्ट्रवादी चैतन्यदायी इतिहास व सहिष्णू संस्कृती ब्रिटिशांनी शालेय अभ्यासक्रमातून गायब करून युरोपचा इतिहास पुढे आणला. भारतीय वैभवशाली परंपरा शोधून अस्सल भारतीय इतिहास लोकांसमोर मांडण्याचा पं. नेहरूंचा प्रयत्न भारतीय राष्ट्रवाद तयार करणारा होता. यात त्यांनी राष्ट्रप्रेम तयार करणाऱ्या अनेक प्राचीन, ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या यात सिंधू खोऱ्यातील मोंहजोदारो, वेरूळ अजंठा, दिल्ली व आग्रा येतील किल्ले व ऐतिहासिक वास्तू, सारनाथ, अशोक स्तंभ, फत्तेहरपूर शिक्री, नदी, नाले, डोंगर इत्यादी. यावेळी भारतीय विविधतेत सांस्कृतिक ऐक्य असल्याचे पं. नेहरूंच्या लक्षात आले. ब्रिटिशांचे एकशे ऐंशी वर्षाचे तसे छोटे पर्व भारताचा हजारो वर्षाचा खरा इतिहास दडपून टाकू शकणार नाही. अशी पं. नेहरूंना खात्री होती. खऱ्या राष्ट्रवादासाठी भारतीयांनी आपल्या भूतकाळाबद्दल अंधश्रध्द असू नये. पण

त्याचवेळी लोकांनी आपल्या गौरबी इतिहासाचे विस्मरणही करू नये, असे ते म्हणतात. पितृभूमीवर आधारीत राष्ट्रवाद पं. नेहरूंना महत्त्वाचा वाटतो, कारण तो आंतरराष्ट्रवाद तयार करू शकतो, असे ते म्हणतात. त्यांनी सर्व प्रकारच्या संकुचित राष्ट्रवादांना व खोट्या अभिमानावर उभ्या असणाऱ्या राष्ट्रवादांना विरोध केला. पं. नेहरू या देशाच्या सांस्कृतिक विविधतेमधील समान सूत्रावर राष्ट्रवादासाठी भर देतात. त्यांची भूतकाळावरील राष्ट्रवादावर श्रध्दा होती पण खरा विश्वास मात्र वर्तमानकाळातील राष्ट्रवादावर होता. पं. नेहरू हे नव्या आधुनिकतेचे पुरस्कर्ते होते. भूतकाळाच्या प्रेरणा महत्त्वाच्या असतात, पण त्यात सारखे अडकून पडणे त्यांना मान्य नव्हते. राष्ट्रवादाच्या वास्तविक स्वरूपाचा स्वीकार करण्याला ते विवेकवादी दृष्टीकोन म्हणत. वेदकाळाकडे चला किंवा इस्लामी धर्मराज्याकडे परत फिरा, असे म्हणणारे धर्मपंडित भ्रमिष्ट आहेत, असे पं. नेहरू म्हणत. ब्रिटिश राज्यकर्ते स्वत:च्या स्वार्थासाठी एवढ्या मोठ्या भारत देशात धार्मिक जातीय फुटिरता तयार करीत आहेत याचे त्यांना दु:ख वाटत होते. पण समान गुलामगिरीने भारतात ऐक्य व राष्ट्रवादी प्रेरणा अधिक तीव्र झाल्याचे ते मान्य करतात. ब्रिटिश राजवटीत आपली विविधता व सामान्य मतभेद दूर करून भारतीय राष्ट्रवाद तयार झाल्याचे समाधान पं. नेहरूंना वाटत होते. बॅ. जीनांचा द्विराष्ट्रवाद व इतर संकुचित राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हते. राष्ट्रवाद सर्वसमावेशक, लोकसत्ताक अशा संमिश्र स्वरूपाचा असावा व तो बौध्दिक व भावनिक आधारावर मानवी समूहात खोल रुजलेला तथा विकासवादी असावा असे पं. नेहरू म्हणत, 'आम्ही जगातील सर्वश्रेष्ठ आहोत' असा व्यथा गर्विष्ट राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता.

पं. नेहरू जसे उदारमतवादी, सर्वसमावेशक, लोकसत्ताक, मानसिक व विवेकी राष्ट्रवादाचे समर्थक होते तसेच ते आंतरराष्ट्रवाद व विश्वबंधुत्वाचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रवादाला ते एक साधन मानत होते. राष्ट्रवादाच्या खंबीर पायावर त्यांना खरे तर आंतरराष्ट्रवाद तयार करावयाचा होता. भारत त्यांनी सैन्यबलाने सबल करावयाचा नव्हता तर भारत त्यांना विचार, संस्कृती, मानवता व उदार लोकशाही विकासाच्या अंगाने सबल व समक्ष करावयाचा होता. म्हणूनच राष्ट्रवादाचा ते आंतरराष्ट्रीयवादाशी समन्वय जोडू इच्छित होते. म. गांधींपेक्षा त्यांनी राष्ट्रवादाचा अधिक सखोल अभ्यास केला होता. मात्र आंतरराष्ट्रवादाची प्रेरणा त्यांनी म. गांधी, रविंद्रनाथ टागोर व स्वामी विवेकानंद यांच्या विचारातून घेतली होती.

## २. पंडित नेहरूंचे जातीय सलोख्याचे प्रयत्न

पंडित नेहरू हे प्रखर राष्ट्रवादी नेते होते. आयुष्यभर भारतीय स्वातंत्र्य, लोकशाही कल्याणकारी राज्य, समाजवाद, धर्मनिरपेक्षता व मानवतावादासाठी त्यांनी असंख्य यातना सोसल्या. आंदोलने केली व लोकलढ्याबरोबर वेळोवेळी आपले विचार मांडले. भारतीय स्वातंत्र्य लढा, राष्ट्रीय काँग्रेस व महात्मा गांधींचा मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीत ते सहभागी झाले व पुढे १९२०-२१ मध्ये त्यांनी महात्मा गांधींच्या सत्याग्रही आंदोलनात भाग घेतला. १९२९ मध्ये लाहोर काँग्रेसच्या अध्यक्ष पदावरून त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची जी घोषणा केली त्यात भारतीय राष्ट्रवादाबरोबर भारतीय स्वातंत्र्य हे सर्वजातीजमाती व धर्मातील लोकांचे असेल ही जातीय सलोख्याची भावनाही होती.

पंडित नेहरूंनी संपूर्ण भारतभ्रमण केल्यानंतर भारतातील विविधता व विषमता त्यांच्या लक्षात आली होती. त्यांना भारतातील संमिश्र राष्ट्रभावनेचा व संस्कृतीचा आदर वाटत होता. मात्र या बहुसंस्कृतीमधून सकुचित राष्ट्रवाद तयार होणार काय ? याची त्यांना काळजी वाटत होती. यासाठी लोकशाहीबरोबर समाजवादामध्ये सामाजिक विषमता दूर करून जातीय सलोखा दूर करताना भारतीय स्वातंत्र्यलढा अधिक सर्वस्पर्शी करता येईल का ? याचा ते सतत विचार करीत होते. म्हणूनच बॅ. जीनांच्या द्विराष्ट्रवादाला त्यांनी विरोध केला तसा हिंदू राष्ट्रवादही त्यांना मान्य नव्हता. पंडित नेहरूंच्या समाजवादी, लोकसत्ताक आणि धर्मनिरपेक्ष विचारात उदार राष्ट्रवादाबरोबर जातीय सलोख्याची बीजे लपलेली होती.

पंडित नेहरूंनी राष्ट्रवादाबरोबर जातीय सलोखा व सामंजस्य तयार करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले. यातील काही प्रयोगाचा आपण आढावा घेऊ. गॅरिवाली व लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादी प्रेरणा घेऊन महात्मा गांधीच्या सत्याग्रही चळवळीत काम करणाऱ्या पंडित नेहरूंचे व्यक्तिमत्वही काहीसे संमिश्र स्वरूपाचे होते तरी उदारमतवाद स्वातंत्र्य, लोकशाही राष्ट्रवाद व समाजवाद यांचा त्यांच्यावर अधिक प्रभाव होता. भारतात विविधता असली तरी मानसिकदृष्ट्या भारतीय लोक राष्ट्रवादी असून त्यांच्यातील जातीय, धार्मिक मतभेद सामान्य स्वरूपाचे आहेत याची त्यांना माहिती होती. राष्ट्रीय अवघड प्रश्नांच्या वेळी या देशातील सर्वजण एकत्र येऊन आपले राष्ट्रप्रेम व जातीय सलोखा दाखवून देतात हे त्यांना राष्ट्रीय कॉंग्रेसच्या व महात्मा गांधींच्या वाटचालीत अनुभवले होते. भारतात असणारी ही विविधतेतील राष्ट्रवादी एकता त्यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात अधोरेखित करून स्पष्ट केली आहे.

**पंडित नेहरूंच्या राष्ट्रवादातील जातीय सलोखा :**

पंडित नेहरू प्रथम राष्ट्रवादी व नंतर आंतरराष्ट्रवादी होते. भारतात केवळ स्वातंत्र्य मिळून चालणार नाही तर या देशात संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून सर्वांचा समतोल विकास करायचा असेल तर लोकशाहीच्या जोडीला समाजवाद, उदारमतवाद, राष्ट्रवाद आणि मानवतावादाच धर्मनिरपेक्ष ऐक्याचे प्रयोग करणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. विकासाच्या या मार्गात संकुचित राष्ट्रवाद धोकादायक आहेत असे ते म्हणत म्हणूनच त्यांनी मुस्लीम राष्ट्रवाद, हिंदू राष्ट्रवाद व सर्वच धार्मिक प्रादेशिक आक्रमक हिंसक राष्ट्रवादांना विरोध केला होता. राष्ट्रवाद हा सर्वसमावेशक व सर्वांना बरोबर घेऊन लोकशाही मार्गाने पुढे जाणारा असावा असे त्यांचे मत होते. त्यांच्या या विचारात समन्वयाचे व राष्ट्रबांधणीचे विचार अभिप्रेत होते.

पंडित नेहरूंनी भारतातील विभिन्न राष्ट्रवादी भावनांचा आदर केला होता मात्र या स्थानिक राष्ट्रवादाचा विकास करताना तो भारतीय एकसंघ राष्ट्रवादात व भारतीय राष्ट्रवाद अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रवादी बनाना ही त्यांची भावना सलोखा, मित्रत्व, विश्वबंधुत्व, सहकार्य व विकासाकडे जाणारी होती. त्यांनी वेळोवेळी भारतीय राष्ट्रवाद व परस्पर सहाचर्याचे महत्त्व सांगितले होते. हा राष्ट्रवाद मजबूत बनण्यासाठी राष्ट्रवादाला धर्मनिरपेक्षवादी विचार व कायद्याची आवश्यकता

त्यांनी मांडली होती. तसेच या राष्ट्रवादासाठी भारतीय इतिहासातून प्रेरणा घ्याव्यात असे ते म्हणत. पंडित नेहरूंचा राष्ट्रवाद साम्राज्यवादाच्या विरोधातून तयार झाल्याने त्याला एका बाजुला आर्थिक तर दुसऱ्याबाजुला लोकलढ्यातील बहुजनांच्या एकीची पार्श्वभूमी होती.

भारतात जातीय सलोखा तयार करण्यासाठी पंडित नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्थेचा प्रयोग केला. फेबियन समाजवाद व गांधीवादी समाजवादातून प्रेरणा घेऊन तयार झालेला हा पंडित नेहरूंचा समाजवादी संमिश्र अर्थव्यवस्थेचा प्रयोग राष्ट्रीय उद्योगव्यवसायाबरोबर छोट्या ग्रामीण व्यवसाय व शेतीला चालना देणारा होता. याच विकास व सलोख्याची एक बाजू म्हणजे त्यांनी तयार केलेली पंचवार्षिक योजना. नियोजबद्ध अर्थव्यवस्थेमुळे समाजातील सर्व घटकांचा विकास होऊन राष्ट्रीय प्रकल्पाबरोबर खाजगी उद्योग आणि शहराबरोबर खेड्यातील शेतीचा विकास होईल असे त्यांना वाटत होते. या त्यांच्या व्यापक समाजवादाच्या मुळाशी जातीय सलोखा होता हे आपल्या लक्षात येते. १९२९ च्या लाहोर कॉंग्रेस अधिवेशनात अध्यक्ष पदावरून बोलताना ते म्हणाले होते की, आर्थिक विषमता, वर्गिय समाजरचना व दारिद्र्य नष्ट झाल्याशिवाय एकसंघ राष्ट्रवाद व राष्ट्रीय समतोल विकास होणार नाही. त्यांच्या मते दारिद्र्य व जातिभेद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून लोकशाही समाजवादातूनदारिद्र मिटवले तर जातीय सलोखा तयार होईल. जो लोकशाही राष्ट्रवादाला प्रेरक ठरेल. ते व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते.

पंडित नेहरूंनी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करताना अतिरेकी धर्मांना राजकारणापासु दूर ठेवावे असे म्हटले होते. विकृत धर्म संकुचित राष्ट्रवादासाठी जाती तयार करतात व समाजाचे विभाजन करून देशाला दुर्बल करतात असे ते म्हणत. धर्मनिरपेक्षतेबरोबर त्यांनी महात्मा गांधीचे धर्मासाठीचे नैतिक अधिष्ठान व मानवतावादाचा जातीय सलोख्यासाठी स्वीकार केला होता. साधारणत: १९१६ ते १९६४ हा पंडित नेहरूंच्या सक्रिय राजकीय सहभाग व नेतृत्वाचा कालखंड. या कालखंडात भारतात वेळोवेळी जातीय व धार्मिक तणाव तयार झाले. या तणावातून मार्ग काढताना त्यांनी महात्मा गांधींच्या राष्ट्रीय आंदोलनांना व सत्याग्रहांना पाठिंबा दिला. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व समतेच्या कार्याबद्दल त्यांना आदर होता म्हणूनच जातीय सलोख्याच्या कामात त्यांनी वेळोवेळी डॉ. आंबेडकरांना सहकार्य केले होते. याचाच एक भाग म्हणजे भारतीय घटना समितीच्या लेखनकार्याची जबाबदारी ही डॉ. आंबेडकरांना देण्यात त्यांचा पुढाकार होता. तसेच त्यांच्या पहिल्या मंत्रीमंडळात पंडित नेहरूंनी डॉ. आंबेडकरांना कायदा मंत्रीपद दिले होते. पंडित नेहरूंचे हे कार्य जातीय सलोख्याला पृष्ठी देणारे होते.

### २.२.३.३ मौलाना अबुल कलाम आझाद यांचा संमिश्र राष्ट्रवाद

सुरुवातीला मौलाना आझाद मुस्लीम राष्ट्रवादाचे कट्टर समर्थक होते. १९०६ ते १९२० या काळात त्यांनी धार्मिक राष्ट्रवादाचे समर्थक म्हणून काम केले. अलहिलाल व अलवलाग या साप्ताहिकातून त्यांनी धार्मिक राष्ट्रवादी विचार मांडले. मुस्लीम धर्म एवढा व्यापक आहे की, राजकीय धोरणे ठरवण्यासाठी त्यांनी हिंदूशी हातमिळवणी करण्याचे काहीच कारण नाही असे ते

म्हणत. असे मुस्लीम राष्ट्रवादी आझाद हे १९२० नंतर एकदमच बदलले. खिलाफत चळवळीत भाग घेऊन त्यांनी भारतीय राजकारणात हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी प्रयत्न केले त्यांनी म. गांधींबरोबर काम केले. मुस्लीम राष्ट्रवाद सोडून त्यांनी भारतीय राष्ट्रवादाचा स्वीकार केला. अखंड भारताचे स्वप्न बघताना द्विराष्ट्रवाद व पाकिस्ताननिर्मितीला त्यांनी शेवटपर्यंत विरोध केला. मौलाना आझाद हे भारतीय उदारमतवादी, व्यापक व लोकसत्ताक सहभागी राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते.

१९१२ मध्ये सुरू केलेल्या 'अल हिलाल' या साप्ताहिकातून जगभरातील मुस्लीमांचे राजकारण व ब्रिटिशांचे साम्राज्यवादी धोरण यावर त्यांनी सातत्याने लेखन केल्याने ब्रिटिश सरकारने त्यांना तुरुंगात टाकले. तुरुंगातून सुटल्यावर १८ जानेवारी १९२० रोजी म. गांधींशी त्यांची दिल्ली येथे हिंदु-मुस्लीम ऐक्य परिषदेत भेट झाली व ते गांधींच्या विचारांनी प्रभावीत झाले आणि त्यांच्या असहकार चळवळीत सामील झाले. १९२३ मध्ये आझार दिल्ली येथे होणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले यावेळी 'हिंदू मुस्लीम ऐक्य झाल्याशिवाय स्वातंत्र्य अशक्य असून या ऐक्याशिवाय जर स्वराज्य मिळणार असेल तर ते मी नाकारेन'' असे ते म्हणाले व मौलाना आझाद भारतीय राष्ट्रवादाचे एक खंदे पुरस्कते बनले. १९४० मध्ये ते पुन्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. यावेळी मुस्लीम लीगच्या अलगतावादी धोरणाला विरोध करून त्यांनी हिंदू मुस्लीम ऐक्यावर जोर देणारा संमिश्र राष्ट्रवाद मांडला.

भारताच्या फाळणीला व मुस्लीम लीगच्या द्विराष्ट्रवादाला त्यांचा विरोध होता. त्यांचे ऐक्याचे राष्ट्रवादी विचार ऐकून १९३६ नंतर म्हणजे फैजपूर अधिवेशनानंतर अनेक मुस्लीम नेते लीग सोडून राष्ट्रीय काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले. तरी बॅ. जीनांनी हट्टाने पाकिस्तानची निर्मिती केली. मौलाना आझाद यांनी 'इंडिया विन्स फ्रिडम' या ग्रंथात या फाळणीचे दु:ख व्यक्त केले आहे.

**मौलाना आझाद यांचे संमिश्र राष्ट्रवादी विचार :**

मौलाना आझाद यांनी धर्म व राजकारण या दोन गोष्टी भिन्न आहेत असे कधीच मानले नाही. त्यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात धार्मिक नेता म्हणजे आलम म्हणून झाली. त्यांच्यावर पॅन इस्लाममिझमचा प्रभाव होता. इमाम घराण्याचा वारसा, वडिलांचे कठोर धर्मविषयक विचार, यामुळे मुस्लीम धर्माचे खोल संस्कार त्यांच्यावर झाले. पुढे वहावी पंथीयांचा एकेश्वरवाद त्यांनी स्वीकारला. वहावी हे सुफी संप्रदायाचे उलेमा होते. त्यांनी मुस्लीम समाजात मूलभूत मूल्यांचे पुनरुज्जीवन केले. या काळात आझादांवर सर सैय्यद खान, सैय्यद रशिद राजा, शिबली नोमानी, जमालउद्दीन अफगाणी, कामिल, राशिद रिदा यांचा प्रभाव पडला. जमालउद्दिन अफगाणी यांची पॅन इस्लामिक चळवळ विश्वव्यापी होती. अशीच एखादी राष्ट्रव्यापी चळवळ भारतात तयार व्हावी, असे मौलाना आझादांना वाटत होते. सातत्याने त्यांच्या विचारात परिवर्तने होत गेली, त्यामुळे त्यांचा राष्ट्रवाद संकुचित राष्ट्रवादाकडून भारतीय बृहद राष्ट्रवादाकडे परावर्तीत झाला.

१९२० पर्यंत मौलाना आझाद यांचा राष्ट्रवाद स्वप्नाळू व अपरिपक्व स्वरूपाचा होता. याला काही विचारवंत संयोगी, संयुक्त व संमिश्र राष्ट्रवाद असे म्हणतात. १९२० नंतर मात्र तो

अधिक विवेकी, धर्मनिरपेक्ष व लोकशाही विचारांनी भारला गेला. १९२१ मध्ये त्यांनी आग्रा येथे खिलाफत चळवळीच्या अधिवेशनात हिंदू मुस्लीम ऐक्यावर भर दिला.

**मौलाना आझाद यांच्या राष्ट्रवादी विचाराचा पहिला कालखंड :**

१९०६ ते १९२० या कालखंडात भारतीय मुस्लीमावर सर सय्यद अहमद, कुतूबुद्दिन तय्यबजी, महंमद इकबाल, सरहद्द गांधी, बॅ. जीना व मौलाना आझाद यांचा प्रभाव होता. या काळात हे सर्व मुस्लीम समाजाचे नेते होते व ते सर्व मुस्लीम राष्ट्रवादी होते. १९०६ मध्ये स्थापन झालेल्या मुस्लीम लीगच्या पहिल्या अधिवेशनाला मौलाना आझाद हजर होते. सय्यद अहमद यांच्या बरेसवी चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव होता. पण पुढे अहमद हे ब्रिटिशांचे छुपे हस्तक आहेत हे आझादांच्या लक्षात आले. मुस्लीम समाजाला राष्ट्रांबद्दल प्रेम वाटू नये असे आझादांचे मत असल्याने त्यांनी अल हिलाल या त्यांच्या साप्ताहिकातून मुस्लीमांचे बरेच प्रबोधन केले. इस्लाम म्हणजे अंतीम सत्य व सत्य म्हणजे काय? हेच लोकांना कळत नाही असे त्यांना वाटत होते. ते स्वत: पॅन इस्लामिस्ट होते. जगाचा उध्दार केवळ इस्लाम करेल असे त्यांचे मत होते. त्यांचे धर्म व राजकारणाला एकत्र बांधण्याचे प्रयत्न या काळात काँग्रेसला मान्य नव्हते. पण इस्लामचा प्रचंड प्रभाव असणाऱ्या आझाद यांनी 'हिजबुल्लाह' म्हणजे परेमश्वराचा पक्ष स्थापन केला. मुस्लीमांनी परमेश्वराचे दास्यत्व स्वीकारले तर तो त्याला 'खलीफा' म्हणून नेमतो, असे ते म्हणत.

या काळात मुस्लीमांच्या स्वातंत्र्याबद्दल आझाद यांना अधिक चिंता वाटू लागली. हे स्वातंत्र्य शांततेच्या मार्गाने मिळवावे असे ते म्हणत, पण पुढे मात्र ते अचानक जिहाद बद्दल बोलू लागले. यावेळी मुस्लीम देशातील नेत्यांनी भारतातील मुस्लीम नेत्यांना हिंदूशी सहकार्य करण्याचा सल्ला दिला. कारण असे केल्याशिवाय ब्रिटिश राजवट नष्ट होणार नाही असे त्यांचे मत होते, त्यामुळे आझाद यांनी आपला इस्लामला केंद्रस्थानी मानणारा संकुचित राष्ट्रवाद सोडून देण्यास सुरूवात केली. यावर कट्टर मुस्लीमांनी टीका केली. १९२० नंतर प्रभावी होत असलेले गांधीचे सर्वसमावेशक राष्ट्रीय नेतृत्व, हिंदी उर्दू वाद, प्रशासन व शिक्षणातील मुस्लीमांचे नगण्य प्रमाण, हिंदू मुस्लीम संघर्ष या सर्वांचा परिणाम म्हणजे आझाद आपल्या राष्ट्रवादाचे परीक्षण करू लागले. आपला धार्मिक राष्ट्रवाद आक्रमक वाटत असला तरी भारताच्या एकंदर राष्ट्रीय प्रवाहात तो आपले हितसंबंध जोपासण्यात अपुरा आहे याची जाणीव त्यांना हळूहळू होऊ लागली. मुस्लीमांवर अन्याय करणाऱ्या ब्रिटिशांविरुध्द त्यांना जनमत तयार करायचे होते. जर संपूर्ण जग आपलेच राष्ट्र झाले व त्याचा सन्मान करावयाचा झाला तर प्रथम भारतीयांचा सन्मान झाला पाहिजे ही भावना त्यांना भारतीय बृहद राष्ट्रवादाकडे नेणारी होती.

**मौलाना आझाद यांच्या राष्ट्रवादी विचाराचा दुसरा कालखंड :**

म. गांधींचा प्रभाव, अरब व तुर्कस्थानातील धर्मनिरपेक्ष व प्रादेशिक आधारावरील राष्ट्रवाद यामुळे आझाद २७ ऑक्टोबर १९२१ रोजी आग्रा येथे झालेल्या खिलाफत चळवळीच्या अधिवेशनात

हिंदू मुस्लीम ऐक्याचे व भारतीय लोकसत्ताक राष्ट्रवादाचे समर्थक बनले. पहिल्या महायुध्दात इंग्लंडसह विजयी राष्ट्रांनी तुर्की साम्राज्य नष्ट करून खलीफा हे पद नष्ट केले. ही घटना जगभरातील मुस्लीमांप्रमाणे भारतीय मुस्लीमांनाही आवडली नाही. म्हणून ब्रिटिशांविरुध्द खिलाफत चळवळ सुरू झाली. या चळवळीला काँग्रेस व गांधींचा पाठिंबा होता. त्यामुळे भारतातील सर्व मुस्लीमांनी हिंदूबरोबर राष्ट्रीय प्रवाहात सामील होवून भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आझाद यांनी मुस्लीमांना केले. सिरियासारखे बहुधर्मी राष्ट्र जर तेथील स्वातंत्र्यासाठी एकत्र येऊ शकते, तर भारतात तसे का होत नाही? असा प्रश्न विचारून ते हिंदू मुस्लीमांना एकत्र बांधण्याचा प्रयत्न करू लागले.

१९२० नंतर मौलाना आझाद यांनी उदारमतवादी राष्ट्रवादाचा स्वीकार केला. व्यापक राष्ट्रवाद मुस्लीमांना घातक नाही हे त्यांच्या लक्षात आले. राष्ट्रवाद ही एक आंतरीक प्रागतिक शक्ती असते व ती भिन्न लोकांना एकत्र बांधून विधायक कामासाठी प्रबळ ऊर्जा तयार करते हे त्यांच्यालक्षात आले होते. भारतीय राष्ट्रवाद मुस्लीमविरोधी नाही शिवाय तो हिंदू मुस्लीम ऐक्याशिवाय तयार होत नाही ही वस्तुस्थिती त्यांनी तपासली होती. आझादांचे भारतीय राष्ट्रवादातील योगदानाचे महत्त्व सांगताना पं. नेहरू म्हणतात, ''आझादांचे व्यक्तिमत्त्व एवढे उत्तुंग होते की, त्यांनी भारतीय जीवनाच्या विविधतेच्या मागे असणारी अत्यावश्यक एकी पाहिली नाही तर तिच्यात संपूर्ण भारतीय जीवनाच्या धमन्यांतून वाहणाऱ्या विविध उदात्त प्रवाहांना एकत्र ठेवण्याची आशाही पाहिली.'' आझादांचा आधुनिक राष्ट्रवाद एकीतून स्वातंत्र्य व विकासाचा मार्ग शोधणारा होता.

१९व्या शतकात तयार झालेला संकुचित राष्ट्रवाद, धार्मिक राष्ट्रवाद अपुरा ठरल्याचे आझाद यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. सुरूवातीच्या काही मुस्लीम राष्ट्रवाद्यांनी संकुचित धार्मिक राष्ट्रवादाचा आधार घेऊन राष्ट्रीय प्रवाहापासून व समग्र विकासापासून मुस्लीमांना बाजूला ठेवल्याचे त्यांच्या लक्षात आले. या साऱ्यांना राष्ट्रीय प्रवाहात म्हणजे स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेतल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही, तद्वतच देशाचा विकास म्हणजे हिंदू मुस्लीमांचा विकास हे सूत्र पण त्यांना समजले होते. भारतीय राष्ट्रवादाचा स्वीकार करणे म्हणजे भारतीय परंपरा, कला, भाषा, साहित्य संस्कृती या सर्वांचा खुल्या मनाने स्वीकार करणे असे ते म्हणत. रामगढ येथे १९४० मध्ये झालेल्या काँग्रेस अधिवेशनात ''मला भारतीय असल्याचा अभिमान आहे. मी भारतीय राष्ट्रवादाचा अविभाज्य घटक आहे व भारतीय वैभवशाली परंपरा माझ्याशिवाय अपूर्ण आहेत. भारताच्या राष्ट्रबांधणीत मी अपरिहार्य घटक आहे.'' मौलाना आझाद यांनी या काळात द्विराष्ट्रवादाला विरोध करीत गांधीवादी उदारमतवादी, एकजिनसी राष्ट्रवाद स्वीकारला व भारतीय मुस्लीमांना राष्ट्रीय प्रवाहात सामील केले.

मौलाना आझाद यांनी द्विराष्ट्रवाद व जातीय निवाड्याला विरोध केला. मुस्लीमांना वेगळा मतदार संघ, राखीव जागा किंवा द्विराष्ट्रवादानुसार स्वतंत्र राष्ट्र या धोकादायक गोष्टी आहेत, असे त्यांना वाटते. फाळणीमुळे भारतात राहणाऱ्या मुस्लीमांनाही अपराधीपणा सतावेल. त्यांना अल्पसंख्य झाल्याने आणखी असुरक्षितता वाटेल म्हणून देशाचे विभाजन हा काही कोणत्याही वादावरचा उपाय

नाही असे ते म्हणत. उलट एकत्र राहून व एकत्र बसून हिंदू मुस्लीमांनी राष्ट्रीय प्रवाह बळकट करावा असे त्यांचे मत होते. भारताची फाळणी होऊ नये म्हणून त्यांनी कॅबिनेट मिशनचा पुरस्कार केला. ३१ मार्च १९४७ रोजी म. गांधींची भेट घेऊन फाळणी टाळण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न केले. पण काँग्रेस अथवा म. गांधी, पं. नेहरू व वल्लभभाई पटेल यापैकी कोणालाच फाळणी टाळता आली नाही तरी हिंदू मुस्लीम ऐक्य व लोकसत्ताक संयुक्त राष्ट्रवादाचे आझादांचे प्रयत्न नेहमीच आदरणीय ठरले.

**मौलाना अबुल कलाम आझाद यांचे जातीय सलोख्याचे प्रयत्न :**

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेच्या वेळी भारतात सर सय्यद अहमद यांनी अलोगड चळवळ उभारली होती. याच काळात वहाबी चळवळ मुस्लीमांसाठी काम करीत होती. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हिंदूची असून भविष्यकाळात ती मुस्लीमांच्या हितसंबंधाचे रक्षण करेल काय ? याबद्दल त्यांच्या मनात शंका असल्याने हिंदू महासभेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मुस्लीम लीग, अलीगढ मुस्लीम विद्यापीठाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला होता.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला भारतात द्विराष्ट्रवादाचे विचार मांडायला मुस्लीम मूलतत्ववाद्यांनी सुरूवात केली होती. मात्र हिंदू मुस्लीम संघर्ष व दुहीला मौलाना आझाद यांनी विरोध करून जातीय सलोख्याचे प्रयत्न केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या समन्वयवादी उदार व सर्वसमावेशक राष्ट्रवादाचा आमि लोकशाही विचारांचा प्रभाव होता. शिक्षणमंत्री म्हणून भारताचे नेतृत्व करताना त्यांनी युजीसीची स्थापना केली. त्याबरोबर संगित नाटक अकादमी, साहित्य अकादमी व ललित कलाअकादमीची स्थापना केली. या साऱ्या संस्था शिक्षण साहित्य व कलाक्षेत्राशी निगडीत असल्या तरी या सांस्कृतिक संस्था व चळवळीतून राष्ट्रप्रेम व जातीय जिव्हाळा तयार होत असतो.

मौलाना आझाद यांनी खिलाफत आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली. खिलाफत चळवळ १९१९ ते १९२१ या काळात उभारली गेली. याच मोहमद अली व शौकत अली बरोबर बरेच मुस्लीम नेते होते. त्यांनी महात्मा गांधींची भेट घेऊन खिलापतच्या व स्वराज्य आंदोलनासाठी असहयोग आंदोलन सुरू करण्याबाबत मत मांडले. यातील ब्रिटिशांचा हा मुस्लीमावरील आघात आहे असे काहींना वाटू लागल्याने ते आक्रमक बनले. त्या आक्रमक राष्ट्रवादाला सौम्य करण्याचे काम मौलाना आझाद जफर अली यांनी केले. १९२० मध्ये खिलाफत चळवळीने महात्मा गांधींच्या अहिंसात्मक असहयोग आंदोलनाला पाठिंबा दिला. हे काम केवळ जातीय सलोख्याचे व राष्ट्रीय प्रवाह मजबूत करण्यासाठी उपयोगाचे होते.

ब्रिटिश सरकार भारतीयांचे शोषण करीत या देशात जातीय व धार्मिक तणाव तयार करीत आहेत असे मौलाना आझाद यांचे मत होते. या काळात १९०५ मध्ये धार्मिक आधारावर बंगालची केलेली फाळणी त्यांना मान्य नव्हती. सुरूवातीच्या या काळात मौलाना आझाद हे क्रांतिकारी विचाराकडे थोडे आकर्षित झाले होते. महर्षी अरविंदोचा राष्ट्रवाद त्यांना मान्य होता. मात्र १९१२

मध्ये ते पत्रकार बनले व त्यांनी अल हिलाल ही पत्रिका सुरू करून हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी युवकांना आव्हान करून राष्ट्रवाद तयार केला व जातीय सलोखा तयार करण्याचा प्रयत्न केला. मौलाना आझाद हे कट्टर गांधीवादी असल्याने महात्मा गांधींच्या प्रत्येक राष्ट्रवादी व जातीय ऐक्याच्या आंदोलनात ते सहभागी झाले होते. बॅ. जीनांच्या द्विराष्ट्रवादाला त्यांचा विरोध होता.

१९४२ नंतर भारतात वाढणाऱ्या हिंदू मुस्लीम दंगलीबद्दल त्यांना चिंता वाटत होती. यासाठी महात्मा गांधींचा उदार मानवतावादी राष्ट्रवाद, सत्याग्रह व सामाजिक सलोख्यासाठी त्यांचे प्रयत्न याचा मौलाना आझाद यांना आदर तर होताच पण या सर्व आंदोलनात ते महात्मा गांधीबरोबर काम करती होते.

## २.५ सारांश

राष्ट्रवाद ही मानवी नैसर्गिक भावना असून ती देशप्रेम, राष्ट्रप्रेम शिकवते. राष्ट्रवाद तयार करण्यासाठी समान धर्म, समान वंश, समान भाषा, समान प्रदेश, समान संस्कृती, परंपरा, इतिहास सावा लागतो. राष्ट्रवादाने लोकांचे ऐक्य व संघटन होते. राष्ट्रवाद भावनिक असला तरी तो विवेकीही असतो. मध्य युरोपात हेगेल, हिटलर, मुसोलिनी यांनी तो वाढवला. पण हा राष्ट्रवाद हिंसक, आक्रमक, युध्दाला महत्त्व देणारा, आत्मकेंद्री व वांशिक, श्रेष्ठत्वावर उभा होता. या राष्ट्रवादाने जगात फॅसिस्ट हुकूमशाही वृत्ती तयार झाली, त्यामुळे इतर लोकसत्ताक, समाजवादी देशात तो वाढला नाही.

भारतामध्ये ब्रिटिश आल्यानंतर अधिक शिस्तबध्द, संघटीत असा राष्ट्रवाद तयार होऊ लागला. भारतात धर्म, जाती, भाषा, पंथ यात विभिन्नता असल्याने एकजिनसी संघटीत राष्ट्रवाद तयार होणे अवघड होते, पण परकीय राजवट व गुलामगिरीच्या समान प्रश्नाने आपले अंतर्गत मतभेद विसरून लोक समान संस्कृती व ऐतिहासिक परंपरांच्या आधारे एकत्र आले. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात पहिल्यांदा भारतीय राष्ट्रवाद अधिक एकजिनसी झाल्याचे दिसते.

भारतीय समाज दोन धर्मात विभागला जात आहे हे धोकादायक आहे. याची जाणीव म. गांधींना झाली. १९२० नंतर त्यांनी भारतीय राष्ट्रवाद अधिक सर्वस्पर्शी, उदारमतवादी करण्याचा प्रयत्न केला. यासाठी हिंदू मुस्लीम ऐक्यावर भर देऊन त्यांनी काँग्रेसचा राष्ट्रवादी प्रवाह बळकट केला व भारतीय राष्ट्रवादाला सत्य, अहिंसा व मानवतावादी नैतिक आधार दिला. हेच तत्त्व पं. नेहरूंनी विकसीत केले. पं. नेहरूंनी राष्ट्रवादाचा सखोल अभ्यास करून भारतीय राष्ट्रवाद अधिक लोकसत्ताक, व्यापक केला. त्याला आंतरराष्ट्रवादाचे व जागतिक सरकार तथा विश्वबंधुत्वाचे संदर्भ दिले. सर्व मानवजात व तिच्या कल्याणासाठी त्यांनी राष्ट्रवादाची मांडणी केली. या समकलाळात मौलाना आझाद यांनी संकुचित मुस्लीम धर्मवादी राष्ट्रवादाकडून लोकशाही, बृहद व संयुक्त राष्ट्रवादाची मांडणी केली. अगोदर फक्त मुस्लीम कल्याणाचा विचार करणारे आझाद १९२० नंतर भारतीय

समाजाचा व्यापक विचार करू लागले. हिंदू मुस्लीम एकीशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही यासाठी त्यांनी हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी प्रयत्न करून म. गांधींचे विचार राबवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पाकिस्तान निर्मितीला विरोध करून भारतीय राष्ट्रवाद बळकट केला.

## पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१. समिश्र राष्ट्रवाद : सर्व विचार मंडळीना एकत्रित आणून राष्ट्रवादाची मांडणी करणे.५६

## स्वाध्यायासाठी प्रश्न :

१. महात्मा गांधी यांचा राष्ट्रवाद स्पष्ट करा.

२. पंडित नेहरूंच्या समिश्र राष्ट्रवादाची चर्चा करा.

३. मौलाना आझाद यांची राष्ट्रवादाची कल्पना स्पष्ट करा.

## अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. भोळे, भा. ल. (२०१६). आधुनिक भारतातील राजकीय विचार, नागपूर, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स.

२. जावडेकर, शं. द. आधुनिक भारत कॉंटिनेंटल, पुणे, १९६८.

३. वकील अलीम मौ. आझादांचे यांचे राजकीय विचार, प्रतिभा प्रकाशन, पुणे, १९९८.


❋ ❋ ❋

# घटक ४

# बहुजन राष्ट्रवाद आणि जातीय सलोखा

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ महात्मा फुले

४.२.२ छ. शाहू महाराज

४.२.३ सयाजीराव गायकवाड

४.२.४ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

४.२.५ डॉ. बी. आर. आंबेडकर

४.३ पारिभाषिक शब्द व त्याचे अर्थ

४.४ स्वाध्यायासाठी प्रश्न

४.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

आधुनिक भारताच्या विकासामध्ये अनेक राजकीय नेत्यानी समाजसुधारकांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. ब्रिटीश सत्तेने भारतामध्ये शिक्षणाची सुरूवात केली त्यामुळे भारतातील तरूणांवर पाश्चात्य विचारांचा प्रभाव पडला त्यातूनच एक नवी दृष्टी भारतीयांना प्राप्त झाली. भारतीय समाजातील वाईट रूढी परंपरा बदलण्याचा प्रयत्न नवशिक्षित तरूणानी म्हणजेच अनेक समाजसुधारकानी केले आहे. त्यात प्रामुख्याने रानडे, गोखले, फुले, आगरकर इत्यादी समाजसुधारकाचा समावेश होतो. याच काळात राष्ट्रवाद ही संकल्पना उदयास आली. राष्ट्रवाद अनेक विचारवंतानी आपापल्या दृष्टीकोनातून मांडले आणि राष्ट्रवादाची अनेक रूपे निर्माण झाले त्यामध्ये सामायिक राष्ट्रवाद, हिंदूराष्ट्रवाद, द्विराष्ट्रवाद, बहुजनराष्ट्रवाद इत्यादीचा समावेश होतो. यातील बहुजन राष्ट्रवादाची मांडणी महात्मा फुले, शाहू

महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी केले आहे. त्याच बरोबर भारताच्या स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या काळामध्ये जातीयता, धर्माधता मोठ्या प्रमाणात होती. त्या अनुषंगाने प्रत्येक जाती जाती मध्ये व हिंदू - मुस्लिम धर्मामध्ये संघर्ष होता तो संघर्ष मिटविण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केला. त्याच्यामध्ये जातीय सलोखा निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले. या सर्व गोष्टींचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे. प्रामुख्याने महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा त्यातून निर्माण झालेल्या बहूजन राष्ट्रवाद व जातीय सलोख्याची चर्चा करणार आहे.

## ४.१ प्रास्ताविक

बहुजन राष्ट्रवाद आणि जातीय सलोखा या अनुषंगाने महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चिकित्सक रीतीने अभ्यास करणे आवश्यक आहे कारण भारतीय राष्ट्रवादाची मांडणी होत असताना अनेक विचारवंतानी त्यात योगदान दिले आहे. परंतु बरेच विचारवंत हे राष्ट्रवादाच्या मांडणी मध्ये शूद्रातीशूद्र, दलित, मुस्लिम स्त्रीया यांचा समावेशच केला नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकर व महात्मा फुले यांनी बहुजन राष्ट्रवाद मांडला. परंतु राष्ट्रवाद ही संकल्पना युरोपमध्ये १९ व्या शतकामध्ये उदयास आली. इंग्रजांचे राज्य भारतात स्थापन झाल्यानंतर येथे अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये सुरू करण्यात आली. शिक्षणाच्या माध्यमातून भारतामध्ये नवशिक्षित लोकांना राष्ट्रवादाची ओळख झाली. त्यामुळे भारतातील अनेक समाज सुधारकांनी राष्ट्रवादाची मांडणी केली. न्या. रानडे यांनी धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक राष्ट्रवादाची मांडणी केली. चिपळूणकर, लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचा मुख्य आधार साम्राज्यवाद विरोध हा होता. अरविदांनी राष्ट्रवादाला आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. तर स्वा. सावकरांनी हिंदू राष्ट्रवादाची मांडणी केली आहे. या सर्व राष्ट्रवादाची मांडणी करताना त्यामध्ये देशातील शूद्रातीशूद्र, अस्पृश्य आणि आदीवासीना विचारात घेतले नव्हते. त्यामुळे भारतातखऱ्या अर्थाने एकात्मता साधू शकत नाही. म्हणून महात्मा फुले यांनी प्रस्थापित राष्ट्रवादाला विरोध केला आणि स्वत:चे शेतकरी, कामगार वर्ग, शुद्र, अस्पृश्य, आदिवासी यांना राष्ट्रवादामध्ये समावेश केला पाहिजे जेणे करून राष्ट्रवाद हा सर्व जाती धर्मांना घेऊन तयार झाले पाहिजे. यालाच बहुजनाचा राष्ट्रवाद म्हणून ओळखला जातो.

बहुजन राष्ट्रवादाची मांडणी अनेक विचारवंतानी केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. आंबेडकरांचा समावेश होतो. राष्ट्रवादाची मांडणी करीत असताना जातीय सलोखा प्रस्थापित करण्याचे कार्य ही या

विचारवंतानी केला आहे. कारण भारतीय समाज हा अनेक जाती धर्मामध्ये विभागलेला आहे. त्यामुळे अनेक वेळा जातीय दंगे, धार्मिक संघर्षाच्या घटना घडताना दिसतात. भारतामध्ये धर्म आणि राजकारण यांच्यातील संघर्ष पूर्वापार अस्तित्वात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात अनेक ठिकाणी हिंदू-मुस्लिम दंगे झाल्याची उदाहरणे आढळतात. फाळणीच्या वेळीही अन्य धर्मीयांवर हिंसक हल्ले करून आपला धर्माभिमान सिद्ध करण्याचा प्रयत्न विभिन्न धार्मिक समूहांनी केला. स्वतंत्र भारतात हिंदू-मुस्लिम दंगली होत राहिल्या. आजही राम जन्मभूमी आणि बाबरी मशिद यांच्या वादात १९९२ साली हिंदू मुस्लिम संघर्ष/दंगली निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे या जातीय संघर्ष मिटविण्यासाठी आणि जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सयाजीराव गायकवाड, महात्मा फुले, शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी महत्त्वाचे काम केले आहेत ते अभ्यासणे आवश्यक आहे.

## ४.२ विषय विवेचन

**बहुजन राष्ट्रवाद**

राष्ट्रवाद म्हणजे एकतेची भावना असते. अंतर्गत भावना व इतरांपेक्षा वेगळेपणाची जाणीव या आधारावर राष्ट्रवादाची निर्मिती होते. एकोणिसाव्या शतकापासून राष्ट्रवाद या संकल्पनेचा प्रभाव जगभर जाणवू लागला. तसा भारतात ही आला. भारतामध्ये अनेक समाजसुधारकांनी राष्ट्रवादाची मांडणी केली. परंतु इंग्रज येण्यापूर्वी भारतामध्ये आधुनिक राष्ट्रीयतेची भावना निर्माण झालेली नव्हती. १९ व्या शतकाच्या सुरूवातीस संपूर्ण देशावर आपली सत्ता स्थापन करण्यास इंग्रजाना यश मिळाले. त्यानंतर भारतात नव्या सामाजिक प्रक्रिया सुरू झाल्या आणि परिवर्तनाचे वारे वाहू लागले. नवशिक्षित भारतीय तरूणामध्ये राष्ट्रभावनेची जाणीव निर्माण झाली. त्यातूनच भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीय राष्ट्रवादाची जी मांडणी या काळात झाली त्याची पार्थ चॅटर्जी यांनी तीन टप्प्यात मांडणी केली आहे. त्यातील पहिला टप्पा म्हणजे बकीमचंद्र चटर्जी यांनी राष्ट्रवादाची मांडणी केली आहे. या मांडणीमध्ये पाश्चिमात्य भौतिकवादाला पौर्वात्य आध्यात्मवादाने आव्हान दिले आहे. अंतिमत: या दोन्ही विचारांचा समन्वय करून खास भारतीय प्रागतिक विचारसरणी तयार करण्यावर त्यांनी भर दिला. दुसरा टप्पा महात्मा गांधींच्या चळवळीचा आहे. आणि तिसरा पंडित नेहरू यांचा असून त्या काळात राजकीय व्यवस्था आणि सत्तेची संरचना यांची बांधणी झाली.

भारतीय राष्ट्रवादाच्या १९२० पर्यंत करण्यात आलेल्या मांडणीत याचा समावेश नाही. ब्रिटीशांच्या काळात आणि नंतर ही सत्तेमध्ये आपला वाटा असणार नाही अशी जाणीव समाजातील

दलित, शुद्र, अतिशुद्र, गुन्हेगारी जमात यांना होऊ लागली. या काळात निर्माण झालेले सामाजिक अंतर्विरोध अभिव्यक्त करण्याचे काम प्रथम महात्मा ज्योतीराव फुले आणि सर सैय्यद महमद यांनी केले. कारण भारतीय राष्ट्रवादामध्ये केवळ उच्च जाती वर्गातील लोकांचा समावेश होता. तेथे दलित अस्पृश्य शुद्रातिशुद्र यांना स्थान नव्हते. तसेच भारतीय राष्ट्रवादाला ब्राम्हण राष्ट्रवाद असेही म्हंटले जाते. कारण टिळक, चिपळूणकर, सावरकर इत्यादी विचारवंतांनी मांडलेला राष्ट्रवाद हा केवळ उच्च जाती वर्गासाठीचा आहे त्यात शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना स्थान नाही असे म्हटले गेले. भारतातील ब्राम्हणानी हे बहुजन समाजावर आपली गुलामगिरी स्थापन केली आहे. या गुलामगिरी विरूद्ध समाजाला संघटित करून त्याची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी ही अस्पृश्य, शूद्रातिशूद्र, दलित लोकांना स्थान असलेला राष्ट्रवाद मांडला. या काळात ब्राम्हणशाहीच्या विरोधात अनेक बहुजन समाजातील लोकांनी एकत्र येऊन ब्राम्हणेत्तर चळवळीची उभारणी केली. फुलेनी मांडलेला विचार सर्वत्र पोहचविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. ब्राम्हणेत्तर चळवळीमुळे सत्यशोधक समाजाचे कार्य पुन्हा पुर्नजीवीत झाले आणि ब्राम्हणेत्तर चळवळीपासून बहुजन हा शब्द व्यापक अर्थाने रूढ झाला.

बहुजन म्हणजे स्थूलमानाने शूद्रातिशूद्र जनसमूह असा त्यांचा अर्थ प्रामुख्याने म. फुले यांनी केला. महात्मा फुले स्वत: शूद्रातिशूद्र हाच शब्द प्राधान्याने वापरत होते, हे जरी खरे असले तरी येथील रयत गोरगरीब लोक शेतकरी वर्ग इत्यादी सर्व सामान्यांचा अंर्तभाव बहुजन या शब्दात करण्यात कोणतीही अडचण सत्यशोधकीय अनुयानाना वाटली नाही. शूद्रातिशूद्र म्हणजे बहुजन आणि बहुजन म्हणजे शूद्रातिशूद्र हे समीकरणच बनले होते. पुढे वि. रा. शिंदे यांनी जेव्हा बहुजन समाजपक्षाची स्थापना केली, तेव्हा त्यामागे हा सत्यशोधकी वारसाच ते सांगू इच्छित होते ते स्पष्टच आहे. भारतामध्ये विशेषत: महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तर चळवळ जेव्हा सुरू झाली तेव्हा बहुजन समाज या शब्दाचा वापर करण्यात आला. यामध्ये ब्राह्मणेतत्तर मराठा व तत्सम जातीतील लोक असा एक अर्थ प्राप्त झाला. काही वेळा बहुजन शब्दात दलित आणि अन्य मागास समूह या दोहोंचा समावेश अभिप्रेत असतो. अनेक वेळा बहुजन या शब्दाचा शब्दश: अर्थ घेऊन विशिष्ट समूह बहुसंख्य आहेत या मुद्याचाच आग्रह धरला जातो. महाराष्ट्रामध्ये बहुजनवाद हा शब्द यशवंतराव चव्हाण यांनी परवलीचा बनवला तर उत्तरेमध्ये बहुजनवाद त्रैवर्णिक (ब्राह्मण, रजपूत, वैश्य) हिंदूच्या सर्वस्पर्शी वर्चस्वास ाव्हान देतो व या त्रैवर्णिकाच्या विरोधात तो दलित जाती, शुद्र जाती व धार्मिक अल्पसंख्याकातील शोषित वर्ग यांची एक संयुक्त आघाडी उभी करून संसदीय लोकशाहीच्या चौकटीत राजकीय सत्ता मिळवू इच्छितो. कांशीराम यांनी ब्राम्हण, बनिया आणि ठाकूर यांना चोर ठरवून उर्वरीत

समाजाला दलित, शोषित मानले. कांचा इलाया यांनी अल्पजन आणि बहुजन अशा संकल्पना वापरून प्रामुख्याने ब्राम्हण आणि इतर अशी विभागणी केली आहे. त्याच्या बहुजन संकल्पनेत अन्य मागास समूहांचा समावेश होतो. प्रकाश आंबेडकरांचा भारिप बहुजन महासंघ ही दलित ओबीसी युती म्हणूनच पाहिली गेली. मंडलानंतर राजकारणामध्ये बहुजनवाद हा प्रामुख्याने शूद्र अस्मितेशी निगडीत झाला आहे म्हणून बहुजनवादाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) ब्राम्हणी वर्चस्वास विरोध :

ब्राम्हणवादास व ब्राम्हणी वर्चस्वास विरोध हे या बहुजनवादाचे ठळक वैशिष्ट्य आहे. कारण ब्राह्मणवाद ही एक वर्चस्ववादी तत्त्वप्रणाली असल्याने ब्राह्मण तर सोडाच पण ब्राह्मणेत्तर जातीही या ब्राह्मणवादाचे विचार स्वीकारून कळत नकळत शूद्रातिशूद्र जातीचे शोषण करतात. म्हणून ब्राह्मणवादास आणि ब्राह्मणवाद स्वीकारलेल्या समाजाला बहुजनवाद विरोध करतो.

### २) बहुजनवादाचा पाया फुले – आंबेडकरांचा विचार :

बहुजनवादाच्या तात्विक मांडणीला फुले आंबेडकरांचे विचार प्रेरणादायी ठरले आहे. फुले आणि आंबेडकरांचे विचार भारतीय पातळीवर नेण्याचे कार्य या बहुजनवादाने केले आहे. कारण बहुजनवादाची मांडणी हे फुले आंबेडकरांनीच केला आहे. फुलेंच्या मते, ज्या समाजामध्ये वेगवेगल्या जाती आहेत त्या समाजामध्ये खरी राष्ट्रीयता निर्माण होत नाही. कारण या समाजामध्ये खरी देशभक्ती असत नाही. डॉ. आंबेडकरांची राष्ट्रवाद हा पददलित व गरीबाच्या कल्याणासाठी काम करण्याच्या भावनेतून निर्माण झाला आहे. समान संधी व मानवी हक्क हे अनेक शतकापासून नाकारलेल्या समाजाला दारद्रियातून मुक्त झाल्याशिवाय हे वर्ग राष्ट्रजीवनाशी समरस होणार नाहीत असे आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळे बहुजनवादाने डॉ. आंबेडकर व महात्मा फुलेंच्या विचारांच्या आधारावर दलितमुक्तीचे हत्यार बनविले.

### ३) शोषित समाज एकमेकांचा मित्र :

भारतासारख्या जातीग्रस्त समाजामध्ये अनेक शोषक व शोषित जाती आहेत. परंतु त्याच्यामध्ये ध्रुवीकरण होत नाही. कारण काही जाती या एका बाजूने शोषक आहेत तर दुसरीकडे कोणत्यातरी जातीचे शोषण करतात. परंतु त्रिवर्णिकांच्या विरोधात शूद्रातिशूर्द आदिवासी व गुन्हेगारी जमाती अशा केवळ शोषित समाजघटकाच्यामध्ये एकतेची भावना निर्माण होते. वर्णभान, जातीभान अस्तित्वात असले तरी भौतिक शोषणाच्या संदर्भात हे सर्व समाजघटक परस्पराचे स्वाभाविक मित्र असतात.

### ४) दलित व मुस्लिम ऐक्य :

मंडलोत्तर बहुजनवादाने फुले - आंबेडकरवादी परंपरेचा धागा पकडून शुद्रातिशुद्र याच्या बरोबर मुस्लिमांना परिवर्तनाच्या व्यापक लढ्यात सामील करून घेण्याचा प्रयत्न केला आहे कारण मुस्लिम धर्मामध्येही कनिष्ठ जातीचे शोषण केले जाते. भारतातील जाती व्यवस्था ही केवळ हिंदू समाजाचीच नसून हिंदू समाजाच्या सहवासात आलेल्या हिंदूतर अशा मुस्लिम, ख्रिस्ती, शिख समाजाचीही ती व्यथा आहे. त्यामुळे बहुजनवादाने मुस्लिमामधील कनिष्ठ शोषित जातीना एकत्रित घेऊन दलित मुस्लिम ऐक्य करण्यात आले आहे.

अशा प्रकारे बहुजनवादाचे वैशिष्ट्ये किंवा स्वरूप स्पष्ट करता येईल. बहुजनवादाचा उदय हा फुलेंनी मांडलेल्या बहुजन राष्ट्रवादातून झाला त्याचा विस्तार शाहू महाराज, वि.रा. शिंदे, आंबेडकरांनी केला. महात्मा फुले यांनी असे म्हटले की, भारतासारख्या जातीग्रस्त समाजामध्ये जर जातीय राष्ट्रवादाची तत्त्वे आमलात आणली तर समाजामध्ये अन्यायी हूकूमशाही निर्माण होईल कारण विषम समाजामध्ये जर समतेची तत्त्वे सरसकट लागू केली तर त्याचा फायदा समाजात आधीच बळकट असणाऱ्या अल्पसंख्य गटांना होतो. फुलेंच्या मते राष्ट्र किंवा नेशन म्हणजे समाजामध्ये असणाऱ्या अठरापगड जाती ज्यावेळी एका पातळीवर येतील आणि या जाती अठरा धान्याची एकी होऊन कडबोळे ज्यावेळी तयार होईल त्यावेळी राष्ट्र झाले असे म्हणावे लागेल. शुद्र, अतिशुद्र, भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होणार नाहीत. तो पर्यंत येथे राष्ट्र होणार नाही. अशा प्रकारे महात्मा फुले यांनी हिंदू धर्मातील ब्राह्मणी वर्चस्वावर हल्ला चढविला व शूद्रातिशूद्र आणि शेतकरी वर्ग यांना अंतर्भूत असलेला राष्ट्रवाद मांडला आहे. डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रवादाची भूमिका स्पष्ट करताना समाजातील जातीयता नष्ट झाली पाहिजे. जनतेला स्वातंत्र्य असले पाहिजे. तसेच राष्ट्रवादामध्ये लोक समुदाय परस्परसंबंध भावनेने एकत्र असले पाहिजे. त्याच बरोबर एक समान भाषा असावे, अल्पसंख्याकांना संरक्षण मिळावे. अशा सर्व गोष्टी अंतर्भूत असलेला राष्ट्रवाद मांडला आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्ष, पुरोगामी व बुद्धीप्राणाव्यवादी होता. पूर्वग्रहदूषित अमानुष आक्रमक आणि असहिष्णू असा राष्ट्रवाद त्यांना नको होता. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा विवेकशील मानवतावादी, ईहवादी होता.

अशा प्रकारे बहुजनवाद आणि बहुजन राष्ट्रवादाचे विवेचन केले आहे.

**जातीय सलोखा (Communal Harmony)**

भारतामध्ये अनेक जातीचे आणि धर्माचे लोक राहतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये संघर्ष न होता सलोख्याचे वातावरण निर्माण होणे आवश्यक आहे परंतू त्याच्यामध्ये जमातवादाचा प्रार्दूर्भाव इंग्रजी शासनाच्या काळात झाला. कारण नव्या बदलत्या सामाजिक आर्थिक व राजकीय परिस्थितीमध्ये आपली अस्मिता केवळ धर्माच्या नावानेच कायम ठेवता येईल. नव्याने येऊ घातलेल्या लोकशाही प्रक्रियेत बहुसंख्याचे वर्चस्व रोखण्यासाठी धर्माच्या नावानेच आपण संघटित झाले पाहिजे. आपल्या जातीधर्माचे रक्षण केले पाहिजे. या भावनेतूनच विविध प्रकारच्या जमातवादी राजकीय चळवळी निर्माण झाल्या. जमातवादासंबंधी चर्चा करताना अनेकदा धर्मांध शक्ती आणि मूलतत्ववादी शक्ती असे उल्लेख केले जातात. धार्मिक जमातवाद म्हणजे एकाच धर्माच्या सर्व लोकांमध्ये त्या धर्माच्या आधारे आत्मभान निर्माण करणे हे धार्मिक जामतवादाचे प्रमुख लक्षण आहे असे आत्मभान निर्माण करण्यासाठी स्वत:च्या धर्माविषयी अवास्तव अहंकार लोकांच्या मनात निर्माण केला जातो. आणि अन्य धर्माबद्दल संशय द्वेष पसरविला जातो. या पार्श्वभूमीवर आपले धार्मिक आणि भौतिक हित सांभाळण्याकरीता हिंसेच्या वापराचे समर्थन केले जाते. यातून धार्मिक दंगली घडतात.

धार्मिक दंगली या भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून घडत आले आहेत. प्रथम जातीय दंगल ही १८५० साली पारशी आणि मुस्लमान यांच्या दरम्यान घडला. गांधी नामक एका पारशी पत्रकाराने हजरत मुहंमद पैगंबर यांचे काल्पनिक चित्र आपल्या वर्तमानपत्रात छापले. त्यावरून हा दंगा उद्भवला होता. १८९३ साली मुंबईमध्ये जातीय दंगा झाला. या प्रभासपट्टण जुनागड या संस्थानातील गावी घडला. प्रभासपट्टण हे गुतराथी लोकांचे पवित्र क्षेत्र आहे, तेथे मोहरमच्या ताबुतांच्या निमित्ताने दंगा झाला. त्या पार्श्वभूमीवर गुतराथी लोकांनी मुंबईच्या माधवबागेत सभा भरविली. मुस्लमानांनी ही सभा आणि प्रभासपट्टणच्या दंग्याचे पडसाद मुंबईत उमटले. १८९४ साली पुण्यात पालखीच्या निमित्ताने हिंदू-मुस्लिमाचा दंगा उद्भवण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. १८९६ मध्ये बकरी इदसारख्या धार्मिक उत्सवाच्या दिवशी मुसलमान श्रमिकाद्वारे करण्यात आलेल्या गोहत्येमुळे हिंदू मुस्लिमामध्ये दंगे निर्माण झाले.

१९२६ ते १९३० या काळात अनेक जातीय दंगे झाले. दिल्ली, गुलबर्गा, मुंबई, नागपूर, कलकत्ता, लखनऊ, अलाहाबाद, लाहोर इ. ठिकाणी झालेल्या दंग्याचा उल्लेख करता येईल. १९४० च्या दशकात मुस्लिम लीगने उभी केलेली स्वतंत्र पाकिस्तानची मागणी ही हिंदू-मुस्लिम संघर्षास कारणीभूत ठरेली. १९३० ते १९४६ या काळामध्ये हिंदू-मुस्लिम संबंधातील तणाव वाढत गेला.१९२४-२५ नंतर हिंदू-जमातवादी शक्ती संघटित व्हायला सुरूवात झाली. आणि मुस्लिम मध्यमवर्गामध्ये

सुद्धा आक्रमकता वाढू लागली. पुढे हे संघर्ष वाढतच गेले आणि डिसेंबर १९४६ आणि १९४७ पर्यंत भारतात अनेक ठिकाणी व बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात दंगे झाले. मुस्लिम लीगने पाकिस्तान निर्मितीचा हेतू ठेवून अमृतसर, रावळपिंढी, मुलतान, झेलम, वायव्य सरहद प्रांताच्या अबोटाबाद येथे दंगली घडवल्या. यात हिंदू व शिख मिळून २०४९ लोक मारले गेले होते. याच दरम्यान पश्चिम बंगाल, नोआखली, कलकत्ता इत्यादी ठिकाणी जातीय दंगे प्रचंड प्रमाणात वाढले होते. महात्मा गांधी या दंग्यामध्ये शांततेचे आव्हान करण्यासाठी प्रांतोप्राती फिरत होते.

स्वातंत्र्यानंतर ही भारतातील हिंदू मुस्लिम संघर्ष कमी झाला नाही. फाळणीमुळे मुस्लिमांचा पाकिस्तान व हिंदूचा भारत असे दोन राष्ट्र हे धर्माच्या आधारावरच निर्माण झाले. त्यामुळे वारंवार जातीय दंगे निर्माण होताना दिसतात. कारण १९६५, १९७१, १९९९ इत्यादी वेळा भारत पाकिस्तान युद्ध झाले आहे. १९८० नंतर भारतामध्ये जमातवादी चळवळी मोठ्या प्रमाणात वाढले. त्याची तीन कारणे सांगता येतील, (१) मीनाक्षीपूरम येथील धर्मांतर, (२) मुस्लिमांमध्ये पुनरूज्जीवनवादी शक्तीचा उठाव, आणि (३) पंजाबमध्ये भिद्रानवाले यांच्या मार्गदर्शनाखाली शिख मूलतत्ववाद्याच्या हिंसक कारवाया व अकाली दलाचा धर्मयुद्ध मोर्चा. या तीनही तत्वामुळे अनेक जमातवादी चळवळी झाल्या. हिंदूतील जमातवादाला सुरूवात पंजाबमधील भिद्रानवाले यांनी केलेल्या दहशतवादी कारवायामुळेच झाली. पंजाबमध्ये धर्माच्या नावावर सुवर्ण मंदिरा भोवती एक मोठे राजकीय आंदोलन उभे राहिले. महाराष्ट्रात ही १९८४ च्या दंग्यानंतर मुंबईतील हिंदू जनतेत शिवसेनेची लोकप्रियता वाढत होती. हिंदू जमातवादी संघटनाप्रमाणे मुस्लमानामध्ये जमातवादी संघटना मोठ्या प्रमाणात वाढत होत्या. त्यातूनच १९७१ साली पाकिस्तानची फाळणी झाली. १९८४ साली इंदिरा गांधींच्या हत्येनंतर एकट्या दिल्लीत ३००० शिखांची अत्यंत निर्घृण अशी कत्तल करण्यात आली. १९८९, १९९१ आणि १९९३ साली राम जन्मभूमीच्या ठिकाणी हिंदूत्ववादी शक्तीनी चळवळी केल्या आणि शेवटी ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडण्यात आली. एका धर्मनिरपेक्ष देशात ४५० वर्षापूर्वी बांधलेली मशीद धार्मिक उन्मादाच्या भरात हिंस्त्र जमावाकडून नष्ट केली जाते. डिसेंबर १९९२ व पुन्हा जानेवारी १९९३ मध्ये शेकडो माणसाचा बळी घेणारी आणि शेकडो कोटी रूपयांचा चुराडा उडविणारी जातीय दंगल मुंबई, सुरत, गोध्रा इ. शहरात झाली. या दंगलीमध्ये हजारो निरपराध लोक मारले गेले.

अशा प्रकारे आजही अनेक वेळा हिंदू मुस्लिम यांच्यात संघर्ष मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. पाकिस्तानी दहशतवादी भारतातील निष्पाप लोकांचा वारंवार बळी घेताना दिसतात. त्यामुळे अनेकवेळा हिंदू मुस्लिम संघर्ष निर्माण झाला आहे. त्यांच्यामध्ये जातीय सलोखा निर्माण करणे गरजेचे आहे. अन्यथा भारतीय राजकारणामध्ये अनेक संकटे निर्माण होतील आणि भारताच्या अस्तित्वाची

लढाई हिंदू मुस्लिम संघर्षातच विलीन होईल म्हणून जातीय सलोखा निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जात ही सर्व श्रेष्ठ मानून ब्राह्मण व क्षत्रिय वैश्य यांनी शुद्रांचा आणि अतिशूद्र स्त्रिया, दलित इत्यादी लोकांचे शोषण केले आहे. त्यामुळे भारतामध्ये बहुजन राष्ट्रवाद मांडण्यात आला आणि बहुजन राष्ट्रवादी लोकांनी समाजामध्ये जातीय सलोखा निर्माण करण्याचे कार्य केले आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड आणि डॉ. आंबेडकरांनी जाती अंताचा लढा दिल्या बरोबर समाजातील जे धर्मावर आधारीत जातीय दंगली आहेत ते नष्ट करण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून केला आहे. तरी बहुजनवादी राष्ट्रवाद आणि जातीय सलोखा यासंबंधी चर्चा करणे महत्त्वाचे आहे.

जातीय सलोखा म्हणजे धर्माधर्मात एकता निर्माण करणे होय. हे कार्य भारतातील अनेक विचारवंतानी केला आहे. त्यांच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, विरा शिंदे आणि आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास करणे व त्यासंबंधी चर्चा करणे गरजेचे आहे. जातीय सलोखा निर्माण करण्याचे कार्य करीत असताना महात्मा गांधी यांनी प्रांतोप्रांत फिरून उसळलेल्या दंगली शांत करण्याचे कार्य केले. दंगलीच्या काळात महात्मा गांधीनी बंगाल, बिहार मधील दंगलग्रस्त भागांना भेटी दिल्या. पदयत्रा काढल्या. तसेच नैतिक अध्यात्मिक व अहिंसेच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम यांच्यात सलोखा निर्माण करण्याचे प्रयत्न केले. महात्मा गांधीनी हिंदू मुस्लिम प्रश्नासंबंधी आणि जमातवादी दंग्याच्या सोडवणूकीसाठी अहिंसा प्रेम मानवतेचा संदेश दिला.

### ४.२.१ महात्मा फुले

**जीवन परिचय :**

महात्मा फुले यांचा जन्म एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. त्यांचे मूळ आडनाव गोऱ्हे आणि मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण होते. परंतु त्यांचे आजोबा पुण्यात स्थाईक झाले होते. पेशव्यांना फुले पुरवण्याचा व्यवसाय घरात चालत असल्यामुळे त्यांना फुले नावानेच लोक ओळखू लागले. जोतीराव फुले यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण होताच आपल्या वडिलांसोबत शेतातील अंग मेहनतीची कामे करू लागले. त्यांना शिक्षणाची ओढ शांत बसू देत नव्हती. त्यामुळे तीन-चार वर्षांच्यानंतर पुन्हा स्कॉटिश मिशनरी हायस्कूल मध्ये प्रवेश केला. याच शाळेत असताना वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाईंशी जोतीरावांचा विवाह झाला. तर याच शाळेत

असताना जोतीरावांची उत्तम जडणघडण झाली. ब्राह्मण, प्रभू, क्षत्रिय, कायस्थ, मुस्लिम, ख्रिस्ती अशी सगळ्या अठरापगड समाजघटकातून आलेली मित्रमंडळी मिळून त्यांच्या विचारांच्या कक्षा सर्वसमावेशक झाल्या. मुस्लमान मित्रांनी हिंदू धर्मावर केलेली टिका ऐकून जोतीरावांना आपल्या धर्मातील अन्याय, उच्चनीच भाव आणि धर्माचरणातील मतलबीपण याची पहिल्यांदा जाणीव झाली आणि आपल्या धर्मसंस्थेचे अंतरंग न्यायनिष्ठूरतेने तपासून पाहण्याची त्यांना गरज भासू लागली. त्याच काळात थॉमस पेन या तत्त्वज्ञाच्या राईटस ऑफ मॅन या पुस्तकाने जोतीराव प्रभावित झाले आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सरकारी नोकरी न करण्याचा निर्णय जोतीरावांनी घेतला.

एका ब्राह्मण मित्राच्या वरातीत फुलेंचा सनातनी ब्राह्मणांनी जेंव्हा अपमान केला तेव्हा त्या प्रसंगाने त्यांना समाजातील गुलामगिरीची जाणीव झाली. समाजातील उच्चवर्णीयांनी शूद्रातीशूद्रांना सामाजिक व मानसिक गुलामगिरीत ठेवले आहे. ती राजकीय गुलामीपेक्षा कितीतरी पटीनी भीषण आहे हे जोतिरावांना जाणवले. त्यामुळे त्यांनी जातीव्यवस्थेचे समूळ उच्चाटण करायचे आणि स्त्री-शुद्रातीशुद्रांच्या सर्वांगीण विकासासाठी व हक्कांसाठी लढायचे असे ठरविले.

या सर्व सामाजिक घटनेला मुख्य कारण अविद्या आहे ते प्रथम दूर करणे आवश्यक आहे असे निदान जोतीरावांनी केले. १८४८ साली जोतीरावांनी पूर्वास्पृश्य मुलामुलींसाठी शाळा उघडली. अस्पृश्याना शिक्षण नाकारणे हाच ज्यांना हिंदू धर्म वाटत होता त्या सनातनी वर्गांनी विरोध केला. त्यामुळे शिकवण्यासाठी शिक्षक मिळत नव्हते. फुलेंनी सावित्रीबाई यांना शिकविले आणि मुलींच्या शाळेत शिकविण्याची जबाबदारी सोपवली. तेव्हा तर या धर्माभिमान्यांचा संताप अनावर झाला त्यांनी सावित्रीबाईंवर शेण फेकले त्यांना दगड मारले याला फुलेंनी जुमानले नाही. त्यांचे शिक्षण देण्याचे कार्य चालूच ठेवले. त्यांनी मुलींसाठी आणखीही काही शाळा उघडल्या. विधवा स्त्रियांना आत्महत्येपासून वाचविण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. समाजातील सामाजिक सलोखा निर्माण करण्याचे कार्य फुले यांनी केले. त्याचे विचार कृतीत आणण्यासाठी प्रचार करण्यासाठी २७ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १८७६ साली पुणे नगरपालिकेचे सदस्य झाले. महात्मा फुले यांनी त्यांच्या जीवनात अनेक रूढी, प्रथा, परंपरा दूर करण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी विपूल लेखनही केले आहे. त्यामध्ये गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड इत्यादी ग्रंथाचा समावेश होता.

जोतीरावांनी ज्या शुद्रातिशुद्र, दलित, शोषीत स्त्रिया यांच्यासाठी जन्मभर झटले त्या गरीब श्रमिकांनी ११ मे, १८८८ रोजी मोठ्या उत्साहाने फुलेंचा प्रकष्ठीचा सोहळा साजरा केला. त्यावेळी या कष्टकऱ्यांनी, असपृश्यांनी फुलेंना 'महात्मा' ही पदवी स्वयंस्फूर्तीनेदिली. त्यानंतर काही दिवसांतच फुलेंना अर्धागवायूच्या व्याधीने ग्रस्त झाले आणि त्यातच त्याचे २८ नोव्हेंबर, १८९० रोजी निधन

झाले. परंतू त्यांनी दलित, शोषित, गरीब स्त्रिया या सर्वांसाठी केलेल्या कामामुळे ते आज ही जिवंत आहेत. त्यांच्या त्या कार्यामुळे समाजातील सुधारणा करण्याचे कार्य अनेक लोकांना प्रभावित झाले होते. म्हणून महात्मा फुलेंनी आपला जन्मभर जी कार्य केले आहेत त्यात जातीय सलोखाच निर्माण केला आहे.

**महात्मा फुले यांचे कार्य :**

महात्मा फुले यांनी जो राष्ट्रवाद मांडला ते सर्वसमावेश असे होते. तसेच त्यांनी केलेले प्रत्येक कार्य हे भारतीय समाजातील जात व धर्मातील जातीय सलोखा निर्माण करणे व बहुजनवादी राष्ट्रवाद प्रस्थापित करणे हाच उद्देश होता.

**१) धर्मविषयक विचार :**

स्कॉटिश मिशनच्या शाळेत गेल्यापासूनच जोतीरावांच्या धर्मचितनाला चालना मिळाली होती. ख्रिस्ती धर्मातील एकेश्‍ववादाने आणि ख्रिस्तप्रणीत मानवतावादाने त्यांना प्रभावित केले होते. त्यामुळे हिंदू धर्मामधील उणिवावर नेमके बोट ठेवून पर्यायी धर्मव्यवस्थेचे रूप रेखाटन ही त्यांनी केले. जोतीराव स्वत: नास्तिक नव्हते. परंतू निर्मिक या नावाने सृष्टीकर्त्याचा उल्लेख करतात. त्यांनी धर्मकल्पना आपल्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात मांडली आहे. परंतू १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर अनेक व्याख्याने पुस्तीका याच्या माध्यमातून हिंदू धर्मातील अनिष्ठ प्रथा, रूढी, परंपरा इ. विरूद्ध आवाज उटवित होते. हिंदू धर्मातील मूर्तीपूजेला त्यांचा विरोध होता. सनातनवादी लोकांनी स्वत:च्या स्वार्थासाठी केलेले थोतांड आहे, असे त्यांचे मत होते. ब्राह्मणवादामुळे धर्माला बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. कर्मकांड देवभोळ्या समजूती अंधश्रद्धा याचे प्राबल्य वाढलेले आहे. हिंदू धर्मातील वर्णवर्चस्व विषमता उच्चवर्णियाचे विशेष अधिकार, शुद्रावर लादलेले, अन्यायी निर्बंध दूर केले पाहिजे अशी भूमिका फुलेंनी मांडली आहे. जोतीरावांच्या धर्मसुधारणा विषयक प्रयत्नांचे स्वरूप येथील समाजरचनेतील विषमता पोषक मूख्यता उखडून फेकून समाजाची सर्वांगिण पुनरर्चना पर्यायी संस्कृतीच्या आधारावर करणे असे दुहेरी होते.

**२) स्त्रियांसंबंधीचे कार्य :**

१९ व्या शतकात स्त्रीयांची स्थिती शूद्रातिशूद्र प्रमाणेच होती. स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रीयांना विधवा विवाह करण्याचा अधिकार नव्हता. बालविवाहाची प्रथा होती. त्यामुळे फुलेंनी स्त्रीयांचा उद्धार करण्यासाठी स्त्रीशिक्षण, विधवा पुर्नविवाह व बालहत्या प्रतिबंध गृह इत्यादी कार्यांवर भर दिला. ब्राह्मणवादी विचारांना विरोध केला आणि स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले.

१८४८ साली पुण्यामध्ये मुलींसाठी पहिली शाळा बुधवारपेठेतील भिडेंच्या वाड्यात सुरू केली. या शाळेत सर्व जातीच्या मुलींना शिक्षण देण्याचे काम फुले करत होते. सावित्रीबाईंना शाळा शिकवून त्यांना शिक्षकाचे कार्य करण्याचे फुले यांनी सांगितले. पुढे नानासो चिपळूणकर यांच्या वाढ्यात ३ जुलै १८५१ रोजी व १७ सप्टेंबर १८५१ रास्तापेठ व १५ मार्च १८५२ मध्ये वेताळपेठेत मुलींसाठी शाळा सुरू केल्या.

महात्मा फुलेंना ब्राह्मणदेष्ठे, ब्राह्मणांचे शत्रू म्हंटले जात होते. परंतु याच फुलेंनी ब्राह्मण विधवेच्या बाबतीत केलेले कार्य पहाता त्यांनी आपल्यावरील हा आरोप खोटा ठरविला. स्त्रियांचे सामाजिक स्तरातून आयुष्य चांगले व्हावे यासाठी फुलेंनी विधवा पुर्नविवाहाचा पुरस्कार केला. त्या काळात विधवांचे मुंडण करून त्यांना विद्रुप केले जात. पांढरे वस्त्र परिधान करावे, घराबाहेर पडू नये, असे अनेक निर्बंध घातले होते. यासाठी विधवा पुर्नविवाहाचे कार्य सूरू केले. त्यांनी १८६४ मध्ये पुण्यात गोखलेंच्या बागेत एका विधवा ब्राह्मण मुलींचा पुर्नविवाह घडवून आणला.

जोतीरावांनी विधवांच्या कार्यपद्धती प्रश्नासंबंधी वेगळ्याच प्रकारची वापरले. तरूण विधवा ब्राह्मण स्त्रियांचे पाऊल वाकडे पडले किंवा कोण्या पुरूषांच्या वासनेला बळी पडून जर गर्भारपण त्याच्यावर लादले गेले तर आत्मघात किंवा भ्रुणहत्या याखेरीज तिसरा मार्ग त्यांना उपलब्ध नव्हता. म्हणून १८६३ साली त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली आणि त्यासंदर्भात मोठमोठाली पोस्टर्स गावभर सर्वत्र लावली. अडचणीत सापडलेल्या विधवांनी तेथे यावे. आपल्या मुलांना जन्म द्यावा. त्यांची नावे जाहीर होणार नाहीत. आपले मुले येथे ठेवा किंवा ठेवू नका अनाथश्रमात त्यांच्या मुलांचे संगोपन केले जाईल अशी सोय फुलेंनी केली होती. महात्मा फुलेंनी सुरू केलेले बालहत्या प्रतिबंधगृह हे भारतातील पहिले गृह होते.

### ३) अस्पृश्यता निवारणाचे कार्य :

भारतातील अस्पृश्यता ही एक वाईट प्रथा होती. १९ व्या शतकात तर ती अधिक तीव्र बनली होती. हिंदू धर्मातील उच्चवर्णियांकडून अस्पृश्यांना अत्यंत हीन दर्जाची वागणूक देत होते. पेशवेकाळात अस्पृश्यांना दुपारी १२ वाजता सूर्य डोक्यावर आला की घराबाहेर पडण्यासाठी मुभा असे. गळ्यात मडके व कमरेला झाडू बांधून रस्त्यावर फिवावे लागे. असे अनेक प्रकारे दलितांचे, अस्पृश्यांचे शोषण करीत होते. महात्मा फुलेंनी अस्पृश्यांना निवारण्याचे मूलगामी विचार मांडून त्याला खऱ्या अर्थाने व्यवहारात प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. आपल्या वृत्तीने व कृतीने अस्पृश्यता निवारम्याच्या कार्याला विधायक वळण दिले. कारण पुण्यामध्ये अस्पृश्याना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत होता. त्याच्यासाठी कोठेही पाण्याची टाकी किंवा हौद बांधण्यात आले नव्हते. त्यांना मैलोमैल जाऊन

पाणी आणावे लागत होते. त्याच्यासाठी फुलेंनी १८६८ मध्ये आपल्या घरचा पाण्याचा हौद अस्पृश्य मानल्या गेलेल्यांसाठी खुला केला. अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य हाती घेतले. १८५२ मध्ये वेताळपेठेत अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. त्यानंतर १८५३, १८५८ साली पुण्यात तीन शाळा सुरु केल्या. प्रतिकूल काळा असतानाही मोठ्या धाडसाने प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेला विरोध करून अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले.

### ४) समताविषयक विचार :

ऐकोणीसाव्या शतकातील जगभरच्या विचारवंताना समतासंकल्पनेने प्रेरित केलेले होते. कारण हजारो वर्षापासून अस्पृश्य दलित समाजाला विषमतेची वागणूक ब्राह्मण देत आहेत. अशी जोतीरावांची भूमिका होती. त्यामुळे जोतीरावांनी समाजरचनेची ही सगळी उत्पती तर्कदृष्ट्या असार्वत्रिक आणि म्हणून खोटी ठरवून उडवून लावली आहे. जातीव्यवस्थेमुळे विषमता निर्माण होते त्यासाठी फुलेंनी सामाजिक विषमतेचे उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. स्त्री, शूद्रातिशूद्र, विधवेचे केशवपन बंदी, विधवा पुर्नविवाहास बंदी इत्यादी प्रथा बंद होण्यासाठी शुद्रवर्गांनी वर्गजातिभेदावर उभी असलेली ब्राह्मणशाही संरजामशाही रचना मोडून टाकली आणि सत्यधर्माच्या, समताधिष्ठित, सर्वसमावेशक असा समाज निर्माण व्हावा असे मत मांडले. त्याच बरोबर स्त्री आणि पुरूष दोघांनाही एकाच निर्मीकाने निर्माण केले असून त्याने त्यांना सारख्याच अधिकाराचे हाती केले आहे. सबब ----- त्यांच्यात मुळीच स्थान असता कामा नये, परस्परांच्या हक्काबद्दल त्यांनी आदर बाळगायला हवा. सर्व मानवप्राणी एकाच ईश्वराची लेकरे असल्यामुळे त्याचे सर्व हक्क ही समान असले पाहिजेत आणि त्यांनी एकमेकांना बंधुभाव आचरणात आणावा अशी शिकवणूक फुलेंनी सत्यशोधक समाजाद्वारे जनतेला दिली. अस्पृश्यतेच्या प्रश्नांचा मूलगामी उहापोह जोतीरारांनी केला आहे. महार या शब्दाची महा + अरी अशी व्ल्युत्पती लावून असे सांगतात की शूर प्रतापी व लढवय्या समाजाचा स्वाभिमान ठेचून काढण्यासाठी हीनहीन करून टाकण्यासाठी आग्रभटानी अतिशुद्र ठरवून टाकले आहे. त्यामुळे समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी जाती व्यवस्था नष्ट केली पाहिजे.

### ५) शिक्षण विषयक विचार :

महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. शिक्षणाच्या अभावी माणूस नैतिक, बौद्धिकदृष्ट्या पंगू तर होतोच शिवाय व्यावहारिक क्षेत्रातही पीछेहाट होते. स्त्री शुद्रातिशुद्रांच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने अग्रक्रमाने स्विकारावी असे आव्हान त्यांनी केले. पण केवळ शासनाला आव्हान करूनच थांबले नाहीत तर स्वत:च मुलींसाठी व महारमांगासाठी शाळा काढून त्या वर्गात जाणीवजागृती करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले होते. बहुजन समाजाची प्रगती शिक्षणाशिवाय होणार

नाही शिक्षण हेच एक असे प्रभावी साधन आहे की ज्यामुळे अस्पृश्यता अज्ञान दूर होईल. भारतात शिक्षणाचा प्रसार पाहण्यासाठी भारतीय सरकारने त्या काळात विल्यम हंटर या समितीचे अध्यक्ष होते. या हंटर आयोगासमोर १८८२ मध्ये साक्ष देताना फुलेंनी मांडलेले विचार हे चिंतनिय व दृष्टेपणाचे होते म्हणून सरकारने कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष पाहिजे १२ वर्षाच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत दिले पाहिजे असे सांगणारे पहिले भारतीय म्हणून महात्मा फुलेंचा उल्लेख करता येईल.

**६) सत्यशोधक समाजाची स्थापना :**

सामाजिक सुधारणेसाठी शुद्रतिशुद्राची स्थिती सुधारणेसाठी महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर, १९७३ रोजी पुणे येथे केली. या समाजाचा मुख्य उद्देश धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हा होता. सार्वजनिक सत्यधर्म व गुलामगिरी या दोन पुस्तकात फुलेंनी सत्यशोधक समाजाबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. या समाजाची मुख्य तत्त्वे म्हणजे सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. परमेश्वर त्याचा आईबाप आहे. ईश्वर एकच असून तो निर्गुण व निराकार आहे. परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे आई अगर बापाला भेटण्यास मध्यस्थाची गरज नसते. त्याप्रमाणेच परमेश्वराची प्रार्थना करण्यात पुरोहिताची आवश्यकता नसते असे तत्व सत्यशोधक समाजाचे होते.

**७) शेतकऱ्याविषयीचे कार्य :**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशाची भरभराट व समृद्धी ही शेतकऱ्यावर अवलंबून आहे परंतू शेतकरी सुखी, समाधानी का नाही त्याच्या मागासलेपणा, दारिद्र्य या अनेक शेतकऱ्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी महात्मा फुले यांनी १८८३ मध्ये शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ लिहिला. शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षण द्यावे यासाठी सरकारने खास प्रयत्न करावेत. शेतकऱ्याच्या मुलांसाठी शहरात वस्तीगृहे उभारावीत, व्यावसायिक शिक्षण द्यावे असी सूचना केली आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी इंग्लडच्या राणीचे पूत्र ड्यूक ऑफ कॅनॉट याच्याशी बोलण्याची संधी मिळाली तेव्हा शेतकऱ्याच्या मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळावे अशी व्यवस्था करा असा निरोप राणीसाहेबांना कळवा अशी भूमिका मांडली.

एकूणच वरील सर्व कार्याचा विचार केला तर महात्मा फुले यांनी समाजातील प्रत्येक वर्गासाठी कार्य केले आहे. विशेषत: ज्या भारतीय समाजाने ज्यांना हीनतेची वागणूक देत होते त्यांना आपल्यामध्ये समावून घेण्याचे कार्य केले. त्यांनी अस्पृश्यता, शुद्रातिशुद्र, शेतकरी वर्ग, स्त्रीया यांच्याबद्दल तसेच

शिक्षणाबद्दलची भूमिका मांडली आहे. यातून भारतीय राजकारणाचे कोणत्याही प्रकारचे जातीय दंगे घडले नाहीत. त्यांना हिंदू धर्मातील व ब्राह्मणवादी तत्वाना विरोध केला परंतू त्यांनी ईश्वराला नाकारले नाही मात्र समाजातील तळागाळातील जनतेला आपल्या बहुजनवादी राष्ट्रवादामध्ये सामावून घेतले आहे. त्याचबरोबर समाजात कोणत्याही प्रकारची तेढ निर्माण होण्यासारखे विधान फुलेंनी केला नाही. परंतू सुरूवातीला महात्मा फुलेंचे अस्पृश्यासंबंधी कार्य करताना त्यांना शाळेमध्ये मुलींना पाठविताना ब्राह्मणांनी अनेक अडथळे निर्माण केले. त्यामुळे फुलेंनी सरकारी शाळांमध्ये किंवा महाविद्यालयामध्ये अस्पृश्यता, जातीभेद, धर्मवाद नष्ट व्हावे यासाठी प्रयत्न केले आहे. म्हणून त्यावेळी तुम्हाला मदत केल्याची भावना व्यक्त करतात. परंतू समाज एकत्रित ठेवण्याचे काम महात्मा फुलेंना महत्त्वाची वाटत होती. त्यामुळे राजकारण आणि जातीय सलोखा या दोन्ही गोष्टी एकमेकावर अवलंबून असल्याचे वाटले तरीही आजच्या परिस्थितीत समाजातील संघर्ष मिटविण्याच्या संबंधाने महात्मा फुले यांनी अनेक पुस्तकाद्वारे समाजापर्यंत पोहचण्याची कृती केली. त्याद्वारे भारतात जातीय सलोखा निर्माण होण्यासाठी महत्त्वाचे आहे.

### ४.२.२ राजर्षी शाहू महाराज

**जीवन परिचय**

कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी यांना इंग्रजांनी वेडसर ठरवून अहमदनगरच्या जिल्ह्यात कैदेत ठेवले होते. त्यांचा मृत्यु झाला. त्यांना औरसपुत्र नसल्याने त्यांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव यांना दत्तक घेतले. छत्रपती शाहूंचे नाव यशवंतराव घाटगे होते. ते आबासाहेब घाटगे यांचे पुत्र त्यांच्या आईचे नाव राधाबाई त्यांनी यशवंतरावांना चांगले वाढवले. दोघांच्या पोटी यशवंतरावांचाजन्म २६ जून १८७४ रोजी झाला.

शाहू महाराजांचे प्राथमिक शिक्षण घरातच झाले, तर पुढे इ.स. १८८५ मध्ये त्यांना राजकोट येथील राजकुमारासाठी असलेल्या कॉलेजात प्रवेश घेण्यात आला. तेथे चार वर्षे शिक्षण घेतल्यानंतर कोल्हापूरमध्ये युरोपीय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राज्य कारभार इतिहास, इंग्रजी, संस्कृत भाषा इत्यादी विषयाचे अध्ययन केले. इ.स. १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानाची अधिकार सूत्रे आपल्या हाती घेतली.

शाहूंचा कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सुत्रे देण्याचा समारंभ गव्हर्नर लॉर्ड हॅारिस यांच्या उपस्थितीत २ एप्रिल १८९४ रोजी झाला ब्रिटीश शासनाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ त्यांनी घेतली. त्याचप्रमाणे काही सनदा, करार, मदार यांचे पालन करण्याची प्रतिज्ञापूर्वक घोषणाही केली. त्या दिवसापासून ते छत्रपती झाले. शाहू गादीवर आले त्यावेळची संस्थानाची स्थिती फारशी चांगली नव्हती. त्यांनी संस्थांनाचे प्रमुख या नात्याने लोकोपयोगी कामे केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यावर शाहू महाराजांनी भर दिला समाज सुधारणेच्यादृष्टीने त्यांनी जनहिताचे अनेक कायदे केले. अस्पृश्य व दुर्बल घटक यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. मधूमेह आणि हृदयरोगामुळे शाहूंची प्रकृती खुपच ढासळली व ६ मे, १९२२ रोजी वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी ते अनंतास विलीन झाले.

**शाहू महाराजाचे कार्य :**

शाहू महाराजाने समाजातील अस्पृश्यता निवारण, शिक्षण स्त्रीयांचे उद्धारकर्ते सामाजिक समता बंधुतेची भावना इत्यादीसाठी कार्य केले आहेत.

**१) अस्पृश्यता निवारण :**

अस्पृश्यता ही भारतीय समाजातील एक वाईट प्रथा होती. जेव्हा शाहू महाराजांनी ब्राह्मणांचा वर्चस्ववादी धोरण पाहिले तेव्हा ज्या शुद्रातिशुद्रांना पशुतुल्य जीवन जगण्यास भाग पाडले होते. त्यांच्या वेदना महाराज समजू शकले, ब्राह्मणशाही विरूद्धच्या झगड्यात या शुद्रातिशुद्रांना प्रथम मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करावयास हवे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. त्यामुळे त्यांनी अस्पृश्याना शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय अस्पृश्यांतील हुशार विद्यार्थ्यांना दरबारकडून वेळोवेळी खास शिष्यवृत्ती देण्यात येऊ लागले. अस्पृश्यांना वेदाची संथा देण्यात आली. दलितांच्या व अस्पृश्यांवर लादण्यात आलेले अमानुष असा हजेरीच्या पद्धतीचे निमूर्लन करण्यात आले. असे अनेक अस्पृश्यांबाबतचे निर्णय घेतले. त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्यात आले. त्यामध्ये महार वतन रद्द करणे, अस्पृश्य नोकरी करीत असलेल्या ठिकाणी समतेचे वागणूक मिळावी यासाठी चार जाहीरनामे काढले त्याप्रमाणे मुनसीपालीटीच्या चेअरमनपदी अस्पृश्याची नेमणूक करण्यात आले. १९०२ साली नोकरीमध्ये ५०% जागा अस्पृश्यांना राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला.

**२) शैक्षणिक कार्य :**

शाहू महाराजांनी शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी जातवार वसतिगृह काढली.तसेच म. फुल्यांनी शुद्रातिशुद्र मुलामुलींसाठी शाळा काढल्या प्रमाणे शाहू महाराजानी आपल्या राज्यात प्रजेसाठी प्राथमिक शिक्षण व मोफत व सक्तीचे करणे या विषयावर विचार करीत

होते. पुढे त्यांनी २१ सप्टेंबर, १९१७ रोजी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला साधारणपणे ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा सुरू केली होती. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यासाठी ५ शाळा होत्या त्यानंतर ही संख्या २७ झाली. मागासवर्गीय शिक्षण संस्था स्थापन करायला त्यांनी मदत केली. स्त्रीयांना शिक्षणासाठी प्रोत्साहीत केले. उच्च शिक्षण मिळावे म्हणून राजाराम कॉलेजची स्थापना केली.

### ३) स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य :

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्या. विधवाचा पुर्नविवाह होत नव्हता यासाठी शाहू महाराजांनी या अन्यायी रूढीस नष्ट करण्यासाठी १९१७ च्या जुलैमध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवाच्या पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. उच्चवर्णियात राजघराणी याच्यामध्ये पडदा पद्धती सर्वत्र रूढ होती या प्रथेच्या निषेध करून स्त्रीयांच्या स्वाभाविक गुणांना वाव देण्याचे काम केले. १२ जुलै, १९१९ रोजी आंतरजातीय विवाह कायदा करण्यात आले. १९१९ मध्ये स्त्रियांनाक्रुरपणे वागवण्यात प्रतिबंध करणारा कायदा केला. इ.स. १९२० मध्ये वारसाचा व घटस्फोटाचा कायदा केला. देवदासी प्रथा प्रतिबंध करण्याचा कायदा केला. इत्यादी कायद्याद्वारे स्त्रीयांच्या जीवनाचे उद्धार करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले आहे. स्त्रीयांना शिक्षणास ही प्रोत्साहित केले आहे.

### ४) हिंदू मुस्लिम ऐक्य :

१८५७ च्या उठावात हिंदू व मुस्लिम लोक ब्रिटीशांचे राज्य उलथून टाकण्यासाठी एकत्र लढले होते. त्यामुळे यांचा विचार करून शाहू महाराजांनी हिंदू मुस्लिम यांच्यात जे विष पेरले जात आहे ते आताच नष्ट केले पाहिजे या दोन्ही समाजात परस्परांविषयी समांजस्याची व बंधुभावाची भावना कायम ठेवली पाहिजे त्यातच देशाचे हित सामावलेले आहे हा राष्ट्रभक्तीचा विचार मांडला. त्यांनी हिंदू व मुस्लिम म्हणजे एकाच राष्ट्राचे भिन्नभिन्न अवयवआहेत असे महाराजांनी म्हंटले. त्यामुळे शाहू महाराजांनी मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित मंडळींची सभा बोलाविली आणि शिक्षण प्रसारासाठी मोमेडीज एज्युकेशन सोसायटीची या संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे त्यांनी मुस्लिम बोर्डींग सुरू केले. विशेष म्हणजे स्वत: महाराज या संस्थेचे अध्यक्ष बनले. हिंदू आणि मुस्लिम या दोहोंमध्ये भावनिक व सामाजिक ऐक्य व्हावे यासाठी शाहू महाराजांनी आपल्या कारर्किदीत अनेक अभिनव उपक्रम केले. त्यापैकी एका म्हणजे एका धर्माच्या देवस्थानचे उत्पन्न दुसऱ्या धर्माच्या देवस्थानाच्या खर्चासाठी देणे हे महत्त्वाचे कार्य केले. तसेच इतर धर्मीयांच्या प्रार्थनास्थळाबद्दल व धर्मग्रंथाबद्दल आदर बाळगला. शाहुपूरीसारख्या नव्या पेठा वसवून कोल्हापूरचा विकास करताना या पेठेमध्ये

मुस्लिम प्रजाजनाना महाराजांनी त्याच्या मशिदीसाठी जागा व अनुदान दिल्याचे अनेक दाखले दफ्तरात मिळतात. राधानगरीसारखे नवे नगर वसवतानाही मुस्लिमांसाठी देवस्थाने त्यांनी बांधून दिली. शाहू महाराजांनी मुस्लिमांच्या पवीत्र कुराणाचे मराठीत भाषांतर करण्याचे काम तज्ज्ञांकडे सोपविले होते ते दुर्देवाने होऊ शकली नाही. १९१७ साली शाहू महाराजांनी एक आदेश काढला त्याद्वारे जाहीर केले की, मुस्लिम समाजात काजीने अथवा त्याच्या गुमास्त्याने लावलेली लग्ने कायदेशीर मानली जातील अशी लग्ने लावली गेल्यावर त्याच्या रजिस्टर सरकारी नोंदणीचे कायद्याने बंधन घातले गेले ही गोष्ट मुस्लिमांच्या विशेषत: मुस्लिम स्त्रीयांच्या हक्काचे संरक्षण करणारी होती. शाहू महाराजांनी संस्थानातील सामान्य मुस्लिम समाजातील गुणी लोकांना उदार राजाश्रय दिला. त्यामध्ये शाहीर, लहरी, हैदर, चित्रकार, आबालाल रहिमान अल्लादिया खाँसाहेब इत्यादीचा समावेश होतो. कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी गोहत्या बंदीचा कायदा अंमलात आणूनही उभय समाजात कधी दंगली तर झाल्या नाहीतच पण तणावही निर्माण झाले नाहीत. एवढेच नव्हे तर मुस्लिमांच्या मोहरममध्ये हिंदू मोठ्या संख्येने उत्साहाने भाग घेत, गणेश उत्सव व मोहरम हे दोन्ही सण एकाच वेळी येत तेव्हा कोल्हापूरात तालमीसारख्या सार्वजनिक ठिकाणी गणेणमूर्ती व मोहरमचे पंजे एकत्र बसविले जात आणि तिच परंपरा आजही कोल्हापूरात पाळली जाते.

रा. शाहू पुरोगामी राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. स्वराज्यास त्यांचा पाठींबा होता पण त्यांना असे स्वराज्य हवे होते ज्यात जातिभेद व जातिद्वेष नसेल. सर्व समान असतील. एका जातीच्या हातात सत्ता जाणार नाही. त्यासाठी त्यांनी ---- स्वप्नांचा पुस्कार केला.

अशा प्रकारे शाहू महाराजांनी जे कार्य केले यामुळे बहुजनांचा विकास आणि जातीय सलोखा निर्माण झाले आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर असे दिसून येईल की, भारतात वेगवेगळ्या ठिकाणी जातीय दंगे निर्माण होत असेल तरी कोल्हापूरात हिंदू मुस्लिम समाजात दंगे निर्माण झाले नाहीत आणि त्याची झळही पोहचले नाही. त्यामुळे कोल्हापूरातील हिंदू-मुस्लिम ऐक्य ही परंपरा देशाला आदर्श ठरू शकेल.

### ४.२.३ सयाजीराव गायकवाड

**जीवन परिचय :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरातमधील बडोदा या संस्थानचे राजे होते. ११ मार्च, १८६३ रोजी सयाजीरावांचा जन्म झाला. नाशिक जिल्ह्यातील कवकाणे हे त्यांचे मुळ गाव. त्यांचे वडील काशीराव गायकवाड हे आपल्या कवकाळणे या गावी शेतीचा व्यवसाय करीत होते. काशीरावांना आनंदराव गोपाळराव व संपतराव असे तीन मुले होते. त्यांच्या घराण्याचा बडोद्याच्या गायकवाड

घराण्याशी दुरचा संबंध होता. बडोदा संस्थानाचे राजे खंडेराव गायकवाड यांचे १८७० मध्ये निधन झाले. पुढे खंडेराव गायकवाडांच्या विधवा पत्नी जमनाबाई यांनी हिंदूस्थानाच्या सरकारकडून दत्तक घेण्याचा अधिकार मिळविला. त्यानुसार जमनाबाईंनी कवणाणेचे काशीराव गायकवाड यांचा मुलगा गोपाळराव यास २७ मे, १८७३ रोजी दत्तक घेतले आणि त्यांचे नाव सयाजीराव असे ठेवले.

अशा प्रकारे सयाजीराव बडोदा संस्थानचे राजे बनले. सयाजीरावांचे सर्वबालपण खेडेगावत गेले होते. तेथील वातावरणामुळे आणि घराच्या गरिबीमुळे त्यांना लहान वयात शिक्षणाची संधी मिळाली नव्हती, तेव्हा बडोद्यात आपल्यावर त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. अल्पावधीतच त्यांनी मराठी, इंग्रजी, गुजराती व उर्दू भाषांचे शिक्षण पूर्ण केले. तसेच अश्वारोहण, राजघराण्यातील रीतिरिवाज, राज्य कारभारातील बारकावे इत्यादी गोष्टीही त्यांनी आत्मसात केल्या. बडोदा संस्थानचे त्या वेळचे दिवाण राजा सर, ही माधवराव यांच्याकडून त्यांना राजकारणाचे शिक्षण मिळाले. सयाजीराव गायकवाड यांच्या राज्यारोहण समारंभ २८ डिसेंबर १८८१ रोजी झाला यांनी एकंदर चौसष्ट वर्षे राज्य केले. पण आपल्या हाती आलेल्या सत्तेचा वापर त्यांनी सदैव प्रजेच्या कल्याणासाठीच केला. आपल्या कारर्किर्दीत त्यांनी बडोदा संस्थानात अनेक सुधारणा घडवून आणल्या. अनेक लोकोपयोगी कामे केली. गरजू व लायक व्यक्तींना अनेक प्रकारे सहाय्य केले. आपल्या राज्यातील गोरगरीब प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन एक प्रजाहितदत्र राजा असा लौकिक त्यांनी संपादन केले. ६ फेब्रुवारी, १९३९ रोजी मुंबई येथे सयाजीरावांचे निधन झाले.

**सयाजीराव गायकवाड यांचे कार्य :**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानातील राज्यकारभार व्यवस्थितरीत्या चालविले. राज्याच्या न्यायव्यवस्थेतही त्यांनी सुधारणा केल्या. एवढ्यावरच संतुष्ट न होता सयाजीरावांनी लोककल्याणासाठी अनेक विविध योजना हाती घेतल्या व त्या यशस्वीरीत्या पार पाडल्या.

**१) शिक्षण विषयक कार्य :**

सयाजीराव गायकवाड यांनी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १८९१ साली ग्रामशाळा उघडण्याचा आदेश दिला. विशेषत: बहुजन समाज व मागास वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यास त्यांनी प्राधान्य दिले. त्याकरीता १८९३ साली बडोदा संस्थानात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणयोजनेची सुरूवात करून त्या योजनेची व्याप्ती वाढवीत नेले आणि १९०६ मध्ये संपूर्ण संस्थानात ती अमंलात आणली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे शिक्षण देणारे भारतातील बडोदा संस्थान हे पाहिले राज्य म्हणून मान्याता मिळविली. त्याचबरोबर अस्पृश्यांसाठी जवळजवळ २८८ शाळा काढल्या. एकूण शाळेची संख्या ४४४ असून त्यापैकी ३५ शाळा खास मुलींकरीता होत्या. त्याचबरोबर अस्पृश्य व इतर

विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे पालन केले. तसेच शिक्षणाशिवाय पर्याय नाही व वाचन केल्याशिवाय नवा विचार किंवा दृष्टी प्राप्त होणार नाही म्हणून गावोगावी वाचनालये काढण्यात आले. सन १८९० मध्ये त्यांनी कलाभुवन ही संस्था स्थापन करून तंत्रशिक्षणाला ही चालना दिली. शिष्यवृत्ती योजनेतून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ. आंबेडकर यांसारख्या महान व्यक्तींना लाभ मिळाला होता.

२) **स्त्री उद्धाराचे कार्य :**

सयाजीराव गायकवाड यांनी स्त्रियांच्या उन्नतीकडे फार लक्ष दिले होते. लहानपणी लग्ने झाल्यामुळे सर्व आयुष्याची नासाडी होते त्यामुळे मुलामुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविली त्याचप्रमाणे विधवा विवाह कायदा हा घटस्फोटाचा कायदाही पास केला होता. कारण स्त्रियांना होत असलेल्या छळापासून बचाव करण्याचा कायदेशीर हक्क हवे होते. त्यामुळे अशाप्रकारचे कायदे करण्यात आले. त्याचबरोबर मिश्रविवाहाला मान्यता, विधवा विवाहाला मान्यता, अस्पृश्यताबंदी, कन्या विक्रय बंदी, पडदा पद्धती बंदी, बालविवाह बंदी असे अनेक कायदे करून स्त्रियांना मानसिक शारीरिक त्रासातून सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य महाराजा सयाजीरावांनी केले आहे. त्यांना शिक्षणाची दारे उघडे करून त्याच्यासाठी पुष्कळ पैसा खर्च केला आणि स्त्रियांना सुरक्षित करण्याची व्यवस्था निर्माण केली.

३) **अस्पृश्यता निवारणाचे कार्य :**

बहुजन समाज हा अतिशय हीन, गरीब स्थितीत असतो त्याला शिक्षण द्यावयास लावावयाचे म्हणजे त्याच्याकरीता नुसत्या शाळा काढून उपयोगाच्या नाहीत तर त्याला मोफत शिक्षण दिले पाहिजे हे महाराजांनी जाणले होते. म्हणून अस्पृश्य आणि आदिवासी मुलांसाठी सरकारी खर्चाने शाळा व मुलांना राहण्यासाठी वसतिगृह सुरू केले. कायद्याने मागासलेल्या मुलांसाठी आणि आदिवासी मुलांसाटी शिक्षण देण्याचा हुकूम काढणारे महाराज सयाजीराव हे जनकल्याणाचा ध्यास घेणारे पहिले राजा ठरले. समाजामध्ये अस्पृश्य समाजाला धर्म विधी व वेद अभ्यास करण्याचा अधिकार नव्हता त्यामुळे अस्पृश्य समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी व ब्राह्मणेतरांसाठी पहिली वेदशाळा सुरू करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला. ते सुरू ही केले व काही काळाने बंद पडली. हरिजन मुलांना शिक्षण मोफत एवढेच नव्हे तर पुस्तक आणि शालेय साहित्य हे विनामूल्य पुरवणे सुरू केले. दलित वर्गातील विद्यार्थ्यांना धार्मिक

शिक्षण घेण्यासाठी उत्तेजन मिळावे म्हणून बिर्ला निधीची तरतूद करण्यात आली होती. सफाई कर्मचाऱ्यांसाठी भविष्यनिर्वाह निधी योजना लागू करण्यात आली होती. एकूणच अस्पृश्याना निवारणासाठी त्यांना वेगवेगल्या प्रकारे मदत करून समाजजीवन उंचावण्याचे कार्य महाराजांनी केले.

**४) धर्मविषयक विचार :**

महाराजांच्या मते खरा धर्म अभागी आणि दु:खी लोकांची काळजी घ्यावयाला आणि त्यांना सुखी करायला सांगतो. सर्व लोकांबद्दल सदभाव बाळगायला शिकवतो. त्यामुळे प्रत्येक धर्मातील लोकांनी परस्परांच्या धर्माचा आणि चालीरीतीचा अभ्यास केल्यानेच खरोखर आपल्या ही विचारात आणि वर्तनात सुधारणा होऊ शकते कारण वेगवेगळ्या धर्मातील सामान्य तत्वाचा विचार करून आपल्या शील संवर्धनासाठी त्या तत्वाचा वापर करावा असे महाराजांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी ख्रिस्ती महमदी बौद्ध जैन हिंदू या सर्व धर्मातील सर्वात इतकी उज्वल समान तत्वे आहेत की, ती एकत्र करून सर्वांना मान्य होईल असा विधी संग्रह किंवा कोड निर्माण करता येईल अशी भूमिका महाराजांनी मांडली आहे. परंतु धर्मा धर्मामध्ये जे संघर्ष निर्माण होत आहेत त्यासाठी महाराजांनी समाजामध्ये नीती परोपकार व बंधुभाव वाढविण्याची गरज आहे असे स्पष्ट केले आहे त्यामुळे धर्माधर्मातील संघर्ष कमी होऊन जातीय सलोखा निर्माण होईल.

अशाप्रकारे सयाजीराव गायकवाड यांनी समाजातील अस्पृश्यता निवारण स्त्रीयासंबंधीचे कार्य केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षणाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्यांनी संस्थानातून जास्तीत जास्त खर्च हा शिक्षणावर केल्याचे दिसून येते एकूणच समाजामध्ये कोणात्याही प्रकारचे संघर्ष निर्माण न होता सर्व जाती धर्माच्या लोकांना चांगल्या प्रकारे शिक्षण देणे त्यांच्या जीवनमान उंचाविणे हे कार्य सयाजीराव यांनी केले आहे. यातील महत्त्वाचे म्हणजे त्यांना लहानपणी शिक्षण मिळाले नव्हते ते संस्थानात दत्तक गेल्यानंतर त्यांच्या शिक्षणास सुरूवात झाली म्हणून सयाजीराव यांनी शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. एकूणच त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील समाज सुधारणा चळवलीला चालना मिळाली. त्याचबरोबर शाहू महाराजांनी जे कार्य केले ती सर्व कार्ये सयाजीराव गायकवाड यांनी केले आहे. सयाजीरावांनी अस्पृश्य, दलित स्त्रीया यांच्या उद्धारासाठी आपल्या राजपदाचा वापर केला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून १९०४ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला होता. त्यामुळे सयाजीराव गायकवाड यांचे कार्य बहुजन राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी आणि जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

### ४.२.४ विठ्ठल रामजी शिंदे

**जीवन परिचय :**

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी प्रतिष्ठित मराठा कुटुंबात जमखंडी येथे झाला. सध्या जमखंडी हे कर्नाटकात आहे येथे संस्थान होते. जमखंडी गाव डोंगराच्या कुशीत वसलेले असून येथे कन्नड व मराठी या दोन्ही भाषा बोलल्या जात असल्यामुळे येथे कर्नाटक व महाराष्ट्र या दोन्ही संस्कृतीचा मेळ होता. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आईचे नाव यमुनाबाई व वडीलांचे नांव रामजी होते. घरची श्रीमंती कमी झाल्यामुळे रामजी यांनी जमखंडी संस्थानात काही काळ शिक्षक म्हणून तर काही काळ कारकूनी स्वरूपाच्या पदावर नोकरी केली. विठ्ठल रामजी शिंदे यांचा विवाह लहानपणी म्हणजेच वयाच्या नवव्या वर्षी त्यांच्या आत्याची मुलगी रूक्मिणीबाई यांच्याशी झाला. त्यांचे प्राथमिक व हायस्कूलचे शिक्षण जमखंडी येथे झाले. हायस्कूलमध्ये त्यांना उत्तम क्षिक लाभले. हायस्कूलच्या काळात मराठी, इंग्रजी आणि संस्कृत साहित्याचा त्यांना चांगला परिचय झाला. १८९१ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण झाले. इ.स. १८९२ साली जमखंडी हायस्कूलमध्ये काही दिवस त्यांनी शिक्षकाचे काम केले. पुढे उच्चशिक्षणासाठी इ.स. १८९३ ते १८९८ पर्यंत पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये शिक्षण घेऊन बी.ए. ची परिक्षा पास झाले. इस.स. १८९९ व १९०० मध्ये एल.एल.बी. च्या अभ्यासासाठी शिंदे मुंबईला जाऊ लागले तेथे प्रार्थना समाजाशी त्यांचा अधिक संपर्क आला आणि त्यामुळे ते प्रार्थना समाजी बनले व पुढे १९०१ साली न्या. रानडे व भांडारकरांनी महर्षी शिंदेना मँचेस्टरला धर्मशास्त्राच्या शिक्षणासाठी पाठविले. त्यावेळी सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. १९०३ पर्यंत मँचेस्टरला धर्मशास्त्राचा अभ्यास केल्यानंतर प्रार्थना समाजाने महर्षी शिंदेना १९०३ साली प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून नेमले. बडोद्याच्या दिवाणपदाची नोकरी न स्विकारता त्यांनी आयुष्यभर उदारधर्माचा प्रचार आणि दीनदुबळ्याच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित केले. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना केली. शिंदे यांनी काढलेले हे मिशन म्हणजे अस्पृश्यवर्गाची सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी व हिंदू समाजातील अस्पृश्यतेची रूढी नष्ट करण्यासाठी अखिल भारतीय पातळीवर कार्य करू पाहणारी पहिलीच संस्था होय. अस्पृश्यता निवारण हा राष्ट्रसभेमध्ये १९१७ साली ठराव मंजूर करून हे राष्ट्रीय सभेच्या कार्याचा भाग बनविला. इ.स. १९१८ मध्ये मुंबईला अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद घेऊन या प्रश्नाचे गांभीर्य स्पष्ट केले. १९१९ साली पुणे नगरपालिकेने केवळ मुलासाठीच सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची योजना तयार केली होती. त्यावेळी महर्षी शिंदेनी मुलांप्रमाणे मुलींना सक्तीचे मोफत शिक्षण मिळावे

यासाठी चळवळ केली. १९२० साली पुण्याहून कायदे कौन्सिलची निवडणूक लढविली. १९२६ पासून शेतकऱ्यांच्या अनेक परिषदामधून भाग घेऊन त्यांच्या चळवळीला मार्गदर्शन केले. महात्मा गांधींच्या १९३० सालच्या चळवळीमध्ये भाग घेतले. त्यासाठी त्यांना सहा महिन्याचा तुरूंगवास झाला. तुरूंगवासातून बाहेर पडल्यानंतर शिंदे यांची प्रकृती बिघडली. वाई येथील ब्राम्हसमाजी मंडळीच्या समवेत आजूबाजूच्या ग्रामीण परिसरात सातत्याने दौरे काढून अस्पृश्यता निवारणाचे आणि उन्नत धर्मप्रसाराचे कार्य केले. अखेर २ जानेवारी १९४४ रोजी त्यांचे निधन झाले.

महर्षी शिंदे यांनी धर्म, जाती निमूर्लन, अस्पृश्य निवारणासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांनी अनेक ठिकाणी भाषण केली, व्याख्याने दिले. त्यांनी समाजकारण, धर्म राजकारण यावर चिंतन केले आहे. त्यांच्या राजकीय विचारामध्ये बहुजनवाद हि महत्त्वाची विचारधारा आहे. त्यांनी बहुजन पक्षाची स्थापना केली होती. एकूणच त्यांनी बहुजन राष्ट्रवादाची मांडणी केली आहे. त्यातून जातीय सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महर्षी शिंदे यांचे कार्य :**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी ईश्वर व धर्मकल्पनेचे विचार मांडून त्यांच्या प्रचारासाठी कार्य केले आहे. तसेच अस्पृश्यता निवारण करणे, शेतकऱ्यांच्या समस्येसंबंधी लढा देणे स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी कार्य केले आहेत. सामाजिक सुधारणा व त्यातील अनेक प्रश्नांची चर्चा विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले आहे.

**१) धर्म कल्पना :**

शिंदे यांच्या घरातच लहानपणी त्यांच्यावर वारकरी उर्फ भागवत संप्रदायातील विचारांचे संस्कार झाले होते. त्यामुळे जातीभेदाला थारा न देणारे उदार स्वरूपाचे वातावरण त्यांना मिळाले. फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना आणि नंतरच्या काळामध्ये वारकरी संप्रदायाशी जुळणाऱ्या प्रार्थना समाजाकडे ते आकृष्ट झाले. प्रार्थना समाजाचे प्रचारक पद स्विकाल्यानंतर शिंदे धर्मविषयक व ईश्वर विषयक विचार वेगवेगल्या ठिकाणी दिलेल्या व्याख्यानामध्ये व लिखानामध्ये मांडले आहेत. शिंदे यांच्या मते, ईश्वर हा कोणी शरिरविशिष्ट व्यक्ती नसून सर्वव्यापी शुद्ध चैतन्य आहे, तो केवळ गुणामय आहे. तो सुखी किंवा दुःखी नसून केवळ सुखरूपच आहे. तो दयेचा प्रेरक आहे, तो प्रेमाचा प्रवर्तक आहे. माणसाला होणारे ईश्वराच्या अस्तित्वाचे आकलन बौद्धिक नव्हे तर आंतरीक प्रेरणा व भावना यातून मिळणाऱ्या अनूभवातून होते. मानवी व्यक्तित्व पूर्णत्वास नेणे दैवी योजनेत अंतर्भूतच असते, त्या योजनेला अनुकूल असे आपले वर्तन ठेवणे हाच माणसाचा आद्य व अंतिम धर्म असतो.

असा धर्म असताना सुद्धा धार्मिक कारणावरून कलह संघर्ष निर्माण होतात. कारण शिंदे यांच्या मते, कितीतरी शुद्ध, सात्विक व सुंदर तत्वे आणि कितीतरी थोर प्रयत्न धर्माच्या ठिकाणी एकवटले असले तरी त्या सर्वांवर भलत्याच अवांतर गोष्टीचे वेष्टन पडले असून त्या गौण गोष्टीनांच वेळोवेळी फाजील महत्त्व प्राप्त झाल्यामुळे आणि धर्माच्या नकाशात अनेक चित्रविचित्र रंग भरल्यामुळे हे संघर्ष निर्माण होतात अशी तक्रार शिंदे यांनी केली आहे. संघर्ष निवारण करण्यासाठी उदार उन्नत धर्माची मांडणी केली आहे. भारतात आल्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या धर्म संस्थांना भेटी दिल्या आणि त्यांनी येथील धार्मिक प्रकार पाहून त्यात सुधारणा करण्यासाठी उदार धार्मिक चळवळीमध्ये समन्वय साधणे आणि त्यांना आंतरराष्ट्रीय चळवळीशी जोडणे तसेच स्थानिक पातळीवर उदार धार्मिक चळवळ तिच्या वैशिष्ट्यासह उभी करून जनतेच्या भौतिक तसेच आध्यात्मिक कल्याणाला चालना देणे हे कार्य करण्याचे प्रयत्न शिंदेनी केला आहे. हा उदार धर्माचा पाया आध्यात्मिक असला तरी त्यात पोथीनिष्ठेला वा पुरोहित वर्गावर नव्हता तर भ्रातृभाव, सामाजिक न्याय व सामाजिक कल्याण, सामाजिक जाणीवजागृती व आंतरराष्ट्रीय हक्क या तत्वावर त्याची उभारणी झाली होती. उदार धर्माची प्रेरणा ही वैदिक धर्मात नसून भागवत धर्मात आहे आणि भागवत धर्माची प्रेरणा जैन आणि बौद्ध परस्परांमध्येच सापडते असे शिंदे यांचे स्पष्ट मत होते. समतातत्वाची प्रतिष्ठापना, अंधश्रद्धानिर्मूलन, जातिअंत, सहिष्णुता सुधारणेचा मध्यममार्ग इत्यादी चांगल्या गोष्टींसाठी बौद्धधर्माचाच मार्ग अनुसरण्याची आज गरज आहे असे शिंदे यांचे मत होते. मी बौद्ध आहे ह ते अभिमानाने सांगत असत. त्याचप्रमाणे भागवत धर्माला हिंदू-मुस्लीम, ब्राम्हण-ब्राम्णणेत्तर, स्वदेशी-परदेशी-इहलोकवादी-परलोकवादी असे दृहाची ठिगळे लावणाऱ्याच्या पदरी र्निन्ि येणार याबद्दल शिंदेना मुळीच शंका नव्हती. त्यामुळे ते धर्माचे राजकारण करण्यास विरोध केलेला दिसून येतो. शिंदे यांचा विश्‍वास होती की, जगातील सर्व उदार धर्म परस्परांच्या जवळ येतील, एकमेकांच्या सहकार्याने निरामय समाजजीवनाचे समान उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न कसोशीने करतील आणि मग धर्माधर्मातील हीण आपोआपच गळून पडेल. जमातवादाला स्थान असणार नाही असे शिंदे यांना वाटत होते. एकूणच धर्म कल्पना ही समाजातील धर्माधर्मातील जमातवाद संपुष्टात येऊन ते एकमेका सोबत एकत्रित राहतील अशी कल्पना शिंदेनी केली होती. परंतू ते आज कल्पना सत्यात आलेली दिसत नाही त्यामुळे शिंदेची धर्मकल्पना जातीय सलोखा निर्माण करण्यास किंवा होण्यास महत्त्वाचा विचार आहे.

### २) अस्पृश्यता निवारण :

अखिल भारतीय पातळीवर अस्पृश्यता निवारणाचे व अस्पृश्यवर्गाची उन्नती करण्याचे कार्य करण्यासाठी १९०६ साली विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया'

ही संस्था स्थापन केली आणि मी जात न पाळणारा मराठा आहे अशी स्वत:ची ओळख सांगणारे विठ्ठल रामजी शिंदे जातविहरीत समाज निर्माण करण्यासाठीच जन्मभर प्रयत्नशील होते. कारण माणसामाणसामध्ये भेद पाळणे हे अमंगळ आहे अशा प्रकारचा वारकरी संप्रदायाचा संस्कार त्यांच्या मनावर बालपणीच झाला होता. ज्या प्रार्थना समाजाचे अथवा ब्राम्हसमाजाचे ते अनुयाची झाले होते. त्याचे एक तत्व असे होते की, सर्व मनुष्ये परमेश्वराची लेकरे आहेत म्हणून भेद न राखता परस्परांशी बंधुभावाने वागावे. या तत्वाचे पालन करीत राहीले एवढेच नव्हे तर दीनदुबळ्या आणि पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर त्यांनी कार्य केले व त्यानुसार विचार मांडले. १९०३ साली भारतात आल्यानंतर सयाजीराव गायकवाड महाराजांनी बडोदा येथील अस्पृश्यवर्गातील मुलांसाठी असलेल्या शाळा तपासून आपले मत देण्यास शिंदेना सांगितले त्यावेळी शिंदेनी या मुलांची केवळ शिक्षणाची सोय करणे पुरेसे नाही तर शिक्षणानंतर त्यांच्या नोकरीचीही तरतूद करणे आवश्यक आहे असा अभिप्राय दिला. १९०५ मध्ये सुबोध पब्लिकेतून सामाजिक पातळीवर अस्पृश्यता मानल्यामुळे या वर्गावर कसा अन्याय होतो याचे वर्णन करून त्याची उन्नती करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. अस्पृष्यता निवारणाच्या कार्यामध्ये त्यांनी दोन भूमिका मांडली आहे. पहिली अशी आहे की, शतकानुशतके बहिष्कृत अवस्था लादल्यामुळे अस्पृश्य ठरविल्या गेलेल्या वर्गाला प्राप्त झालेला निकृष्टपणा नाहीसा करणे त्यांच्या मनात स्वाभिमान निर्माण करणे, त्यांना सुशिक्षित व उद्योगी बनविणे, व्यक्तीगत शील आणि नागरीकता या गुणांचा त्यांच्यामध्ये विकास करणे हा त्यांच्या कार्याचा भाग होतो. दुसरा म्हणजे समाजातील अस्पृश्यता नाहीशी करणे. त्यासाठी वरिष्ठ वर्णीयांच्या मनामधील अस्पृश्यतेची भ्रामक जाणीव नष्ट करणे. आवश्यक आहे अशी भूमिका मांडली.अस्पृश्यवर्गाच्या उन्नतीसाठी शाळा, उद्योगशाळा, वसतिगृहे व तत्सदृश संस्था शिंदेनी स्थापन केल्या व तसेच व्याख्याने, परिषदा, मिरवणूकी विविध प्रदर्शने इत्यादीद्वारा सामाजिक अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य केले. डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही महत्त्वाची संस्था स्थापन केली होती. त्यांच्या मते, जेव्हा सर्व लहान-थोर अश्पृश्य स्त्री पुरूष हिंदू स्पृश्यांच्या सहवासात समसमान दर्जाने सर्वच बाबतीत वारू लागतील तेव्हाच त्यांची गणना हिंदू धर्मात यथार्थ झाली असे म्हणता येईल.

### ३) स्त्रीविषयक विचार :

स्त्रियांना समाजामध्ये समान दर्जा नव्हते त्यामुळे स्त्रीयांनवर अनेक अन्यायी रूढी प्रथा, परंपरा लादल्या होत्या. मुलींना शिक्षणाचे अधिकार नव्हते १९१९ साली पुणे नगरपालिकेने मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा विचार चालविला होता त्यावेळी शिंदेनी मुलांच्या बरोबरीने मुलींनाही सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी चळवळ उभारली. बहुजनपक्ष स्थापन करून

त्याच्या जाहीरनाम्यामध्ये स्त्रीवर्गाचा समावेश केला आणि मागास राहिलेल्या वर्गाच्या हितासाठी झटण्याची भूमिका शिंदेनी मांडली. १९२५ साली शिंदेच्या प्रेरणेने कौटुंबिक उपासना मंडळ सुरू झाले. धार्मिक उपासना सहकुटुंब व्हावयास पाहिजे त्यात आई, बहीण, बायको अशा स्त्रीव्यक्तीसह सदस्य झाले पाहिजे अशी भूमिका शिंदेनी मांडली आहे. स्त्रीयांना केवळ शिष्टाचारयुक्त वागण्यात मान दिल्याने स्त्रीला समानतेने वागविले असे होत नाही तिला खरेखुरे स्वातंत्र्य दिल्याने तिची विवेचकबुद्धी आणि यत्नशक्ती यांची वाढ होऊ शकेल व घरात आणि घराबाहेर ती आपले खरेखुरे प्रेमाचे साम्राज्य चलाविल असे शिंदेनी सूचविले आहे. स्त्रीच्या सुधारणाचा त्याचे हक्क, समान दर्जाचा पुरस्कार कायद्याच्या निर्बंधातून स्त्रियांची मुक्तता करणे इत्यादी गोष्टींचा पुरस्कार शिंदेनी केला आहे. त्याचबरोबर आध्यात्मिकतेची जोड देतात त्यामुळे त्याचा स्त्रीविषयक विचार हा वेगळा आणि सखोल स्वरूपाचा आहे. अशाप्रकारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्रिविषयक विचार स्पष्ट केले आहेत.

**४) बहुजनवादी विचार :**

बहुजनवाद हा भारतीय राजकारणात परवलीचा शब्द झाला आहे तेव्हा महर्षी शिंदेच्या बहुजनवादी राजकारणाचे विचार समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण बहुजननिष्ठा आणि लोकसत्तात्मकता हे शिंदेच्या राजकारणाचे तात्विक आधार होते. त्यामुळे त्यांनी बहुजन समाजाचे मूलभूत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजाने मराठा श्रेष्ठीच्या हातातील बाहुली बनू नये, असा इशारा शिंदेनी दिला होती आणि काँग्रेसने बहुजन समाजाला आवर्जून जवळ करावे असे वारंवार आवाहन केले होते. तळागाळातील बहुजनसमाजाला स्वत:ची राजकीय ताकद निर्माण करायची असेल तर त्यांनी मराठा वर्चस्व आणि ब्राम्हणी हिंदूत्व या दोन्हीपासून दूर राहून स्व-उद्धारासाठी मार्गक्रमण केले पाहिजे अशी भूमिका शिंदेची होती. महाराष्ट्रात मराठे व अस्पृश्य या दोन्ही घटकांना सोबत घेऊन काँग्रेसने वाटचाल करावी असे शिंदेना वाटत होते. काँग्रेसने केलेल्या जागृतीमुळे कोणताच जातीगट दुखावणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी मराठा समाज महत्त्वाची भूमिका पार पाडू शकेल अशा अपेक्षेने शिंदेनी मराठा राष्ट्रीय संघ स्थापन करण्यात पुढाकार घेतला. मराठावर्ग स्वातंत्र्यविरोधी व ब्रिटिश धार्जिणा नाही हे पुण्यातील सभेमध्ये विठ्ठल रामजी शिंदेनी जाहीर केले. दुसऱ्या बाजूने शिंदे अस्पृश्यानाही काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या प्रयत्नात होते. परंतू मराठा श्रेष्ठींना अस्पृश्यता निवारणाचे महत्त्व वाटेनासे झाले होते. पण कुणयब्यानाही बरोबरीने मानायची मराठ्यांची तयारी नव्हती. यातूनच मराठा लीगची स्थापना केली आणि तिच्यातले मराठ्यांसाठी राखीव जागाची मागणी केली. त्यानुसार मुंबई प्रांतिक कौन्सिल मध्ये मराठ्यांसाठी सात जागा राखीव होत्या. परंतू शिंदे यांनी मी अशा राखीव जागावर उभा राहणार नाही अशी भूमिका घेतली. त्यांनी बहुजन समाजाच्या

विकासासाठी राजकारणाची सुरूवात केली व बहुजनपक्षाची स्थापना केली. भारतामध्ये एक पुढारलेला वर्ग आणि मागासलेला वर्ग किंवा बहुजन समाजाचा वर्ग आहे परंतू या दोन्ही वर्गात विरोध होऊ लागल्यामुळे ब्राम्हणेतर पक्ष तयार झाला परंतू त्यास बहुजनपक्ष म्हणावे असे शिंदेनी सांगितले. त्यांनी केवळ निवडणूका व पक्षीय सत्तेचे राजकारण विचारात न घेता बहुजन समाजाच्या व्यापक विकासाचा विचार त्यांना अधिक महत्त्वाचा वाटत होता. लोकशाही प्रक्रियांमध्ये बहुजनांनी सहभागी होऊन आपल्या व लोकशाही विचारांच्या कक्षा अधिक विस्तृत कराव्यात ही म. शिंद्याची इच्छा होती. यासाठी त्यांनी खालीलप्रकारे बहुजन पक्षाची रचना केली.

**म. शिंद्यांचा बहुजन पक्ष :**

म. शिद्यांनी बडोद्याच्या भगवंतराव पाळेकरांच्या 'जागृती' पेपरमध्ये बहुजन पक्षाची रचना व तिची कार्यपद्धती यावर सविस्तर लेख लिहिला. यात ते लिहितात.

**१. शेतकरी वर्ग :**

ह्यात डोईजड जमिनदारांना समावेश नसून जो आपल्या मालकीचे अथवा कौलाचे शेत आपणच वाहतो (स्वत: कसतो) आणि त्या कामासाठी पुरेशा मजूरदारांना समान दर्जाचे वेतन देऊन सांभाळतो तोच खरा अस्सल शेतकरी.

**२. शिपाई वर्ग :**

ह्यात सरदारांची गणना मुळीच नाही. पण सामान्य शिपायांचे हितसंबंध हा पक्ष राखील, कारण ते मागासलेले आहेत. कुणबी हा या सर्वांचा खरा पोशिंदा आणि मोठमोठे ऐतखाऊ जमिनदार व जहागिरदार हे केवळ त्याचे पोष्य होत. हातावर शिर घेऊन लढणारा एकांडा शिलेदार हाच खरा क्षत्रिय.

**३. शिक्षक वर्ग :**

ह्यात सोवळे शास्त्री, हक्कदार पुरोहित किंवा बलुते जोशी किंवा इतर ऐतखाऊ यांची गणना करता येत नाही. वाङ्मयाचे व्यावहारिक शिक्षण देण्यास जे कोणी लायक आहेत व जे आपल्या वृत्तीचा पिढीजात हक्क न सांगता बाजारभावाप्रमाणे चालू वेतन घेण्यास तयार आहेत. अशांची जात, धर्म काहीही असो त्यांचा हा पक्ष हितसंबंध राखील.

**४. उदमी वर्ग :**

सुतार, सोनार, शिंपी, तेली, तांबोळी, गवळी इत्यादी लहान धंदे करून राष्ट्राची सेवा करणारे जे कोणी शिक्षित व अनाधिकारी वर्ग आहेत, तेही राष्ट्राचे धारक असून त्यांचा दर्जा शेतकरी किंवा शिपाई यापेक्षा रतिभरही कमी नाही.

**५. दुकानदार :**

ह्यात व्याज देऊन, भांडवल वळवून आणून त्यावर गब्बर होणारे पेढीवाले वा कंपनीवाले वर्ज्य आहेत परंतु उदमी लोकांच्या व मजुरीच्या साहाय्याने जी राष्ट्रीय संपत्ती शेतकऱ्यांनी निर्माण केली व शिपायांनी राखली. तिची देशभर वाटणी होण्यास बिनव्याजी भांडवलवाल्या दुकानदारांची तितकीच जरूरी आहे. हा वर्ग डोईजड होऊन बहुजन समाजाचे रक्त शोषणार नसेल तर यालाही पुढे आणण्यास हा पक्ष पुढाकार घेईल.

**६. मजूर वर्ग :**

ह्यात बाजारभावाने वेतन घेऊन अंगमेहनत करणारेच नव्हते तर बुद्धिचातुर्य लढविणारे वकील, डॉक्टर यांचाही याता समावेश होऊ शकतो. परंतू हा दुसरा वर्ग आपल्या विद्याबळामुळे आपल्या गरजेपेक्षा जास्ती धनसंचय करून अधिकारपदावर सहज जाऊन बसतो. इतकेच नव्हे तर आपल्या विद्येच्या व चळवळ स्वभावाच्या जोरावर बहुजन समाजाचे पुढारीपण ही करतो. असे लोक हे तत्वत: मजूर असले तरी वस्तुत: मागासलेले नसल्याने त्यांची जबाबदारी ही त्यांच्यावरच टाकणे बरे. मजूरही डोईजड झाल्यास त्यांची समजूत घालण्याचा अधिकार बहुजन पक्षाला आहे.

**७. अस्पृश्य वर्ग :**

अस्पृश्यतेमुळे हा वर्ग चिरडला गेला आहे त्यासाठी त्यांना समान दर्जाच्या बहुजन समाजात एकजीव करणे हे या पक्षाचे पवित्र कर्तव्य आहे. पुष्कळशी संधी वादात व मतलबी सहानुभूतीत अगोदरच गेली असल्याने आमच्या पक्षाने सावध राहिले पाहिजे.

**८. स्त्रीवर्ग :**

चालू राज्यक्रांतीत आमच्या देशातील स्त्रीवर्गाच्या हाती काहीच लाभले नाही. आमचापक्ष विदवानांचा नाही, वक्त्यांचा नाही, म्हणून तो थोडेच स्त्रीवर्गाला विसरणारा आहे ? स्त्रीवर्ग तर आमचा पाळणा, त्याची हयगय करू तर पाळण्यातच आमचे थडगे डोलू लागेल. हे आम्ही जाणून आहोत. राष्ट्रहिताची ज्याला चाड आहे त्यांनी आम्हास सहाय्य करावे. (माझ्या आठवणी व अनुभव – शिंदे विठ्ठल रामजी, पृ. ३०७ व ३०८ – लेखन वाचन भांडार, पुणे, १९५८).

म. शिंद्यांनी जातीय राजकारणाला फाटा देऊन वर्गिय आधारावर बहुजन पक्षाची रचना केली. ही वर्गिय रचना कॉंग्रेस पक्षाला देता आली नाही असे त्यांचे मत होते. पक्षाची त्यांची ही रचना वर्गिय असली तरी ती साम्यवाद व हिंसक क्रांतीवर विश्वास ठेवणारी नव्हती. म. शिंदे स्वत:ला मराठा समाजाऐवजी बहुजन समाजाचा नेता मानत होते. बहुजन समाजाचा विकास व त्यांचा या लोकशाहीत नेतृत्वासाठी व्यापक सहभाग म. शिंद्यांना महत्त्वाचा वाटत होता.

म. शिंद्यांची ही व्यापक भूमिका मराठा समाजातील काही नेत्यांना आवडली नाही. छ. शाहूंनी मात्र म. शिंद्यांचे प्रतिस्पर्धी न. चिं. केळकरांवर टीका करून ३० ऑगस्ट १९२० रोजी म. शिंद्यांना पाठिंबा दिला. याच काळात छ. शाहूंनी क्षात्रजगतगुरुचे पद तयार केले. म. शिंदे, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील व ना. भास्करराव जाधव यांना हे पद मान्य नव्हते. म्हणून म. शिंद्यांनी छ. शाहूंवर टीका केली. त्यामुळे छ. शाहूंनी त्यांचे दिवाण रा. ब. सबनीस यांचे नातलग वासुदेव गुप्तेंना निवडणूकीत पाठिंबा दिला. अर्थातच म. शिंद्याचा या निवडणूकीत पराभव झाला.

मराठा लीग व मराठा परिषद या दोन संघटनांच्या एकत्रीकरणाबरोबर बहुजन समाजाच्या विकासासाठी म. शिंद्यांनी बहुजनपक्षाची स्थापना केली होती आणि त्यासाठीच त्यांनी ही निवडणूक लढवली होती. परंतु त्यांच्यावर टिका करण्यात आली. कारण महर्षी शिंदेचे उदारमतवादी विचार मराठा समाजातील काहिंना मान्य नव्हते. तर काहिंनी बहुजन पक्षाच्या जाहिरनाम्यातील वर्गीय आंतरविरोधाच्या विचारावरून शिंदे हे साम्यवादाच्या जवळ होते असे म्हटले तर काहिंनी भारतीय कम्युनिष्ट पक्षाचे नेतृत्व करण्याचे आवाहनही केले होते. परंतू शिंदे हे राजकारणात रमले नाहीत. पण बहुजन समाजाच्या हातात राजकारणाची व सत्तेची सूत्रे असल्याशिवाय प्रगती होणार नाही हे ओळखून त्यांनी बहुजन समाजासाठी सत्तेचे राजकारण केले. त्यासाठी आर्थिक पाठबळ हवे असते म्हणून खेडे दुरूस्त करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी हा बहुजन समाजाचा केंद्रबिंदू आहे असे शिंदेना वाटत होते. त्यामुळे इ.स. १९३६ च्या फैजपूर काँग्रेस अधिवेशनानंतर त्यांनी बहुजन समाज काँग्रेसमध्ये म्हणजेच राष्ट्रीय प्रवाहात परावर्तीत केला. महर्षी शिंदेनी महाराष्ट्रात चांदवड, तेरदाळ, भोर, बोरगाव येथे शेतकरी परिषदा घेऊन सावकारी शोषण, सारावाढ, तुकडेबंदी इत्याली संदर्भात शेतकऱ्यांच्यात नव्या जाणिवा तयार केल्या. अस्पृश्य शेतकरी व संस्थानात कसणाऱ्या शेतकऱ्याचे प्रश्न तर आणखी जटील आहेत हे त्यांनी समाजाला सांगितले. एकूणच महर्षी शिंदे यांनी अस्पृश्य, दलित, स्त्री, बहुजन समाज, मराठा, आदिवासी, शेतकरी, कामगार यासर्वांसाठी न्याय देण्यासाठी आणि समता प्रस्थापित करण्यासाठी कार्य केले आहे. त्याच्या बहुजनवादी राष्ट्रवाद हा सर्व गरीब, दलित आणि ब्राम्हणेत्तर जातीचा समावेश असणारा असा राष्ट्रवाद आहे. या बहुजनवादी राष्ट्रवादाच्या माध्यमातून समाजामध्ये जे गरीब, श्रीमंत, उच्च-निच्च असा भेदभाव दूर करून समाजात समतेच्या आधारावर समाज प्रस्थापित करण्याचा प्रयत्न विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला आहे आणि धर्माची कल्पना स्पष्ट करताना सर्व धर्मांना समान मानून कोणत्याही धर्माचा द्वेष न करता एकमेकामध्ये मिसळून राहण्याचा सल्ला महर्षी शिंदेंनी दिला आहे हा विचार समाजामध्ये जातीय सलोखा निर्माण होण्यास उपचुक्त आहे.

### ४.२.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**जीवन परिचय :**

मध्यप्रदेशातील महू या गावी १४ एप्रिल, १९९१ रोजी आंबेडकरांचा जन्म एका मागास कुटुंबात झाला. हिंदूमधील पूर्वास्पृश्य महार जातीत आंबेडकर जन्मले. त्यांचे आजोबा मालोजी सपकाळ हे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्याचे रहिवासी होते. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव भीमाबाई असे होते. त्यांचे अजोबा आणि वडिल सैन्यात नोकरीला होते. वडील रामजी सैन्यात चढत चढत सुभेदार मेजर झाले. इतरांच्या तुलनेत सपकाळ कुटुंबाची आर्थिक स्थिती बरी होती. आंबेडकरांचे सुरूवातीचे प्राथमिक शिक्षण दापोलीला नंतर सातारा येथे झाले. माध्यमिक शिक्षण मुंबईच्या एलफिस्टन हायस्कूल मध्ये झाले. १९०७ मध्ये ते दुसऱ्या वर्गात मॅट्रिकची परीक्षा उतीर्ण झाले. एलफिस्टन कॉलेजमधून १९१२ मध्ये बी.ए. ची परिक्षा उतीर्ण झाले. सयाजीराव गायकवाड यांनी आंबेडकरांचे आपल्या संस्थानातील दलामध्ये लॅफ्टनंट म्हणून नेमणूक केली तेथेही त्यांच्यावर मानहानीचे प्रसंग आले. मात्र गायकवाडांनी त्यांना शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेतून जुन १९९३ मध्ये शिक्षणासाठी पाठविले. त्यांनी तेथे दोन वर्षे शिक्षण घेऊन अर्थशास्त्रात एम.ए. पदवी प्राप्त केली. कोलंबिया विद्यापीठाने त्यांना ‘प्राचीन भारतातील व्यापार’ या विषयावर प्रबंधासाठी ही एम.ए. पदवी १९१४ मध्ये दिली.

१९१६ मध्ये डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी करताना ‘भारतातील राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथ: करणाऱ्या परिशीलन या प्रबंध सादर केला. या प्रबंधास पुढे पीएच.डी. ही पदवी मिळाली. १९१८ साली मुंबई येते अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून महाविद्यालयात नोकरी केली. १९२० मध्ये लंडन विद्यापीठास प्रबंध सादर करून एम.एस्सी. ९इकॉनॉमिक्स) ही पदवी संपादित केली. १८२२ साली लंडन विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी दिली. १९२२ साली कायदा व निर्बंधशास्त्र विषयात बॅरिस्टरची पदवी संपादित केली.

१९२३ सालापासून सामाजिक राजकीय कार्यात प्रवेश केला. २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकणी सभेची स्थापना केली. २० मार्च १९२६ रोजी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह. २० मार्च १९३० रोजी नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा सुरू केला. हिंदू समाजरचनेत सुधारणा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश येत नव्हते या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी १९३५ मध्ये येवला या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केली केली १९३६ मध्ये जातीप्रथेचे निमूर्लन हा ग्रंथ प्रकाशित झाला १९३६ मध्येच स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना डॉ. आंबेडकरांनी केली. १९३७ च्या मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणूकीत डॉ. आंबेडकरांच्यासह स्वतंत्र मजूर पक्षाचे तेरा उमेदवार निवडून

आले. १९४६ मध्ये सिद्धार्थ महाविद्यालय सुरू केले. १९४७ मध्ये मध्ये मसुदा समितीच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. घटनानिर्मितीमध्ये अमुल्य योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दिले. १९५० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली.

१९५४ मध्ये रंगून येथे झालेल्या जागतिक धम्म परिषदेला त्यांनी संबोधित केले. येवला या ठिकाणी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेप्रमाणे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. अशा महामानवाचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानर्विन झाले.

**डॉ. आंबेडकरांचे कार्य :**

डॉ. आंबडेकरांनी समाजामधील अनेक गोष्टींची चिकित्सा करून समाजामध्ये स्वातंत्र्य समता न्याय बंधुता प्रस्थापित करण्याचे कार्य केले आहे. त्यांनी जे कार्य केले ते बहुजनाचा राष्ट्रवाद जातीय सलोख्याच्या बाजूने चर्चा करणे क्रमप्राप्त ठरेल.

**१) आंतरजातीय विवाहास प्राधान्य :**

भारतीय समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी दलित शोषित, पिढीत समाजाचे शोषण थांबविण्यासाठी जातीव्यवस्था नष्ट करणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आंतरजातीय विवाहस प्रोत्साहन दिले. त्यामुळे जाती नष्ट होईल असे वाटत होते तसेच त्याच्यामध्ये एकतेची भावना निर्माण होईल.

**२) स्वातंत्र्य समता तत्वाचा पुरस्कार :**

भारतातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे राजकीय स्वातंत्र्य सामाजिक स्वातंत्र्य असले पाहिजे ज्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास होऊ शकतो त्याच बरोबर समता असणे आवश्यक आहे. कारण समाजामधील जी विषमता आहे त्यामुळे लोकशाही दिसू शकत नाही त्यामुळे समाजात समता प्रस्थापित करणे आवश्यक आहे. समता असेल तर स्वातंत्र्य उपभोगता येते अन्यथा स्वातंत्र्याला काहीच अर्थ उरत नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी घटना तयार करताना प्रथम १४-१८ कलमामध्ये समतेचा हक्क दिला आणि नंतर १९-२२ मध्ये स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे.

**३) धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार :**

आंबेडकरांच्या मते धर्म हा मानवी आयुष्याचा आणि समाजाचा सार्वजनिक पाया आहे कारण धर्म ही नीतीमतेची बाब आहे आणि नैतिक अधिष्ठानाशिवाय मानवी समाज म्हणून समाज जिवंत राहू शकत नाही. त्याची धर्माची धारणा अशी आहे की, सुसंवादी आयुष्याचे समर्थन

करण्यासाटी धर्म ही एक नीतिमूल्याची बंधने आणि प्रतिबंधाची प्रणाली आहे. सुसंवादी आयुष्य म्हणजे सर्व सदस्यामध्ये असलेली समता व बंधुत्वाची भावना होय. म्हणून डॉ. आंबेडकरांना प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य असणे आवश्याक आहे. कोणत्याही धर्मावर अन्याय न करता प्रत्येकाच्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार असला पाहिजे. प्रत्येकाच्या धर्माचा आदर केला पाहिजे असे महत्त्वाची भूमिका डॉ. आंबडेकरांनी घेतली होती.

**४) स्त्रियांच्या उन्नतीसाठीचे प्रयत्न :**

भारतीय समाजामध्ये स्त्रियांना अत्यंत हीन शूद्रातिशूद्र दर्जाची वागणूक मिळत होती. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी अन्यायी व स्त्रियांचे जीवन उध्वस्त करून टाकणाऱ्या मनुस्मृतीचा दहन केला. त्यानंतर त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्याविषयी जागृती करण्यासाठी अनेक ठिकाणी वेगवेगळ्या भागामध्ये महिला परिषदा घेतले. याद्वारे त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रीयांना शिक्षणास प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. त्यासाठी त्यांनी महात्मा फउलेंनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेला प्रोत्साहन केले. स्त्रीयांनी शिक्षण घेतले पाहिजे यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर स्त्रियांवर बाळंतपणाचा त्रास कमी व्हावा यासाठी कुटुंब नियोजनांचे तत्व सांगून त्यास प्रोत्साहन केले. स्त्रिया कामगार म्हणून काम करताना त्यांना पुरूषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, बाळंतपणाची रजा मिळावी, महिलांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघर असावे यासाठी सवलती देण्याचे कार्य केले. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा, वारसा हक्क लावण्याचा वडीलांच्या संपत्तीत वाटा मिळण्यासाठी कायदा करण्याचा प्रयत्न केला अशाप्रकारे स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे डॉ. आंबेडकरांनी केले आहेत.

**५) अस्पृश्यता निवारण :**

डॉ. आंबेडकरांनी समाजातील अस्पृश्यता निवारण्याचा कार्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. समाजामध्ये अस्पृश्यता पाळले जाते. या विरोधात अनेक चळवळी उभ्या केल्या. १९२३ साली महाड येथील चवदार तळ्याचे सत्याग्रह केले त्यामुळे त्यांनी अस्पृश्यता पाणी पिण्याचा हक्क नाकारले जात होते ते नष्ट करण्यासाठी केले. अस्पृश्य समाजाला मंदिरात प्रवेश दिला जात नव्हता त्यामुळे आंबेडकरांनी ३ मार्च १९३० रोजी नाशिक येथील काळाराम मंदिरात आठ ते दहा हजार नागरिकांसह प्रवेश केला. अस्पृश्यासाठी हिनतेचे वागणूक देणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्याच्या हक्कासंबंधी व मुंबई प्रांतात अस्पृश्यांना कोणते राजकीय हक्का असावेत असे दोन खलिते सायमन समितीला पाठविले. या समितीने अस्पृश्यांना राजकीय हक्क असावेत अशी शिफारस केली.

त्याचबरोबर महार वतन रद्द करण्यासंबंधी कायदेमंडळात महार वतन बील मांडले. अशाप्रकारे समाजातील अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य केले.

**६) शैक्षणिक कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनामध्ये शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. शिक्षणाने माणसाला आपल्या हक्काची जाणीव होते. शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे ते पिल्यावर गुरगुरल्या शिवाय रहात नाही म्हणून समाजातील अस्पृश्य, दलित आदीवासी इत्यादी सर्व घटकांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांनी स्वत: पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून गरीब दलित लोकांना शिक्षणाची द्वारे खुली करून दिली. त्याचबरोबर त्यांनी स्त्री शिक्षणाला ही महत्त्वाचे मानून स्त्रीयांना शिक्षणास प्रोत्साहन केले आहे.

**७) अल्पसंख्यकांना संरक्षण :**

डॉ. आंबेडकरांनी बहंसंख्यकांनी अल्पसंख्यकांवर अन्याय करीत असतात. बहुसंख्यकांचे इच्छेप्रमाणे अल्पसंख्यकांवर राज्य केले जाते. त्यामुळे अल्पसंख्यकांना संरक्षण दिले पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे. त्यामुळे जाती जातीतील संघर्ष कमी होईल नाहीतर एका विशिष्ट जातीचे बहुमत निर्माण होईल आणि हे जातीय बहुमत इतर अल्पसंख्य जातीतील लोकांपासून त्याचे हक्क हिरावून घेईल त्यामुळे अल्पसंख्यकांना संरक्षण देणे गरजेचे आहे. जातीय सलोखा निर्माण करताना भारतातील हिंदू मुस्लिम ऐक्याबरोबरच जातीजातीमधील ऐक्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**८) हिंदू मुस्लिम ऐक्यासंबंधीचा विचार :**

आंबेडकरांचा जन्म अस्पृश्य म्हणून झाल्यामुळे त्यांना अनेक यातना भोगाव्या लागल्या. हिंदूधर्मामध्ये अस्पृश्यांना हिन वागणूक देत होते. त्यामुळे हिंदू धर्माबद्दल आंबेडकरांना एक प्रकारे चीड होती. त्यातच भारतामध्ये १९४० च्या दरम्यान धर्मावर आधारीत पाकिस्तानची मागणी होऊ लागली त्यावेळी आंबेडकरांनी पाकिस्तान ऑर द पार्टिशन ऑफ इंडिया हा ग्रंथ लिहिला. त्यांनी हे पुस्तक पाकिस्तानचे समर्थन करण्यासाठी किंवा पाकिस्तानला विरोध करण्यासाठी नव्हे तर ही गुंतागुंतीची बाब समजावून घेण्यासाठी लिहिले होते. एकाच प्रदेशात राहणारे हे परस्परविरोधी आहेत त्यामुळे प्रत्येक देशात अल्पसंख्यकांच्या अधिकारांचा प्रश्न महत्त्वाचा असतो व एकदा आपण राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य केला की तो आपणास इतरांनाही द्यावा लागतो. कारण आधुनिक काळात बहुसंख्य असणारे मोठे समाजामध्ये अल्पसंख्य समाज सामील होवू इच्छित नाही. त्यांना त्याचा

स्वतंत्र्य देश हवा असतो. त्यामुळे मुस्लिमांच्या मनात नवी राजकीय आकांक्षा निर्माण झाली आहे. भारतातील हिंदू नेत्यांना भारत एकत्र ठेवायचा असेल तर त्यांना अनेक बाबतीत तडजोडी कराव्या लागतील पण अशा तडजोडी करावयास हिंदू तयार होणार नाहीत कारण हिंदू समाजात अनेक फुटीरवादी प्रवृत्ती असून वेगवेगळ्या भाषिक समाजात परस्परद्वेषाची भावना आहे उत्तर व दक्षिण भारतातील राज्यात मतभेद आहेत. फुटीरपणाची व वेगवेगळेपणाची हिंदूची प्रवृत्ती असल्यामुळे केंद्रसरकारला आव्हाने मिळत राहतील आजही प्रवृत्ती सुप्त अवस्थेत असली तरी ाज ना उद्या ती प्रकट होणार आहे म्हणून हिंदू नेते तडजोडीस तयार नाहीत. बाबासाहेबांच्या मते संसदीय लोकसाहीत देखील बहुमताची हुकुमशाही असू शकते. म्हणून अल्पसंख्यकांना योग्य असे संरक्षण मिळाले पाहिजे असा त्याचा आग्रह होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सक्तीपेक्षा सामोपचाराला प्राधान्य देत अखंडतेचा आग्रह धरण्यापेक्षा फाळणी करणे अधिक योग्य ठरेल असा निर्वाळा दिला. त्यांच्या मते मुक्तिसाठी धर्माला सर्वाधिक महत्त्व दिल्यामुळे समाजसुधारणेला फारसे महत्त्व दिले नाही. त्यांना कितीही सांगितले तरीही त्याचा विचार बदलणार नाहीत म्हणून त्यांना समजावण्यात शक्ती खर्च करण्यापेक्षा पाकिस्तनच्या निर्मितीला हिंदूनी मान्यता द्यावी अशी भूमिका आंबेडकरांनी घेतली. असे असले तरी डॉ. आंबेडकरांनी अखंड भारताच्या भूमिकेला प्राधान्य दिले पण अशा भूमिकेचे किंवा सक्तीने अखंडता टिकवायचा प्रयत्न केला तर त्यातून फारसे काही हाती लागणार नाही अशी त्यांची मांडणी होती.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन राष्ट्रवादामध्ये शुद्रातिशुद्र अस्पृश्य स्त्रीया, मुस्लिम यांचा समावेश करतानाच जातीय सलोखा निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले आहे. त्यामुळे भारतातील जाती जातीतील संघर्ष धर्माधर्मामधील संघर्ष मिटविणे डॉ. आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे आहेत. कारण वारंवार जातीय दंगे घडताना दिसतात. त्यामुळे जातीव्यवस्था नष्ट करणे हा आंबेडकरांचा उपाय आहे. गेल्या सत्तर वर्षातील भारतातील जातीय राजकारण आणि भारत पाकिस्तान यांच्या संबंधाचा आढावा घेतला तर डॉ. आंबेडकरांची भूमिका रास्त आणि योग्य होती.

## सारांश :

बहुजन राष्ट्रवाद आणि जातीय सलोखा या संकल्पनाचा अभ्यास केल्यानंतर त्या अनुषंगाने भारतातील अनेक समाज सुधारकांनी व राजे विचारवंतानी केलेले कार्य महत्त्वाचे आहे. महात्मा ज्योतीबा फुले यांनी समाजातील शुद्रातिशुद्र दलित स्त्रीया यांना भारतीय राष्ट्रवादामध्ये कोणतेही स्थान नाही त्यामुळे तो राष्ट्रवाद उपयोगी नाही म्हणून ब्राह्मण विरोधी बहुजनाचा राष्ट्रवाद मांडला. शाहू,

सयाजीराव गायकवाड, वि. रा. शिंदे आणि डॉ. आंबेडकरांनी त्याच्या या बहुजन राष्ट्रवादाचा विकास केला आहे. त्यातून आज बहुजनवाद ही संकल्पना उदयास आल्याची दिसते. बहुजन वादाबरोबर जातीय सलोखा हा विषय आज भारतात गंभीर रूप धारण केले आहे. कारण भारतामध्ये वारंवार हिंदू मुस्लिम दंगे घडरले जातात. त्यामुळे भारताच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो. या दंग्यामुळे समाजामधील निष्पाप लोकांचा बळी जातो त्यामुळे समाजामध्ये जमातवादी संघटना तयार होतात त्यातून दहशतवाद निर्माण होते. एकूणच या सर्व गोष्टींचा विचार केला तर जातीय सलोखा गरजेचे आहे.

महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, वि. रा. शिंदे व डॉ. आंबेडकर यांनी समाजामध्ये जे कार्य केले आहे त्यातून जातीय सलोखा निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळते कारण महात्मा फुले यांनी समाजातील स्त्री अस्पृश्यता निवारण, सामाजिक समता, गुलामगिरी नष्ट करणे इत्यादी गोष्टी समाजात रूजविण्याचे कार्य केले त्याच बरोबर शाहू महाराजांनी समजातील अस्पृश्यांना शिक्षणाची दारे खुली करून दिले. स्त्रीयांच्या जीवनाच्या विकासासाठी अनेक कायदे करण्याचे कार्य केले. त्याचबरोबर सयाजीराव गायकवाड यांनी ही शिक्षण, अस्पृश्यता निवारण, स्त्रीमुक्तीचे कार्य केले आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांनी धर्मकल्पना, स्त्रिविषयक विचार मांडून समाजामध्ये जातीय सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला व बहुजनपक्ष स्थापन करून बहुजनवादी संकल्पनेचा विकास केला आहे आणि डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना करून अस्पृश्यता निवारणाचे काम केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वाचे कार्य करून समाजामध्ये जातीय सलोखा करण्याचा प्रयत्न केला. या सर्व कार्याची सुरूवात फुलेंनी केला, शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांनी आपआपल्या राज्यामध्ये त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली आणि डॉ. आंबेडकरांनी फुले, शाहू, सयाजीराव यांच्या कार्याने प्रभावीत झाले होते. त्यांनी स्वतंत्र भारतामध्ये हे कायदे नियम स्त्री उद्धाराचे कार्य या सर्व गोष्टी भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करून ते समाजात निर्माण करण्यासाठी मोठे योगदान दिले.

एकूणच बहुजन राष्ट्रावादामध्ये मागास जाती वर्ग, स्त्रिया आणि उच्च वर्गातील जे पुरागामी विचार करणाऱ्या जातीचा हि समावेश होतो. पार्थ चटर्जी यांनी बहुजन राष्ट्रवादाचा विचार मांडताना त्यांनी यासर्व मागास जाती व वर्ग यांचा समावेश असतो असे सांगितले. सत्तेमध्ये मागास जाती, शेतकरी, कामगार, स्त्रिया, अनुसूचित जाती व जमाती यांचा विकास झाल्याशिवाय बहुजन राष्ट्रवाद प्रस्थापित करणे शक्य होणार नाही. त्यामुळे या सर्व जाती, जमातींना तसेच वेगवेगळ्या घटकांना सत्तेमध्ये सामावून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांना शिक्षणाच्या सोयी सुविधा मिळाव्यात त्याचा विकास व्हावा त्यांना सत्तेत वाटा मिळावा इत्यादी सर्व गोष्टीचा विचार बहुजन राष्ट्रवादामध्ये समावेश करावा. त्यांना सत्तेत आणि सरकारी नोकरीत योग्य वाटा मिळावा.

## ४.३ पारिभाषिक शब्द व त्याचे अर्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बहुजनवाद | : | समाजातील बहुसंख्य ब्राह्मणेत्तर मागास जाती व वर्ग, स्त्रिया व स्वातंत्र्य, समता, बंधुत्त्व या तत्त्वांवर विश्वास ठेवणारा विचार. |
| २. | बहुजनराष्ट्रवाद | : | राष्ट्रवादाचा विचार करताना सर्व दलित अस्पृश्य, स्त्रिया, मागास वर्ग या सर्वांच्या हितास प्राधान्य देणारा समतावादी राष्ट्र विचार. |
| ३. | जातीय सलोखा | : | धर्मा धर्मा मधील व जाती जाती मधील संघर्ष कमी करून त्यांच्यात बंधुभाव व सलोखा निर्माण करणे. |

## ४.४ स्वाध्यायासाठी प्रश्न.

१. बहुजन राष्ट्रवाद ही संकल्पना स्पष्ट करा.

२. जातीय सलोखा उदहरणासह चर्चा करा.

३. महात्मा फुले यांचे बहुजनराष्ट्रवाद व जातीय सलोखासंबंधी केलेल्या कार्याची चर्चा करा.

४. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्याची चर्चा करा.

५. सयाजीराव गायकवाड यांनी समाजसुधारणेसाठी घेतलेल्या भूमिका स्पष्ट करा.

६. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बहुजन पक्षाची चर्चा करा.

७. डॉ. बाबासाहेब ओंबडकरांच्या समाजसुधारणा व जातीय सलोखा यावर चर्चा करा.

## ४.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. रणसुभे, सूर्यनारायण (संपा), सामाजिक समतेचा प्रवाह, द. युनिक फौंडेशन, पुणे, २०१९.

२. पळशीकर, सुहास, समकालीन भारतीय राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.

३. चौसाळकर अशोक, भारतीय राष्ट्रवादा पुढील आव्हाने, राज्यशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००७.

४. सुमंत, यशवंत, विचारसरणीच्या विश्वात, युनिक ॲकॅडमी, पुणे, २०१८.

५. भोळे, भा.ल., महात्मा जोतीराव फुले, साहित्य अकादमी, दिल्ली, २०१७.

६. पवार/वरोकर, महात्मा जोतीराव फुले, पदमगंधा प्रकाशन, पुणे, २०१५.

७. पवार, जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन कार्य, अरूंधती प्रकाशन, कोल्हापूर, २०१४.

८. भांड बाबा, महाराजा सयाजीराव गौरवगाथा, युगपुरूषाची, उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २०१७.

९. राव राघवेंद्र, बाबासाहेब आंबेडकर, साहित्य अकादमी, दिल्ली, २०१७.

१०. भोळे भा.ल. आधुनिक महाराष्ट्रातील विचारवंत, युनिक ॲकाडमी पब्लिकेशन्स, पुणे, २०१९.

११. पवार गो. मा. विठ्ठल रामजी शिंदे, साहित्य अकादेमी, दिल्ली, २०००.

❋❋❋